श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६४
**श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग**
**(श्रीदासरामकृत अर्थासह)**

**प्रकाशक** : **श्री.रघुनाथ शरद आपटे**
९८/१, रुणवाल पॅराडाईज,
बिल्डिंग-डी,फ्लॅट नं.८,भुसारी कॉलनी,
कोथरुड,पूणे- ४११०३८
मो.- ९८२२२८९३३५

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०१६

**प्रकाशन दिन** : फाल्गुन शु.१० शके १९३७
शुक्रवार दि.१८/३/२०१६
प.पू. श्रीमामामहाराज केळकर जयंती

© श्री.दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ६४

# श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग

**(श्रीदासराममहाराज केळकर कृत अर्थासह)**

ॐ

◆ संपादक ◆

**प्रा.डॉ.के.वा.आपटे**

◆ प्रकाशक ◆

**श्री. रघुनाथ शरद आपटे**

आवृत्ति पहिली    सांगली    इ.स. २०१६

## श्रीराम

भगवान श्रीसद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे अभंग गाथ्यातील अभंगाचा अर्थ लिहण्याचे काम माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज यांनी हाती घेतले होते. २७१ अभंगाचा अर्थ त्यांचा लिहून झाला. सदरचे अभंग आणि त्याचा अर्थ आमच्या श्रीदासराम महाराजांचे कृपांकित कै.शरद वामन आपटे तथा आमचे शरद काका यांनी लिहून ठेवला आहे.

'' ज्ञानबाची मेख आणि तुकोबाची खुंटी'' अशी अध्यात्मात म्हण आहे. दोन्हीचा अर्थ साधारणपणे एकच आहे. हे सगळे न सुटणारे कोडे आहे. श्रीगोकुळअष्टमीच्या उत्सवातील कीर्तनामध्ये भगवान श्रीगोपाळकृष्णाच्या बाबतीत असणारा '' नवल केवढे केवढे । नकळे कान्होबाचे कोडे । असा जगद्गुरु श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगातील एक चरण आमचे श्रीदादा उधृत करीत असत. आणि यापुढे जाऊन सांगत हे जसे कान्होबाचे कोडे आहे. तसे जगद्गुरु श्रीतुकाराममहाराजांचे '' माझे दंडवत तुम्हा सर्व लोका । देहासहीत तुका वैकुंठासी '' हे फार मोठे कोडे आहे. अशा अनेक खुंट्या /अनेक मेखा ज्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंगातुन आहेत. त्यांच्या २७१ अभंगाचा अर्थ आमच्या श्रीदादांनी सांगितला असल्याने आमच्या सारख्या अध्यात्मप्रेमी व श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या भक्तांचेवर फार मोठे उपकार झाले आहेत.

श्रीदादांनी सांगितलेल्या अर्थामध्येही श्रीदादांचे फार मोठे वैशिष्ट्य जागोजागी दिसून येत आहे. ही सगळी कोडी आम्हालाही थोडी फार उलगडली जावीत आणि त्याचा आनंद आम्हाला घेता यावा, अशी भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरणी प्रार्थना करतो.

शेवटी भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर,माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अभिवादन करून येथेच थांबतो.

।। पुंडलिका वरदे हरि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम ।
पार्वती पते हरहर महादेव श्रीगुरुदेव दत्त ।।

।। राजाधिराज सद्गुरूनाथ महाराज की जय ।।

सांगली
दि.७/२/२०१६

**श्रीदादांचा कृपाभिलाषी**
चंद्रशेखर
(चंद्रशेखर रामराय केळकर)

---

**मेख – तुकाराम बोवाची मेख – न सुटणारे कोडे**
**खुंटी – लहान खुंटा**

# प्रस्तावना

सांगली नगरीत श्री मामा महाराज केळकर हे साक्षात्कारी संत होऊन गेले. ते बालपणापासूनच श्री ज्ञानेश्वरांचे भक्त होते. ''बाप्पा ज्ञानिया रे । येई येई जीव जीवना योगिया रे '' हे भजन ते तल्लीन होऊन म्हणत असत. विवाह न करता परमार्थ करीत रहावे असा त्यांचा विचार होता. जेव्हा त्यांच्या माता-पित्यांनी त्यांना विवाहाचा आग्रह करण्यास प्रारंभ केला, तेव्हा श्री मामा महाराज त्यांना म्हणाले ''मी आळंदीस जातो आणि ज्ञानेश्वर महाराजांना कौल लावतो. त्यांनी जर माझ्या विवाहास अनुज्ञा दिली तर मी विवाह करीन.'' माता-पित्यांची अनुज्ञा घेऊन श्री मामा महाराज आळंदीस गेले आणि तेथे त्यांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची पारायणे सुरु केली. ही पारायणे पूर्ण होताच ऐके दिवशी ज्ञानेश्वर महाराज मामा महाराजांच्या पुढे साक्षात प्रकट झाले आणि विवाह कर आणि प्रपंच करताना परमार्थ कर. तुझा परमार्थ पूर्ण होईल अशी खात्री मी तुला देतो.'' हे ज्ञानेश्वर महाराजांचे वचन प्रमाण मानून मामा महाराज सांगलीत परतले. मग वडिलांनी पसंत केलेल्या मुलीशी विवाह करून, ते प्रपंचात राहूनच परमार्थ करु लागले.

श्री मामा महाराजांचे श्रेष्ठ चिरंजीव म्हणजेच श्री दासराम महाराज ऊर्फ श्री दादा हे होत. आपल्या पिताजींची ज्ञानेश्वर भक्ती ही पुरेपूर श्री दादांच्या अंगी उतरली होती. आणि या भक्तीमुळेच श्री दादांचे हातून ज्ञानेश्वर महाराजांच्या अनेक लहान मोठ्या ग्रंथांवर आणि अभंगांवर लेखन झाले. या लेखनाचा तपशील पुढीलप्रमाणे देता येईल.

(१) ज्ञानदेव तेहत्तिशी या मार्गावरील ग्रंथावर त्यांनी विवरणात्मक सानंद नावाची टीका लिहिली. (२) मुद्राक्रम हा ग्रंथ भौगिक मुद्रा सांगणारा आहे. त्यावर श्री दादांनी ओवीबध्द टीका लिहिली. ती 'मुद्राप्रकाश' या शीर्षकाखाली प्रकाशित झाली. (३) ज्ञानदेव आज्ञापत्र आणि (४) ज्ञानदेव कृत नमन स्त्रोत्र या ग्रंथावरही श्री दादांनी लेखन केले. (५) ज्ञानेश्वरीवर त्यांचे 'ज्ञानेश्वरीसार' उपलब्ध आहे. तसेच (६) ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाचे गद्य रुपांतरही त्यांनी केले आहे. (७) उत्तरगीता नावाच्या संस्कृत ग्रंथावर ज्ञानेश्वर महाराजांची ओवीबध्द टीका आहे. तिचे गद्य रुपांतर श्री दादांनी केले. (८) ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभव ग्रंथाच्या संस्कृतमधील मंगल श्लोकांचे विवेचनही लिहिले. इतकेच नव्हे तर (९) संपूर्ण अमृतानुभव ग्रंथाचा सम-ओवीत अनुवाद केला. (१०) ज्ञानेश्वर महाराजांच्या चांगदेवपासष्टी नामक ग्रंथावर त्यांचे विविध लेखन आहे. त्यातील श्री चांगदेव पासष्टी - एक नामकळा हे खूप विस्तृत लेखन आहे. (११) ज्ञानेश्वर महाराजांचा हरीपाठ हा लघुग्रंथ फारच लोकप्रिय आहे. यावर श्री दादांचे पुढीलप्रमाणे लेखन आहे. (अ) हरीपाठाच्या प्रत्येक चरणाचा भावार्थ श्रीदादांनी गद्यात लिहिला आहे. तो ज्ञानदेव तेहत्तिशी या ग्रंथात प्रकाशित झाला. (ब) हरीपाठाचा भावार्थ सांगणारा ''भावार्थ हरीपाठ'' श्री दादांना स्फुरला , तो त्यांनी लिहून काढला. तो ''श्री दासराम गाथा'' या ग्रंथात उपलब्ध आहे. (क) हरीपाठाचा भावार्थ श्री दादांनी श्लोकबध्द केला. त्याचे नांव 'सुश्लोक हरीपाठ' तो ''श्लोक रचना'' या ग्रंथात प्रसिध्द झाला. (ड) असे दिसते की ज्ञानदेव कृत हरीपाठाचे अत्यंत सविस्तर विवेचन श्री दादांना करावयाचे होते, आणि तसे त्यांनी सुरुही केले होते. हरीपाठाच्या पहिल्या काही अभंगांचे सविस्तर विवरण त्यांच्या हस्तात आढळते. पण पुढे काय कारण झाले हे कळण्यास मार्ग नाही. हे विस्तृत विवरण पूर्ण न होता ते अपूर्णच राहिले. तथापि, येथे हे नमूद करावेसे वाटते की श्री दादांची हरीपाठावर जी कीर्तने होत, त्यांचे सारांश कथन श्री दादांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अनिलप्रभू केळकर यांनी केले आणि ते ''हरीपाठ संकीर्तन'' या शीर्षकाखाली प्रसिध्द झाले. (ज्ञानेश्वरांच्या हरीपाठाची महती गाणाऱ्या आरत्या श्री दादांना स्फुरल्या, त्या ''आरती संग्रह'' या ग्रंथात प्रकाशित झाल्या आहेत.)

श्री ज्ञानेश्वर महाराजांचे १००१ अभंग हे त्र्यंबक हरी आपटे या भाविक गृहस्थांनी शके १८३० मध्ये प्रकाशित केले होते. त्यातील ''पैल मेरुच्या शिखरी'' (अभंग क्रमांक ७३३) या अभंगात दत्तात्रेयांचे नांव आहे. या अभंगाचे श्रीदादांनी केलेले स्पष्टीकरण ''दत्त स्तुती'' या ग्रंथात प्रसिध्द झाले आहे. याच ग्रंथात अभंग क्रमांक ७५२ या ॐकार अक्षर या नावाखाली दिलेला आहे. हा अभंग अत्यंत अवघड आहे. त्याचे गद्य भाषांतर श्री दादांनी लिहिले आहे व ते प्रसिध्दही झाले.

असे दिसते की ज्ञानेश्वर महाराजांच्या संपूर्ण १००१ अभंगांचा अर्थ श्री दादांना लिहावयाचा होता. पण तसे घडले नाही. श्री दादांनी लिहिलेल्या सुमारे २७१ अभंगांचा अर्थ आज उपलब्ध आहे, पण तो त्यांच्या हस्ताक्षरातील नाही. त्याची जी प्रत श्री दादांचे भक्त श्री. शरद वामन आपटे यांनी केली असे श्री. दीपक चंद्रशेखर केळकर सांगतात, ती त्यांच्या हस्ताक्षरात उपलब्ध आहे. तीच प्रसिध्द करण्याचे श्री. दीपक यांनी ठरविले आहे. आणि ती संपादित करण्यास त्यांनी मला सांगितले. तसा प्रयत्न मी येथे केला आहे.

वर म्हटल्याप्रमाणे या २७१ अभंगांचा अर्थ संग्रहीत असणारी श्री दादांची वही अथवा कागद आज उपलब्ध नाहीत. त्यामुळे श्री दादांनी किती अभंगांचा अर्थ लिहिला होता हे आज कळण्यास मार्ग नाही. श्री. शरद आपटे यांनी १६४ फुलस्केप कागदांवर हा अर्थ लिहिलेला आहे. त्यात शेवटचा अभंग २७३ हा पुढीलप्रमाणे आहे :-

**(२७३)**

रुप सामावले दर्शन ठाकले । अंग हरपले तेचि भावे ।।१।।
पाहो जाय न व पहाण्या वेगळे । ते सुख सोहळे कोण बोले ।।२।।
जेथे जाय तेथे मौन्यची पडिले । बोलवेना पुढे काय करु ।।३।।
सारिता ना संगम ओरू ना भ्रम । नाही क्रिया कर्म तैसे झाले ।।४।।
जाणो जाय नव जाणवी भर सारिखे । नवल विस्मये कवण सांगो ।।५।।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलचि अंगी। निवृत्तिराये वेगी दाखविला ।।६।।
तोचि सवरा भरितु रुपनाम रहित । अपरंपार मी तू नीच नवा ।। ७ ।।

या अभंगाचा अर्थ शरद आपटे यांनी लिहिला नल्यामुळे तो अभंग येथे घेतलेला नाही.

श्री. शरद आपटे यांनी लिहिलेल्या त्या प्रतीच्या बाबतीत पुढील गोष्टी लक्षणीय आहेत

१) ज्ञानेश्वरांच्या २७२ अभंगांचा अर्थ दिलेला आहे.
अभंग २७३ मात्र अर्थ रहित नांदविलेला आहे.

२)अभंग २५ नंतर अभंग २६ नाही. त्यामुळे (२७२ -१)
२७१ अभंग राहतात.

३)अभंग ५४ नंतर अभंग ५५ नाही त्यामुळे २७२-१-१=२७०
अभंग होतात.

४)अभंग ९२ नंतर अभंग ९३ नाही त्यामुळे २७२-१-१-१=२६९
अभंग होतात.

५)अभंग १७३ नंतर पुन्हा अभंग १७३ आहे त्यामुळे २७२-१-१-
१+१=२७० अभंग होतात.

६)अभंग १७५ नंतर पुन्हा अभंग १७६ नाही त्यामुळे २७२-१-१-
१+१-१=२६९ अभंग होतात.

७)अभंग २३७ दोनदा आला आहे म्हणून २७२-१-१-
१+१-१+१ = २७० अभंग होतात.

८)अभंग २६६ दोनदा आला आहे म्हणून
२७२-१-१-१+१+१+१ = २७१ अभंग होतात.

याचा अर्थ असा आहे : शरद आपटे यांच्या वहीत जरी २७२ अभंगांचा आकडा आहे, तरी वर पाहिल्याप्रमाणे नसणारे आणि दोनदा येणारे अभंग पाहिल्यावर असे लक्षात येते की शरद आपटे यांच्या वहीत फक्त

२७१ अभंगांचा अर्थ आहे.

हे अभंग व अर्थ छापताना अभंग क्रमांक ओळीने घेतलेले आहेत. त्यामुळे या ग्रंथात एकूण २७१ अभंग आहेत व त्यांचा अर्थ आहे.

श्री दादांनी निवडलेले अभंग :

वर म्हटले की आपटे प्रकाशित गाभापंचकात ज्ञानेश्वर महाराजांचे १००१ अभंग आहेत. त्यातील अभंगच श्री दादांनी घेतले आहेत. त्या क्रमांकाने श्री दादांनी हे २७१ अभंग घेतलेले नाहीत, हे पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होते :-

| अभंग | श्री दादांचा क्रम | आंतरिक्त क्रम |
|---|---|---|
| चिदानंद रुप | २ | ८ |
| सुंदर सुरेख | ६ | १० |
| निष्ठेचे पेरणी | १० | ३३ |
| विज्ञानाचे ज्ञान | २१ | ५० |
| नभ नभाचेनि | २७ | १५ |
| त्रिभंगी देहुडा | ३४ | ६ |
| मन मारुनि | ४५ | १७६ |
| आनु नेणे काही | ७२ | ६४ |
| अठरा दिगंताहुनि | १०२ | ६२६ |
| एकुची एकला | १२२ | ६८७ |
| द्‌वैताद्‌वैत विरहित | १४३ | ६१२ |
| अंती कुळ माझे | १९२ | ६५२ |
| अनुभव खूण | २२९ | १३२ |
| शुद्‌ध मती गती | २५० | १५३ |
| अनुभवे अनुभव | २७१ | १६० |

यावरुन असे दिसते की आपटे प्रकाशित या ७१० अभंगांपर्यंतच्या अभंगातून आपणास पाहिजे ते अभंग श्रीदादांनी निवडून घेतले व त्यांचा गद्यात अर्थ लिहिला.

श्री दादांनी निवडलेल्या अभंगांच्या अर्थांच्या संदर्भात पुढील गोष्ट लक्षात घ्यावी : हा अर्थ असणारी श्री दादांची वही अथवा कागद आज शोधूनही सापडले नाहीत, असे दीपक सांगतात. त्यामुळे श्री दादांनी किती अभंगांचा अर्थ लिहिला होता हे आज सांगता येत नाही. श्री दादांनी निवडलेल्या २७१ अभंगांच्या अर्थाची वही आज उपलब्ध आहे. ती फक्त १६४ फुलस्केप आकाराच्या कागदावर आहे. त्यात २७३वा अभंग लिहिलेला आहे, पण त्याचा अर्थ लिहिलेला नाही. म्हणून तो अभंग येथे घेतलेला नाही. तेंव्हा श्री दादांनी निवडलेले अभंग २७२(२७१) होते की अधिक होते हे आज तरी सांगता येत नाही. ते कसेही असो, श्री दादांच्या या २७२ (=२७१) अभंगाचा अर्थ प्रकाशित करण्याची प्रेरणा श्री. रघुनाथ आपटे यांना झाली व त्याप्रमाणे प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित होत आहे.

ज्ञानेश्वर महाराजांच्या या २७१ अभंगांचा अर्थ जो श्री दादांनी लिहिला आहे त्याबद्दल थोडे सांगणे आवश्यक आहे. :- श्री दादा हे आत्मसाक्षाकारी श्रेष्ठ संत होते. त्यांनी आपल्या स्वानुभवाचा वापर हा अर्थ करताना केलेला दिसतो. आणखी असे की अभंगाचा अर्थ देताना अधून मधून श्री दादांनी काही स्पष्टीकरणेही जोडलेली आहेत. त्यामुळे हे भाषांतर इतरांच्या भाषांतरापेक्षा वेगळे झाले आहे हे जाणवते.

**के. वा. आपटे**

**श्रीदासराममहाराज केळकर कृत**

# अर्थासह
# श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे निवडक अभंग

**(१)**

**रूप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी ।।१।।**
**तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।२।।**
**बहुता सुकृतांची जोडी । म्हणुनि विठ्ठली आवडी ।।३।।**
**सर्व सुखाचे आगरू । *बापरखुमादेविवरु* ।।४।।**

बुद्धीला डोळ्यामधे रूपाची प्रचीती घेताच सुख झाले. तोच हा आणि हाच तो विठ्ठल आणि माधव चांगला आहे. मोठीच पुण्याईची जोड झाल्यामुळे विठ्ठलाची आवड निर्माण झाली. श्रीरुक्मिणीदेवीवर विठ्ठलपंत श्रीपांडुरंग हाच सर्व सुखाचा ठेवा आहे.

**(२)**

**चिदानंद रूप चेतविते एक । एकपणे गुणागुणी दावी अनेक ।।१।।**
**आदि अंती गुण सर्वत्र निर्गुण । गुणासी अगुण भासती ना ।।२।।**
**कैसे जाले अरुपी गुणी गुण वृत्ती । सगुण पाहता अंतरले गती ।।३।।**
***बापरखुमादेवीवरु* विठ्ठलु नंदनंदनू । आदि अंतु एकू पूर्ण सनातनु गे माये ।।४।।**

आनंदरूप चैतन्यच एक चेतना देणारे असून एकत्वच गुणागुणांचे योगाने अनेक दाखविते (१) आरंभाला व शेवटाला कोठेही एकच सूत्र असून हे आदि अंत जेथे होतात ते गुणातीत निर्गुणच सर्वत्र आहे. जीवनाचे सूत्राचे मूळ हे अगुण म्हणजे गुणातीत असलेने तेथे कांहीच भासत नाही(२). अरूपाचे ठिकाणी ते अरूप असूनही म्हणजे त्याचे रूप हे ठराविक नसूनही जीवनसूत्राचे ठिकाणी गुणात्मक वृत्ती कशी झाली हाच एक चमत्कार आहे. जीवन सूत्रांसह सगुण दृश्य पहाता पहाता ज्या

गतीवर आपले आयुष्याची वाटचाल होते त्याची स्मृतीच राहिली नाही. गतीला अंतर पडले(३). आदि अंती एक जे परिपूर्ण म्हणून सनातन नंदाचा मुलगा श्रीकृष्ण परमात्माच आहे(४).

(३)

**मन मुरडोनि डोळा लेइले । काळेपणे मिरविले रूप त्याचे ।।१।।**
**बरवे रूप काळे अमोलिक । म्हणोनिया सांगतसे शुद्ध भावे ।।२।।**
***रखुमादेविवरू* अगाध काळे । म्हणोनी सर्वत्र अर्पियेले ।।३।।**

मनाची वृत्तीच जेथे नाही अशा मनाची मुरड झालेल्या स्थितीत शून्यपणाने ज्याचे रूप मिरवले आहे, ते रूपच चांगले असून चंद्रसूर्यात्मक जीवनाच्या गती जेथे लुप्त झाल्या त्या ठिकाणी जो काळोख आहे, असे ते काळे रूप की ज्याचे मोलच होणार नाही असे आहे. हे मी जीवनाचा भाव शुद्ध झालेल्या स्थितीत जेथे जीवनावाचून काही नाही अशा अवस्थेत सांगत आहे(१-२). परमात्मा हा अगाध शून्यरूप असल्याने सर्वत्र आत्मार्पणच झाले आहे(३).

(४)

**हरपली सत्ता मुराली वासना । सावळाचि नयना दिसतसे ।।१।।**
**काय करू माय सावळा श्रीकृष्ण । सांगितला प्रश्न निवृत्तीने ।।२।।**
***बापरखुमादेवीवरू* सावळीये तेज । सेज वाज निज कृष्ण सुखे ।।३।।**

जीवनाच्या दोन गती ज्या आत्मतेजात विरून गेल्या अशी सत्ता आत्मरूपी विलीन झाली तो आत्मत्वी वास नाही अशी अवस्था उरली नाही. वासना मुराली तो डोळ्यात सहाला वळविणारा सावळा परमात्माच प्रत्ययास आला(१). आकर्षण करणारा श्रीकृष्ण अनुभूतीस आला. तेथे काय करावे? करणेसारखे मग काय राहिले हा प्रश्नच निवृत्तीने सांगितला. तेथे निवृत्ती वृत्ती झालेने निवृत्त कृतीच राहिली(२). परमात्म्याचे तेज हे सावळेच असलेने त्या ठिकाणी जी वृत्ती पहुडली ती कृष्णसुखाने निजत्वात आली(३).



(५)

**नवल देखिले कृष्णरुपी बिंब । सावळी स्वयंभ मूर्ती हरीची ।।१।।**
**मन निवाले बिंबले समाधान झाले । कृष्णरुपे बोधले मन माझे ।।२।।**
**बापरखुमादेवीवरू सावळा सर्व घटी । चित्ते चैतन्या मिठी घालीता खेवो ।।३।।**

कृष्णरूपाच्या ठिकाणी बिंब पाहिले; त्यावरून कृष्ण हा परिपूर्ण स्वरूप आहे हे दिसून आले आणि म्हणूनच दृश्याचे हरण करणारी ही श्रीकृष्ण हरीची मूर्ती स्वयंसिद्ध असून ती सहांना म्हणजे कामक्रोधादिकांना वळविणारी आहे(१). त्या बिंबात जे मन बिंबून मनाची प्रतिमा उमटली तो ते तदाकार झाले आणि यामुळे चित्तैकाग्र्य समाधान झाले. कारण माझे मन कृष्णरूपाने बोधले गेल्याने माझ्या ठिकाणी आकर्षण करणारा श्रीकृष्ण कसा आहे हाच बोध झाला(२). असा हा परमात्मा सावळा सर्व देहभर असल्याने चित्त आणि चैतन्य यांचे संघर्षात चित्ताने त्याचे पूर्ण रूप जे चैतन्य त्याला मिठीच दिली(३).

(६)

**सुंदर सुरेख वोतिले । परब्रह्म तेज फाकले । ते व्योमी व्योम सामावले । नयनी वो माये ।।१।। कमळ नयन सुमन फाकले । त्या परिमळा आथिले। मकरंदी वो माय ।।ध्रु।। संकोचला संसार । पारूषला व्यवहार । ब्रह्मानंद अपार । जहाला वो माय ।।२।। मधुर वेदवाणी । न पवे ज्याच्या गुणी । ते ठकावले (निर्गुणी) निर्वाणी । नेति मुखे वो माय ।।३।। या परते बोलणे। न बोलणे होणे । ते म्या आपुल्या अंगवणे । केले वो माय ।।४।। ऐसीयाते वोटी । लागले तयाचे पाठी । *रखुमादेवीवरा* भेटी । विठ्ठली वो माय ।।५।।**

चांगल्या रेखेत ध्वनी श्रवण जे ओतले तेथेच परवस्तु परब्रह्माचे तेज प्रकाशित झाले. यामुळे भूताकाश हे नयनाकाशात समाविष्ट झाले(१). नयन कमलात जे मनाचे सुमनत्व प्रविष्ट होऊन विकसित झाले तो सुविचार सुगंध गोडीतून निर्माण झाला (ध्रु). जीवनाच्या संसरणाचे वलय कमी होऊन संसार संकुचित झाला. त्या ठिकाणी

जीवशिवाचे व्यवहाराची पारख झाली. चैतन्याचे बैठकीवर चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याशी तादात्म्य झाले. शरीराचा व इंद्रियांचा व्यवहार राहिला नाही. प्राणाचे योगाने शरीराची होणारी हालचाल व जीवशिवाचा जो दुवा प्राण ज्याने या दोघांचे ऐक्य होते. त्या निखळ प्राणाचीच हालचाल यात फरक आहे. असंगाशी संग होऊन प्राणाशी गाठ पडल्याबरोबर जीवाशिवांचे ऐक्य झाले. त्याने अपार-अपरंपार ब्रह्मानंद झाला(२). परमात्म्याचे निःश्वास जे वेद त्यांची वाणी म्हणजे स्फुरण यात अमृत साठले असून त्याचे माधुर्य मोठे आहे. ज्याचे योगाने जीवनात गोडी आली म्हणून जीवाला अरसिकतेतून रसग्रहण करणेची शक्ती आली ती वेदवाणी ही ज्या परमात्म्याचे गुणापर्यंत पोचत नाही, गुणवर्णन करण्यास असमर्थ होते. ते अखेर स्वस्थ होऊन हे नव्हे हे नव्हे असाच त्यांनी उच्चार केला(३). या परते मौनावस्थेत ज्याबद्दल काही बोलता येते असे जे बोलणे की ज्याला बोलणे म्हणजे वैखरीने बोलणे असे म्हणता येत नाही, पण जेथे कांही ध्वनी आहे अर्थात शब्द आहे व शब्द आहे म्हणून अर्थ आहे प्रसाद आहे व मोठा आनंद आहे असे जे लौकिकी न बोलणे हेच होऊन रहावे लागते, तेच तेथे हा जीव तद्रूपतेने होतो. आणि म्हणून तेच मी अंगभूत केले, कारण तंदगभूतच मी होऊन राहिलो(४). हीच धारणा निर्माण करून याचेच ग्रहण करून त्याचे पाठी लागल्याने त्याचा पुरा पाठपुरावा केल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात मला श्रीविठ्ठलाची भेट झाली(५).

**(७)**

**मूळ ना डाळ शाखा ना पल्लव । तो हा कैसा देव आला घरी ।।१।।**
**निर्गुणपणे उभा सगुणपणे शोभा । जिवाशिवा प्रभा दाविताहे ।।२।।**
**नकळे याची गती न कळे याची लीला । आपेआप सोहळा भोगितसे ।।३।।**
***ज्ञानदेव* म्हणे नकळे याची थोरी । आपण चराचरी नांदतसे ।।४।।**

ज्याचे मूळ सापडत नाही, ज्या ठिकाणी द्वैतभाव नाही, ज्याचा विस्तार नाही व ज्याला पालवी म्हणजे इंद्रिये नाहीत असा सोहंरुप देव घरी म्हणजे जीवनाच्या घरघरीत प्रत्ययाला आला(१). ज्याची धारणा ठराविक गुणात नाही असा तो अनंतगुणी



निर्गुणी असून सकाराचे गुणाने तो सगुण साकार होण्याबरोबर तेथे जी शोभा आली त्या आकर्षणाने जीवशिवांना त्याने आत्मप्रभा (सोहमात्मप्रभा) दाखविली(२). याची गतीच न कळणारी, अकळ असल्याने ज्याची कळच कळत नाही त्याची होणारी सहज लीला म्हणजे जीवनाच्या उठाबशा कशा होतात हेच कळत नाही. हा जो आपोआप सहज होणारा सोहळा ज्यात मुद्दाम काहीच करावे लागत नाही तोच भोगतो आहे(३). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात जो आपण या चराचर पदार्थात नांदतो आहे त्याच्या मोठेपणाचा उकलच होत नाही(४).

**(८)**

**निळिये मंडळी नीलवर्ण सावळी । तेथे वेधलीसे बाळी ध्यानरुपा ।।१।।**
**वेधू वेधला निळा पाहे घन निळा । विरहणी केवळा रंग रसने ।।२।।**
**नीळवर्ण अंभ नीळ वर्ण स्वयंभ । वेधे वेधू न लभे वैकुंठीचा ।।३।।**
***ज्ञानदेव* निळी हृदयी सावळी । प्रेमरसे कल्लोळी बुडी देत ।।४।।**

आकाश मंडळात म्हणजे चिदाकाशात सहाला वळविणारी सावळी चित्शक्ती असून त्याठिकाणी त्या ध्यानात तद्रूप झालेली बुद्धी, तीला या चिद्शक्तीचा वेध सारखाच लागला. तेच एक अनुसंधान होऊन राहिले(१). त्या वेधाने जो त्या चिदाकाशाचा वेध घेतला तो नीलवर्ण घनःश्याम परमात्म्याची प्रचीती आली. यामुळे प्रथमतः वियोगाने विरह झालेल्या बुद्धीला रसरूप उत्स्फूर्त अशा स्फुरद्रूप जिव्हेतून हा आगळा असा केवळ चैतन्याचा रंगच प्राप्त झाला(२). नीलवर्ण असे आपले जीवन स्वयंसिद्ध नीलवर्ण आत्म्याशी एकरूप झाल्याने त्या आत्मवेधाने वेधून गेलेल्या आत्मबुद्धीला ज्या ठिकाणी आपले वय कुंठित होते अशा वैकुंठ परमात्म्याचा लाभ झाला(३). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हृ म्हणजे हरण करणे, द म्हणजे देणे व य म्हणजे नियमन करणे अशा हृदयात ही सावळी चित्शक्ती प्रगट झाल्याने तेथेच प्रेमरसाचे लाटात बुडी दिली(४).

**(९)**

**नीलवर्ण रज नीळवर्ण बुझे । निळिमा सहजे आकारिली ।।१।।**
**नीळप्रभा दिसे नीळपणे वसे । निळीये आकाश हारपले ।।२।।**
**निळेपण ठेले निळिये गोविले । नीळपणा सोविले आम्हा जाले ।।३।।**
***ज्ञानदेवी* निळा परब्रह्मी गोविला । कृष्णमूर्ती सावळा ह्रदयी वसे ।।४।।**

नीळवर्ण जीवनात असणारे रजःकण नीलवर्ण आकाशात विलीन झाले, तो सकार व हकार ज्या ठिकाणी जन्माला येतात अशा त्या सहजतेत निळिमा म्हणजे नीलवर्ण प्रचीती व्याप्त झाली(१). त्यात नीळपणाने असणाऱ्या आत्म्याची नीलप्रभा ही दृष्टीला गोचर झाली की ज्या ठिकाणी निळे आकाश म्हणजे भूताकाश हे नाहीसे झाले (२). मग त्या ठिकाणी राहिलेल्या निळेपणात हा जीवनाचा निळेपणा समाविष्ट झाला, तेथे नीळपणाचेच आम्हाला सोवळे झाले. मीपणाचा लय होऊन सःकडेच वृत्ती वळली.आणि असा शुचिर्भूतपणा प्राप्त झाला(३). ह्रदयाच्या ठिकाणी सावळ्या श्रीकृष्णाची वसती असल्याने नीलवर्ण श्रीज्ञानेश्वरमहाराज परब्रह्मात मिसळून राहिले(४).

**(१०)**

**निळिये पेरणी निळिये वाहाणी । गुणाची लेणी कृष्णवर्ण ।।१।।**
**नवलाव गे माये नवलाव चोज । निळी निळिमा काज आकारिले ।।२।।**
**नीळवर्ण तनू नीळवर्ण गुणू । निळिमा पूर्णू ह्रदयी नांदे ।।३।।**
***ज्ञानदेवी* लीला मननी निवाला । निळिये अवलीला हरपला ।।४।।**

नीलवर्ण आकाशाचे ठिकाणी ज्या दृश्याची पेरणी झाली ते निळेपणातच वहात चालले, त्या ठिकाणी कृष्णवर्णी गुणांचे अलंकार चढले(१). खरोखरीच जर बुद्धीने विचार केला तर हे मोठ्या कौतुकाचे नवल आहे. कारण नीलवर्ण परमात्म्याचे ठिकाणी हा निलीमाच आकाराला आला (२).ज्याची तनू नीलवर्ण आहे, ज्याचे गुण नीलवर्ण आहेत, जो पूर्ण निळा आहे, तो आपल्या ह्रदयातच वास्तव्य करून आहे (३).



श्रीज्ञानेश्वरमहाराज सहज लीलेने याचे मनन करता करता शांत झाले, येवढेच नव्हे तर सहज त्या नीळ रूपात विरून त्यांचे निराळेपण असे कांही राहिलेच नाही(४).

**(११)**

**जरासंदु मल्ल मर्दनु तो । गजपित्रा हरणू तो गे बाई ।।१।।**
**कुब्जकपान तो । सुदाम्या अनुसंधान तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेवीवरु* तो । कंस चाणूर मर्दन तो गे बाई ।।३।।**

जरासंधासारख्या मल्लाचे मर्दन करणारा. म्हातारपणासारखी संधी ज्या ठिकाणी उत्साहच रहात नाही मग उपासना कोठली? हा एक देवाच्या आड येणारा मल्लच आहे. मग अशी अवस्था ज्याने ठेवली नाही. म्हातारपण येईना पण उत्साहात कमतरता नाही हा अनुभव देणारा गज पित्रास हरविणारा. जेथे अहंकाराच्या बापालाही थारा नाही. तोच तो (१). कुब्जादासीची सेवा घेणारा. तिचा उद्धार करून ज्याने तिला खराच ब्रह्मानंद दिला. सुदाम्या ब्राह्मणास ज्याचे अनुसंधान राहिले. ज्या ठिकाणी दुसरा अध्यासच राहिला नाही. ज्याने आपले अनुसंधान त्या सुदाम्यास लावले तोच तो (२). कंसासारख्या मल्लाचा ज्याने चांगलाच समाचार घेतला. अहंकाराचा निःपात केला तोच तो, रखुमादेवीवर परमात्मा पांडुरंग होय(३).

**(१२)**

**ब्रह्मादिका आठकू तो । शिवध्यान ध्यानकू तो गे बाई ।।१।।**
**गौरी जाप्य सहस्रनामी तो । पुण्यपावन त्रैलोक्य तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेवीवरु* तो । सहजपूर्ण तो गे बाई ।।३।।**

ब्रह्मादिकानी ज्याचा आठव करावा, ज्या ध्यानाचे बैठकीवर शंकराचे ध्यान आहे, तोच तो(१). सहस्रनामाने पार्वती ज्याचा जप करते, तीनी लोकात जो पुण्यपावन आहे, तोच तो(२). रखुमादेवीवर परमात्मा पांडुरंग जो सहज पूर्ण आहे तोच तो(३).

**(१३)**

**सर्वा आदि सर्व साक्षी तो । विश्वंभर खल्विद तो गे बाई ।।१।।**
**आनंदा आनंद तो । प्रबोधा प्रबोध तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेविवरु* तो । विटेवरी उभा तो गे बाई ।।३।।**

सर्वाचा आरंभ असून जो सर्वांचा साक्षी आहे, खरोखरीच हा विश्वात भरून राहिलेला, तोच तो (१). आनंदालाही आनंद व्हावा व बोधालाही प्रकर्षात्मक बोध व्हावा असा, तोच तो आहे (२). रखुमादेविवर परमात्मा पांडुरंग ज्या ठिकाणी सर्व दृश्याचा वीट येतो अशा विटेवर उभा आहे, तोच तो (३).

**(१४)**

**श्रुति स्मृति वचन तो । गुह्यागुह्य जो गे बाई ।।१।।**
**जागता निजता तो । निज चेवविता तो गे बाई ।।२।।**
**परात्पर तो । *रखुमादेविवरु* तो गे बाई ।।३।।**

ऋषी मुनीनी जे श्रवण केले आणि स्मरणात आणले अशा श्रुती स्मृतींचे जे सारभूत बोलणे, जे गुह्यातीलही गुह्य आहे, जे खरे परमार्थातले गुपित आहे, तोच तो (१). जागेपणा आणि निजत्व तोच असून निजत्वाला चेतना देणारा चैतन्यरूप तोच आहे (२). रखुमादेवीवर परमात्मा पांडुरंग सर्व दृश्याचे पलीकडे असणारा श्रेष्ठ, असा तोच आहे (३).

**(१५)**

**निजगूजा गूज तो गे बाई । मोहनाचा मोहन तो गे बाई ।।१।।**
**बोधा बोध बोधविता तो गे बाई । द्वैता द्वैतअद्वैत तो गे बाई ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* तो गे बाई । सर्वा आदि सर्वेश्वरू तो गे बाई ।।३।।**

आपल्या अस्तित्वाच्या गौप्याचे गौप्य तोच असून मोहनाचा मोह नाहीसा करणारा तोच आहे (१). ज्याला बोध करावयाचा ज्याने करावयाचा व जो बोध करावयाचा, असा तोच असून द्वैत व अद्वैत ही सापेक्षता जेथे रहात नाही असा तोच एक अद्वैत आहे (२). सर्व ईश्वररूप सर्वाचे मूळ रखुमादेविवर श्रीपांडुरंग तोच आहे (३).



**(१६)**

**काही नव्हे तो । अमूर्तामूर्ति तो गे बाई ।।१।।**
**सहजा सहज तो । सहज सुखनिधान तो गे बाई ।।२।।**
**रखुमादेविवरु तो । पुंडलिक वरद तो गे बाई ।।३।।**

जे काही आहे आहे म्हणता आपल्या हातून निसटून जाते. असा कांही जो नव्हे, परंतू अमूर्त आणि मूर्त पदार्थ ज्यामुळे झाले, ज्यामुळे दृश्य व ज्यामुळे अदृश्य, असा तो आहे (१). सहजताही ज्यामुळे निर्माण झाली, असा तो सहज सुखाचा ठेवा सकार व हकार यांना जेथे जन्म झाला, असा तो सहजच आहे (२). पुंडलिकाला वर देणारा रखुमादेविवर परमात्मा श्रीपांडुरंग तोच आहे (३).

**(१७)**

**निज ब्रह्म ब्रह्म तो । ब्रह्मादिका वंद्य तो गे बाई ।।१।।**
**अचिंत चिंतन तो । सारासार गुह्य तो गे बाई ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलू तो । जनी वनी कृपाळू तो गे बाई ।।३।।**

आपल्या ठिकाणी आपले असणारे अस्तित्व जे ब्रह्मरुप आहे त्याचे पूर्ण रूप व्यष्टि समष्टिभावाने प्रत्ययास येणारे ब्रह्म तोच आहे. ब्रह्मादिक देवानाही तोच पूज्य आहे (१). चिंतनात न येणारा, ज्याचे चिंतन करणेच दुरापास्त पण जो चिंतनात आला आहे, ज्याचे योगाने चिंतन व अचिंतन या दोनी क्रिया घडतात, अशा साराचेही सारभूत गौप्य एक तोच आहे (२). जनात व वनातही जो सर्वावर कृपा करणारा आमचा मायबाप रखुमादेविवर विठ्ठल तोच आहे (३).

**(१८)**

**सारंगधरू तो । चक्रा आधारू हरि तो गे बाई ।।१।।**
**सुलभा सुलभु तो । आटकु न टके तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेविवरु* तो । द्वैताद्वैतातीत तो गे बाई ।।३।।**

आपले देहातील प्रत्येक चक्राचक्राला आधारभूत असणारा शारंगधर श्रीहरी हा तोच आहे (१). तो अगदी सोप्यात सोपा असून त्याची आटक म्हणजे कला साधली तरी तेथे आपली दृष्टीची टक राहू शकत नाही. जेथे जीवमात्राची दृष्टीच पोहचू शकत नाही व पोचली तरी फार काळ ती ठरू शकत नाही असा तो आहे (२). द्वैत आणि अद्वैत म्हणजे एकपणा व दोनपणा याचे अतीत-पलीकडे-असणारा रखुमादेविवर परमात्मा पांडुरंग तोच आहे (३).

**(१९)**

**विश्व भुलवी योगमाया तो । गोकुळी रहिवासु तो गे बाई ।।१।।**
**वसुदेव कुमरू तो । देवकी नंदनु तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेविवरु* तो । शुकादिका चिंतन तो गे बाई ।।३।।**

सर्व विश्वाला भूल पाडणारी योगमायाच तो असून गोनाम इंद्रियांच्या कुळात ज्याचे वास्तव्य आहे, असा तोच आहे (१). वसुदेव देवकीचा मुलगा, तोच तो. पंचमहाभूते आणि त्रिगुण या अष्टधा प्रकृतीत देवच आहे; या दोन वृत्तींच्या ठिकाणी असणारा जो प्रकाश, तोच तो (२). शुकादिकांनी ज्याचे चिंतन करावे असा रखुमादेविवर परमात्मा पांडुरंग तोच आहे (३).

**(२०)**

**पैल गोल्हाट मंडळ तो गे बाई । त्रिकुटा वेगळा तो गे बाई ।।१।।**
**सहज बोधी अनुभव तो गे बाई । परमतत्त्वी अनुराग तो गे बाई ।।२।।**
***रखुमादेविवरु* तो गे बाई । ब्रह्म विटेवरी तो गे बाई ।।३।।**



तीन गुण ज्या ठिकाणी कुटले जातात असे जे त्रिकूट जेथे इडा पिंगला व सुषुम्ना असा त्रिवेणी संगम होतो त्या वेगळा, गोल्हाट मंडळात शामवर्णाचे पलीकडे प्रत्ययास येणारा, असा तो आहे (१). आपल्या सहज स्थितीत येणारा जो अनुभव तोच तो असून, श्रेष्ठ तत्त्वाचे ठिकाणी आपले प्रेमाची एकरूपता म्हणजेच तो आहे (२). रखुमादेविवर परमात्मा विटेवर आहे, तोच तो (३).

**(२१)**

**विज्ञानाचे ज्ञान अज्ञानी घनवट । ज्ञाने अज्ञान नीट लाविले दिसे ।।१।।**
**मी तू हे मात हरपले दृष्टांत । हृदयी हृदयस्थ निज तेजे ।।२।।**
**साकार निराकार शून्याशून्य दिठा । रूपांरुप वाटा हरी माझा ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* हृदयस्थ घटी । बिंबोनी उफराटी कळा दिसे ।।४।।**

विज्ञान ते की ज्यात पोकळ आशावाद नाही. ज्ञानात समज आहे पण उमज नाही. अज्ञानात विस्मृतीच आहे. अर्थात समज नाही. विज्ञान हा अनुभवाचा सोलीव गाभा आहे. तेथे ज्ञानाज्ञान दोनी रहात नाहीत. परमात्मा हा श्रेष्ठ अनुभवाचा विषय आहे. आत्म्यामुळे ज्ञान व आत्म्यामुळे अज्ञान, ज्ञानाज्ञानामुळे आत्मा सिद्ध होत नाही. तर आत्म्यामुळेच ज्ञानाज्ञान सिद्ध होते. अनुभवानेच आपणास हे ज्ञान आहे व हे अज्ञान आहे असे कळते. पण ज्ञानाने किंवा अज्ञानाने अनुभव मात्र येत नाही. अनुभवात या दोनी गोष्टी बाजूलाच ठेवाव्या लागतात. म्हणून अनुभवाचा सोलीव गाभा जो स्वानुभवघन परमात्मा तो ज्ञान आणि अज्ञान या दोही ठिकाणी सारखाच व्यापला आहे. म्हणूनच त्या योगाने जीवमात्राला हे ज्ञान आहे व हे अज्ञान आहे या दोहोचेही ज्ञान होते. या दोनी गोष्टी बुद्धीला निश्चित करून देणारा जो प्रकाश, तेच स्वानुभव विज्ञान परमात्मरूप होय (१). या ठिकाणी मीतूपणाची गोष्ट सरली की दृष्टांत होतो. दृश्याचा अंत हाच तो दृष्टांत आहे. दृश्य या शब्दापासूनच दृष्ट हा शब्द झाला आहे. तेव्हा दृष्टांत झाला व मीतूपणा राहिला असेही होत नाही. आपले अस्तित्त्वाचे जे हे तेज, ते हृदयाच्या हृदयातच स्थिर होऊन राहिले आहे. येथे

आपणास एकच हृदय ठाऊक आहे. पण दोन हृदये आहेत हे स्पष्ट होत आहे. आपल्या हृदयाची क्रिया श्वसनावर अवलंबून आहे व हे श्वसन त्या प्राणाचे स्पंदनावर अवलंबून आहे त्या प्राणगतीची वहातूक जेथून होते त्या हृदयाच्या ठिकाणी हे निज तेज स्थित आहे (२). शून्याचे म्हणजे आकाशाचेही मुळाशी शून्यरूप असणारा म्हणजे जेथे आकाशही नाही, असा परमात्माच ज्याला कांही ठराविक आकार नाही असा निराकार, व चिद् लहरींच्या योगाने जो विशिष्ट आकारात दिसतो असा साकार, असून जेथे या आकाशाची घडणही झाली नाही अशा रूपाची जी अद्‌वय वाट की जेथे द्‌वैतच नाही तेथे ज्याचा अनुभव घ्यावा, असा तो माझा हरी आहे (३). रखुमादेवीवर मायबाप परमात्मा हा घटाघटात हृदय सिंहासनावर विराजमान असून तेथे त्याचे जे बिंब हृदयात म्हणजे आकर्ष प्रकर्ष गतीत जे उमटले आहे तीच कळा उफराटी झाली की त्याचा खरा सुलट अनुभव येतो. याचा अर्थ असा की निसर्गाने उमटणारे बिंब हे उफराटेच आहे. त्याची उलट प्रतिमा होऊन मगच मेंदूला यथार्थ ज्ञान होते. तीच क्रिया या जीव मात्रांचे ठिकाणी असणाऱ्या दोन हृदयातून उलट सुलट होत असते (४).

**(२२)**

**ज्ञान विज्ञान हरी नांदे आमुच्या घरी । बाह्यजु अभ्यंतरी जाला देव ।।१।।**
**काय सांगू माय त्रिभुवन धाय । पहाता न समाय नाना रुपी ।।२।।**
**चढत्या वाढत्या गोष्टी प्रगट दिसे घटी । नामरूपे वैकुंठी नेऊनी घाली इया ।।३।।**
***ज्ञानदेवा* गोडी हरी पदी आवडी । प्रवृत्तीची थडी उलंडिली ।।४।।**

ज्ञानाचे विज्ञानरूप श्रीहरी आमचे जीवनाची होणारी नैसर्गिक घरघर याच घरामध्ये वास्तव्य करून असल्यामुळे आत बाहेर एक देवच झाला. अंतर्बाह्य त्याचाच प्रकाश आहे (१). खरोखरीच काय सांगू ? नानारूपाने याला पहाता त्रैलोक्य तृप्त होऊन जाते की ज्याला तोडच नाही (२). याच्या सर्वच गोष्टी चढत्या वाढत्या असून देहात तो प्रगट रूपाने दिसतो. नामाच्या योगाने रूपाचा साक्षात्कार होताच वय ज्या ठिकाणी कुंठित होते अशा ठिकाणी तो नेतो (३). हरिपदाची आवडच श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना गोड असल्याने जीवनाचे प्रकर्षात्मक प्रवृत्ती तीरच ओलांडले गेले (४).



**(२३)**

**सारासार दोन्ही न दिसती नयनी । अवचीता गगनी बिंबलासे ।।१।।**
**लोपले रविशशी तेज न माये आकाशी । मेघश्यामे मेघाशी लपविले ।।२।।**
**दिव्यरूप तेज तीव्र ना तेज बीज ।कुंडली विराजे लोपले सूर्यो ।।३।।**
***ज्ञानदेवा* ध्यान मनाचेही मन । हरिचरण स्थान दृढ केले ।।४।।**

सार आणि असार ही सापेक्षता दृष्टीत उरली नाही, त्या ठिकाणी असणाऱ्या आकाशात त्याची आकृती उमटली (१). त्याचे तेज चंद्रसूर्यात्मक जीवनाच्या गती लुप्त झाल्याने आकाशात मावेना, नयनातून ओसंडू लागले; असा तो मेघश्याम- ज्याचा मेघासारखा शामवर्ण आहे तो- प्रगट झाल्याने ढग आले आणि गेले पैकी जे हे दृश्य ते लपविले गेले (२). तेजाचे बीजभूत असणाऱ्या त्या दिव्य रूपाचे तेजात प्रखरता नसून कुंडलिनीच्या ठिकाणी ते तेज प्राप्त झाल्याने सूर्यनाडीचाही ग्रास झाला (३). मनाच्या मनाला हे ध्यान लागलेने मनानेही आपल्या मनाशी ताडून पहावे, अशा स्थितीत श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात सुषुम्नाकार श्रीहरीच्या चरण गतीचे स्थानाशी दृढतेने तादात्म्य झाले (४).

**(२४)**

**सावळेचे तेज सावळे बिंबले । प्रेम जे घातले हृदय घटी ।।१।।**
**निरालंब बाज निरालंब तेज । चित्तरस निज निज तेजे ।।२।।**
**आदिमध्य अंतर राहिला अनंत । न दिसे द्‌वैताद्‌वैत आम्हा रया ।।३।।**
***ज्ञानदेवी* सोय अवघाची सामाय । सुखदुःख माय आम्हा नाही ।।४।।**

आकर्ष प्रकर्षात्मक जीवनाच्या गतीचे सम्पुटात सावळ्याचे सावळे तेज प्रतिबिंबित झाल्याने ते प्रेमच ओतले गेले (१). जेथे आलंब नाही अशा चार शून्याच्या निरालंब बाजेवर निरालंब तेज प्रकाशित झाले. त्या ठिकाणी चित्ताचा रस आपल्या अस्तित्वासह त्या आपल्या आत्मतेजात प्रविष्ट झाला(२). ज्याला आदि, मध्य, अंत, नाही असा अनंत जीवनाच्या आरंभी, मधे व शेवटीही व्यापून राहिला

यामुळे अरे आम्हाला द्वैत आणि अद्वैत दोन आणि एक हे काहीच दिसेना (३). सर्वत्र परमात्मा समाविष्ट असल्याने आम्हाला काही सुख दुःख हे उरले नाही. अशा योगाने श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात आमची मोठी सोयच झाली (४).

**(२५)**

**एकांति बाळा । कीं सोहं सुख शयन सोहळा । पाहे चरण कमळा । सुंदराचे। तेथे अरुण उदेला । की सुमन प्रगटला । कमळणी जाला । अंतरी विकासू।। ते चरण कमळ केवळ । भक्त आळि डळ । सेविती सकळ । योगीजन तेणे तृप्त झाले । कीं हृदय वोसंडले । म्हणोनि वाहावले । ज्ञान डोही । तेचि ते परमानंद गे माय ।।१।। न संगवे माय परा पारुषली । दोंदिल दृष्टी जाली देखणे पणे । मनाचा अंकुर उगीच मुराला । तो कृष्णचि होऊनि ठेला अनुभविया ।।ध्रु।। तया पदांघ्रीचे रज । तेणे तृप्ती वो सहज । वरि त्रिवेणी ऊर्ध्वव्रज । मज पाहता । ते तव रेखा वरि सखोल देखा । त्यावरि वोळले पीयुषपाणी । तयेचेनि मागे । उद्धरणे जगे । म्हणोनी संत संगे । तया सोयी। ते दोही भागी । विस्तारले जगी । म्हणोनि तया भागी । चरणांगुष्ठ। दृष्टीचा डोळा । न निवडेच बाळा । तेथे जाला एक वेळा । मुनिजना गे माये ।।२।। तेथे बिंबली नखे । की विवळणी विशेखे । काळेपणाचेनि द्वेषे । वाहावली पुढा । उगमीच संचले । की वियोगे वाहावले । पुनरपि जडले । कृष्णापदी । गंगा अंगुष्ठ धार । वाकीचा बडिवार । तेथे सप्तही स्वर । उमटताती । स्वरूपी रमली । म्हणोनि अधोमुख जाली । शोभती घाघुरली। पायी प्रभावळी गे माये ।।३।। तव ते निजानंद भरिते । नेणती आणिकाते। विसरली आपणाते । हास्य वदने । म्हणती नेति नेति गर्जना । की माणिका खेवणा । (कोंदण) घोट्या अनुमाना । बाळ सूर्यो । पोटरिया निवाळा । की उभालिया सरळा । जानुद्वय सोज्वळा । उच्चस्तंभ । उंच युगल कटी । आज सामावे मुष्टी । सोहं समदृष्टी । दोही भागी गे माये ।।४।। वरिवे ढिला पिवळा । कीं मिरवे सोनसळा । कीं कल्पतरु फुलेला । नाभिस्थानी । तेथे**



**वेधु गोपिबाळा। कीं अंतरी सावळा । पालवी मेखळा । आभिळाखिया । तेथे मदनू गूढपणे। रति शये रमणे । दुजे अनुभऊ अनुभवणे । न निवडे केही । सखोल नभ मंडळ । तैं ब्रह्मस्थान केवळ । कैसे पहाले निवळ । तथे जगामाजी गे माये ।।५।। रोम राज वेळा । कीं वेणी एकवळा । दावि निराळा। उदरामध्ये । हृदय निर्मळ । तेथे ध्येय ध्यान केवळ । वरि चरण कमळ । द्विजोत्तम । वैजयंती माळा । शोभतसे गळा । उभलेनि वक्षस्थळा। उभारिली । सरळ बाहुदंड । न कळे कानवड । अंगोळिया धडफुड । खुणा दावितो गे माये ।।६।। ऐसा खुणा दावितसे एका । तव दावी अनेका । अंगोळिया देखा । दशावतारी । नखाची मंडणी । तेथे तेज तारांगणी । होत असे प्रवणी । त्रिमिर द्वैत । शुक्ल पक्ष । कीं अंतरी लक्ष । सारुनिया साक्ष। दृश्यादि सर्वी। एका एकी संचरे । कीं माजी घरी दुसरे । स्वये एक सरे । नवल चोज गे माये ।।७।। तेथ सानु सानु स्वर । दोहिले अंबर । हास्य वदन सुंदर । पावया छंदे। निमासुरा नेटका । न कळे ब्रह्मादिका । वेधुनि गोपिका। मोहियेले जग । समदृष्टी नासापुटी । नेत्रद्वय निघाले भेटी । रविशशी कोटी। लोपले तेथे । नामारु निमले । कीं कुंडले शोभे किळा । तेथे जाला एकवळा । योगीजना गे माये ।।८।। व्योमीचा मणी । तयातळी सहस्र फणी । तो लाधला निर्वाणी। आराधिता । शेष वर्णिता श्रमला । म्हणोनि शरण आला । शयन होऊनि ठेला । तया तळी । ऐसी सुमन सेजा । कीं मवाळपण बरविया बोजा । तेथे रातळी रमा भाजा । न निवडे केही । ऐसा जाला कळवळा । शेष म्हणे दैव आले फळा । आता पाहेन सुनीळा । काये सेज माजी ।।९।। ऐसयाचे ध्यान । जरी हे न करी मन । तरीच पतन जन्ममरण । चिंतासाठी फेडी ।कीं उभारुनिया गुढी । स्वये सुखाचिया आवडी । कां सांडितासी । आता करू पाहे ध्यान । तरी सहजेचि उन्मन । म्हणोनी समाधान होय जीवा । तीर्थव्रत तप दान । जरि न करी हे मन । तरि सहजची साधन । गोपिनाथु ।।१०।। तीर्था जाता सायासी । तू काय एकदेसि ।**

**म्हणोनि स्तविलासी । बहुता परी । तव परा पश्यंती मध्यमा वैखरी । या युक्ति नो बोलवेसी । निवृत्ती म्हणे लीळा । विश्व व्यापक निराळा । पाहे उघडा डोळा परब्रह्म । *ज्ञानदेवा* मीपणी । निवृत्ती ऐक्य चरणी । सरो दुजेपणी । हाव जीवा ।।११।।**

ध्वनि श्रवणरूप परमात्मगतीचे चरणकमळी सोऽहं सुरवात पहुडली, अशी बुद्धि की ज्या एकात सर्वाचा अंत होतो अशा एकांती वेळ साधून संधिकालात सोहंसुखाला पात्र झाली. तेथेच आपल्या जीवनाचा अरुणोदय जहाला असून मनाचे सुमनत्व शुद्धत्व प्रगट झाल्याने हृत्कमळाचे ठिकाणी अंतःकरणाचा विकास झाला. त्या ठिकाणी समचरण आत्मगतीच केवळ राहिली असून त्या चरणकमलास उत्कंठित हळुवार अंतःकरणाचे, त्या ठिकाणी एकरूप झालेले विभक्त होऊन अभक्त नसलेले भक्तरूपी भ्रमर समुदाय, व ज्यांचा संयोग त्या तत्त्वाशी आहे व वियोग नाहीच असे कळ जाणणारे, सकळ योगीजन ज्याची उत्तम आठवण करतात, सेवा करतात त्या योगाने तृप्त होऊन, समाधानाने ज्यांचे हृदय जीवनगतीचा प्रकर्ष होऊन हृदयी वोसंडले तो प्रकर्ष हृदयात मावेना अशी स्थिती झाली. तेथेच आत्मज्ञान संवेदना प्रवाही झाली. व ती ज्ञानाचा साठा जो सहस्रदलाचा गाभा तेथे मिळाली. तोच तो परम असा श्रेष्ठ आनंद होय (१). ज्या ठिकाणी परेचीही पारख होऊन स्फुरद्रूप दृष्टी जी दृश्याला भिडली तो ती दृष्टी विशाल झाली. उगेपणात सहजतेने मनाचा संकल्परूप अंकुर जो मुरला तो या अनुभवात तो जीव आकर्षण करणारा श्रीकृष्ण तोच होऊन राहिला (ध्रु). तत् ने निर्दिष्ट होणारे श्रीहरिचे पदांबुजाचे रजःकण की ज्याने सहज स्थिती प्राप्त झाल्याने तृप्ती झाली. इडा, पिंगला व सुषुम्ना ऊर्ध्वगामी झाली; तेथे जे कांही माझे खरेखुरे रुप गोनाम इंद्रियांचे कुळात म्हणजे गोकुळात प्रत्ययास आले तेथे जो आकर्षण करणाऱ्या श्रीकृष्णाने मला पाहिले ते तो दोनी एका रेषेत आले. सखोल दृष्टी निर्माण झाली. असा जो जीव त्यावर ज्याचे हाती अमृत आहे अशा विष्णूंनी कृपा केली. त्याचा मागोसा घेत जगाचा उद्धार व्हावा, त्याचे मागे जे कोणी आहेत त्यांचे



जीवनाची धारणा उंचावी, जीवनाला खूप खूप उंची यावी, म्हणून त्या ठिकाणी जे सत् आहे म्हणजे अस्तिभावाने जे तत्त्व प्रगट आहे, त्याच्या संगाने परमार्थाचे प्रकर्षाची सोयच झाली, त्याला सुलभता आली. ॐकाराने निर्दिष्ट केलेले जे 'तत्' तेच या जगात विकास पावले म्हणून त्या ठिकाणी जे जीवन विभागले गेले तेथेच समचरण गतिरुप चरणांगुष्ठ कीं ज्या ठिकाणी प्राण हा गुप्त रूपाने स्थित आहे, त्याचे दर्शन झाले. आत्मदृष्टीचा डोळा उघडल्याने बुद्धीने आता काही तरतमभावाने वेगळी निवड करावी असे आता राहिलेच नाही. तेथे दिक्, काल आणि आकाश याचे अतीत झाल्याने वेळा एकच झाली. मनाचे आकलन ज्यांना झाले अशा मुनिजनांनी हा अनुभव घेतला. पाणी आणि पाण्याचा ओघ या प्रमाणे काळ आणि वेळ यांचा संबंध आहे. ज्या ठिकाणी कालाचा ग्रास झाला तेथे वेळ एकच मुनिजनांना झाली. एकोपा झाला असा या ठिकाणी अभिप्राय आहे (२). तेथे दृश्याची जडत्वाची नखे प्रतिबिंबित झाली की जेथे विशेषत्वाने अस्वस्थताच प्राप्त व्हावी. कालरूप परमात्म्याच्या जणू द्वेषाने ती जडताही पुढे प्रवाही झाली. उगमाचे ठिकाणी जे स्वरूप साचले आहे ते वियोगाने दृश्य प्रतीतीस आले, तथापि या वियोगाची जाणीव होताच पुनः कृष्णपदाचे ठिकाणी तादात्म्य झाले. जेथे प्राण गुप्तरुपाने स्थित आहे अशा अंगुष्ठातून जी धारणा जीवनाची निर्माण झाली, अशा गंगेने ज्या चरणांगुष्ठाचा आश्रय केला त्या कृष्णपदाचे ठिकाणी बाकींचा मोठा थाट असून जेथे सप्त स्वर गतिमान होऊन नादाची प्रचीती येत आहे. त्या स्वरूपाचा या जीवनाच्या धारणेला साक्षात्कार झाल्याने ती नम्र झाली, अधोमुख झाली. या खुणेनेच निसर्गाने जीवनाचा प्रवाह अधोगामी झाला आहे. अशा त्या पदांचे ठिकाणी घुंगुर शोभत असून त्यांची प्रभा जेथे पसरली आहे (३). तेव्हा त्या आपल्या अस्तित्त्वाचे आनंदाचे भरते ज्यांचे अंतःकरणात आले ते आपले निजत्वाशिवाय दुसरे कांही जाणत नाहीत. नव्हे नव्हे ज्या ठिकाणी देहाहंकाराची विस्मृतीच झाली आणि जे या जगात हसतमुखच राहिले, दुर्मखनाम जे कधीही दिसले नाहीत. 'न इति न इति' हीच ज्यांची गर्जना आहे. मायेशिवाय आणिक असे जे माणिक तेच ज्यानी जाणले. आणि कोंदणात बसविले, शिरोधार्य केले (४).

ज्याचे घोट्याचे ठिकाणी शब्दाचा जेथे ग्रास झाला अशा प्रस्फुट गगनाचे ठिकाणी ज्याचे अनुमान होते, जेथे चिद्भानू बालरूपाने प्रकाशित आहे. प्रस्फुट गगनाचे वरील भाग ज्या पोटऱ्या शून्याच्या लहरी अनुभूतीस आल्यावर जीव निवाला थंड झाला असे होते. सरळ रेषेत जी उभी अशी जेथे तेजोवलये आहेत अशा दोन सोज्वळ अशा मांड्या की जेथे उंचावलेल्या जीवनाचे स्तंभनच होते. कंबरेच्या दोनी बाजू ज्याच्या उंच आहेत, ज्याचे माप एका मुठीत सामावेल असे आहे, सोहं हे तत्त्व जेथे दोही भागात विभागले असून समदृष्टीने ज्याचा अनुभव घेता येतो (५). पीत प्रकाशयुक्त चिद् गगन हाच पीतांबर ज्याने परिधान केला आहे. सोन्यासारखा चकाकतो आहे. सुवर्णाने जो युक्त आहे. जेथे सुवर्ण नामध्वनी उमटतो आहे. ज्याचे नाभिस्थानी भीतीच नाही, अशी स्थिती आहे. जे कल्पावे तेच होणार अशी अवस्था आहे, असा कल्पतरूच जेथे फुलला आहे. तेथे ही वृत्ती वेधली आहे. जिचे अंतरात सहाला वळविणारा सावळा श्रीकृष्ण आहे. देह पालवीची मेखळा जिने धारण केली आहे. देहाचे ठिकाणी असणारी टवटवी ज्या आत्मानुभूतीचेच केवळ फळ आहे. तेथे दुसरा अभिलाष तो कोणता असणार? ज्या गूढ अशा निर्विषय आत्मविषयाने मदच वृत्तीचा नाहीसा झाला असा तो श्रीकृष्ण मदन जो गौप्य म्हणजे खरा गुप्तच आहे. त्या सुखाने सुखी होण्याकरिता रममाण होणे हीच जिला आवड दुजेपणाने आपण कोणी निराळे आहोत या आंतरिक भावनेने दुसरा दृश्याचा अनुभव अनुभवावा अशी निवड जेथे कधीच होणे नाही. अत्यंत खोल असे हे आकाशमंडल की जे केवळ ब्रह्माचे स्थानच आहे, त्या ठिकाणी या जगामध्ये ते कसे पहाणेपणाला आले दृश्यरूपाने नटले हे आश्चर्यच आहे (६). रोमरोमातून तीन गतींची वेणी गुंफून ज्याने एक सूत्र दाखविले आहे तो गगनगर्भामध्ये निराळा आहे हेच दाखवितो. ज्याचे हृदय निर्मळ आहे. तेथे केवळ ध्यान हेच ध्येय असून श्रीभृगुऋषींचे श्रीवत्सलांछन आहे. ज्याचे गळ्यात वैजयंती माळा असून ती उभय चिन्हे छातीवर रुळत आहेत. ज्याचे हात सरळ असून ज्या योगाने सरळ देणे घेणेची क्रिया घडते व व्यवहारातही सरळपणा येतो. कुशीजवळचा हात ज्याचा कळत नाही तो अंगुली निर्देशाने आपली खुणा



दाखवितो (७). करण्याची जी अंगुली या करांगुली निर्देशाने एकत्वात अशाप्रकारे खुणा दाखवित असता दशावतारी तो अनेक दाखविता झाला. नखाला जे मंडण केले तेथे तारांगणाचे तेज असून तत्प्रवण वृत्तीने चंचळत्वाने द्वैत निर्माण झाले. ज्या नाडीतून चंद्रगती वहाते, जेथे सर्व आकाश शीतल प्रकाशाने भरून गेलेले असून (चांदण्या लखलख करीत आहेत.)तेथे लक्ष अंतर्मूख होऊन दृश्यादि सर्व साक्षी अवस्थाही विसरून जो एकाएकी संचरण करतो व दुसऱ्या घरी सूर्यनाडीत प्रवेश करून दोनीचे ऐक्य करतो आणि अद्वैत दाखवितो असे ज्याचे मोठे कौतुक आहे (८). चिदाकाशातून जेथे त्याचे मंथनाने जेथे बारीक बारीक असा सूक्ष्म नाद अनुहताचे छंदाने उमटतो आहे. अनुहात हाच ज्याचा पावा आहे अशा त्या हास्यवदन सुंदर आत्मानुभूतीची आकाशालाही उत्कटता आहे. सर्व जीवमात्रांना नेट देणारा नेटका असा तो सुंदर परमात्मा ज्याचे आकलन ब्रह्मादिकांनाही होत नाही त्याने आपला वेध गोपिकाना म्हणजे इंद्रियवृत्तींना लावून सर्व जग मोहून टाकले. नासापुटी म्हणजे नासिकेतून ज्याची धारणा असून ज्याची दृष्टी सम आहे की ज्या ठिकाणी जीवनच सम आहे. तेथे द्वैत प्रचीती घेणारे दोनी नेत्र एक होऊन द्वैत विसरून एकत्वाचे भेटीस नासापुटी-नासिकाग्री समदृष्टी करून निघाले, तेथे कोट्यावधी रवि-शशी लोपून गेले, इतके शीत पण अपरंपार तेज प्रगट झाले. ज्याची कुंडले प्रकाशमान झाली असून नाद आणि प्रकाश यांचे ऐक्य झाले आहे. असा हा जीवनाचा सुंदर मिलाफ होऊन जेथे मनाचे मनत्वच राहिले नाही असा हा एकरूप झालेल्या योगीजन वृत्तींचा जेथे एकवळा एकोपा झाला आहे. एकाकडे जे वळलो तोच एकवळा झाला (९). असा आकाशातला राजा असून आकाशात शोभणारा असून ज्यामुळे आकाशालाही त्याचाच रंग प्राप्त झाला आहे. त्याचे पायाशी-पायाचे तळाशी-सहस्र फणी शेषसहस्र वायुगतीने युक्त असे जीवन शोभतो आहे. ज्याने या निखळ वायुरूप परमात्म्याची आराधना केली तेव्हा त्याला हे भाग्य लाभले. शेषही ज्याचे वर्णन करता करता दमला आणि शरण आला म्हणून जो त्या परमात्म्याची शय्याच होऊन राहिला जेथे तो परमात्मा पहुडला आहे असा हा वायुप्रकाशरूपजीवन परमात्म्याचा नवलाव

आहे. मनाचे जेथे सुमन झाले. वृत्तींचे अस्तित्वच जेथे राहिले नाही अशा या सुमन शेजेवर मऊ मऊ अशा चांगल्या बिछान्यावर त्या स्वरूपाशी ऐक्य झालेली रमा चित्शक्ती रममाण झाली, जिला त्याशिवाय या विश्वात दुसरे असे कांही उरलेच नाही. आत्मानंद हेच जिचे सारसर्वस्व असा सर्व एकमेळ जेथे झाला तेथे शेष म्हणाला, माझे सर्व दैव आज फळाला आले. आता माझे शरीराची ही जी शेज आहे या ठिकाणी अशा या सुनील परमात्म्याला जन्मभर पाहीन (१०). अशा स्वरूपाचे ध्यान जर हे मन करणार नाही तर पतन होऊन अधोगामी जीवन होऊन जन्ममरणपरंपरा चुकणार नाही. ज्यात केवळ चिंताच साठली आहे अशी चिंतासाठी फेडून चिंतनाने भक्तिध्वजा उभारून स्वसुखाची आवड का सांडावी ? आता ध्यान करून पहाणेच महत्त्वाचे की ज्या योगाने सहज उन्मनी लाभून जीवाला समाधान होईल. तीर्थव्रत तप,दान जर हे मन करणार नाही तर इंद्रिय वृत्तींचा धणी जो गोपीनाथ परमात्मा नादप्रकाशरूप जीवन हेच एक सहज साधन उरेल (१०). तीर्थाला मोठ्या सायासाने जावे तर तू एकदेशीच आहेस. ज्यामुळे बहुत प्रकाराने स्तुती झाली. तरी पण परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी यांनाच जर आपण युक्तीने बोलविले, त्यातून उठणारा चैतन्याचा स्वयंसिद्ध ध्वनी श्रवण केला तर निवृत्तीनाथ लीलेने सांगतात विश्वव्यापक पण जो सर्वाहून निराळा आहे तो परमात्मा ज्याला परब्रह्म म्हणतात तो निरुपाधिक डोळ्यात पहा. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात मीपणा सरून श्रीनिवृत्तीपदाशी ऐक्य होऊन दुसरेपणाची हावच जीवाची सरो हीच इच्छा (११).

**(२६)**

**मनाचा भाव माझा खुंटला हरि ध्याने ।अवघेची येणे मने काळापिवन केले ।।१।। लघु म्हणो हरि सूक्ष्महि नव्हे । सूक्ष्म म्हणो तरि अगाधही नव्हे । या काळियाची जाली गे माये ।।ध्रु।। *बापरखुमादेविवरू* सुनीळ नीळ काळा । अवघ्यासहित गोपाळा बुडी दिधली गे माये ।।२।।**

हरीचे ध्यानावस्थेत अवघे दृश्य मनासह शाम पीत वर्ण केले. पीतांबरधारी



काळासावळा तो पांडुरंगच सर्व कांही झाला. तद्रूपच दृश्य आणि मन झाल्याने मनाचा भाव जो संकल्प तोच लयाला गेला (१). अति लहान त्यास म्हणावे तर सूक्ष्म आहे असे नाही, अगदी उघड आहे. उघड आहे. पण एकदम दिसत नाही म्हणून सूक्ष्म म्हणावे तर अतर्क्यही नव्हे. कारण सगळे तर्क हे त्याचेमुळेच चालतात. असा जो काळा त्याचीच ही बुद्धी झाली (ध्रु). देहबुद्धि ही स्थिर अशा ध्यानावस्थेत आत्मबुद्धि झाली. आभाळाचा वर्ण काळा हे जेथे, त्या आकाशाचा वर्ण निळा हे ज्या योगाने घडले तो परमात्मा सुनील वर्ण चांगला आहे. तोच बापरखुमादेविवर असून जीवनाच्या सारसर्वस्वासह गोपाळनाम सर्व इंद्रियभावानी जेथे बुडीच दिली. 'पडिले वळण इंद्रिया सकळा । भाव तो निराळा नाही दुजा ।।' असे झाले (२).

**(२७)**

**नभ नभाचेनि झळे । क्षोभू वयहिजे कालिंदी जळे । सासीनले जगाचे डोळे। ते रूप पहावया । भलतैसी हाव मना न पुरे तेथिची थाव । लावण्यसिंधू सिवसांडू निजा तो गे माये ।।१।। सुलभ परमात्मा ग माय । मन मुरोनी देखणेपणा उरी । याचि कारणे उभा भिवरे तिरी । अनुपम्य जयाची थोरी। गे माये ।।ध्रु।। कालिंदी जळाचा भोवरा । की माजी वेढुनी इंदिवरा । माळ बांधोनिया मधूकरा । रोमामाजी ।।२।। सकल सिद्धींचा मेळा । तेवि विभूती शोभे भाळा । मुगुटी रत्न किळा । लिंग अनुपम्य गे माये ।।३।। क्षीरसागरीचे निवांत सुख । असो हे निमासुरे मुख । श्रीयेचे मनोहर देख । टवकारिले दो भागी । पहावया उरूंची शोभा । सकळ देवांची प्रभा । तेथे तारांगणे कैंची नभा । लेइला गे माये ।।४।। कटावरि ठेवुनि हात । जना दावि संकेत । भवजलाब्धीचा इतुलाची । समचरणीच्या खुणा । उभा पंढरीचा राणा । तो आवडे जना मना । दुर्लभु गे माये ।।५।। कैवल्याचा गाभा । कीं ब्रह्मविद्येचा वालभा । निकटपणाचि या लोभा । कैसा उभा असे । देवा पायीची वीट । तेचि माये नीट । वरि येऊनि भीमातट । वोळग दावी गे माये ।।६।। नेति नेतिचेनि विरारे । उभवूनि श्रीकरारे । शृंगाराचेनि पडिभरे । चराचरे वोळगती**

**। हा मेखलेचा मध्यमणी । उदो केला ग्रहगणी । मध्य नायकू तरणी किरणी । विरजितु गे माये ।।७।। आमुची हृदयीची श्रीमूर्ती। घेऊनि विठ्ठल वेषाची बुंथी । आता चाळविसी किती । बापा पालटू ने घे। *बापरखुमादेविवरा* विठ्ठला । त्वा मजशी अबोला का धरिला । जीवी जीव आहे उरला । तो निघो पाहे ।।८।।**

आकाशाला ज्या श्रीकृष्ण परमात्म्याचा रंग प्राप्त झाला ते आकाश कालगती कालिंदीच्या प्रवाहात प्रक्षुब्ध होऊन, प्रवाही झाले. ते रूप पहाण्याकरता साऱ्या जगाचे डोळे स्थिरावले. ज्याचा मनाला थांग पत्ता लागत नाही असा तो परमात्मा, लावण्याचा सागर, दृश्याची कक्षा ओलांडून जाणारा, त्याला भलोभलतैसी इच्छा उत्पन्न होऊन पाहू गेले (१). हा परमात्मा सुलभ असून मन मुरल्यावर उरणारा दृश्याचा गाभा-ज्याचा मोठेपणाला उपमाच नाही-तो या एकाच कारणामुळे वायुस्वरूपिणी भीमेच्या तीरावर उभा आहे (ध्रु). कालगतिरूप जीवनात जो भोवरा आहे त्यामध्ये तो प्रविष्ट होऊन सुखाचा शोध घेणाऱ्या जीवांची त्याने एका रोमात मालिकाच तयार केली आहे (२). सर्व सिद्धींचा जेथे एक मेळ आहे, जेथे कांही इच्छाच रहात नाही अशा प्रकारची विभूती ज्याचे मस्तकी शोभत आहे; मुगुटावर दृश्यावर रममाण न होणारी रत्नप्रभा फाकली आहे, असे ते अनुपम आत्मतत्त्व आहे. (३). सत्रावीचे क्षीरसागरी निवांत असणारा, सुखस्वरूप असणारा, ज्याचे मुख अति सुंदर आहे, त्याची मनाला हरण करणारी जी शोभा आहे, असे ते रूप आकाशात व कालगतीचे प्रवाहात दृश्यमान-प्रतीत-झाले. दृश्याची शोभा पहाण्याकरता सर्व देवांची प्रभा जी तारांगणे ती आकाशाचे ठिकाणी धारण केली आहेत. असंख्य तारकरूपांचे जेथे दर्शन होत आहे (४). जेथे व्यवहार थांबतो तेथेच परमार्थ सुरू होतो हा संकेत कंबरेवर हात ठेवून जो दाखवितो. हाच भवसमुद्राचा अंत आहे. समगतीचे स्वरूप कळावे म्हणून समचरण खुणेने जो पंढरीचा राणा उभा आहे त्याची आवड दृश्य मनाला उत्पन्न होणे हे दुर्लभच आहे (५). ब्रह्मविद्येचा आवडता जो मोक्षसुखाचा गाभा तो जवळिकेच्या लोभाने उभा आहे. देवापायीची वीट-जेथे सर्व दृश्याचा वीट



येतो-तेथेच जीवनात नीटनेटकेपणा येतो, सरळ मार्ग सापडतो. असा जीव जगालाही सरळच वाटतो. अशी जी नीट वीट आहे तेथेच वायुरुपिणी भीमेच्या तटी येऊन त्याने आपली खरीखुरी ओळख दाखविली (६). न इति न इति हे जे श्रुतीने वर्णन केले असा तो आपले सुख आपण चाखण्याकरता, आपल्या कराराने चिद् शक्तीचे द्वारे विलास म्हणून त्याने चराचरे निर्माण केली. हा विश्वमालेचा मध्यबिंदू असून, ग्रहांचा समुदाय ज्याने निर्माण केला, हा चिद्सूर्य सर्वांचा स्वामी असून, हा अखिल विश्वात मध्यबिंदू असून, आपल्या प्रभाकिरणाने विराजमान झाला आहे (७). तीच आमच्या हृदयात श्रीमूर्ती असून उघड उघड विठ्ठलवेष घेऊन जगाला किती चैतन्य देत आहे. त्याचे योगाने चलन वलन आहे. तो जो जगत्पिता तेथे मात्र पालट नाही. हे विठ्ठला, तू माझ्यापाशी का अबोला धरलास? जीवात जो जीव उरला आहे, जीवात जीव धरून जो मी आहे तो यामुळे तुझ्याकडेच जाऊ पहात आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (८).

**(२८)**

**वेद प्रमाण करावया गोकुळासी आला । कीं नाटकीचा कुवासा जाला । ब्रह्म आणि गोवळु । ब्रह्मादिका वंद्यू । ऐसा निगमु पै लाजविला ।गणिका स्विकारी राहो मांडला । कीं दशरथ पतनी चुकविला । एका ते म्हणे जागा। एका ते म्हणे रे निजा । तै मुचकुंदापै काळयवनु आणिला रया ।।१।। विरोचनसुत बळी बांधोनि जेणे । निगड निबद्ध गजा सोडविले । एकाची बालके काळापासुनिया हिरे । एका बाळाचे बाप विदारिले । शिशुपाळासी जैत देऊनिया । शेखि पाहे पा आपणचि जिंकिले रया ।।ध्रु।। गुरू दुर्वास याचिये भक्ति । आणि त्याचियेची रथी । देवि रूक्मिणी सहित स्वादु चालविला । तो तेणे माने फुंदो पाहे । तंव कोलतिया भेणे त्रैलोक्य हिंडविला। पैज सारूनी हाती । सुदर्शन वसविले । कीं भीष्मपण साचू केला। जितुकाचि कौरवा तितुकाची पांडवा । अचोज हा अमुला रया ।।२।। जमदग्नी जनकाचा बोल भूमी न पडावा । हा ठावो वरि पितृ भक्तिची आवडी। जेणे साचपणा**

**कारणे माता वधिली । कीं पुराणे खोचिली तोंडी । असुर दैत्य संहारिता बापू। तयांची पातके दवडी । प्रजासि रायाची आण। रायासी कवण नेमु । हे तो संततपणाची प्रौढी रया ।।३।। या परी चराचरीचे दानव । गिवसुंनि पुसिले परोपरी । तव यादवासि अंबुलेपणाची आस जाली थोरी । प्रभास क्षेत्री अवघियाते केली एकसरी । देवकी पुतना नोळखिजे। वैरभक्तिसी एकची वोवरी । पवनु काय हा पंथु शोधुनिया चाले । समर्थु करील ते उजरी रया ।।४।। या गोविंदाची माव । हे तो ब्रह्मादिकासी कुवाडे। तो हा मायेचेनि साचपणे । न घेपवे । प्रकृतीचे गुण ते याचिये गावीचे । तो करील ते अनुचित बरवे । लाघवियाचे भ्रमु लाघवीच जाणे । यासी कांही नवल नव्हे। *बापरखुमादेविवरु* जाणितला । तरी उकलेल हे आघवे रया ।।६।।**

वेद हेच प्रमाणभूत आहेत हे दाखवून त्याप्रमाणे आचरण करून दाखविणे करिताच जो गोकुळात अवतीर्ण झाला. आणि त्या ठिकाणी ज्या लीला करावयाच्या होत्या त्याला आश्रयभूत झाला. ज्याचे अधिष्ठानावर सर्व विलास घडला. ब्रह्मादि देवताना वंदनीय असा परिपूर्ण परब्रह्म पण गवळ्याचे घरी साकार झाला. वेद म्हणजे पूर्ण ज्ञान पण ज्याने त्यांनाही आपल्या कृतीने लाजविले. गणिकेचा स्वीकार केला. दशरथराजाचा होणारा अधःपात चुकविला. एकाला जागृती देऊन व एकावर अज्ञानाचे आवरण टाकून मुचकुंदास कालयवनात आणला (१). ज्याने विरोचनसुत बळीला बांधून ठेवले आणि बंधनात सापडलेल्या हत्तीला सोडविले. एकाची मुले काळापासून सोडवून घेतली. प्रल्हादाचा बाप जो हिरण्यकश्यपू यास विदारण करून टाकले आणि शिशुपालाला जय देऊन शेवटी आपणच विजयी झाला (ध्रु). गुरू दुर्वासाची भक्ती जाणून त्याच्याच रथात बसून देवी रुक्मिणीसह ज्याने रथ चालविला. त्याचप्रमाणे तो मानाने फुगला, तेव्हा त्यास भीतिग्रस्त करून तीनी लोकांत त्याला हिंडविलाच हिंडविला. पैज मारून हाती सुदर्शनचक्र घेऊन ज्याने भीष्माचार्यांचा पण खरा केला. आमूलाग्र कौरवांना व पांडवांना जो सारखाच झाला की ज्याचे वर्णन शब्दाने होणार नाही (२).



जमदग्नीचा बोल खाली न पडावा म्हणून आईचा वध करणेपर्यंतही ज्या परशुरामाचे अंतःकरणात पितृभक्तीची आवड, तोंडात ज्याने पुराणे धरलेली, असुरांचा संहार करून ज्याने पृथ्वीवरील पातकांचा भार उतरविला. आणि प्रजेला राजाज्ञा प्रमाण आणि राजाला कांही नियम नाही असे कसे दोघांचे संबंध हे एकमेकाला पूरकच आहेत हे दाखवणेत ज्याला सतत मोठेपणा वाटला (३). या प्रकाराने चराचरातले राक्षस धरधरून पुनःपुनः त्यांचा समाचार घेतला. तोच यादवांना मोठेपणांची इच्छा फार झाली. प्रभास क्षेत्रावर या सर्वांची एकच अवस्था केली. देवकी व पूतना हा द्वैतभाव जेथे नाहीच. वैर आणि भक्ती यांना जेथे एकच जागा मिळाली. दोघांचाही संबंध कृष्णाशीच आला तेथे त्याना दुसरी जागा मिळणार कशी? वारा काय वाटेत काय आहे हे पाहून चालतो काय? तेथे काय द्वैतभाव आहे काय? तो सर्व वाटेवर सर्वांना सारखाच असतो. तो समर्थ आहे. तो करील ते चांगलेच (४). या गोविंदाचे नवल हे तो ब्रह्मादिकांना मोठेच कोडे आहे. तो हा परमात्माच साचपणे सत्यत्वाने असलेने मायेच्या योगाने विपर्यस्त ज्ञानामुळे घेता येत नाही. प्रकृतीचे गुण हेही याचे अधिष्ठानावरच वेगवेगळेपणाने प्रतीत होतात. या दृष्टीने तो करील ते अयोग्यही चांगलेच ठरले. असा तो लाघवी आहे. त्याने निर्माण केलेला भ्रम जो द्वैतमूलक आहे तो तसाच जो कोणी होऊन राहील त्यालाच कळणार. तोच जाणतो. यात काय तसे आश्चर्य नाही. बाबारे, बापरखुमादेविवर जाणला तर हे सर्वच कोडे सुटेल (५).

## (२९)

**निळे हे व्योम निळे हे सप्रेम । निळेपणे सम आकारिले ।।१।।**
**निळेवर्ण ब्रह्म निळे वर्ण कर्म । निलवर्ण आश्रम गुरू देखे ।।२।।**
**निळेपणे वर्तो निळेपणे खातो । निळेपण पहातो निळेपणे ।।३।।**
***ज्ञानदेव* आला नीलवर्ण शाळा । निळेपण गोवळा रातलीये ।।४।।**

हे आकाश निळे असून तेथेच प्रेमाचे आकर्षण आहे. त्याचे योगानेच जीवनाचे समत्व आकारले आहे (१). ब्रह्माचा वर्ण नीळ असून तेथे घडणारे कर्म ही त्यातलेच आहे. हीच ज्यांची उपासना आहे, हा आश्रम ज्यांनी स्वीकारला आहे. तेच गुरू

असून हा नीलवर्ण आश्रम सर्व श्रेष्ठ आहे (२). नीळपण हे आमचे जीवन असून तेच आमचे अस्तित्व असलेमुळे त्यावरच आम्ही वर्तन करतो आणि आकाशाचा म्हणजे शब्दाचा ग्रास करून नीळवर्ण जीवनाने आपले जे नीळपण आत्मत्वाने पाहतो (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज या नीळवर्ण शाळेमध्ये अभ्यासाकरता आल्याने या अंधारातही गोनाम इंद्रियवृत्तींना वळविणारा परमात्मा श्रीकृष्ण नीळपणाने प्रतीत झाला (४).

**(३०)**

**सावळियाचे तेज सावळा श्रीहरि । रोज बाज ओवरी ब्रह्मांडाची ।।१।।**
**गृहदारा दिनमणी तेज देऊनी मेदिनी । मेरू प्रदक्षणी आप होये ।।२।।**
**ऐसा हा सावळा सतेज साजणी । म्यां आपुल्या आंगणी देखियेला ।।३।।**
***ज्ञानदेवा* साजण सावळिये प्रभेचे । मी माझे मोहाचे हरिरूप ।।४।।**

ज्या अधिष्ठानावर ब्रह्मांडाची रचना झाली अशी जी शून्यावस्था तेथे जे सावळियाचे तेज तोच सावळा श्रीहरि आहे (१). ज्याचे घराचे दारातच हा चित् सूर्य असून त्याने आपले तेज या पृथ्वीला दिनमणीमार्फत दिले आहे. पृथ्वीही अणू परमाणूंची झाली आहे. सूर्यातून ज्या ठिणग्या पडल्या त्याचीच ही पृथ्वी असून त्यात हे अणु परमाणू आहेत. अचल अशा स्थाणुभूत मेरूला प्रदक्षणा घालता घालता त्यांत हे जीवांचे जीवन तयार झाले आहे. देह धारणा अचल अशा वायुरूप मेरूचे भोवती फिरते, तोवरच हे जीवन जीवाला प्राप्त होत असते. पृथ्वी कशी झाली हा निकष येथे नसून फक्त जीवनाचा विचार आहे. सर्व कांही हा वायूचाच खेळ असल्याने यथाक्रम उत्पत्ती, स्थिती आणि लय होतच असतात (२). असा हा सतेज सावळा श्रीहरी मी आपल्या ॐकाराचे अंगणात पाहिला (३). या सावळिया प्रभेचे कौतुक मला असून मी आणि माझे हेही ते मोहक असे हरिरूपच आहे हेही भाव त्या परमात्म्याचेच आहेत. तेथे निराळे आपले असे कांहीच नाही असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(३१)**

**पैल सुखाचेनि माये सुकाळु । नवल पाहिजे हो गोपाळु। म्हणोनी योग याग तप साधन । व्रत दान उद्यापन । पंचाग्नि गोरांजन अनुष्ठान । पदी पद निर्वाण नकळे हे ।।१।। तुझ्या नामाचेनि आनंदे । गाता वाता जोडसी विनोदे रया ।।ध्रु।।या गोवळेनि जग । न दिसे जगपण भाग । पाहे पा सकळी योग । तुझा तूचि ।।२।। अर्थुनी पाहे दृष्टी । तव तुझ्यापायी पडे मिठी । आवडी नोसंडी गाठी । तुझिया पायाची ।।३।। आता जरी निरुते। तूचि आत्मा तू ते । सुखी सुखाचेनि निज प्राप्ती रया ।।४।। तुझे स्वरूप अदृश्य । तो मुनिमानसीचा प्रकाश । इंदु तू पूर्णांश। चैतन्य घन ।।५।। *बापरखुमादेविवरा* । विठ्ठला पाहता उघड डोळा । दाविले निधान रया ।।६।।**



मायेचे पलीकडे सुखाचा सुकाळ असून ते जे नवल तो गोपाळ-गोनाम इंद्रियांचा पालनकर्ता - पाहिजे म्हणून योग, याग, तपादि साधन, व्रत, दानादि उद्यापने, पंचाग्नि गोरांजन, अनुष्ठाने केली तरी जे निर्वाण म्हणजे मोक्षपद हे कळतच नाही (१). असा देवा, तू तुझ्या नामाने आनंदरूप वायुस्वराने गाता गाता विनोदाने मौजेने प्रतीत होतोस (ध्रु). या गोनाम इंद्रियवृत्तींना वळविणारा जो हा गोवळा परमात्मा जगपणाचा भाग जाऊन सकळी सकाराचे कळेने योगयुक्त होऊन तुझा तूच झाल्याने जग दिसतच नाही (२). शब्दरूपात आकाशाचे ठिकाणी जो अर्थ म्हणजे तत्त्व आहे त्या अर्थरूपतेने दृष्टीतच तुला पाहिले. दृश्याचा ग्रास झाला की देवा तुझ्या पायी चैतन्यगतीशी मिठीच पडते. ज्या आवडीने तू हे विश्व निर्माण केलेस ती गगनाचा ग्रास करणारी आवडी गाठी पडल्याने ती आता लवंडून ओसंडून कोठे दूरवर जाणारच नाही असे झाले (३). आता जर खरे तुझा तूच आत्मा आहेस तर सुखाचे जे सुख तेथेच जे आपले रूप आत्मरूप त्या निजत्वाची चिद् घनानंद अस्तित्वाची प्राप्ती आहे (४). मुनिजनांच्या मनातला प्रकाश तू परिपूर्ण चंद्र (प्रकाश) असून तुझे हे चिद्घन स्वरूप वर नामरूपात्मक आवर्णाने आच्छादिले असल्याने अदृश्य आहे (५). बापरखुमादेविवर विठ्ठलाला डोळ्यात निरुपाधी पहाता पहाता त्याने हा ठेवाच दाखविला (६).

**(३२)**

**सुनीळ गगना पालटु । तैसा दिस अंगी नटु । कृष्णी बाणलासे । नीळवर्णु**

**गे माये ।।१।। यमुनेच्या पाबळी । तनु घेऊनि सावळी । पावा वन माळी। वातु असे ।।ध्रु।। पावयाचे निनादे । कृष्णाचेनि वेधे । अमृत घनु वोळला। आकाश वोळुनि वर्षाव झाला । ब्रह्मरसपूर आला रे ।।२।। कान्हा अति सुंदर। वदनारविंद आळी सेविती । अनिवार रे आयो ।।३।। चंदनादि टिळकु लल्लाटी । जया साजे मोर । विसांवटी रे आयो । सुरतरु कुसुमे कंबरी भारूरे कुंडले । झळकती कपोळी रे आयो ।।४।। *बापरखुमादेविवरू* विठ्ठलु रे । त्रिभुवनजन मोहन रे आयो ।।५।।**

निळे आकाश हे मूळचे खरे पण उपाधी भेदाने ते घटाकाश, मठाकाश, महदाकाश म्हणून संबोधले जाते, तसा नराप्रमाणे आपली रूपे पालटून श्रुतीला न इति न इति म्हणावयास लावणारा श्रीकृष्ण जो नीलवर्ण असा प्रत्ययास येतो (१). यमनियमादि वृत्तींच्या म्हणजे यमुनेच्या तीरावर हा वनमाळी परमात्मा सावळे शरीर धारण केलेला पावा वाजवीत असे (ध्रु). या अनुहतनादश्रवणाने या कृष्णाचा वेध लागल्यामुळे अमृतघनच वर्षू लागला. जीवन अमृतमय झाले. चिदाकाशातून कृपेने जो वर्षाव झाला तो 'रसानां वै रस:' असा ब्रह्मरसाचा पूर आला (२). कान्हा अति सुंदर त्याचे मुखकमल पाहून तो सुखास्वाद घेण्याकरता अपरंपार जीव भ्रमराप्रमाणे आले व हा आनंद लुटू लागले (३). चंदनतिलक ज्याचे कपाळी असून, मयूरपिच्छ ज्याचे मस्तकी शोभत आहे, ज्याला पाहिले की विसावाच प्राप्त झाला पाहिजे, कंबरेत कल्पवृक्षांची फुले ज्याने खोचली आहेत, कपाळी वायुप्रकाशरूप दिव्य कुंडले झळकत आहेत (४). तो बापरखुमादेवीवर विठ्ठल त्रैलोक्यातील जनमनांना मोह घालणारा असा मोहक आहे (५).

**(३३)**

**लाउनि मनगणीची दोरी । विपरीत तयाची कुसरी । अकळुन न कळे श्रीहरी। अवघे वोडंबर तुझे ।।१।। अष्टदळ कमळाची वोवरी । विपरीत तयाची कुसरी । एकवीस खणांचे उपरी । बाहिजू का हरी दाखविली ।।ध्रु।। तेथ रात्र**



**दिवस नेणिजे । सोहं प्रकाश सहजे । नाचविसी पंचभूते वोजे । कवतुक तुझे तू पाहसी ।।२।। भानू निसियेचा कुवासा । येक राहिले याचिये आशा । येक म्हणती अढळ धुरू कैसा । तयाचा भरंवसा । त्यासि नाही ।।३।। ऐसी तयाची बोलणी । अंगी राहिली खेळणी । साही पावटणी करूनी । सातावरि घातू मांडिला ।।४।। करी घेऊनि आळवणी । करू नेणे ओवळणी । *बापरखुमादेविवरा* विठ्ठला चरणी। चौघीजणी निमालिया ।।५।।**

मनोवृत्तींचा समुदाय त्यास ज्याने आपले सूत्र लाऊन ठेविले त्याचे कौशल्यच वेगळे आहे. यामुळे याचे आकलन झाले तरी ते सूत्र कळतच नाही अशी तुझी माया आहे (१). आठ दले ज्याला आहेत असे ब्रह्मचक्र ज्या ठिकाणी वायुगतीचे आठ फेरे आहेत त्या जागेची कुशलता एकवीस स्वर्गाचे वर बाहेर बाहेर स्पष्टतेने दिसावी अशी का देवा दाखविली आहेस? या ठिकाणी स्वरातून गमन होणे हा स्वर्ग आहे. सात स्वर्ग आहेत. प्रत्येकाचे तीन टप्पे असे हे एकवीस टप्पे हेच खण; यावर सहस्रदळात अंतर्यामी तर आत्मप्रचीति येतेच पण याचे कौशल्य वर वर पहाणारालाही कल्पनेत येणे सारखे आहे (ध्रु). तेथे दिननिशी वाचक गती रहात नसून सहज स्वयंसिद्ध सोहं प्रकाश आहे. त्या अधिष्ठानावर ही पंचभूते तू नाचवित असून तुझे तूच हे सर्व कवतुक पहात आहेस (२). चंद्रसूर्यगतीचा कुवासा म्हणजे आश्रय जो तू त्या तुझ्या आशेने एक राहिले. पण ध्रुवाने देवाला अढळपद मागितले, देवाने दिले ध्रुवाचा तारा अढळ झाला तरी तो फसला का, त्याचा त्यालाच भरवसा नाही. मग तो अढळ कसा? (३). अशी ही त्या परमात्म्याची बोलणी अंगी खिळून राहिली. त्यांनी सहावर मात करून सप्तविध धातूंची आटणी करून आपले जीवन ऊर्ध्वगामी केले (४). आळविण्याची वृत्ती हाती घेऊन ओवाळावे तर भानच राहिले नाही. चारी अवस्था या बापरखुमादेविवर विठ्ठलाचे चरणी विलीन झाल्या (५).

**(३४)**

**त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनिया माये । कल्पद्रुमातळी वेणु वाजवितु आहे ।।१।। गोविंदु वो माये गोपाळु वो । सबाह्य अभ्यंतरी अवघा परमानंदु वो**

**।।ध्रु।। सावळे सगुण सकळा जीवांचे जीवन । घनानंद मूर्ति पाहता हरपले मन ।।२।।शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ । *बापरखुमादेविवरू* विठ्ठलु सकळ ।।३।।**

यमनियमादि वृत्तिविरहीत यमुनेचा-जीवनाचा-प्रवाह तीन ठिकाणी वाकडा गेलेला, त्या तीन प्रवाहांचा भंग जेथे होतो तेथेच यमनियम, ध्यानधारणा प्रतीत होते. त्या ठिकाणावर एका पायावर भार देऊन व दुसरा पाय त्यावर वाकडा ठेवून ज्याने आत्मजीवनाची गती दिडकी दाखविली असा तो श्रीकृष्ण परमात्मा निर्विकल्प अवस्थात्मक कल्पवृक्षातळी अनुहत वेणू वाजवीत आहे (१). असा तो अंतर्बाह्य असणारा अवघा परमानंद गोविंद गोपाळ होय (ध्रु). कळेने युक्त असणाऱ्या सकळा जीवांचे जीवन हा सकार गुणाने युक्त असणारा व सहांना वळविणारा सगुण सावळा की ज्या घनानंद मूर्तीला पाहता माझे मनच हरपून गेले (२). स्थावर जंगम दृश्य ज्या अकळ शून्यातून निर्माण झाले त्याला जो व्यापून राहिला तोच सर्व कांही बापरखुमादेविवर विठ्ठल आहे (३).

**(३५)**

**तुरे कांबळा डांगेवरी । विषाण वेणु घेउनि करी । वैजयंति रुळे कैशी । वक्षस्थळावरी ।।१।। गोविंदू वो पैल गोपाळु माये । सुरतरू तळवटी देखे कैसा उभा राहे ।।ध्रु।। आड त्रिपुंड्र शोभत दृमिळ भारेसि जे जात । नागर केशरीची पुष्पे कैसा खोप मिरवित ।।२।। हिरिया ऐशा दंत पंक्ति अधर पोवळवेली । श्रवणी कुंडले ब्रह्मरसाची वोतली ।।३।। विश्वाचे जीवन ते म्या सार देखियले । योगी ध्याती ध्यानी ब्रह्म तेचि गोकुळासि आले ।।४।। आजी धन्य धन्य जाले राया कृष्णासि देखिले । निवृत्तिमुनिराय प्रसादे ध्यान ते हृदयासी आले ।।५।।**

खांद्यावर कांबळे, हातात शिंगाची तुतारी-वेणू-छातीवर वैजयंती माला (१). असा तो गोविंद गोपाळ कल्पवृक्षातळी कसा उभा राहिला आहे (ध्रु). ज्याचे कपाळावर जीवनाचे तीन प्रवाहांचे एकत्व दाखविणारे त्रिपुंड्र शोभत असून मस्तकी नागर केशरीची



फुले खोचून मिरवत आहे. जेथे सुगंधाचा साक्षात्कार होत आहे (२). हिऱ्यासारख्या दंतपंगती प्रकाशमान असून ओठ पोवळ्याप्रमाणे लाल आहेत. ब्रह्मरसाची ओतलेली कुंडले श्रवणात झळकत आहेत. नाद प्रकाश जीवनाचा अनुभव श्रवणीच घ्यावा असे साधन ज्या योगे व्यक्त झाले आहे (३). सारभूत विश्वाचे जीवन ज्याचे ध्यान योगीजनांनी करावे ते मी पाहिले असून ते ब्रह्मच गोकुळात आले आहे (४). कृष्णाला पाहून धन्य धन्य झाले आणि तेच ध्यान श्रीनिवृत्तिमुनिरायांचे कृपाप्रसादाने हृदयात आविर्भूत झाले (५).

**(३६)**

**बरवा हो हरि बरवा हो । गोविंद गोपाळ गुण गुरुवावो ।।१।।**
**सावळा वो हरि सावळावो । मदन मोहन कान्हो गोवळावो ।।ध्रु।।**
**पाहाता वो हरि पाहाता वो । ध्यान लागले या चित्ता वो ।।२।।**
**पढियेवो हरि पढियेवो । *बापरखुमादेविवरू* घडियेवो ।।३।।**

गोविंद आणि गोपाळ या दोन गुणांनी श्रेष्ठ असा हरीच तेवढा बरवा आहे (१). सहाला वळविणारा, मद मोह नाहीसा करणारा, गोनाम इंद्रिय वृत्तींना वळविणारा मदनमोहन सावळा कान्हा श्रीहरीच आहे (ध्रु). हरीला पाहता पाहता चित्ताला ध्यानच लागले (२). हरिनामाचे पठण सुरू झाले की बापरखुमादेविवर परमात्मा आकाराला आलाच (४).

**(३७)**

**आतसि कुसुम कोश शामघनु । तुळसी वृंदावनामाजी मुनी मनोपद्मदळ विशाळती रे आयो ।।ध्रु।। जलधी शयन कमलालया जीवनु । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु घनानंद मूर्ति ।।१।।**

फुलाप्रमाणे नाजूक शामवर्ण परमात्मा मुनीमनकमलदळामध्ये विशाल रूपाने प्रत्ययास येणारा, तुलसी वृंदावनामध्ये आहे (ध्रु). प्रलयकाली बाल हंसरूपाने निद्रिस्त होऊन क्रीडा करणारा, जीवनरूप घनानंद मूर्ती बापरखुमादेविवर विठ्ठलच आहे (१).

**(३८)**

**चतुरपणे चतुराननु पै भागला । शिवुपणे शिवरुपु पै जाहला ।।१।।**
**हरिपणे हरिअंग रिघाला । या तिहीचा मेळा न दिसे गे माये ।।२।।**
***रखुमादेविवरू* तिही गुणा वेगळा । शक्ति नव्हे दादुला गे माये ।।३।।**

चतुरपणाने ब्रह्मदेव दमला. कल्याणपणाने शिवरूप झाला (१). हरिपणाने हरि अंगाने युक्त झाला. या तिहीचा मेळा दिसत नाही (२). तिहीचा मेळ झाला की अव्यक्तता प्रतीत होती. या तिहीचे जे तीन गुण त्या वेगळा, शक्तीला अधिष्ठानभूत, पण जो शक्ति नव्हे, असा तो पुरुष रखुमादेविवरच होय (३).

**(३९)**

**तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।।१।।**
**अनुमानेना अनुमानेना । श्रृति नेति नेति म्हणति गोविंदु रे ।।ध्रु।।**
**तुज स्थूल म्हणो की सुक्ष्म रे । स्थूल सुक्ष्म एकु गोविंदु रे ।।**
**तुज आकार म्हणो की निराकार रे । साकारू निरूकारू एकु गोविंदु रे ।।३।।**
**तुज दृश्य म्हणो कीं अदृश्य रे । दृश्य अदृश्य एकु गोविंदु रे ।।४।।**
**निवृत्ति प्रसाद ज्ञानदेव बोले । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु रे ।।५।।**

तुला सगुण म्हणावे का निर्गुण म्हणावे? सकाराचे गुणाने तू युक्त आहेस कां ज्या निर्गुणांचे अधिष्ठानावर हा सकार प्रतीत होतो तो तू आहेस? विचार केला तर तू गोविंदच सगुण व निर्गुण आहेस. निर्गुण साचले की सगुण होते मग त्यात भेद कसला (१). ज्या तुझे अनुमान होत नाही, तर्कालाही जो तू अतर्क्य म्हणून जी श्रुती तुझ्याबद्दल 'न इति' म्हणते असा तू गोविंद आहेस (ध्रु). तू स्थूल मानाने दिसणारा आहेस का स्थूलाला चालविणारे जे सूक्ष्म तत्त्व ते तू आहेस? सूक्ष्माशिवाय स्थूल म्हणून काय दाखविणार? व स्थूलच नाही तर सूक्ष्म कशाला म्हणणार? सूक्ष्मातून स्थूल झाले व त्यामुळेच तेथे चलन वलन निर्माण झाले. मग त्यात भेद तो कोणता? म्हणून स्थूल सूक्ष्म तू गोविंदच आहेस (२). तुला आकार म्हणावे का निराकार म्हणावे? सकाराचा आकार ज्या निराकारांतून व्यक्त होतो तो तू साकार निराकार



गोविंदच आहेस (३). तुला दृश्यादृश्य काय म्हणावे? तुझा एक भाग अदृश्य झाला की एक भाग दृश्य होतो व एक भाग दृश्य झाला की एक अदृश्य होतो. आत्मपणाने प्रगट झालास की जगदाभास रहात नाही. ते तू आत्मत्व लपवलेस की दृश्य थैमान घालते. मग दृश्य या शब्दाला वेगळा अर्थ काय? दोनीही तू गोविंदच आहेस (४). निवृत्तिप्रसादें ज्ञानदेववृत्ति निवृत्त झाली तर 'ज्ञानादेव तु कैवल्यं' ज्ञान झाले तर वृत्ती तरी काय होईल? म्हणजे बापरखुमादेविवर विठ्ठलाचीच ही सर्व व्याप्ती आहे (५).

**(४०)**

**चंचळ चांदणे सोनेविण भासले । तेज निमाले रवि बिंबाविणे ।।१।।**
**जगत्र जीवनु म्हणे जगासी कारण । ते अणुप्रमाण तेथे दिसे ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* अणु प्रमाण भासला । सगुण निर्गुण जाला बाई येवो ।।३।।**

चैतन्य हे प्रवाही असल्याने आणि ते प्रकाशित असल्याने चंचळत्वाचे चांदणे चंद्राशिवाय भासमान झाले. जेथे अपरंपार तेज असून रविबिंबाचा ग्रास जेथे झाला ते तेज चैतन्यातच मिळून गेले. प्रत्यक्ष चंद्र सूर्य नसता जीवनात ही प्रतीती चैतन्याचे प्रवाहात आली. इडापिंगलेचा वाहणारा ओघ; त्यावर प्रकाशित झालेले आत्मतेज; दोनीची ऐक्यता होऊन, सूर्य लुप्त व्हावा असा शीतल प्रकाश की ज्यात जीवनाचे तेज अंतर्भूत होते ही अनुभूती आली (१). ज्याला जगत्रयाचे जीवन असे म्हणतात तो अणुप्रमाण बापरखुमारेविवर परमात्मा येथे अणुप्रमाण प्रतीत झाला असून तोच सगुण निर्गुण झाला (३).

**(४१)**

**दोही बाही संतांची सभा । सिंहासनी उभा श्रीविठ्ठल ।।१।।**
**गाती नारद तुंबर प्रेमे । हरिचे नामे गर्जती ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु उभा । त्रैलोक्याची शोभा शोभतसे ।।३।।**

दोनी बाजूला संतांची सभा असून सिंहासनावर श्रीविठ्ठल उभा आहे (१). नारद तुंबर यांचे प्रेमाने गायन चालले असून ते हरिनामाची गर्जना करीत आहेत (२). त्रैलोक्याची शोभा असा बापरखुमादेविवर विठ्ठल उभा असलेला शोभत आहे (३).

(४२)

**ऐसा अवतार नरहरि स्तंभा माझारी । भक्तां परोपरी धरी रूपे ।।१।।**
**धरूनिया महीत्व झाला नृसिंह रूप । वेदशास्त्रासी अमूर्त मूर्तीस आला ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* नरहरी अवतारू । वर्ण सारंगधरू निजरूप ।।३।।**

भक्ताकरता पुनः पुनः नाना रुपे धारण करणारा भगवान-खांबामध्ये नरात हरि प्रगट व्हावा - असा नरहरि रूपाने अवतीर्ण झाला (१). पृथ्वीपणा स्वीकारून वेदशास्त्रांना अमूर्त असणारा मूर्त होऊन नृसिंहरूपें प्रगट झाला (२). नीलवर्ण आत्मरूप बापरखुमादेविवर परमात्माच नरहरि अवतार होय (३).

(४३)

**स्वर्ग जयाची साळोखा । समुद्रपाळी पिंड देखा ।**
**शेषा सारिखी बैसका । जो आधार तिही लोकी ।।१।।**
**लिंग देखिले देखिले । त्रिभुवनी विस्तारले ।।२।।**
**मेघधारी तपन केले । तारापुष्पीवरि पूजिले ।**
**चंद्रफळ ज्या वाहिले । ओवाळिले रवि दीपे ।।३।।**
**आत्मनैवेद्य समर्पिले । ब्रह्मानंद मग वंदिले ।**
**ज्योर्तिलिंग मग ध्यायीले । *ज्ञानदेवी* हृदयी ।।४।।**

स्वर्ग ही ज्याची शाळुंका असून समुद्रपाळी ही ज्याची पिंडी आहे, तिही लोकास आधारभूत असणारा शेष ही ज्याची बैठक आहे (१). असे ते त्रिभुवनात विस्तारलेले आत्मलिंग पाहिले (२). मेघाचे धारेचे तपन करून ते पाणी या लिंगास समर्पण केले. तारापुष्पांनी त्याची पूजा केली. चंद्रफळ त्याला अर्पून रविदीपाने त्याची आरती केली (३). आपले आत्मत्व हाच नैवेद्य त्यास दिला. आणि अशा त्या ब्रह्मानंदास वंदन केले. असे ते ज्योतिप्रकाशयुक्त हृदयस्थ आत्मलिंग, त्याचे हृदयातच श्रीज्ञानेश्वरमहाराजानी ध्यान केले (४).

(४४)

**देव आहे जैसा तैसा नेणवे सहसा । भांबावला कैसा विश्वजनू । जया रूप**



**ना रेखा लय ना लक्षण । ते प्रतिमे आणून वासना रूपे ।।१।। देखा सर्वगत निराळा अद्वैत । तया मूर्तिमंत ध्यान जनू । तिही देवासि आरू जेथुनि विस्तारु । तो ध्वनी ॐकारु त्या आरू । आता तो नाद ना बिंदू । कला ना छंदू ।अक्षय परमानंदू । सदोदितु ।।२।। अवतरे तैसाच नव्हे । होय ते न संभवे ।आहे ते आघवे । लाघव रया । तो येकट एकला । रचला ना वेचला ।आदि अंती संचला । अनंतपणे पृथ्वी आप तेज वायु आकाश । ही सकळही हारपती प्रळयाति । तो निरशून्य निरुपम निरंजन निर्वाण । ते दशा पाषाण केवी पावती ।।३।।हता या डोळा परी न दिसे कांही केल्या । व्यापुनि ठेला बाहिजू भीतरी । तो पद पिंडा अतितू । भव भाव रहितू । *बापरखुमादेविवर* विठ्ठलु हृदयातु रया ।।४।।**

जसा देव आहे तसा तो सहसा जाणवत नाही. यामुळे विश्वातील लोक कसा भांबावून गेला आहे, भ्रमला आहे. ज्याला रूप नाही, रेषा नाही म्हणजे आकृती नाही लय नाही, नाश पावत नाही, ते तत्त्व प्रतिमेत इच्छेप्रमाणे आणून (१). सर्वगत असून-सर्वात गतिरूपाने प्रत्ययास येणारा सर्वास गती देणारा गतिरूप जो सर्वापेक्षा निराळा अद्वैत आहे त्याला मूर्तिमंत करून जग ध्यात असते (२). तिही देवांना आधारभूत सर्व आहे, जेथून सर्व विस्तार झाला जो तो ॐकार ध्वनी त्याला जो आधारभूत आहे, जेथून हा ॐकार उठला, आता तो नाद बिंदू कला छंद काहीच नव्हे. जीवनाची सूक्ष्म हालचाल हे अनुकंपन तेथेच वृत्तीवर वृत्ती उठणे व दृश्यावर वृत्ती न उठणे ही अनुवृत्ती हीच क्रिया सतत प्रतीत होणे हा छंद मग नाद बिंदू असे होत एकदा का आत्मप्रत्यय आला की तेथे तो आत्मत्वानेच आत्मानुभूती घेत रहातो. यामुळे ज्याला क्षयच नाही अर्थात् वृद्धीही नाही. असा क्षयाक्षयातीत अक्षय श्रेष्ठ आनंद जो सदाच आहे तोच तो आहे (२). वरून खाली आले तर ते खरे नव्हे म्हणजे ते तसेच आहे असे नव्हे. ते होय हे न संभवे. तेथे कांही होणे हे संभवतच नाही. अर्थात् कांही न होणे हेच जेथे कांही होणे आहे. म्हणून होणे जहाले, होईल ही भाषाच जेथे नाही. मग जेथे कांही आहे तो सर्व त्याचा सहजच चिद्विलास आहे.

त्याचे हे सर्व कवतूक आहे. तो एकत्वाने एक असा एकी एक आहे. तो रचला नाही किंवा त्यात कांही खर्चीही पडले नाही. आदिअंती आम्ही म्हणू तेथे अनंतपणाने तो साचला आहे. अनंताला आदि अंत नसतातच. पूर्ण वस्तूचा आरंभ व शेवट दाखवता येत नाही पण कल्पिता येतो, खरा असत नाही. कोठेही आरंभ व शेवट म्हणता येतो. त्याप्रमाणे आम्ही म्हणू तेथे तो अनंतच असलेने आहेच. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हे प्रलयकाली सर्व नाहीसे होतात. तो तर ज्या शून्यातून ही भौतिक सृष्टी निर्माण झाली त्याचे पलीकडचा, ज्याला उपमा नाही असा, जेथे हालचाल गडबड धांदल काही नाही, असा सर्व दृश्यादृश्यातील शून्याचाही शेवट मोक्षच रूप असा तो देव तो किंवा पुष्कळ देव आहेत. आमचे सोयी करता अशी कल्पना केली तरी हे देव पाषाणावस्थेत येतील कसे? (३) या डोळ्याने पहाता जो कांही केल्या दिसत नाही, तरी जो अंतर्बाह्य व्यापून आहे. तो पिंडात वावरणाऱ्या जीवपदाचे अतीत भू म्हणजे होणे व भव म्हणजे झालेले. यात भाव म्हणजे जे आपले अज्ञानात्मक अहंतारूप अस्तित्व त्याचे रहित म्हणजे पलीकडे बापरखुमादेविवर विठ्ठल हृदयातच आहे (४).

**(४५)**

**मन मारूनि डोळा लेईले । काळेपणे मिरविले रूप त्याचे ।।१।।**
**बरवे हे रूप काळे अमोलीक । म्हणुनि सांगतसे शुद्ध भावे ।।२।।**
***रखुमादेविवरु* अगाध काळे रुप । म्हणोनि सर्वत्र व्योम व्यापियेले ।।३।।**

मनाचे मनत्वच जेथे रहात नाही असे काळे रूप डोळ्यातच मिरविले आहे (१). हे रूपच चांगले असून ते श्यामवर्ण पण अमोलिक आहे, ज्याचे मोलच होणार नाही. जे दृश्य पदार्थापेक्षा वेगळे आहे. द्रष्टेपणाने जे सर्व दृश्य पाहते. या करता त्याबद्दल हे शुद्ध भावाने सांगत आहे (२). हेच रखुमादेविवराचे काळे रूप अगाध आहे ते डोळ्यात भरले आहे. त्याला सीमा नाही म्हणून त्याने सर्व आकाश व्यापून टाकले आहे (३).

**(४६)**

**काळेपणाचा आवो अंबरी बाणला । तो एकू दादुला देखिला डोळा ।।१।।**



**काळे मनुष्य मानव जाले । अरूप रूपा आले गोविंदपणे ।।२।।**
***रखुमादेविवरु* विठ्ठलु सोहं धरू । त्याने माझा वेव्हारु बहु काळे नेला गे माये ।।३।।**

ज्याचे काळेपणाचा ठसा आकाशात बाणला आहे, तो एक पुरुष या डोळ्यात पाहिला (१). तेच काळे रूप मनुष्य-मानवाकृती-झाले आणि अरूपच गोविंदपणाने रूपाला येऊन साकार झाले (२). ज्याची सोहं हीच धारणा आहे, असा सोहं स्वरूप रखुमादेविवरु विठ्ठल असून, बहु कालचा माझा व्यवहार हरण केला (३).

**(४७)**

**ज्याचे गुण नाम आठविता मनचि नाही होय । अनुभवाचे पाय पुढे चालती ।।१।। निर्गुण गे माय गुणवंत जाला । प्रतीबिंबी बिंबतसे चैतन्याचे मुसे । प्रति ठसावत ते वृंदावनी ब्रह्म असे गे माये ।।२।। *बापरखुमादेविवरु* डोळसु सावळा । द्वैत-अद्वैत सोहळा भोगवितो गे माये ।।३।।**

ज्याचे गुणनामाचा आठव होताच मनाचे मनत्वच नाहीसे होते, जीवनाचे सूत्र हेच नाम प्रत्ययास येते, तेथे अनुभवाचे पाऊल अनुभवानेच पुढे जाते (१). निर्गुण परमात्माच जीवनसूत्र गुणाने युक्त होऊन गुणाकार, गुणवंत झाला. चैतन्याच्या द्वारा जीवाचे ठिकाणी बिंबला ते ब्रह्मच वृंदावनात ठसले, साकार झाले (२). डोळ्यात प्रचीतीस येणारा असा डोळसू सावळा बापरखुमादेविवर परमात्मा द्वैत, अद्वैत, सोहळा भोगवित आहे (३).

**(४८)**

**निळीये रजनी वाहे मोतिया सारणी । निळेपणे खाणी सापडली ।।१।।**
**आंगणी चिंतामणी जलधरु सींपणी । अमृत साजणी जीवन कळा ।।२।।**
**सुमनाचे शेजे विरहिणी विराजे । शयनी सुलजे आरळ सेज ।।३।।**
**माजयाने हरी मुख कमळ टेकी । निळीये अवलोकी कृष्णमूर्ती ।।४।।**
**कमळणी अमोद सुस्वाद मकरंद । चंदनाची अभेद उटी अंगी ।।५।।**
**कर्पूर परिमळे दिव्य खाद्य फळे । ठेवुनि सोज्वळे वाट पाहे ।।६।।**
**मन तो निळिये गोविंदाचिये सोसे । विरहिणी पाहे वाटुली जैसी ।।७।।**
**ज्ञानदेवी निळिये वाटुली गोविंदी । *कृष्ण निळिये* पदी ठाव जाला ।।८।।**

नीलवर्ण जीवन शून्यातून वहात असता त्यात मुक्तस्थितीचा अनुभव येतो. चंद्र, सूर्य जेथे लुप्त होतात तेथे अंधारात उजेड होतो. अशा दृश्यादृश्यातीत, शब्दाशब्द ग्रासून प्राप्त झालेल्या शून्यावस्थेत नीलवर्ण खाणीच, निळेपणाने आकाशाचे द्वारा आकाशरूप जीवन ऊर्ध्वगामी झाल्यावर, सापडली (१). ॐकाराचे प्रांगण असे जे अंगण, या अंगणात चिंतिलेले प्राप्त करून देणाऱ्या चिंतामणी जीवनाची शिंपणी सुरू झाली. तेच जीवनकळेत स्रवणारे अमृत होय (२). चांगल्या मनाचे शुद्ध संकल्परूप शेजेवरही विरहावस्थेत या देहोपाधीने आलेली बुद्धी ही विरहिणी अधिष्ठित झाली. आणि मऊ अशा बिछान्यावर लज्जित होऊन राहिली (३). माया जेथे जन्माला येते अशा स्थानी हट्टाने मुखकमल जो टेकती तोच आकर्षण करून घेणारी श्रीकृष्णमूर्ती नीलवर्णरूपात तिला प्रतीत झाली (४). कमळातील मध हा गोडी आणि सुगंध देणारा असल्याने रसास्वादाचा आणि सुंगधाचा त्या अनुभूतीत साक्षात्कार होऊन अभेद चंदनाची उटीच बुद्धीचे ठायी उमटली (५). चार देहातील आयुष्य हेच दिव्य खाद्य सुगंधी फळ ठेवून ती सोज्वळ बुद्धी परमात्मरूप होण्याची वाट पहात होती (६). श्रीगोविंदाचे सोसाने मनात नील प्रकाश प्रतिबिंबित झाला. आणि अशा प्रकाराने हा शुभ शकुन जाणून ती विरही बुद्धी एकरूपतेची वाट पहात राहिली (७). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे ठिकाणी नील प्रकाशाशी समरस झालेली ही आत्मबुद्धी नीलवर्ण कृष्णपरमात्मा श्रीगोविंद यांचे (चरणी) गतिरूप चरणाशी एकरूप झाली, मिळून राहिली (८).

(४९)

**राम बरवा कृष्ण बरवा । सुंदर बरवा बाइयानो ।।१।।**
**केशव बरवा माधव बरवा । गोपाळ बरवा बाइयानो ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* त्रिभुवनी गरुवा । विठ्ठल बरवा बाइयानो ।।३।।**

सुंदर असा रामकृष्णच चांगला आहे (१). केशव माधव गोपाळ चांगला आहे (२). बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल हा त्रिभुवनात श्रेष्ठ असून तोच बरवा आहे (३).



(५०)

**साती बारी दोनी आपणचि होऊनी । सुरतरू माझारी वोळगे । तळी त्रिभंगी मांडुनी ठाण घेऊनि मेघाचे मान । विजु एकी वेढून । बरवे गर्जतु गे माये ।।१।। नवलावो गे माये । न्यहाळिता कैसे मनाचे नयन उमलताती । तीही एक दृष्टी जिव्हा लाभती । तरी सुलभु देखता बोलती गे माये ।।ध्रु।। पाहो याचे पाय । शंभूचिया माथा माये । सासिन्नली चंद्र दाहे । गंगे ते । तेथ असुराची शिरे । येथ सकल शरीरे ।तोडराचेनि बडिवारे । बरिजतु गे माये ।।२।। तेज सावळे । रुप लाधले । परिमळे । अनंगाचे निसळे । कासी कसियेला । तो पालउ पांढर गळे । होतुका जगाचे डोळे । दुरुनिया सुनाळे । रोविले गे माये ।।३।। उपनिषदाचा गाभा । माजी सौंदर्याची शोभा । मांडिला दो खांबा । तैसा दिसे देखा । वेगळालिया कुंभस्थळा । परि हातु सरळा । पालटु बांधला माळा । मेखळा मिसे गे माये ।।४।। भलते उते वाहे न वाहे नदी । जेवी स्थिरावे अगाधी । तैसी पुंजालता हे मंदी । दोही वेदांची । वरिलिया वक्षस्थळा । नुपुरे स्थानीचा डोळा । मागून निघे कमळा । नव्हे रोम राजी ।।५।। लावण्य उदधी वेळा । तेचि पै वैजयंती माळा । वरी शोभतसे सोहळा । साहकार वेचा । म्हणे प्रेम पुष्कळा । थडिये लाभे सकळा । नयन सुखाच्या सुकाळा । जग मेळवितु गे माये ।।६।। भोवति तारांगणे पुंजु । माजी अचळ सुरिजु । आला वक्षस्थळा उजु । तैसा दिसे देखा । जेवणे न अंगे । उभवुनी श्रीकरायोगे, योग नादा तरी रंगे । नभु दुमदुमित वो माये ।।७।। इंद्र धनुष्य का ढिले । तया तळी बहुडले । तेचि कुरुळी वेढिले । समाधि सुख देखा । आवारिचा गुणु । श्रुती गर्भी समवर्णु । दोही स्वरी गोडी वेणु । जग निववितु वो माये ।।८।। वेधिता काहीच नुरे । रूपा आले हेची खरे । वरी दाविता हे माजिरे । गोप वेशाचे । तमावरी हातियारे । रविकाज काई येरे । तैसा *रखुमादेविवरे* । विरे घेतले गे माये ।।९।।**

सप्त स्वर्ग आणि सूर्य कळा (सहस्ररश्मि) आपणच होऊन निर्विकल्प अवस्थात्मक

कल्पवृक्षामध्ये (जो) प्रतीत होतो किंवा प्रकृतीचे बासरीत सात स्वर व दोन जिव्हा आपणच होऊन जो नादानुसंधानाने त्याचा लय करून निर्विकल्पतेत प्रतीत होतो. जीवनाचे तीन ओघांचा भंग जेथे होऊन ते ऊर्ध्वगामी होते तेथे मेघवर्ण स्वरूपाने, पीत प्रभेने वेष्टिलेल्या परमात्म्याने ठाण मांडून अनुहत गर्जत आहे (१). त्याला पाहता पाहता मनाचे डोळे विकसित झाले, तोच एक दृष्टी होऊन जिव्हा फुटली. असे झाले तर प्रतीतीस सुलभता आहे असे म्हणतात (ध्रु). ज्याचे पाय शंकराचे मस्तकी आहेत. भाळी चंद्र असूनही या पायाचे अनिवार प्रेमाने कोंडी होऊन जी तेथेच थांबली आहे. सुरातीत अवस्था सर्व शरीरातून प्रविष्ट झाली आहे. तेथे हे अनुहताचे तोडर निनाद करीत आहेत (२). ज्याचे तेज सावळे आहे असे अंगरहित, सुगंधयुक्त रूप ज्याने कासे पीतप्रभायुक्त पीतांबर परिधान केला आहे, ते रूप प्रचीतीस आल्यामुळे श्वेत स्वरूपाचा साक्षात्कार होत आहे. दुरून पहाणाऱ्या जगालाही तो नीलवर्ण आकाशासारखा दिसतो आहे. त्याने तो वर्ण आकाशाला देऊनच ठेविला आहे (३). उपनिषद म्हणजे परमात्म्याची जवळीक, ज्या योगे यापेक्षा जवळचा पदार्थ नाही हे निश्चित होते. त्या जवळिकेचा जो गाभा आहे. जेथे निकटपणाची सीमाच झाली आहे. सौंदर्यालाही शोभा प्राप्त व्हावी असा जो आहे, अंतर्बाह्य दोनी बाजूने ज्याची मांडणी आहे, तो वेगवेगळ्या घटातून तसाच दिसत आहे. हाताने व्यवहारी जो सरळ आहे. देहधारणेचे मिषाने ज्याने हा चतुर्विध दृश्याचा मळा पालट म्हणून उभा केला आहे (४). नदीप्रमाणे ज्याचे रूप वहात नाही पण जे भले असून प्रवाही आहे आणि प्रवाही असून अगाधत्वात जे स्थिर आहे. वेद दोही बाजूनी विचार करणारे तेजस्वी खरे पण त्यांनाही जेथे मंदता स्वीकारून मंदगती व्हावे लागले. ज्याचे हृदयाचा ठाव ठिकाणा डोळ्याला घेता येत नाही. आकाशाचाही ग्रास होतो. जेथून हे शाम कमल रोमारोमातून प्रतीत होते (५). वैजयंती माळा धारण केलेला जो सौंदर्यसमुद्राची सीमाच आहे, जेथे सोहंकाराचा सोहळा निरहंकारात शोभत आहे. जो प्रेमाची पराकाष्टा आहे. पैलथडी वर्म जाणणाराना ज्याचा लाभ होत आहे. आपल्या नयनांना सुखाचा सुकाळ व्हावा म्हणून ज्याने जगाची रचना केली आहे. आणि जगालाही जो सुखाचा



सुकाळ असा सुखसागर आहे (६). ज्या भोवती तारांगणांचे-तारकरूपाचे-मेळावे आहेत, त्यामध्ये हा चंचळरहित असा आत्मसूर्य आहे. हृदयाचेही जो हृदय आहे असा जो तो प्रत्ययास येत आहे. ज्याला भूक, तहान काही नाही, परंतू आपले हस्तगर्तीचे द्वारा योगनादानुसंधानात जो रंगून जात आहे आणि ज्याने हे आकाश दुमदुमत ठेवले आहे (७). इंद्रधनुष्याचा जो निर्माता ज्याचे चरणी ते शोभत आहे. जे सुंदरतेने वेढले असून दैदिप्यमान आकर्षक आहे. ज्याला पाहता समाधीच लागावी अशी अवस्था आहे. श्रुतिगर्भ समवर्ण हा ज्याचे आवारीचा ॐकार गुण आहे. हेच ज्याला जाणणेचे वर्म आहे जीवनाचे दोनी स्वरांतून प्राप्त होणारी सारखीच गोडी जो आपल्या वेणुनादाने प्रगट करून जगाला शांत करीत आहे (८). ज्याचा वेध लागला की काही उरत नाही हेच उरते तेच ते सर्व रूपाला आले हेच खरे आहे. ज्याने एक उन्माद निर्माण होतो आणि एका धूममधे राहतो त्याने अज्ञानावर हत्यार चालविणे करता सूर्यासारखा सतेज गोपवेश रखुमादेविवराने घेतला (९).

### (५१)

**मदन मूर्ति विश्वी अळंकारिली । ते डोळ्या असु माय झाली । पाहता मनाची वृत्ति नुपुरे । तेथिची सोय । तेथे भरोनि वोसंडिली गे माये ।।१।। अभिनव रूप कैसे मना अगोचर अरूप रूपासि आले । ते हे कल्पद्रुमातळी ठाण मांडुनी देहुडे । तेणे आनंदघने निवर्विले गे माये ।।ध्रु।। चिदानंदाची मांदुस किंचित घन चिदाकाश । तेजःपुंज प्रकाश चरणी शोभा । निडारले दृष्टि पाहता रूपाचा एकवळा । कैसा साकारे सोहळा भोगितसे गे माये ।।२।। सकळ तीर्थे आर्तिली । ती ऋषिवृंदे घेऊनि बैसली । पावन झाली चरणांगुष्ठी । वाकी तोउरू गजरी । गर्जतुसे नाना परी। तो श्रुतिनादु अंबरी । साठवला गे माये ।।३।। उपनिषदाचा गाभा । परि देहुडापाऊली उभा । जानु जघनीच्या प्रभा । नभ धवळले । सुरंग सोनसळा । वरि वेढिला पिवळा । त्यावरी गाठियला मेखळा । रत्न खचित गे माये ।।४।। हा जगडंबरू जगदाभासु । नाभिकमळी प्रकाशु । चतुरानना । पाहता तेथिची हाव । मना न पुरे तेथिची**

**थाव । म्हणवुनि सगुण ध्यान । करी तुझे गे माये ।।५।। ब्रह्मांडाचिया कोटी । रोम रंध्री उतरडी । मदन सांडुनिया प्रौढी । उदरा आला । सुघटित वक्षस्थळा । निरोपम केवळ । वरि पदयुगळ । द्विजोतम गे माये ।।६।। चहु पुरूषार्थांचे साधन । तेचि आयुधे मंडन । बाही बाहू बहे मंडन । मंडना आले । वीर कंकण मनगटी । कांडोवांडी मुद्रा दाटी । कैसा अलोहित । नखे बोटी । वेणू वाजे वो माये ।।७।। ब्रह्म ऐसे धनु आतला । कीं सुधारसु मुराला । तोची नादु सुस्वर आला । पावया छंदे । अधरीचे अमृत । पिकलेसे ब्रह्मरस । तेणे जाला सौरसु । गोपिजना गे माये ।।८।। नयनीचे तारे । दो पक्षी प्रेम पुरे । द्वैताद्वैत सरे । ठकले केले । कुंडलाचिये दीप्ती । लोपला गभस्ती । सुख वरूपाची शांती । येणे सुखे गे माये ।।९।। आता पाहता पाहतया दृष्टी न पुरे । ध्याता मनचि नुरे । आत बाहेरी पुरे । व्यापुनि ठेला । मावळलिया दृष्टी । पाहता देखणे ठसावले । निर्गुण गुणासी आले । सदोदित गे माये ।।१०।। आता हा केवी पहावा । पाहतयेचि दृष्टी । मन मनेचि दिधली मिठी । तेथील ते गोडी रूपासी आली । म्हणति *निवृत्ति* । ज्ञानदेवा पाहे चित्ती । आता जागृतीच्या अंती । सुख शांति रया ।।११।।**

मद नाहीसा करणारी मदनमूर्ती विश्वरूपाने नटली असून डोळ्यामधे पाणीदार रसरूपाने प्रतीत झाली. पाहाता पाहता मनाची वृत्ती पुरी होतच नाही, आता हे पुरे असे वाटतच नाही; अशीच ती व्यवस्था असून डोळे भरून जी प्रसृत होत आहे, आकाशात, ओघवती होत आहे (१). मनाला जाणता न येणारे असे हे अभिनव रूप अशब्द शब्द गुणाने अदृश्यादृश्य होऊन अरूप म्हणजे त्याला ठराविक रूप नाही व रूप म्हणजे जे आकारित झाले आहे असे ते रूप अरूप रूपाला आले आहे. नामरूपाने जगात नटले आहे. तेच हे निर्विकल्प अवस्थात्मक कल्पवृक्षातळी अधिष्ठान मांडून एका पायावर एक पाय वाकडा ठेवून दिडक्या चरणगतीने घनानंदत्वाने ज्याने शांत शांत केले आहे (ध्रु). चिदानंदाचे ठिकाणी चैतन्यात सापडलेल्या आकाशात-पोकळीत म्हणजे चिदाकाशात-जे किंचित घन तेजःपुंज आहे. त्याचे चरणगतीचे



ठिकाणी प्रकाशाची शोभा असून त्याकडे दृष्टीचे प्रसरण होऊन पाहता तेथे चैतन्याचा एकोपा सोहंकारे साकारपणे सोहळा भोगीत आहे (२). सकळ तीर्थांची जेथे आर्त वृत्ती झाली ती मूर्ती ध्यानात घेऊन ऋषीमंडळी ध्यानस्थ बसली. आणि ज्या चरणगतीत प्राण गुप्तरूपाने स्थित आहे अशा चरणांगुष्ठ दर्शनाने पावन झाली. वाकी आणि तोडर ज्याचे ठायी नाना प्रकारे निनाद करीत आहेत. तो श्रुतिनाद आकाशात भरून राहिला आहे (३). उपनिषदाचा जो गाभा  तो एकावर एक वाकडे पाऊल ठेवून उभा आहे. ज्याचे जानु जघनीच्या प्रभेने आकाश प्रकाशित झाले आहे. तो सोन्यासारखी ज्यांची कांती आहे, असा सुर हेच ज्याचे अंग आहे, असा सुरंग परमात्मा पीत प्रभायुक्त पीतांबर परिधान केलेला असून, त्यावर रत्नखचित मेखला शोभत आहे (४). हा जगदंबर जगताचा आभास असून तेथेच हा आभास ठसावला आहे. ज्याचे नाभिकमली शून्यावस्थेत ब्रह्मदेवाला प्रकाश झाला त्याची इच्छा धरून पाहता मनाला त्याचा थांगपत्ता लागत नाही म्हणून तो ब्रह्मदेव तुझे सगुणरूपाचे-सकार गुणरूपाचे - ध्यान करीत आहे (५). ज्याचे रोमारोमातून कोटी ब्रह्मांडांच्या उतरंडी निर्माण झाल्या आहेत तो मदन-आपली प्रौढी मोठेपणा बाजूला ठेवून जेथे साकार झाला, ज्याची छाती केवळ निरुपम असून सुघटित असून ज्याचे हृदयाची अंतःकरणाची घडणच काही वेगळी आहे, ज्यावर भृगुऋषींचे पदचिन्ह भूषण म्हणून मिरवले जात आहे (६). ज्याचे हात शोभिवंत असून चारी पुरुषार्थाचे साधन हेच आयुध हाती आहे, मनगटात वीर कंकण आहे, ज्याचे प्रत्येक अवयवी आत्ममुद्रा ठसली आहे, आणि ज्यात जडत्व नाही अशी नखे ही चैतन्यरूप ज्याचे बोटी आहेत, तो आपला वेणु वाजवीत आहे (७). ब्रह्मच जेथे घनरूप झाले, ज्या ठिकाणी अमृतरस मुरलेला आहे, असा नाद पावयाचे छंदाने गोड स्वरातून जेथे प्रगट झाला आहे, ओठातून स्रवणारे हे अमृत की जेथे ब्रह्मरस परिपक्व झाला आहे, तेथे गोपीजन समरस होऊन राहिले आहेत (८). उभयपक्षी नयनातून चमकणारे तारे प्रेमाची परिपूर्ती दाखवित आहेत. जेथे द्वैताद्वैत एकसमयावेच्छेदेकरून नाहीसे झाले आहे. ज्याचे कुंडलाचे प्रकाशात सूर्यही लोपला आहे . ते आपले रूपाची आत्मत्वाची सुखशांती या सुखाने जाहली (९). आता

पहाणाराला व ज्याला पहावयाचे त्याला दृष्टीच पुरत नाही. त्याचे ध्यान करावे तर मनच उरत नाही. का तर आत बाहेर तोच व्यापून राहिला आहे. जेथे दृष्टीचा ग्रास झाला तेथेच हे पहाणे ठसावले नसून ते निर्गुण सदोदित गुणाकार झाले आहे (१०). आता हा या दृष्टीने कसा पहावा म्हणून मनाने मनालाच खेचून घेतले. मनाचे उन्मन झाले. ती गोडीच स्वरूप झाली. म्हणून हा विषय निर्विषय करणारा परमात्मा चित्ती पहा की अशा जागृतावस्थेत ही अवस्था जेथे अंतर्भूत होते आणि प्रादर्भूत होते तेथेच सुख शांती आहे, असे श्रीनिवृत्तिनाथ श्रीज्ञानेश्वरमहाराजाना सांगत आहेत. (११)

## ।। पंढरी महात्म्य ।।

**(५२)**

**आनंदाच्या ताटी अमृताची वाटी । विवेक तारू घोटी रसना बळे ।।१।।**
**ते हे रूपडे रूपस विठ्ठल । पुंडलिके बहुसाल प्रार्थियेले ।।ध्रु।।**
**तारावया जन व्हावया पावन । जड मूढ अज्ञान हरी पाठे ।।२।।**
**कर्म धर्म करिता शिणली येता जाता । मग पुंडलिके अनंता प्रार्थियेले ।।३।।**
**येऊनिया श्रीहरी भीमेच्या तीरी । सुदर्शनावरि पंढरी उभविली ।।४।।**
**अमर तरूवर तीर्थ सरोवर । वेणुनादी श्रीधर खेळताती ।।५।।**
**बागडे गाती हरी वाकुल्या कुसरी । तेथे पुंडलीक परोपरी स्तवन करी ।।६।।**
**धन्य पंढरी फावली चराचरी । धन्य जो भूमीवरी दृष्टी भरी हरी देखे ।।७।।**
**ज्ञानदेवा बीज *विठ्ठल केशीराज* । नव्हे ते नवल चोज प्रत्यक्ष हरी ।।८।।**

आनंदाच्या ताटात अमृताची वाटी असून नित्यानित्यवस्तुविवेकाचे घोट रसाला रसरूपता ज्यामुळे अशा रसनाबळाने प्राप्ति झाली (१). ते हे रूपाचेही रूप जो श्रीविठ्ठल त्याची अनंत प्रकारे पुंडलिकाने प्रार्थना केली. जड, मूढ, अज्ञान जीव हरिनामाच्या पठणाने तरून पावन व्हावेत हाच त्याचा हेतू होता (२). कर्मधर्म करता, येता जाता, जी जनता शिणून गेली हे पाहून पुंडलिकाने अनंताची प्रार्थना केली (३). तोच भीमेच्या तीरावर येऊन भगवंतानी आपल्या सुदर्शन चक्रावर या



पंढरीची उभारणी केली (४). सरोवर तीर्थाचे काठी वेणुनादी कल्पवृक्षाखाली हा श्रीधर जेथे खेळत आहे. भोळेभाळे वेडेवाकुडे कौशल्याने जेथे त्या परमात्म्याची स्तुतिस्तोत्रे गात आहेत तेथेच पुंडलिक पुनः पुनः स्तवन करीत आहे (६). अशी धन्य धन्य पंढरी या चराचरास प्राप्त झाली आणि जो या भूलोकी जन्मभर डोळे भरून श्रीहरीला पहात आहे तोही धन्यच झाला (७) विठ्ठल केशीराज हे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे बीज तत्त्व हे कवतुकाची नवलाई नसून तो प्रत्यक्ष हरी आहे (८).

**(५३)**

**आवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिही लोक ।।१।।**
**जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ।।२।।**
**सर्व सुकृताचे फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगी ।।३।।**
**_बापरखुमादेविवरु_ विठ्ठलेसी भेटी । आपुले संवसारी करूनि ठेला ।।४।।**

अखिल विश्वाचा संसार सुखाचा करून त्रैलोक्य आनंदाने भरून ठेवीन अशी प्रतिज्ञा श्रीज्ञानेश्वरमहाराज करीत आहेत (१). ते म्हणतात याकरिता मी त्या पंढरपुरास जाऊन आपल्या माहेराला भेटीन (२). सर्व सुकृतांचे हे फळ मी मिळवीन आणि पांडुरंगाला आलिंगन देईन (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाची भेट होताच त्याने मला आपल्या बरोबरीचाच केला, आपल्या सारखाच केला (४).

**(५४)**

**न चलीत शब्द खुंटला पै वाद । एकतत्त्व भेद नाही रुपा ।।१।।**
**ते रुप पंढरी क्षरले चराचरी । माझा माजी घरी बिंबलेसे ।।२।।**
**_रखुमादेविवर_ पुंडलिक वरु । निळियेचा आगरू पंढरीये ।।३।।**

एकच तत्त्व असल्याने सतत भेदच नाही, यामुळे वादच मिटला, तो शब्दांची कसरत उरली कोठे ? (१). ते रूप पंढरीत असून चराचरात क्षरत्वास आले आहे; यामुळे माझे जे कांही आहे त्यामधे जीवनाचे घरघरीत तेच बिंबले आहे (२). रखुमादेविवर, पुंडलिकवरद परमात्मा हा पंढरीत निळेपणाचे आगरच आहे (३).

**(५५)**

**दुजे द्वैत सांडी एकतत्त्व मांडी । अद्वैत ब्रह्मांडी पैसु कीजे ।।१।।**
**ते रुप पंढरी पुंडलीका द्वारी । मुक्ती मार्ग चारी वश्य रया ।।२।।**
**अनंती अनंत वोतले संचित । वैकुंठ अद्भुत उभे असे ।।३।।**
**ज्ञानदेवी ध्यान मन मौन चरण । आपणची मग्न तेथे जाले ।।४।।**

दुजेपणा हे जे द्वैत ते सांडून एक तत्त्वाने ब्रह्मांडात सर्वव्यापित्वाने अद्वैत साम्राज्य प्रस्थापित केले आहे (१). असे ते रूप पुंडलिकाचे द्वारी पंढरीत उभे असून चारी मुक्तींचे मार्ग जेथे वश आहेत (२). अनंत विश्वात अनंत परमात्मा ओतलेलाच येथे साचला, साकार झाला आणि मागे झाले नाही असा इतिहास घडून तो येथे उभा राहिला (३). श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ठिकाणी या चरणांचे मनाचे मौनतेत जे ध्यान झाले तेथे ते ध्यान आपणच मग्न होऊन राहिले. मग श्रीज्ञानेश्वरमहाराज ध्यान मग्न झाले तर नवल काय ? (४).

**(५६)**

**तत्त्वे तत्त्व धरी कोहंभाव होकारी । सोहं सोहं करी कोण सये ।।१।।**
**सोकरी पुंडलिक ज्ञान पुण्यश्लोकु । विठ्ठली त्रिलोकु उद्धरिले ।।२।।**
**सखी जाय तेथे भाव बळीवंत । प्रपंच देहात नाही तुज ।।३।।**
**ज्ञानदेव पुसे निवृत्ति सौरसे । पुंडलिके कैसे पुण्य केले ।।४।।**

कोहं भावाचे हुंकाराने तत्त्व तत्त्वाना धरीत असून तेथे सोहं सोहं करणारे कोण आहे याचा कधी विचार केला आहे ?(१). अहंकारी न रहाता सोहंकारी रहाणारा याचे ज्ञान असणारा पुंडलीक हा पुण्यश्लोक असून विठ्ठलाचे अनुभूतीने त्याने तिही लोकांचा उद्धार केला (२). जेथे आपला अस्तिभाव प्रखर आहे अशा देहात तुला प्रपंच उरतच नाही (३). पुंडलीकाने कसे काय हे पुण्य केले हा प्रश्न श्रीज्ञानेश्वरमहाराजानी निवृत्तिनाथाना त्यांचेशी समरस होऊन हा प्रश्न केला (४).

**(५७)**

**एकी म्हणे भाव धरू नेदी मौन । तेथेच वो ज्ञान मज सांगे ।।१।।**



**एकीने सांगितले दुजीने पसरिले । प्रपंचा पुसले तेणे रूपे ।।२।।**
**ते घरटी कडी सोकरी बागडी । सोहं कथा उघडी पंढरीये ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्तिस मने । नयनासी पारणे देखताची ।।४।।**

ज्ञानवृत्तीने निर्गतवृत्ति/निवृत्ति इला प्रश्न केला की आपला अस्तिभाव जर आपण धरू गेलो तर तेथे मौन धरता येत नाही, याकरिता तेथील ज्ञान मला सांग (१). मग एकीने सांगितले व तेच वृत्तिद्वारा दुजीने ते शरीरात जे प्रसृत केले, तो त्या रूपाचा साक्षात्कार झाल्याने प्रपंच पंचपंचीकृत देह हा पुसलाच गेला (२). प्रपंच पुसला गेला ही जी कड आहे या कडेला म्हणजे शेवटाला ज्या बिंदूत देहभावाचा अंत होतो त्या घरी-घरट्यात-शून्यावस्थेत सोहंकारी वृत्ती बागडली आहे; तिचा नाच तेथे चालूच आहे. निरुपाधिक अवस्थेत तिचा अनुभव येतो. देहपंढरीत ती उघड आहेच पण तीच सोहंकथा उघड उघड वेगळ्या शब्दांत पंढरपुरात दिसून येईल (३). जेथे वृत्तीच रहात नाही अशी निवृत्ती ज्या रूपाने साकार झाली. असे जे श्रीनिवृत्तिनाथ तेथे दृष्टिद्वारा मनाने तादात्म्य होताच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात माझे डोळ्यांचे पारणेच फिटले. आता कांही पहावे असे वाटतच नाही (४).

**(५८)**

**पंढरीचे वाटे अनंत घडती याग । वैकुंठीचा मार्ग तेणे संगे ।।१।।**
**जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म । हे जाणताती वर्म संतजन ।।२।।**
**भक्तिमार्ग फुकटा आनंदाची पव्हे । लागलीसे सवे पुंडलिका ।।३।।**
**दिंडी टाळ घोळ गरुड टकियांचे भार । वैष्णवांचे गजर जये नगरी ।।४।।**
**तिही लोकी दुर्लभ अमर नेणती । वृक्ष होवोनि पुढती सेविती ।।५।।**
**सनकादिक मुनी ध्यानसा पैसदा । ब्रह्मादिका कदा नकळे महिमा ।।६।।**
**ज्ञानदेव निवृत्ति पुसतसे कोडे । पुंडलिके केवढे भाग्य केले ।।७।।**

पंढरीचे वाटेवर यज्ञ घडतात; नुसता त्या वाटेचा स्पर्श झाला तरी तो वैकुंठीचा मार्गच आहे (१). ती वाट हेच जप, तप, अनुष्ठान क्रिया, कर्म, धर्म, यांचे वर्म आहे हे संतजन जाणतात (२). हा फुकटा म्हणजे फुंकरातून प्राप्त होणारा, वायुरूप चैतन्याशी

समरस करणारा, कोणीही आनंदाने पोहत परतीराला जावे, असा हा भक्तिमार्ग असून त्याची सवय पुंडलीकास लागली (३). जेथे दिंडी, टाळ, घोळ, गरुडटके असून वैष्णवांचे गजर होतात अशी जी पंढरी नगरी आहे (४). ज्या पंढरीचे महत्त्व असे की, तिही लोकाना दुर्लभ असून देवही ज्याचा महिमा जाणू शकत नाहीत म्हणून ते वृक्षांचे रूपाने पुढे ज्या क्षेत्राची सेवा करित आहेत. वारी करणाऱ्या पांथिकांना सावली देऊन त्या पुण्याने पुनीत होत आहेत (५). सनकादिक मुनी हे सदा ध्यानस्थ असून ब्रह्मादिकांनाही ज्याचे महात्म्य कळत नाही (६). पुंडलिकाने हे काय भाग्य संपादन केले हे गौप्य श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीनिवृत्तिनाथांना विचारीत आहेत (७).

**(५९)**

**माझे जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।।१।।**
**पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधिले ।।२।।**
**जागृती स्वप्न सुषुप्ति नाठवे । पाहता (रुप) आनंदी आनंद सामावे गा ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* सगुण निर्गुण । रुप विटेवरी दाविली खूण ।।४।।**

भक्तिमार्गाची ध्वजा पंढरपुरास न्यावी ही एकच माझ्या जीवाची आवड आहे (१). श्रीगोविंदाचे गुणाचा वेध लागल्याने माझे मन श्रीपांडुरंगाचे ठिकाणी रंगून गेले आहे (२). ज्याची आठवण जागृती, स्वप्न, सुषुप्तीत होत नाही पण ज्याचे दर्शन झाले की हा आनंद त्या आनंदात समाविष्ट होतो (३). विटेवर रूपाची प्रचीती हीच सगुण निर्गुण बापरखुमादेविवराची त्याने दाखविलेली खूण आहे (४).

**(६०)**

**कल्पना वृक्षासी देखिले । चिंतामणीस चिंतिले । कामधेनूसी आपेक्षिले । जीण्या जिवविले । तेचि हरिरूप पंढरीये ।।१।। धन्य कुळ धन्य जन्म । जयासि पंढरीचा नेम । चित्ती अखंड विठ्ठल प्रेम । ते धन्य भक्त भूमंडळी ।।ध्रु।। तोचि तीर्थरूप सदा । तया दोष न बाधिती कदा । जो रातला परमानंदा । तेथे सर्व सिद्धी वोळंगती ।।२।। ऐशी वेद शास्त्री पुराणी । जो राहला नामस्मरणी । धन्य तया तीर्थ पर्वणी । धन्य वाणी तयाची ।।३।।**



**पंढरीसी कीर्तन करी । पुंडलिकासी नमस्कारी । विठ्ठलचरण अंतरी धरी । धन्य जन्म तयाचा ।।४।। सकळ कुळाचा तारकु । तोचि जाणावा पुण्य श्लोकु । पांडुरंगी रंगला निःशंकु । धन्य जन्म तयाचा ।।५।। त्यासी अंती वैकुंठ प्राप्ती । ऐसे शुके सांगितले परिक्षिती । जे जे हरि चरणी भजती । ते ते पावती वैकुंठ ।।६।। नामे स्फुंदत नाचत रंगणी । प्रेम विठ्ठल चरणी । सर्व सुख खाणी । *बापरखुमादेविवर* विठ्ठल ।।७।।**

कल्पवृक्ष पाहिला, चिंतामणीच चिंतिला, कामधेनूची अपेक्षा केली, असे जीवन ज्याने जगविले असे हरिरूप पंढरीत आहे (१). या करता ते कुळ, तो जन्म, धन्य की ज्याना पंढरीचा नेम असून विठ्ठलाचे प्रेम चित्तात अखंड आहे ते या भूलोकी धन्य भक्त होत (ध्रु). जो या परमानंदी रममाण झाला, ज्याचे पायी सर्व सिद्धी लोळण घेत आहेत, तो सदाचा तीर्थरूप असून त्याला केव्हाही दोष बाधक होत नाहीत (२). जो नामस्मरणात रंगला तो त्या तीर्थानाही पर्वणीसारखा असून त्याची वाणी धन्य असे वेदशास्त्री, पुराणी आहे (३). पंढरीत कीर्तन करणारा, पुंडलीकास नमस्कार करणारा आणि अंतरी विठ्ठल चरण धरणारा, असा जो त्याचा जन्म धन्य आहे (४). पांडुरंगी जो रंगला आणि शंका कुशंका नाही असा झाला, तो सकळ कुळांना तारणारा पुण्यश्लोक जाणावा; त्याचा जन्म धन्य यात शंका नाही (५). जे जे या हरी चरणाचे भजन करतात त्यांना परमात्म्याची प्राप्ती होऊन अंती वैकुंठाला जातात असे शुकाचार्यांनी परिक्षितीस सांगितले (६). विठ्ठल चरणी नाममय होऊन, स्फुंदत प्रेमाने जे या रंगात नाचतात ते बापरखुमादेविर विठ्ठल सुखाची खाणीच होतात (७).

**(६१)**

**वाजतसे बोंब कोण्ही नायकती कानी । हरि हरि न म्हणे तया थोर झाली हानी ।।१।। उठा उठा जागे पाठी भय आले मोठे । पंढरिवाचुनी दुजा ठाव नाही कोठे ।।ध्रु।। तापत्रयाग्नीचा लागला वोणवा । कवण रिघे आडकपण करी सावा धावा ।।२।। देखोनि ऐकोनि एक बहिर अंध जाले । विषयाचे लंपट बांधुनि यमपुरीस नेले ।।३।। आजा मेला पणजा मेला बाप मसणा नेला । देखत देखत नातु पणतु तोही वेडा झाला ।।४।। व्याघ्र लासी भूते ही**

**लागताति पाठी । हरिभजन न करिता सगळे घालू पाहे पोटी ।।५।। संतसंग धरा तुम्ही हरिभजन करा । पाठी लागलासे काळ दात खातो करकरा ।।६।। *बापरखुमादेविवरा* विठ्ठला शरण । भावे न निघता न चुके जन्म मरण ।।७।।**

बोंब या शब्दातील ब कार काढला की उरला तो ॐकार. या ॐकाराची बोंब शरीरात सारखी वाजत आहे. ती कानाने कोणी ऐकतच नाही, तर हरि हरि हा म्हणणार काय? हे न म्हणण्याने आयुष्यात मोठीच हानी झाली हे शेवटी बोंबलून दाखवितात. आणि अजुनी तरी ही शरीरातील बोंब ऐकून सावध व्हा असा दुसऱ्याना इशारा देतात. ही बोंब ऐकली नाही की शेवटी पुनः बोंबच आहे. असे होऊ नये तर हे श्रवण करून हरि हरि म्हणणे हे अवश्यक आहे (१). आता तरी उठा; खरंच उठा; पाठीशी मोठेच भय आले आहे आणि यातून सुटण्यास पंढरीशिवाय दुसरे ठिकाणच नाही (ध्रु). यात कोण अडकला की ज्यामुळे त्रिविध तापांचा वणवा सारखा पोळत आहे की जो सावधान करीत आहे (२). हे सर्व दृश्य डोळ्याने पाहून व बोंब कानाने ऐकूनही एक बहिरे आणि अंधळे झाले असे हे विषयलंपट अहंकाराने विषयाकार झालेले बांधून यमपुरीला नेले (३). आजा, पणजा तर मेला, बाप मसणवटीला नेला, आणि पहाता पहाता डोळ्यादेखत नातू पणतूही भ्रमित होऊन वेडा झाला (४). वाघ, भूते, लासी पाठी लागली तरी हरिभजन न करिता हे सर्व पचविण्याचे उद्योगातच हा केवळ आहे. दृश्याचे आकर्षण एवढे जबर की त्या करता हे सर्व प्रयत्न (५). काळ पाठीला लागला असून कराकरा दात खात आहे. वेळच यावयाची खोटी हे जाणून संत संगात तुम्ही हरिभजन करा (६). भाव धरून बापरखुमादेविवर विठ्ठलास शरण न जाता हे जन्ममरण चुकत नाही (७).

### (६२)

**हे नव्हे आजि कालिचे । युगा अठ्ठाविसांचे । मज निर्धारिता सांचे । हा मृत्यु लोकुचि नव्हे । हाचि मानि रे निर्धारु । येर सांडी रे विचारु । जरी तू पाहसी परात्परु । तरि तू जा रे पंढरीये ।।१।। बाप तीर्थ पंढरी । भूवैकुंठ महीवरी । भक्त पुंडलिकाचे द्वारी । कर कटावरि राहिला ।।ध्रु।। काशी अयोध्या**



**अवंती कांती । मथुरा माया गोमती । ऐशी तीर्थे इत्यादि आहेती । परी सरी न पवती पांडुरंगी ।।२।। हाचि मानि पारे विश्वासु । येर सांडि रे हव्यासु । जरि तू पाहसी वैकुंठवासु । तरि तू जाये पंढरीये ।।३।। आड वाहे भीमा । तारावया देह आत्मा । पैलथडीय परमात्मा । मध्य राहिला पुंडलिकु ।।४।। या तिहीचे दरूशन । प्राण्या नाही जन्ममरण । पुनरपी आगमन । येथे बोलिलेचि नाही ।।५।। पंढरपुरी म्हनीजे भूवैकुंठ । ब्रह्म तंव उभेचि दिसताहे नीट । या हरिदासासी वाळुवंट । जागरणासि दिधले । म्हणोनि करा करा रे क्षीरापति । नटा नटा कीर्तन वृत्ती । ते नर मोक्षाते पावती । ऐसे बोलती सुरवर ।।६।। हे चोविसा मूर्तिचे उद्धरण । शिव सहस्र नामासि गहन । हेचि हरिहराचे चिंतन । विश्व वंद्य हे मूर्तिते । तो हा देवादि देव बरवा । पांडुरंग सदाशिवाचा निज ठेवा । *बापरखुमादेविवरु* पंचविसावा । चोविसा मूर्ति वेगळा ।।७।।**

हे आज कालचे नसून अठ्ठावीस युगांचे आहे. मला हा निर्धार खरा झाल्याने हा मृत्यलोकच नव्हे असे मी म्हणेन. याकरता बाकीचे सर्व विचार सोडून हाच निर्धार मानवला पाहिजे. जर तुला परात्पर परमात्मा पहावयाचा आहे तर तू पंढरपुरलाच जा (१). पृथ्वीवरचे हे भूवैकुंठ असून भक्त पुंडरीकाचे द्वारात कंबरेवर हात देऊन उभा राहिलेला परमात्मा पंढरीत असून तोच सर्वांचा बाप तीर्थरूप आहे. सर्व तीर्थांचे ते तीर्थ आहे (ध्रु). काशी, अयोध्या, अवंती, कांची, मथुरा, माया, गोमती, इत्यादि ऐशी तीर्थे आहेत; तरी ती पांडुरंगाची बरोबरी करू शकत नाहीत (२). जर तुला वैकुंठवासी परमात्मा पहावयाचा आहे तर बाकीचे सर्व हव्यास सांडून हाच दृढ विश्वास ठेवून तू पंढरीला जा (३). देहातील आत्मा तारण्याकरता आड भीमा वाहत असून पैलथडी परमात्मा असून मध्ये पुंडलीक राहिला आहे (४). या तिहींचे दर्शन झाल्यास प्राण्याला जन्ममरण नाही. पुनः जन्मा येणे ही भाषाच नाही (५). पंढरपूर म्हणजे भू वैकुंठ असून ब्रह्म नीट उभे दिसत आहे; म्हणून या हरिदासांना हरिजागराकरता वाळवंट दिले आहे; म्हणून खिरापती कराच करा. येथे कीर्तन वृत्तीने जे नटतात ते मोक्षास जातात, असे देव बोलत आहेत. (६) हे चोवीस नामांचे उद्धरण असून

शिवसहस्रनामालाही गहन आहे. ही मूर्ती हरिहरांचे चिंतन असून विश्वास वंद्य आहे. सदाशिवाचे निजत्वाचा हा ठेवा पांडुरंग तो हा बरवा, देवांचा देव असून चोविस मूर्ती वेगळा पंचविसावा बापरखुमादेविवर आहे (७).

**(६३)**

**पातेजोनि खेवासि आणिले । येणे आपणीया समान मज केले गे माये ।।१।।**
**पाहे पा नवल कैसे वितले । मन उन्मनी उन्मन ग्रासिले ।।२।।**
**पाहे पा येणे *रखुमादेविवरा* विठ्ठले । पाहे पा राहणे पंढरपुरी केले ।।३।।**

शक्तिपाताने म्हणजे जीवनाचे ऊर्ध्वगामित्वाने संघर्षात आणून या परमात्म्याने मला आपल्या समान केले (१). मन आणि उन्मन ही सापेक्षता ज्या उन्मन अवस्थेत ग्रासून गेली. विचार आणि निर्विचार ही दोनी अवस्था उरल्या नाहीत. मन वितळून गेले हे कसे नवल झाले पहा तर (२). या रखुमादेविवर विठ्ठलाने पंढरपुरात रहाणे केले (३).

**(६४)**

**जे येथे होते ते तेथे नाही । ठाईंच्या ठायी हरपले ।।१।।**
**घरीच्या घरी जाली चोरी । आपणावरी आळु आला ।।२।।**
**पंढरपुरी प्रसिद्ध जाणा । पुरविल्या खुणा ज्ञानदेवा ।।३।।**

जे या ठिकाणी होते ते जीवतत्त्व 'तत्' या ठिकाणावर गेल्याबरोबर जिथल्या तिथे विलीन झाले (१). घरातल्या घरात ही जीवनाची चोरी शिवभावाने जहाली याची दखलही नाही असा स्वाभाविकच आपणावर आळ आला (२). परंतू हे घडले याच्या खुणा पंढरपुरी जो प्रसिद्ध आहे त्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना पुरविल्या (३).

**(६५)**

**क्षीर सागरीचे निज रूपडे । पाहता पारखिया त्रिभुवनी न सापडे ।**
**ते उभे आहे वाडे कोडे । पुंडलिकाचे आवडी ।।१।।**
**मेघश्याम घेऊनिया बुंथी । जया ते श्रुती पै वानिती ।**
**कीं ते पुराणासी वाडे । ते पंढरिये उभे असे कानडे गे माये ।।२।।**



**आवडीच्या बालभे गोजवले गोजिरे । पाहता साजिरे त्रिभुवना एक गे माये ।।३।।**
**ते सकळ मंगळ दायकाचे प्रेम आथिले । की ब्रह्मरसाचे वोतिले घोसुले ।**
**ब्रह्मविद्येचे सार मथिले । देखा सकळ आगमीचे संचले ।**
**कीं *बापरखुमादेविवर* विठ्ठल नामे मढिले । श्रीगुरुनिवृत्तिने दिधले प्रेमखुण रया ।।४।।**

क्षीरसागरीचे आपले स्वरूप पारख करणारास त्रिभुवनांत न सापडणारे, पुंडलीकाचे आवडीने कोड कौतुकाने उभे आहे (१). ज्याचे वर्णन वेद करतात, पुराणांना जे खरेच मोठे आहे, असे ते न कळणारे मेघश्याम वर्ण घेऊन पंढरीत उभे आहे (२). आवडीच्या प्रेमाने हे गोनाम इंद्रियवृत्तीना जिरविणारे व सहांना नाहीसे करणारे असे हे स्वरूप पहाता हे त्रैलोक्यात एकच गाजले (३). ते सकळ मंगळदायकांचे प्रेम जेथे एकवटले असे की जेथे ब्रह्मरसाचे घोसच ओतले आहेत असे आहे. ब्रह्मविद्येचे मंथन केलेले ते सार असून वेदांचे गुह्य जेथे साचले आहे. श्रीगुरूनिवृत्तिनाथांनी प्रेमखुणेने दिलेले असे ते श्रीबापरखुमादेविवर विठ्ठलनामाने मढविलेले आहे (४).

**(६६)**

**जया ते पाहता परतला आगमु । निर्गमा नाकळे दुर्गमु ।**
**सिद्धा साधक निरुते वर्मु । न पडे ठायी सर्वथा ।।१।।**
**ते यां पुंडलिका वोळले । प्रेम प्रीतीने घोळले ।**
**भक्तिमातेने चाळविले । आधीन केले आपण या ।।ध्रु।।**
**जे माये अविद्ये वेगळे । गुणत्रया नातळे ।**
**काळे गोरे ना सावळे । निर्धारिता नेणवे ।।२।।**
**द्वैताद्वैताहुनि परते । ते सुखाते वाढविते ।**
**योगी लक्षी लक्षित ज्याते । परि नेणवे सर्वथा ।।३।।**
**जे अरुपा रूपा वेगळे । सहस्रनामाहुनी आगळे ।**
**परम कृपेचे कोवळे । क्रियाकर्मविरहित ।।४।।**
**जे ब्रह्मरसाचे गोठले । ते पंढरीये प्रगटले ।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठले । नामे आथिले चोखडे रया ।।५।।**

वेदांच्या गती दोन. एक आगम व दुसरी निगम. हे दोनी मिळून वेद. मग हा आगम ज्याला पहाताना परतला, निगमांचा जेथे प्रवेशच झाला नाही, सिद्ध, साधकांना ज्याचे वर्म सापडले नाही (१). ते पुंडलीकाला प्राप्त झाले. त्याने ते प्रेमप्रीतीने घोळले. भक्तिपोटी जो साकार झाला म्हणून भक्तिमातेने त्यास चेष्टविले. आणि अशा प्रकारे त्यास आपणच अधीन करून ठेविले(ध्रु) जे स्वरूप अविद्यात्मक मायेचे वेगळे असून तीनी गुणांची दृष्टी जेथे पोचत नाही, जे काळे, गोरे आणि सावळे नसून निर्धार करूनही जे जाणता येत नाही (२). लक्ष्याने योगीजनांनी लक्षूनही जे सर्वथा जाणता येत नाही, असे द्वैताद्वैताच्या पलीकडे असलेले सुखाची वाढ करीत आहे (३). रूपारूपाची सापेक्षता जेथे नाही, सहस्रनामाहून जे वेगळे आहे, कृपेची जेथे पराकाष्ठा आहे, इतके जे कोवळे आहे आणि जे क्रियाकर्मविरहित आहे (४). असे जे ब्रह्मरसाचेच पंढरपुरात गोठलेले शुद्धरूप प्रगट झाले असून बापरखुमादेविवर विठ्ठलनामाने युक्त आहे (५).

**(६७)**

**नेणो विठो मार्ग चुकला । उघडा पंढरपुरा आला ।**
**भक्ते पुंडलिके देखिला । उभा केला विटेवरी ।।१।।**
**तो हा विठोबा निधान । ज्याचे ब्रह्मादिका ध्यान ।**
**पाऊले समान । विटेवरी शोभती ।।२।।**
**रूप पाहता तरि डोळसु । सुंदर पाहता गोपवेषु ।**
**महिमा वर्णिता महेशु । जेणे मस्तकी वंदिला ।।३।।**
**भक्ति सुखे लाचावला । जाऊ नेदि उभा केला ।**
***निवृत्तिदास* म्हणे विठ्ठला । जन्मोजन्मी न विसंबे ।।४।।**

मार्ग चुकल्यावर विठोबाला जाणणार कसे? तो तर निरुपाधिक स्थितीत पंढरपुरला आलेला, पुंडलिक भक्ताने पाहिला आणि त्यास विटेवर उभा केला (१). ज्याचे ब्रह्मादिक देवतांना ध्यान लागले आहे असा तो हा विठोबा सुखाचा ठेवा असून ज्याची सम पाऊले विटेवर शोभत आहेत (२). त्याचे रूप पहावे तर ते ज्याने पहावयाचे तोच सुंदर गोपवेष घेतलेला असा डोळस आहे. ज्याचा महिमा वर्णन करता करता ज्याने आपले मस्तकाने त्यास वंदन केले (३). भक्तिसुखाने वेडा झालेला त्याला पुढे कोठे जाऊ दिला नाही आणि उभाच केला अशा त्या विठ्ठलावर जन्मोजन्मी विसंबून रहाता येणार नाही असे श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).



**(६८)**

**त्रिपुटी भेदूनी मनाच्या मौळी । ते आले भूमंडळी पंढरीये ।।१।।**
**नाम लाधले नाम लाधले । पुंडलिके केले खेवणे देखा ।।२।।**
**समर्थापायी भोजन जाले । पंचामृत घेतले धणीवरी ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलेसी तृप्ती । यथार्थ भाविता कळो येईल चित्ती ।।४।।**

त्रिपुटीचा ग्रास होऊन मनाच्या मूकत्वात जे आहे तेच या भूलोकी पंढरीत आले (१). त्याचे नाम प्राप्त झाले असून पुंडलीकाने त्याचे सान्निध्य निर्माण केले आहे, ते पहा (२). अशा समर्थांचे पंगती भोजन झाल्याने तृप्ती होईतो पंचमातृकात्मक ॐकाराचे पंचामृत घेतले (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे योगाने ही तृप्ती झाली असून यथार्थत्वाने जाणल्यास हे चित्तास कळून येईल (४).

**(६९)**

**आकानिकेले चिरुनामातू । कारले धसिगे मरूळा दने ।।१।।**
**चलुवाने चलुवाने पंढरीराया चलुवाने । यल्लै दौनर्कवाने ।।२।।**
**पुंडलिकने भक्ति बंदा । *रखुमादेविवर* विठ्ठलुने ।।३।।**

चैतन्याने अणुपरमाणु निर्माण होऊन त्या योगे धारणा होऊन परमात्मा मोहकत्वाने आकाराला आला (१). हा सर्व कांही चांगला पंढरीरायच आहे (२). रखुमादेविवर विठ्ठल पुंडलीकाच्या भक्तीने आला (३).

**(७०)**

**जोडुनिया जोडी जेणे हुंडारिली दुरी ।**
**भिकेची आवडी तया नावडे पंढरी ।।१।।**

**करंटे कपाळ ज्याचे नाम न ये वाचे ।**
**सदैव सभाग्य तोचि हरिरंगी नाचे ।।ध्रु।।**
**आपण न करि यात्रा दुजियासि जावो नेदी ।**
**विषयाचा लंपट शिकवी कुविद्या कुबुद्धी ।।२।।**
**जन्मोनि नर भोगिती अघोर ।**
**न करिती तीर्थ यात्रा तया नरकी बिढार ।।३।।**
**पुंडलिके भक्ते रे तारिले विश्वजना ।**
**वैकुंठीची मूर्ती आणिली पंढरपूर पारणा ।।४।।**
**काया वाचा मने जिवे सर्वस्वे उदार ।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलाचा वारिकर ।।५।।**

असेच ज्याचे प्रारब्ध, कर्मांतराची जोडच अशी की जो दूरच चालला आहे, अशी भिकेची ज्याला आवड आहे त्याला पंढरी आवडत नाही (१). कपाळ करंट्याचे वाचेला नाम येत नाही पण जो सदाचा भाग्यवान तोच हरिरंगात नाचतो (ध्रु). विषय लंपट आपणही यात्रा करत नाही व दुसऱ्याला करू देत नाही; कुबुद्धी निर्माण करून कुविद्याच मात्र शिकवितो (२). असे जीव मात्र तीर्थयात्रा न करिता अघोर पतन पावून नरकातच बिऱ्हाड करतात (३). पुंडलीक भक्ताने पंढरीस वैकुंठीची मूर्ती आणली आणि विश्वातील लोकांना तारले (४). बापरखुमादेविवर विठ्ठलाचा तो काया, वाचा, मनाने, जीवाने फार काय सर्वस्वाने उदार, ज्याला या कशाचीही तमा नाही असा वारकरी आहे (५).

**(७१)**

**शरीर हे स्थळ मळा निर्मळाचे मूळ । पाहोनि चोरखाळ आदिपुरुषासी ।**
**जन्ममरणाचिया उचलोनि पेडी । मग तया बिंबडी ज्ञान पिके ।।१।।**
**पंढरीचे पीक न समाये अंबरी । ते शेत सोकरी पुंडलिक ।।ध्रु।।**
**ऐहिक परत्र दोनी शेताची आडते । मुंड मुंड तेथे कुळवाडिये ।**
**उचलोनी पेंडी कासिया समुळी । मग पुण्यकाळी बोलविले ।।२।।**



**गरूड टके दोनी शेताची बुझवणी । दस कुडपणी नाम घोष ।**
**एकवीस स्वर्गाचा घालुनिया माळा । मग तया गोपाळा माजी खेळे ।।३।।**
**जये शेती निवृत्ती भीतरे तये शेती साजे पुरे । राऊळे निदसुरे दंडीजती ।**
**रात्रंदिस तुम्ही हरी चरणी जागा । तेणे तराल गा भवसागारू ।।४।।**
**अठराही बलौते ते केले धडौते । खळे दान देते सनकादिका ।**
***ज्ञानदेव* म्हणे जगदानी पिकला । पुरोनी उरला पंढरीये ।।५।।**

शरीर हे मळानिर्मळाचे मूळ असे स्थळ असून त्या ठिकाणी शुद्ध अशा आदिपुरुषाला पाहून जन्ममरणाची पेंडी उचलली. अशा भक्तियुक्त अंतःकरणाचे भूमिकेत भिजवून तयार केलेल्या जमिनीत ज्ञान परिपक्व दशेला येते (१). पंढरीचे पीक आकाशातही मावणार नाही. हे क्षेत्र सोहं सोहं करणाऱ्या पुंडलिकाचे आहे (ध्रु). ऐहिक आणि पारत्रिक अशी या शेतीची आडते असून त्याने कुळवणी करून देहाहंतेची जमीन सपाट करून मुळासकट जन्ममरणाची पेंडी उचटून पुण्यकाळी बोलाविले (२). दोनी गरूडटके ही पाखरांना भय दाखवणेसाठी उभी केलेली बाहुली असून दशविध नामघोषाने हे क्षेत्र मुळासकट तण काढून एकवीस स्वर्गाच्या माळा घालून त्या गोपाळात हा खेळ खेळू लागला (३). ज्या क्षेत्रात निवृत्ति बहरली आहे तेथे पूर्णतेची शोभा आहे. पण येथे जे निद्रेने ग्रासले आहेत त्यांना या राऊळात दंड होत आहे. रात्रंदिवस जर हरिचरणी जागाल तर हा भवसागर तरून जाल (४). अठरा पुराणे हेच कोणी बलौते ज्याने धड केले. ज्याना धडपणा प्राप्त झाला. खळ्यावर सनकादिकांना दान प्राप्त होते असा जो दानशूर परमात्मा तो जगदानी पिकून पंढरीमध्ये सर्वांना पूर्ण करून उरला आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (५).

**(७२)**

**आनु नेणे कांही । विठ्ठलु स्मरे देहभावी ।।१।।**
**पुंडलिका चिंतन । म्हणोनि विटेवरी हे ब्रह्म ।।२।।**
***रखुमादेविवरु* शहाणे । विठ्ठलु पाहुणे पुंडलिका ।।३।।**

देहभावानेही जेथे विठ्ठलाचेच स्मरण होत असे आणि ज्याने दुसरे कांही जाणलेच

नाही (१) असे पुंडलिकाला हे चिंतन लाभले म्हणून हे ब्रह्म विटेवर उभे राहिले (२). रखुमादेविवर ज्ञानपूर्ण विठ्ठल पुंडलिकाचा पाहुणा झाला (३).

**(७३)**

**तळवे तळवटी असे । विटे फावले अनायासे ।।१।।**
**आम्हा न संडवे पंढरी । विठ्ठलराज विटेवरी ।।ध्रु।।**
**जानु जघन बरवे दिसे । ते देखोनि मन उल्हासे ।।२।।**
**पदकमळ जोडिले । तेथे मुनिजन रंगले ।।३।।**
**कासे कसिला पितांबरु । चरणी ब्रीदाचा तोडरु ।।४।।**
**नाभिकमळी जन्म असे । ब्रह्मादिका अपैसे ।।५।।**
**हस्त कडगे बाहुवटे । विठोबा श्रृंगार गोमटे ।।६।।**
**अंगी चंदनाची उटी । ते देखुनी मन संतुष्टी ।।७।।**
**गळा वैजयंति माळा । मणी मंडित वक्षस्थळा ।।८।।**
**कानी कुंडले झळाळा । श्रीमुख दिसते वेल्हाळा ।।९।।**
**वदन सुकुमार गोजिरे । जैसे पोवळी वेल साजिरे ।।१०।।**
**दंतपंक्ति झळाळ । जैसी माणिकाची कीळ ।।११।।**
**नासिक मनोहर दिसे । जैसे वोतिलेसे मुसे ।।१२।।**
**लोचन बरवे विशाळ । श्रवणी कुंडले झळाळ ।।१३।।**
**टिळक रेखिला मृग नाभीचा । बाप राजा मन्मथाचा ।।१४।।**
**माथा मुगुट झळाळित । बाप पुंडलिका न्यहाळित ।।१५।।**
***निवृत्तिदास* शरणागत । विठ्ठला चरणीचे आरत ।।१६।।**

तळव्यांचे तळी जो विटेवर अनायासे उभा आहे (१). असा तो विठ्ठलराज विटेवर असल्याने आम्हाला पंढरी सोडवत नाही (ध्रु). ज्याचे घोटे, मांडया उत्तम असून ज्यास पाहिले की मनाला उल्हास उत्पन्न होतो. (२) ज्याचे पदकमल जोडलेले



असून ते ज्यानी जोडले असे मुनिजन तेथे रंगून गेले आहेत (३). कंबरेला पीतांबर कसला असून चरणांचे ठिकाणी ब्रीदाचा तोडर साद देत आहे (४) ब्रह्मादिकांना ज्याचे नाभिस्थानी जन्म झाला आहे (५). हातात घालण्याची कडी ज्याचे बाहूंना शोभा देत आहेत असा विठोबाचा श्रृंगार आहे (६). चंदनाची उटी ज्याने अंगाला लाविली आहे की जे पाहून मन संतुष्ट होत आहे (७). गळ्यात वैजयंती माळा असून ज्याची छाती मणिमंडित आहे (८). कानात दैदिप्यमान कुंडले असून ज्याचे श्रीमुख शोभत आहे (९). ज्याचे मुख गोजिरवाणे सुकुमार अगदी नाजूक आहे. पोवळ्याचे वेलाप्रमाणे आकर्षक आहे (१०). माणिकांचे तेजाप्रमाणे ज्याची दंतपंक्ति चकाकत आहे (११). मुशीत ओतल्याप्रमाणे ज्याचे नाक सरळ, मनाला हरण करणारे आहे (१२). ज्याचे चांगले विशाल डोळे असून कानात कुंडले झळकत आहेत (१३). हा मदनाचाही मोठा राजा असून ज्याने कस्तुरीचा टिळा लाविला आहे (१४). ज्याचे मस्तकी मुगुट झळकत असून जो श्रेष्ठ पुंडलिकाला पहात आहे (१५). विठ्ठलचरणाची प्रीती असलेले श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज ज्याचे शरणागत आहेत (१६).

**(७४)**

**जन्मोजन्मीच्या सायासी । विठ्ठल लाधला पुंडलिकासी ।।१।।**
**पूर्वी पुण्य केले वो माये । विटे लाधले या विठोबाचे पाये ।।२।।**
***रखुमादेविवरु* आहे । तया तीर्था केधवा जाती पाय ।।३।।**

जन्मोजन्मीच्या प्रयत्नाने पुंडलीकाला विठ्ठलाची प्राप्ती झाली (१) पूर्वी पुण्य केल्यामुळे या विटेवर विठोबाचे पाय सापडले (२). तो रखुमादेविवर आहे अशा या तीर्थाकडे हे पाय केंव्हा वळतील? (३).

**(७५)**

**विवेक नदीये बैसोनि । सांगड सत्त्वाची बांधोनी ।।१।।**
**एक पंढरी वैकुंठ । येर वाउगे बोभाट ।।२।।**
**चारी वेद विवादती । पुराणे साक्ष देती ।।३।।**

**बोले *निवृत्तिचा दास* । संत गर्जती पाप नाश ।।४।।**

विवेक नदीवर सत्त्वाची सांगड बांधून जो बसून पाहिले तो एक भूवैकुंठ पंढरी असून बाकीचा उगीचच बोभाटा आहे असे दिसून आले (१-२). चारी वेदांनी हेच स्पष्ट केले असून याची साक्ष पुराणे देत आहेत (३). या ठिकाणी पापनाश होतो असे संत गर्जून सांगत आहेत, असे श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज बोलतात (४).

**(७६)**

**वाराणसी यात्रे जाईन । प्रयाग तीर्थ पाहीन । परी मी वीट नव्हेन ।।१।। विठोबा पायीची वीट । मी कई बा होईन ।।ध्रु।। गोदावरी यात्रे जाईन । बारा वरुषाचे फळ लाहीन । अब्जक तीर्थी स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ।।२।। मल्लिकार्जुन यात्रे जाईन । श्रीशैल्य शिखर पाहीन । पाताळगंगे स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ।।३।। मातापुर यात्रे जाईन । सह्याद्री पर्वत पाहीन । गहनगंगे स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ।।४।। कोल्हापुरी यात्रे जाईन । महालक्ष्मी पाहीन । विशाळतीर्थी स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ।।५।। एका अंगुष्ठी जप करीन । पृथ्वी पात्रचि लाहीन । देह कर्वती देईन । परी मी वीट नव्हेन ।।६।। बहुता पुण्यांच्या सायासी । चरण जोडिले विटेसी । *निवृत्तिदासु* म्हणे परियेसी । परी मी वीट नव्हेन ।।७।।**

वाराणसी यात्रेला जाईन, प्रयाग तीर्थही पाहीन; परंतु मला वीट होता येणार नाही (१). खरोखरीच विठ्ठलाचे पायीच वीट मी कधी होईन बरे? (ध्रु). गोदावरीची यात्रा करीन, बारा वर्षाचे फळ मिळवीन, अब्जक तीर्थाचे स्नानही करीन. परंतु मला वीट होता येणार नाही (२). मल्लिकार्जुन यात्रा, श्रीशैल्य शिखर पाहीन, पाताळगंगेत मज्जन करीन पण मला वीट होता येणार नाही (३). मातापुर यात्रा घडेल, सह्याद्री पर्वत पाहीन, गहन गंगेत स्नान करीन, पण मला वीट होता येणार नाही (४). कोल्हापुर यात्रा होईल, महालक्ष्मीचे दर्शन घडेल, विशाल तीर्थी स्नान करता येईल परंतु मी वीट नव्हेन (५). एक अंगठ्यावर उभे राहून तप करता येईल, पृथ्वीपात्र संपादन करता येईल, कर्वती देह घालणेही शक्य होईल परंतु मी वीट कशी होणार?



(६). बहु पुण्यांचे प्रयत्नांनी हे चरण विटेला जोडले आहेत. निवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात बाबारे तू ऐक. मी वीट कधी होईन? (७).

## ❊ रुपके ❊

### ❊ बाळ क्रीडा ❊

**(७७)**

**भवाब्धि सागरी मांडिली टिपरी परि अनुहाते वाजे गजरु वो ।**
**ताळक छंदे उमटति पदे वरि टिपरे टिपरी गाजे वो ।।१।।**
**टिपरिया घाई गोपाळ भाई । घुळुघुळु पाई नादु वाजे वो ।।२।।**
**ताळक छंदे वेगु आल्हादे टिपरी नादे वाजति वो ।**
**सांडुनि अहं धरिले सोहं तयासि टिपरी साधली वो ।।३।।**
**औट हात भूमिका नीट ताल छंदे टिपरी धरी वो ।**
**विरुळा जाणे एथीचे खुणे । टिपरी वाजे शिरी वो ।।४।।**
**एकचि संगे टिपरी वेगे ध्वनि गगनी गाजे वो ।**
**बापरखुमादेविवर टिपरी वो गाजति घाई जाली टिपरीया जोगी ।।५।।**

भू म्हणजे होणे आणि भव म्हणजे झालेले, याचा अब्धि म्हणजे समुद्र त्यात जे सहागर म्हणजे सहा प्रकारची विषे आहेत, अशा या सागरी निसर्गानेच जीवनात आपली टिपरी चालली असून टिपरीप्रमाणे जो अनुहताचा गजर ध्वनित होत आहे. ज्या ध्वनिलहरीवर, ताल छंद व पदे उमटत असून लहरी लहरीनेच संघर्षाने टिपरी चांगलीच गाजत आहे (१). अरे हा गोनाम इंद्रियांचा पालनकर्ता गोपाळ हा या अनुहताचे छंदाने नाचू लागला की त्याचे चरणगतीचे ठायी घुंगुरनाद घुळुघुळु असा होत आहे (२). तालाचे या छंदात जो वेग निर्माण होत आहे. ज्या वेगावर आपले आयुष्य आहे त्या ठिकाणी आल्हादपूर्ण टिपरी नादस्वरूप वाजत आहे. ज्यानी अहं सोडून सोहं धरले त्यानाच ही टिपरी साधली, प्रचितीस आली (३). औट हाताचे भूमिकेवर नीट अशा ताल छंदाने टिपरी आवाज धरती. त्यामुळे तो ध्वनी आतल्या

आत घुमत रहातो. या खुणेने जो कोणी विरळा जीव हे जाणून घेतो त्याचे मस्तकी सहस्त्रदळात ही टिपरी घुमत रहाते (४). जीवशिवाचा एकच संग होऊन या जीवनाचे वेगात टिपरीचा ध्वनी चिदाकाशात गाजतो आहे. हा योग ज्यांनी साधला तेथे बापरखुमादेविवर परमात्म्याचे टिपरीची एकच घाई जहाली असून ती गाजत आहे (५).

**(७८)**

**जटिल धुळ धुसिर दोंदिल डोळसु अंगणी बाळचंद्र खेळता दिसे । ते देखोनि या यशोदा माया पसरोनिया बाह्या । ने क्षेम सांगावया वाचा कैची ।।१।। वालभते ब्रह्म गोकुळी आनंदे । गौळियाच्या छंदे खेळता दिसे ।।ध्रु।। थुरथुर चालत भूमी पाय ठेवित । आजु बाहेर दावित यशोदे माये । तो नित्यपूर्ण म्हणे कडे घे कावो आमये । स्तनपान दे का सये वो संगा गे माये ।।२।। दोनी चारी कणिका वक्रारविंदी देखा । ते मुखमय का माहेर होता । ते उचलोनी कपोळी स्नेहे चुंबिती गोळणी । मांजयाची सीरयाणी ध्यानी मुनिजना गे माये ।।३।। विश्व प्रतिबिंबाचे बिंब तो कान्ह्या वो साजणी । त्यासी वोसंगा घेऊनी गौळणी स्तनपान देति । सवेचि कासावीस होती ते पाही । मां साच की कान्ह्या नाही तेथे यशोदा ते कैची ।।४।। वेद शास्त्रा पुराणा आणि यज्ञ तप दाना । श्रृति धांडाळिता मना ठावो नुरेचि । मां मां म्हणोनि गौळणी अंगोळिया धरिती । मां विस्मयो करिती चोज अचोज गे माये ।।५।। ब्रह्मादिका लक्षा न ये । कल्प गेले युगे युगे । तो गोळणीया वो संगा निघाला गे माये । ते बाळ भावाचे की सतत दैवाचे । न वर्णवे वाचे दिपो दिपो वो माये ।।६।। सावळा सुजेडुं की सुधे परिस गोडु । तो या डोळ्या उजियेडु डोळसु तो । त्याने एकै घेइजे एके पुजिजे । मा प्रीतिचेनी माजे नेणिजे दुजे गे माये ।।७।। हारवि काई आपुलेपण न संडिजा गावोगावीचा होत जात । तैसा गोकुळी गोपिनाथु सकळजना । कृष्ण परब्रह्म पुतळा कीं आनंदाची कळा । तो हा भोगविता हे लीला मदनाची गे माये ।।८।। एक पावलो म्हणती ते कांहीच नेणती । अनुसरलिया हातातळी पावा पावा म्हणे निवृत्तिदासु ।हरि *बापरखुमादेविवरु* विठ्ठलू करिते निके गे माये ।।९।।**

गरगरीत पाणीदार डोळ्याचा, ज्याचे मुख धुलीकणाने तांबूस दिसत आहे असा तो बालचंद्र श्रीकृष्ण परमात्मा अंगणात खेळत होता. ते पाहून यशोदा मातेने आपले हात पसरून प्रेमाने क्षेमालिंगन दिले. ते शब्दाने काय बोलता येईल? (१). असे ते प्रेमळ ब्रह्म गोकुळात आनंदाने गौळियांचे बरोबर हौसेने खेळताना दिसत असे (ध्रु). ते (थुरथुर) तुर तुर तुर चालीत असे. जमीनीवर पाय ठेवीत अंतर्बाह्य प्रचिती यशोदा मायेला देत असे, आणि असे ते नित्य पूर्णब्रह्म ''आई मला कडेवर घे व मला स्तनपान दे'' असे म्हणत असे (२). दोनी चारीना ज्याचा पत्ता नाही, त्याने आपले तोंड वाकडे केले असून ते सर्वांचे माहेरच अशा त्या परमात्म्यास उचलून डोक्याला डोके लावून मुनिजनांना ज्याचे ध्यानाचे महत्त्व, त्याचे चुंबन गौळणींनी घ्यावे (३). विश्व हे ज्याचे प्रतिबिंब असे जे पूर्ण बिंब कान्हा, त्यास मांडीवर घेऊन गौळणी स्तनपान देत आणि स्वतः कृष्णप्रेमाने कासावीस होत. मी खरा की कान्हा नाही, कान्हा खरा की मी नाही अशी अवस्था त्यांची होई. मग यशोदेची काय अवस्था ? (४). वेद, शास्त्र, पुराणे, यज्ञ, तप, दान यांना, श्रुतींचा अभ्यास केलेल्या मनाला ज्याचा पत्ताच लागत नाही तेथे मला मला म्हणून गोळणी ज्याचे हाताची बोटे धरीत आणि खरोखरी अकळ अशा परमात्म्याचे साश्चर्य कवतुक करीत (५). युगायुगाने कल्प गेले तरी ब्रह्मादिकांनाही जे लक्ष्य होत नाही ते या गौळणींच्या संगतीत असावयाचे असे ते बालक भावपूर्ण दैववान ज्यांचे दैवात असेल त्याचे ठिकाणी भाव निर्माण होऊन दर्शन व्हावे असे ज्याचे वर्णन करता येणार नाही असे होऊन दिव्याने दिवा लागला की तो दिवाच व्हावा असे कृष्णाला पहाणारे कृष्णच व्हावेत आणि खरा कृष्ण कोण हाच प्रश्न निर्माण व्हावा असे होते (६). ज्याचा प्रकाश पडावा असा सावळा अमृतापेक्षाही गोड तो या डोळ्यांना ज्याचा उजेड प्राप्त झाला असा डोळ्यात असलेला डोळसू परमात्मा त्याला एकाने घ्यावे, एकाने त्याची पूजा करावी. प्रेमाने अशी एकधूम निर्माण व्हावी की जेथे द्वैतच राहू नये, दुसरेपणाचा अंतःकरणात प्रवेशच होऊ नये

(७). देहभाव नाहीसा करून आपले आत्मत्व न गमावता गावोगावीचा सर्वांचा हा होत जावा. आणि गोकुळातही हा गोपीनाथ सर्व जनांना असाच व्हावा. आनंदाची कळा असा हा ब्रह्माचा पुतळा श्रीकृष्ण तोच हा आणि हाच तो असून भक्तिसोहळे भोगावयास लावणारा, ज्याचे आकर्षण मदनासारखे, ही लीला काय सांगावी ? (८). आपण पोचलो म्हणतात ते एक कांहीच जाणत नाहीत. ज्याचे हातात पावा आहे असा बापरखुमादेविवर हरि विठ्ठल करतो ते योग्यच असे निवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (९).

**(७९)**

**गोकुळी कमळ विस्तारले साचे । ध्यान श्रीधराचे करावया । यमुनेच्या पातळी मूर्ति देखिली सावळी । चिदाकाशीची वोतली प्रेम तनू गे माये ।।१।। आवडीचे वालभ ब्रह्म पुंजाळले । गोप वेषे गाई राखे । कांबळीची बुंथी घेऊनि कल्पद्रुमातळी । त्रिभंगी ठाण मांडियेले गे माये ।।ध्रु।। योगमायेचेनि विलासे उभा देहुडा पाऊली। तेथे दीप्ती जे उदेली तेजाकारे । अंगुष्ठी अंगुष्ठ स्थापियेले मूळ पीठ । सुनीळ नभाचेनि काळीवटे अंगोळिया गे माये ।।२।। शेष गुढारी विसंचला कीं भूमी पावो ठेविला । तोचि वन्यस्त उभारिला तेजःपुंज । कुंकुमपिंजरीचेनी सळे । मा पर्वती रातोत्पळे । तळवाचे रंग वाहले पाउली श्लाघे गे माये ।।३।। चरण कमळी कमळा कैसी विराजली बाळा । तेथे जाला एकवळा ये कमळी कमळा । ध्वज वज्र अंकुश रेखा चरणी वोळली पीयुष । नखे सरळी देखा काळेपणाचेनि गे माये ।।४।। घोटी सुनीळ निरावकाशे काश पाहता भासलासे । जानुज घन प्रकाशे नभ ढवळले । कासे कसिला सोनसळा खवे आला मध्यस्थळा । रत्नजडित मेखळा शोभतसे गे माये ।।५।। द्वितीय कमळी प्रजापती कीं रोमराजी झळकती । तेथे उपनली दीप्ती काळी त्रिवळीची । उदर वक्षस्थळ द्विजपद निर्मळ । स्तन चंद्र पोकळी ढिसाळ काळिमा जैसी गे माये ।।६।। उदधीचेनी प्रेम सळे आपाद वैजयंती माळे । वरी शोभताती सोहळे सगुणाचे । दर्शन दीप्ती**



**झळाळी रत्नकीळा मागो आली । दिसे हनुवटी बुजाली प्रभेचेनि गे माये ।।७।। प्रणवाचा मरिगळा पूजनासि आला भाळा । तुर्येसहित त्रिपुंड्र टिळा अर्ध ऊर्ध्व मात्री । अभिनव महाकारणी । पवन पंचकाची खेवणी । कुंडले पेरावाणी कर्णी ढाळ देती गे माये ।।८।। माथा मोरपिसा वेठी गंडस्थळी पडे दीप्ती । स्वये विस्मित श्रीपती । तेजःपुंज गे माये । तरुघोस खोविले शिरी वेणु ठेवुनि अधरी । नंदरायाचा खिलारी वोज काय सांगो गे माये ।।९।। सप्तरंध्री सप्तस्वर चाळी अंगोळिया मनोहर । मुद्रिका शोभती साकार रत्नजडित गे माये । तिया वेणुचिया किळा । गोपि वेधल्या सकळा । अवघिया जाल्या पै काळ्या कृष्णरूपे गे माये ।।१०।। ऐसा नट नाट्य वेषधारी सवे सवंगडे वारिधारि । कैसा त्रिभंग कुसरी उभा असे गे माये । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु सुखाचे निधान । म्या हृदयी संपूर्ण साठविले गे माये ।।११।।**

श्रीधराचे ध्यान करावयास गोकुळात कमलनयन खरोखरीच विस्तारले असून, ते आपण आपल्यासच पहात होते. चिदाकाशातून अवतीर्ण झालेली प्रेमतनू चैतन्याने वोतलेली ती सावळी मूर्ती यमुनेच्या तीरावर पाहिली (१). आवडीचे असे प्रियकर ब्रह्म तेजःपुंज असून गोपवेषाने गाई राखीत असे. कल्पवृक्षातळी कांबळीचे पांघरूण घेऊन यमुनेचे तीन ओघ जेथे वाकडे गेले आहेत तेथे आपले या परमात्म्याने ठाणच मांडले (ध्रु). योगैश्वर्य विलासाने हा पायावर वाकडा पाय ठेऊन उभा असून, चैतन्याची दीपिका जी तेजाकाराने प्रगट झाली, तेथे आंगठ्या येवढ्या जागेत अंगुष्ठप्रमाण मूळपीठ मूळ स्वरूपाची स्थापना केली. काळा रंग जेथे एकवटला आहे अशा नीलवर्ण आकाशाचे योगाने ज्याने या स्वरूपाचा अंगुली निर्देश करून साधकाला अभ्यासाची खूण दाखविली आहे (२). शेषाचे वेटोळ्यात जो साचला-संचारला-की ज्याने जमिनीवर शेषाचे मस्तकी पृष्ठभागावर पाय ठेविला तोच विज्ञानरूप तेजःपुंज उभा राहिला आहे. पिंजरीचे कुंकुमाप्रमाणे ज्याची आरक्तवर्ण पदकमले मऊ मऊ असून तळव्याचा रंग पाऊलावर उमटला आहे (३). चरणकमलाचे ठिकाणी चित्शक्ती विराजमान असून चैतन्य आणि चित्शक्ती यांचा जेथे एकोपा झाला आहे, ध्वज, वज्र

अंकुश रेखांकित अमृतमय असे हे चरण असून काळेपणाचेनि नखे सरळ सरळ शोभून दिसत आहेत (४). ज्याचे घोट्यात निरशून्य सुनीळ आकाश प्रतीत होत असून जानु, जघन प्रकाशाने, आकाश शुभ्र प्रकाशाने ढवळले, लहरी लहरीने व्याप्त झाले. मध्यभागी कंबरेला जरीचा परिधान केलेला पीतप्रभायुक्त पीतांबर खोवला असून रत्नजडित मेखळा ज्याला शोभत आहे (५). अनंत विश्वांचा निर्माता ब्रह्मदेव ज्याचे नाभिकमली निर्माण झाला. ज्याचे सत्तेने रोमारोमात अनंत विश्वे झळकत आहेत. तेथेच ही त्रिवेणीची काळी सरिता प्रकाशमान सन्निध होऊन राहिली. पोटावर-छातीचे-ठिकाणी भृगुऋषींचे पाऊल निर्मळ असून ज्या पोकळीत काळिमा आहे असे वाटोळे स्तन चंद्राकृतीच दिसत आहेत (६). प्रेमाचा हा समुद्रच असून पायापर्यंत रुळत असलेल्या वैजयंती माळेमुळे सगुण भक्तीचे हे सोहळे शोभा देत आहेत. ज्याच्या दंतपंगतींचे तेज रत्नप्रकाशाप्रमाणे झळकत असून त्या प्रभेमुळे हनुवटी दिसेचना. ज्याची हनुवटीही प्रभायुक्तच आणि काय सांगावे? (७). प्रणवाचा तुरा हाच मस्तकी पूजनास आला असून तीन ओघांचे ऐक्य जेथे होते असा त्रिपुंड्र टिळा अधोर्ध्व तीन मातृकाने युक्त असून महाकारण देहाचे ठिकाणी पंचप्राणांची ऐक्यता होऊन कानातील पेरापेरासारखी असणारी अनुहताची कुंडले जेथे शोभा देत आहेत आणि प्रकाशमान होत आहेत (८). माथ्यावर मोरांचे पिसांचा जुडगा असून मानेवर तेज विकसित झाले आहे असा तो तेजःपुंज श्रीपती परमात्मा स्वतः मित-स्मित हास्य करीत आहे. कल्पतरूंचे घोसही मस्तकी खोविले असून पावा ओठावर ठेऊन नंदरायांचा हा परमात्मा गाईंचे कळपात उभा असावयाचा (९). आपल्या हाताच्या बोटांनी सप्तरंध्रातून जो सात स्वर चाळवीत आहे, असा तो मनाचे हरण करणारा असून, रत्नजडित साकार मुद्रिका ज्याचे बोटांतून शोभत आहेत. त्या वेणूचा प्रकाश पाहून सर्व गोपींना याचा वेध लागला असून त्या कृष्णस्वरूपच होऊन राहिल्या. ज्याचे नादानुसंधानाचे हे महात्म्य (१०). असा नानाप्रकाराने निरनिराळे वेष घेणारा नाटकी परमात्मा ज्याचे बरोबर वारि करणारे असे त्याचे सोबती, तो ज्या ठिकाणी यमुनेचा ओघ तीन ठिकाणी वाकडा गेला आहे, तेथे मोठ्या कौशल्याने उभा असून



तो सुखाचा ठेवाच बापरखुमादेविवर विठ्ठल माझे ह्रदयात संपूर्णतः साठविला आहे (११).

**(८०)**

**भक्तिचिया चाडा गोकुळासी आला । त्याशी गौळणी म्हणती वाल्हा दुल्हा गे माये । आवडीच्या सुरवाडे परब्रह्म सुरवाडे । त्याशी गौळणी खेळविती लाडे कोडे गे माये ।।१।। गोजरिया कान्हो अपछंद मत्ता पाउली रंगे । रंगनाथा दृष्टिचिया डोळा सुख निवडेना मागुते । ते वाचा वर्णावी केवि आता रया ।।ध्रु।। अठुले लोळिया ढाळ देति कानी । मुक्ते खेवणी हरि श्रवणी । अंतरिच्या सुखा प्रगट दाविती देखा । लल्लाटी झळकती रेखा रत्नजडित पत्रे माथा गे माये ।।२।। युगबंदु दिधला तैसा दोंदिलु मिरविला । नाभिकमळी प्रकाश जाला परमेष्टी । कटी तटी कडदोरा साजे त्या सुंदरा । वेगु तरू नेपुरा वेदु मानसी । वसे गे माये ।।३।। श्रुतिचेनि समागमे पाउले गोजिरी । घागुरली प्रेम नेपुरे कैसी वोव देति । अंदु वाकी वाळे पाय करी बोंबिले । मुनिजनांचे सुख सोहळे पुरवितसे गे माये ।।४।। ऐसा आपुलिया लीले आपणासीच खेळे । गौळणी भरूनिया डोळे कैशा पाहताती । अवघे कृष्णरुप भरलेसे मानसी । *बापरखुमादेविवरेसी* मिळोनी गेल्या गे माये ।।५।।**

भक्तिकरताच जो गोकुळास आला त्याला गौळणी हा सगुण निर्गुण असा दोन रूपाचा आहे असे म्हणतात. आवडच गोड असल्याने सुखाचे परब्रह्म गौळणी लाडाने आणि कौतुकाने त्यास खेळवीत (१). हा कान्हा गोजिरवाणा असून वाकड्या पाउलाने एका धूममधे रंगत असे, का तो रंगनाथच होता. सगळे रंग जेथूनच निर्माण झाले. दृष्टीचा जो डोळा त्याला अनुभव घेतल्यानंतर त्यामुळे येथे का यामुळे तेथे हे सुख होत आहे हेच पहाणारांना निवडता येईना. त्याचे वर्णन वाचातीत आहे तर ते काय करावे? (ध्रु). कानात अठुल्यांच्या लोळ्या मुक्तस्वरूपाने प्रकाशमान असून त्यातून हरिनादरूप व्यक्त होत होता की ज्याने हरिश्रवणी श्रवणाकाराच व्हावे. आपले हे आंतरिक सुख

जो या रूपाने प्रगट करीत होता. कपाळावर व मस्तकी रत्नजडित पाने झळकत होती (२). असा हा नादप्रकाशाचा ऐक्य योग ज्याने साधला आहे असा तो श्रेष्ठतेने मिरविला. नाभिकमळी ज्याचे पराकाष्ठेचा प्रकाश झाला, असा कडदोरा ज्याचे कंबरेत असून त्या सुंदर स्वरूपास तो शोभून दिसत होता. ज्या वेदांचे मानसी तो वेगवान झाला की नुपुरांचा होणारा ध्वनी दृढ झाला होता (३). या श्रुतींचे समागमात ही गोजिरवाणी पाऊले असून पायातील साखळ्याने जी चकाकत होती. ज्याचे पायात साखळ्या, वाळे असून मुनिजनांचे सुख सोहळे ज्या दर्शनानेच पुरविले. (४). असा तो परमात्मा आपल्याशीच आपण आपल्या लीलेने खेळत असता गौळणी अगदी डोळे भरून कशा पहात होत्या. त्यांचे मनात अवघे कृष्णरूपच भरून गेले असून त्या बापरखुमादेविवर परमात्मरूपाशीच मिळून गेल्या, एकरूप झाल्या (५).

(८१)

**योगिया मुनिजना ध्यानी । ते सुख आसनी शयनी ।।१।।**
**हरि सुख फावले रे ।।ध्रु।।**
**गोकुळीच्या गौळिया । गोपि गोधना सकळा ।।२।।**
***बापरखुमादेविव*रे विठ्ठले । ते सुख सवंगडिया दिधले ।।३।।**

योग्यांना आणि मुनीजनांना ध्यानी, आसनी फार काय शयनी देखील ते सुख प्राप्त झाले (१). हरि सुखच त्याना मिळाले (ध्रु). गोकुळातील गवळी, गोपी, गाई या सर्वांना तेच लाभले (२) बापरखुमादेविवर विठ्ठलाने ते सुख आपल्या सवंगड्यांना दिले (३).

(८२)

**पाव या लुब्ध जाला पावळा । गाई परे बळारे कान्हो ।।१।।**
**विसरल्या चार विसरल्या पार । तल्लीन साचार कृष्णमूर्ती ।।ध्रु।।**
**पाणिया निघाल्या गाई चरतो कळवा ठाई । हाकीतसे लवलाही सवंगडा ।।२।।**
***ज्ञानदेवी* गाई हाकितु पावे सोई । हरिनाम दोही सत्राविये ।।३।।**

परेचे ठायी आत्मबळाने गोनाम इंद्रियवृत्ती श्रीकृष्णाचे अनुहत ध्वनीने लुब्ध



झाल्या (१). चार अवस्था, देह, वाणी, यांचा पार म्हणजे शेवट जेथे आहे तेही विसरून गेल्या आणि श्रीकृष्णमूर्तीशी खरोखरीच तल्लीन झाल्या (ध्रु). जीवन संपादणेकरता निघालेल्या गाई कळंबाचे ठिकाणी दृश्य विषय सेवन करू लागल्या, चारा चरू लागल्या तो गोपाळांनी तेथून त्याना हाकून लावले (२). श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ठिकाणी या गाई हाकताना सोयच झाली. सत्रावीचे दोहन करून हरिनामाची प्राप्ती झाली (३).

(८३)

**गाई चालिल्या वनाप्रति । सर्व पेंधा चाले सांगाती ।।१।।**
**वळि गोवळिया कान्होबा । यमुने पाण्या नेई तू बा ।।ध्रु।।**
**पावया छंदे परतल्या गाई । विसरल्या चारा तल्लिन ठायी ।।२।।**
***ज्ञानदेव* सवे सवंगडा लाठा । गाई हाकितो गोठणा तटा ।।३।।**

गाई वनाकडे चालल्या असून बरोबर पेंद्या चालला होता (१). गाईंना वळविणाऱ्या श्रीकृष्णा 'तू या गाई वळव व यमुनेच्या पाण्यावर तू घेऊन जा' असे परमात्म्यास पेंद्या म्हणाला (ध्रु). तो श्रीकृष्णाचे पाव्याने छंदाने गाई परतल्या व चारा खाणेचे विसरून ठिकाणावर तल्लीनच झाल्या (२). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे बरोबर मोठा संवगडा असून तो गोठाचे तटी गाई हाकीत आहे (३).

(८४)

**माथे टेकित बाह्या पसरित । डांगाचे आधार घेती ।।ध्रु।।**
**एक म्हणती आम्ही उचलिला पर्वत । बहुत मिळोनी काय नव्हती रे ।।१।।**
**बाहे कडाडित मनगटे लचकत । म्हणोनि उठिले अवघे रे ।।२।।**
**तया माजी असता न दिसे बाप । समर्थ थोर तुझी माव रे ।।३।।**
**काळु आतुडे परी वेळु नातुडे । म्हणौनि रक्षिले सकळा रे ।।४।।**
***बापरखुमादेविवर* विठ्ठल साचा । म्हणोनि रक्षिले आम्हा रे ।।५।।**

डोके टेकीत, हात पसरीत, गोपाळ एकमेकांचे आधार घेत होते (ध्रु). एक म्हणत 'आम्हीच हा पर्वत उचलिला'; मग बाकीचे पुष्कळ मिळून काय नव्हते काय?

(१). कुणाचे हात कडकड करू लागले, कुष्णाची मनगटे लचकली, आणि सर्वजण उठले (२). त्यातच श्रीकृष्ण परमात्मा असून कोणालाही दिसला नाही. देवा तुझे कवतुक करावे तेवढे थोडे आहे (३). काळ आला होता पण वेळ आली नव्हती. म्हणून सर्वांचे रक्षण केले (४). बापरखुमादेविवर विठ्ठलच खरा म्हणून त्यानेच आमचे रक्षण केले (५).

**(८५)**

**कल्पद्रुमातळी ब्रह्म पुंजाळले कैसे दिसते सुनीळ तेज गे मज । पाहता वेणु वेदध्वनि नाद उमटताति सहज गे बाई ये ।।१।। आनंदे गोपाळ गोधने राखसी तळे यमुनेच्या पावली । कर्म काठी करी घेऊनीया वळत्या देतुसे पाचचा मेळिगे बाई ये ।।ध्रु।। ऐसा जिकडे तिकडे उभारोनि बाहो । म्हणति थोटे निकोपे तयाचिया कर्मा होति निवृत्ती । काय पूर्विल येवढे तपगे बाई ये ।।२।। गोवळे पणाचेनि वेषे अमरी सेविजे बोलताति सवंगडे । येरूनि येराचिया उच्छिष्टा झोंबती नेणो तया काय जोडगे बाई ये ।।३।। मुनिजन स्तविता संतोष न पवे तो हुमली घेता असे । ब्रह्मादिका बोलाची अक्षरे कोण जाणे प्रेम कैसे गे बाई ये ।।४।। ऐसा साहि दर्शना वर्णिता पवाडु नाही । आणि गोवळेपणे वेष नवल सांगो मी कायी । *बापरखुमादेविवर* विठ्ठलु सेविलिया । वाचुनि नेणवे केलिया कांही गे बाई ये ।।५।।**

सुनीळ तेजाने प्रकाशमान झालेले ब्रह्म कल्पवृक्षातळी कसे मला दिसत आहे काय सांगावे ? ज्या ठिकाणी वेणूतून वेदांचे ध्वनिघोष सहजच उमटत आहेत (१). यमुनेच्या तीरावर आपला तळ देऊन, आनंदाने गोपाळांचे व गाईंचे रक्षण करून, हातात जीवनाचे धारणेचे सहज कर्माची काठी घेऊन, त्यांना आपलेकडे वळवून पंचमातृत्माक ॐकाराच्या मेळी आणतोस (ध्रु). असा जिकडे तिकडे हात वर करून सर्वांना आणून त्यांच्या कर्मांची वृत्ति निवृत्त करून शुद्ध करतो त्यांचे काय पूर्वीचे येवढे तप तरी आहे याची कल्पनाच करता येत नाही (२). गवळ्यांचे वेषाने स्वर्गातील देव ज्याची सेवा करतात असे आमचे वैष्णवस्नेही सोबती सांगत असतात. एकमेकांचे



उच्छिष्ट प्रसादाकरता जीव टाकतात त्यांनी काय पुण्य जोडले असेल ते जाणणे पलीकडचे आहे (३). मुनिजनानी स्तवन केल्याने ज्याला समाधान नाही पण तोच परमात्मा असा प्रसाद घेताना मात्र हसत असे. ब्रह्मादिकांनी ज्याचे वर्णन आपल्या बोलण्याने अक्षरत्वाने व्यक्त केले आहे ते प्रेम काय आहे आणि कसे आहे हे जाणणार तरी कोण? (४). अशाप्रकारे षट्दर्शनांना वर्णन करताना ज्याचा पत्ता लागत नाही असा तो गोवळेपणाचा वेष घेतो हे काय नवल सांगू तरी कसे ? काय वाटेल ते केले तरी बापरखुमादेविवर विठ्ठलाची सेवा केल्यावाचून त्याची अनुभूती घेतल्याशिवाय हे परमात्म्याचे कोडे जाणताच येणार नाही. (५)

**(८६)**

**नागोठणी गोपाळ वळतिया देतो कीं आनंदली । गोधने ऐकोनि वेणु ध्वनी तत्त्वता । तुझी सावळी सुंदर बुंथी विसंबे क्षणभरी तेचि सुखी सुख पाहता निज चित्ता रया ।।१।। आनंदल्या मने पहा तू निधान । जवळिल्या निजध्याने सांडू नको ।।ध्रु।। म्हणोनि कल्पनेचा उबारा मन संधीच ससंध भागु अनुसराया गोठणीच या । दुर्लभ शक्ति ते गोप वेषे नटले चैतन्य मांदूसे ते परादिका नव्हे निज शक्ति रया ।।२।। म्हणोनि रखुमादेविवरु सद सुखाची निजबोल पाहे मी तू पणा नातळे तो ऐसियाची बुद्धी सखोल ।*निवृत्तिराये* खुणा दावुनि सकळ निज चैतन्य पाहे निखळ रया ।।३।।**

गोठाणावरल्या गाई हा गोपाळच वळवितो. तत्त्वता वेणूचा ध्वनी ऐकून या गाई आनंदित झाल्या. त्या तुझी सावळी सुंदर मूर्ती एक क्षण जरी थांबून पाहिली तरी त्याच सुखात आपल्या चित्तासही सुखच होते (१). मनाचे संधीचा सांदमोड होऊन एकजीव होणारा भाग अनुसरणेसाठी ज्या कल्पनेनेही उबारा निर्माण झाला त्या गोनाम इंद्रियवृत्तींचे स्फुरण होणाऱ्या या गोठाणावर दुर्लभ शक्तिरूप चैतन्य गोपवेषाने साकार होऊन नटले व साक्षात्काराला आले. ही शक्ति जे दुजेपणात आले आणि दुसरेपणात आणि तदनुषंगिक कोठेही पाहू गेले तरी तेथे नाही (२). मीतूपणा आढळणारच नाही

असा जो कोणी रखुमादेविवर सत् सुखाचा अस्तित्त्वातून उठणारा बोल प्रतीती घेऊन पाहतो त्याची बुद्धी सखोलच म्हटली पाहिजे. निवृत्तिनाथांच्या खुणा दाखवून सकळ हे निज चैतन्य निखळ आहे हे पहा (३).

**(८७)**

**हरि प्रेम सरोवरी । क्रीडती ये मदन कुहरी । प्रेम सरोवरी ये ।।१।। चांदिणे निर्मळ । चंदने धवळति ये पैल वृंदावनी वासुगा गोविंदु खेळति ये ।।२।। प्रकृति भक्ति परमातुमा परमहंसु । *ज्ञानदेवो* म्हणे निवृत्तिदासु ।।३।।**

हरि प्रेमसरोवरात मद नाहीसा करणारा भगवान क्रीडा करीत आहे (१). चंदनमिश्रित निर्मळ चांदणे जेथे आहे अशा अलौकिक वृंदावनात वास करणारा गोविंद खेळत आहे (२). परमात्मभक्ति हीच ज्यांची प्रकृती बनली ते निवृत्तिदास परमहंस या क्रीडेचा अनुभव घेणारे आहेत असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(८८)**

**गोवळेपणाची बुंथी घेऊनिया मेष । रिझविशी मानस यशोदेचे ।।१।।**
**त्या सुखे ब्रह्मांड थोडे वा तियेशी । दुग्ध पै मागसी बाळपणे ।।ध्रु।।**
**ऐसे मोहिले पै जगभक्त अंतरंग । भावाचे सुरंग प्रेम बोधे ।।२।।**
**मज मानसी सुख तुझ्या रूपी वोलावा । सर्व इंद्रियी दोहावा तुझ्या नामी ।।३।।**
**जन हे विव्हळ तुजविण अविचार । गुंफले साचार माया मोहे ।।४।।**
**आता ऐसे करी तुज मज सरोबरी । प्रपंच केसरी होई रया ।।५।।**
***बापरखुमादेविवरु* सोपारा पै निळा । निवृत्तिनी कळा सांगितली ।।६।।**

गवळ्याचे रूप घेऊन, देवा, तू यशोदेचे मनास रंजवीत आहेस (१). त्या तुझ्या सुखापुढे तिला ब्रह्मांडही ठेंगणे झाले तो तू बालपणामुळे तिच्याजवळ दूध मागत आहेस (ध्रु). अशा प्रकाराने सर्व जगाला आणि भक्तांचे अंतःकरणाला आपण मोहित करून ठेवले. आपण तो जगाचे व भक्तांचे अंतरंगच आहा, त्या आपण या सर्वासह यशोदेला मोहित केले नसते तरच नवल.आपण अस्तित्वभावाचे सुरंग असून सुर हेच आपले अंग असून आपले प्रेम हाच एक मोठा बोध आहे. यामुळेच आपण सर्वावर



मोहिनी घातली (२). तुझ्या स्वरूपी भक्तिप्रेम हीच एक माझे मनाची आर्तता असून तुझ्या नामाने सर्व इंद्रियांचे दोहन करून त्यातून नामच पुनः संपादन करावे असे मला वाटते (३). एक तुझ्याशिवाय जो होणारा अविचार त्यामुळे जग हे विव्हळ होत असून मायामोहानेच ते खरोखरी गुंफले आहे. किंबहुना माया आणि मोह यांची गुंफण म्हणजेच हे जग आहे. तुझी ओळख व्हावी कशी आणि ओळख नाही तर विचार कुठला? विचार नाही तर विव्हळ होणेपलीकडे काय होईल? (४). तू आता प्रपंचकेसरी होऊन तुझ्या माझ्यात कांही सावढाळपणा निर्माण होईल असेच आता कर (५). नीलवर्ण बापरखुमादेविवर परमात्मा सोपा होण्याची कळच मला श्रीनिवृत्तिनाथानी सांगितली (६).

**(८९)**

**लक्ष लावुनी अंतरी । कृष्णा पाहती नर नारी ।**
**लावण्य सागरू हरि । परमानंदु ।।१।।**

**छंदे छंदे वेणु वाजे । त्रिभुवनी घनु गाजे ।**
**उतावेळ मन माझे । भेटावया ।।ध्रु।।**

**ब्रह्म विद्येचा पुतळा । गाई राखतो गोवळा ।**
**श्रुति नेणवे ते लीला । वेदा सनकादिका ।।२।।**

**भूत ग्रामाचा परिशु । तापत्रयाचा करी नाशू ।**
**आड धरूनी गोप वेषु । वत्से राखे ।।३।।**

**रासक्रिडा वृंदावनी खेळे । इंदुवदन मेळे ।**
**उद्धरी यदुकुळे । कुळदीपके ।।४।।**

**निवृत्तिदासाचा दातारू । *बापरखुमादेविवरू* ।**
**भक्ता देतो अभय करू । क्षणा क्षणा माजी ।।५।।**

लावण्याचा समुद्रच असा श्रीकृष्ण हरि जो आनंदाची पराकाष्ठाच त्याला अंतरात लक्ष्य ठेवून नरनारी पहात आहेत (१). छंदाछंदाने ज्याचा वेणू वाजत असून त्रिभुवनात तो नाद भरून गाजत आहे त्याचे दर्शन घेण्याकरता माझे मन उतावळे आहे (ध्रु).

गाई राखणारा हा गवळी ब्रह्मविद्येचा पुतळाच असून ज्याची लीला सनकादिक, वेदांनाही अगम्य आहे (२). हा भूतग्रामाचा परशु असून तापत्रयाचा नाशच करणारा आहे. आपले स्वरूपाचे आड निमित्तमात्र गवळ्याचे सोंग घेऊन हा गोवत्सांचे रक्षण करीत आहे (३). चंद्रमुख हा परमात्मा वृंदावनात रासक्रीडा खेळत असून या कुलदीपकाने या निमित्ताने यदुकुळांचा उद्धार केला (४). श्रीनिवृत्तिदासांचा दाता बापरखुमादेविवर परमात्मा भक्तांना क्षणाक्षणा अभय कर देत आहे (५).

**(९०)**

**गुणे सुकुमार सावळे दोंदिल पहा पा निराळे केवी बोलले गे माये । सुखे चैतन्याची बुंथी वोतली ब्रह्मादिका नकळे ज्याची थोरीव । तो हा गोवळियाच्या छंदे क्रीडतु साजणी नवल विंदान न कळे भाव रया ।।१।। डोळ बैसले ह्दयी स्थीरावले मन नुठी तेथून कांही केल्या ।।ध्रु।। सत्चिदानंद पदी पदाते निर्भेदी निज सुखाचे आनंदी माये क्रीडतुसे । तो हा डोळिया भीतरी बाहिजु अभ्यंतरी जोडे हा उपावो की जो रया ।।२।। गुणाचे पै निर्गुण गंभीर सत् सुखाचे उद्‌गार जे प्रकाशक थोर सकळ योगाचे । आनंदोनी पाहे पा साचे मनी मनचि मुरोनि राहे तैसे बापरखुमादेविवरा विठ्ठले की मुसेमाजी अलंकार मुराले *श्रीगुरुनिवृत्तिने* दाविले सुख रया ।।३।।**

सर्वांपेक्षा निराळे, बाळसेदार, नाजुक सावळे रूप आपल्या गुणाने कृपाळू झाले. चैतन्याची आनंदरूप ओतलेली धारणाच ती. ब्रह्मादिकांना ज्याची थोरवी कळत नाही तो हा परमात्मा गवळ्यांचे छंदाने क्रीडा करीत आहे ही नवलाईची गोष्ट कळणारी नव्हे (१). ते रूप जे डोळ्यात बसले तो ह्दयात स्थिर झाले, जेथे मनाचे स्फुरण कांही केल्या उठणारच नाही. मनाचे उन्मन होऊन त्याने तेथे ठाणच दिले (ध्रु). ज्या पदाने परमात्म्याचा निर्देश होतो त्याचा भेद करून आकाशाचे पैल सत्‌चिदानंदपदी आपल्या सुखाचे आनंदात म्हणजे स्वानंदसुखात जो क्रीडा करीत आहे तो हा डोळ्याचे आत बाहेर आणि अंतर्यामी जेणे करून जोडेल तोच उपाय केला पाहिजे (२). आपल्या अस्तित्व सुखाचा जो सहजोद्‌गार तत्त्वगंभीर अशा निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी या



गुणाने व्यक्त होणारे सर्वश्रेष्ठ योगाचे जे प्रकाशक स्वरूप ते खरोखरीच उत्साहाने पहात असता मन हे मनाचे ठिकाणी मुरून रहाते. मुसेमध्ये अलंकार मुराले, तसे बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी हे सुख श्रीगुरू निवृत्तिनाथांनी दाखविले (३).

**(९१)**

**मदनमूर्ति तू डोळ्या आसुमाय जालासी । सेखी कामिनिचेनि पक्षे ती पुराणे पिशाच करिती रया ।।१।। गोजिरिया गुण निधाना । बापा गुंतल्यापणाचिया साठी । वेद विदेही विचारिता तेथे । आगम काढिती आटी रया ।।ध्रु।। सायुज्यता जालिया मग सादृश्यपण तेथे लोपे । अवयव अलंकार मुरालिया तेथे दृष्टि परमार्थ थोपे रया ।।२।। तत्त्वपणाचेनि समरसे तेथे पुरोनि उरे ते शेष । *बापरखुमादेविवरु* विठ्ठली गगनी नक्षत्र पडे नुरेचि तेथे रेख रया ।।३।।**

तू मदनमूर्ती डोळ्यांना प्रेममय झालास. शेवटी कामिनीचे पक्षाने पुराणेही वेडी बनली (१). गोजिरवाणा गुणांचा साठा असा तू श्रेष्ठ गुंतलेपणाचे योगाने विदेही वेद विचार करता त्यानी देही विदेही तत्त्व शोधून काढले (ध्रु). सायुज्यतेत सादृश्यपण लुप्त होऊन अवयव अलंकार स्वरूपी मुरल्याने परमार्थ दृष्टीत श्रेष्ठ तत्त्व उभे रहाते (२). तत्त्वार्थाने समरसतेतून पुरोनि उरणारे तेथील शेष नक्षत्र पडले की तेथे पहाण्याची रेषाच उरत नाही अशी अवस्था आकाशात बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी प्रतीत होती (३).

**(९२)**

**सांगाति आमुचिया रे । विद्‌गद् पावया छंदे रे ।।१।।**
**नाचे विनोदे कान्हारे । विद्‌गद् पावया छंदे रे ।।ध्रु।।**
***निवृत्तिदासा* पियोरे । विद्‌गद् पावया छंदे रे ।।२।।**

पाव्याचे छंदाने विज्ञानरूप परमात्मा आमचा सांगाती झाला (१). पाव्याचे छंदाने विज्ञानरूप कान्हा विनोदाने नाचू लागला. त्याचा नाच हाच त्याचा विनोद आहे (ध्रु). पाव्याचे छंदाने विज्ञानरूपच श्रीनिवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना प्रिय झाले (२).

**(९३)**

**वृंदावनी आनंदु रे । विठ्ठल देवो आळविती रे ।।१।।**

**गोपाळ रचले रे । विठ्ठल देवो आळविती रे ।।२।।**

***निवृत्तिदासा* प्रियो रे । विठ्ठल देवो आळविती रे ।।३।।**

विठ्ठल देवास वृंदावनातील जन आनंदाने आळवितात (१). त्यानेच या गोपाळांची रचना केली की ज्यावर गोपाळ कवित्व रचून त्या विठ्ठल देवाला आळवितात (२). निवृत्तिदास श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे प्रिय स्थान जो विठ्ठल त्याला आळवितात(३).

**(९४)**

**काळिये रात्रीचा चंद्रमा कीं सावळी बुंथी आम्हा । काळिये वेळी ते सीमा नवलावो । सुनीळ काळिये भरू मेघःशाम सावरू । तोचि नवलाहो हा धीरू रया ।।१।। आता काळिये दिनु मज न स्मरे हो काही । तुझे तुज पाही गाऱ्हाणे रया ।।ध्रु।। म्हणोनि यमुना कालिंदी जळ सावळे । योगिया शून्यातीत तटी मिळे । सुखिया सुखाचेनि कल्लोळे । देखतसे ।।२।। दिठी सावळ भरू खुंतलासे मज । नाठवे द्वैत काज रया ।।३।। येणे सुखे चैतन्य डोळ्या हो का मिळणी । की नेत्री नेत्र उन्मळणी तटस्थपणे । हा सर्वांग अंग प्रत्यांग होउनिया जेथ । विचारती मुनिजनांची मने । तो हा *रखुमादेविवरु* पाहता दिठी आता पुनरपि नाही येणे रया ।।४।।**

काळ्या रात्रीचा चंद्र जो अंधारातील उजेड आहे असा सावाळे रूप घेणारा परमात्मा की जेथे काळेपणाची सीमाच झाली असे ज्याचे मोठे नवल आहे. दृश्यादृश्यातीत शून्यावस्थेत या स्वरूपाची प्रचिती संतानी घेतली. या काळेपणाची जेथे पराकाष्ठा तेथेच शाम सुनीळ मनोहर रूप दिसते. ते एक नवल आहे, ज्या योगाने जीवाला कोणत्याही प्रसंगी धीर येतो (१). आयुष्यातील काळेपणाचे अनुभूतीचा शून्याचे प्रचितीचा हा जो दिवस आहे. म्हणजे 'दिनू चंद्र जाये' ही जी अवस्था- की जेथे नाड्यांची आलटापालट होऊन व्यवहार संपून परमार्थच निखळ सुरू होतो- तेथे आपण कोण आहोत, काय आहोत, कसे आहोत व कुठे आहोत याचा पत्ताच असत



नाही. हे देवा तुझे गाऱ्हाणे तुलाच सांगतो (ध्रु). म्हणून यमनियमादि वृत्ति शून्य कालवृत्तीचे कालिंदीजळ ज्यात आयुष्याचा ग्रासच होऊन जातो त्यावर परमात्म्याची प्रभा पसरल्याने तेही सावळेच झाले आहे. योग्यांना शून्यातीत अवस्थेत दिक्, काल आणि आकाश याचे परते शब्दाचा ग्रास होऊन शून्यापलीकडे या कालगती कालिंदीचा व त्यात प्रतीत होणाऱ्या या सावळ्या मूर्तीचा साक्षात्कार होतो. आणि या ठिकाणी उठणाऱ्या सुखांच्या लाटांनीच तो चित् सुखाला पहात असतो (२). जीवनाचा भर खुंटला, कालगतीचाही निरोध झाला, त्या दिठी हा सावळा भरून राहिला जेथे द्वैताचे कारणही उरणेचे कारण राहिले नाही. द्वैत निःशेष मावळले (३). या सुखाने डोळ्यांना चैतन्याची मिळणी झाली. तेथे ते चैतन्य चमकून प्रतीत होऊ लागले. तेथे तटस्थ झाल्याने नेत्रातील नेत्र उन्मीलित झाला.ज्या ठिकाणी हाच अंग प्रत्यंग फार काय सर्वांग झाला. मुनिजनांची मने ज्या योगे विचरतात, तो हा रखुमादेविवर मुळाशीच पाहता, पुनः आता येणेच राहिले नाही (४).

**(९५)**

**भोवरी सांडुनि पाव ठेविरे गोपाळा । नाच चिदानंद सुख होईल सकळा ।।१।। रंगु रंगलारे रंगु रंगलारे । आदि मध्य अंत त्रिगुण विरहित विश्वी प्रकाशला रे ।।ध्रु।। रंगु रंगला सुरंग जाला । पहिलिये रंगी निवृत्ति भला ।।२।। सुखी सुख मुरे प्रेमे चिदानंद उरे । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु रे ।।३।।**

परिभ्रमण सांडून, देवा, तू पाय ठेवून नाच म्हणजे हे चिदानंदा आम्हाला सुख होईल (१). आदिमध्यांत त्रिगुणा वेगळा, विश्वात प्रकाशमान असणारा रंगच येथे रंगला आहे . रंग जो रंगला तो सुराचे अंगाने युक्त होऊन सुरंगच झाला. वृत्ति निवृत्ति होऊन निवृत्तीचा लाभ झाला हाच पहिला रंग चांगलाच आहे. आमचे जीवनाचे परिभ्रमण तू पाय ठेवलास की थांबले मग तेथे प्रवृत्ती काय राहील? (२). प्रेमात सुखामध्ये जो सुख मुरले तो चिदानंद बापरखुमादेविवर विठ्ठलच उरला (३).

**(९६)**

**तुझिये निढळी कोटी चंद्र प्रकाशे । कमलनयन हास्य वदन हासे ।।१।।**

**हालकारे कृष्णा डोल का रे । घडिये घडिये घडिये गुज बोल का रे ।।ध्रु।।**
**उभा राहोनिया कैसा हालवितो बाहो । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु नाहो ।।२।।**

तुझे मस्तकी कोटी चंद्र प्रकाशमान असून तुझे डोळे कमळासारखे विशाल असून तुझे हास्य वदन हसरेच आहे की जे पाहून आम्हाला संतोष होतो (१). असा तू श्रीकृष्ण आहेस. कृष्णा तू हाल आणि डोल पाहू आणि तेवढ्याने आमचे समाधान होणारे नाही. घडी घडी घडी तुझ्या अंतरात जे काही गौप्य आहे ते बोलून दाखव (ध्रु). तो कृष्ण उभा राहून जो बाहू हालवू लागला तोच बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठायी त्याला पाहता पाहता पाहणारा 'नाही' असा झाला, तो उरलाच नाही (२).

**(९७)**

**कोवळे ठुसठुशीत मोतियांचे घड । श्रृंगारिले गूढ जया लेणी ।।१।।**
**बैसोनिया रथी सुर नर खेळती । देखोनिया पशुपती वेडावले ।।ध्रु।।**
**युक्ती खुंटली वासना निमाली । कळा पै बैसली पद्मासनी ।।२।।**
**होय की नव्हे *ज्ञानदेवे* पुसती । आठविता निवृत्ति भेटी होये ।।३।।**

ज्या गूढ अशा परमात्म्याला कोवळ्या ठुसठुशीत मुक्त स्वरूप मोतियांचे घडाने घोसांनी श्रृंगारले आहे (१). तो रथात बसला असून ज्याचे बरोबर सुर, नर तादात्म्य होऊन रममाण झाले की जे दृश्य पाहून भगवान शंकरांना वेडच लागले (ध्रु). येथे युक्तीच खुंटली असून वासना नाहीशी झाली, तो जीवनाची कळा पद्मासनावर आरूढ झाली. जीवनाची बैठक साधली (२). हे होय की नाही असे विचारताच आठव स्थितीत जो नाठव आटला तो स्मरणाकारतेने श्रीज्ञानेश्वरमहाराजांना श्रीनिवृत्तींची भेट झाली (३).

**(९८)**

**पावया छंदे तल्लीन गोविंदे । नाचती आनंदे गोपाळ कैसे ।।१।।**
**यमुनेच्या तीरी गाई चारी हरी । गोपाळ गजरी आनंदले ।।ध्रु।।**
**ठायी ठायी मातु पेंधा पै जाततु । वाकुल्या दावितु हरी छंदे ।।२।।**



**ठायी ठाती उभ्या विसरल्या माया । हाकितु लवलाह्या कृष्णहरी ।।३।।**
**ज्ञानदेवा जीवी *कृष्ण चिरंजीवी* । गोपाळ रंजवी प्रेम भक्ता ।।४।।**

श्रीगोविंदाचे पाव्याच्या छंदाने तल्लीन झालेले गोपाळ कसे आनंदाने नाचत होते (१). यमुनेच्या तीरावर हरी गाई चारीत असून हरिनामाचे गजरात गोपाळ आनंदून गेले (ध्रु). ठिकठिकाणी पेंद्या हरिछंदानी नाचत तोंडे वेडीवाकडी करून दाखवीत होता (२). ठिकाणीच माया विसरून उभ्या राहिलेल्या गाई कृष्णहरी परमात्मा लगेच हाकत होता (३). गोपाळांना रंजविणारा व भक्तावर प्रेम करणारा श्रीकृष्ण ज्ञानेश्वरमहाराज यांचे जीवनात चिरंजीव होऊन राहिला (४).

## ❊ पाळणा ❊

**(९९)**

**आकारेविण पाळणा पहुडले । निराकार म्हणोनि वोसणाइले ।।१।।**
**जो जो जो जो बाळा निराकार पाळणा । व्योमी व्योमीकारी झोप घेई ।।२।।**
**चौदा निःशब्दी जागृत केले । येकविसी हलवुनी बाळ उठविले ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* निजी निजविले । काही नव्हे ऐसे कांही ना केले ।।४।।**

निराकार म्हणून जे वोस झाले तिकडे कोणाचे लक्ष नाही असे ते आकाराशिवाय. जो पाळणा आहे; अशा त्या लहरी लहरीतून आकाशाशिवाय बालक पहुडले, झोपी गेले (१). मी तुला झोका देत आहे. या निराकार पाळण्यात, हे बालरूपा-तू या आकाशात जे आकाश आहे ज्याला चिदाकाश म्हणतात-तेथे तू झोप घे (२). चौदा लोक आणि एकवीस स्वर्ग यात ज्याची व्याप्ती आहे असा तो त्या बाळाला उठविल्याबरोबर चौदा निःशब्द झाले व एकवीस हलले. दृश्य लुप्त झाले. याचे उलट तो झोपला की चौदा व एकवीस निःशब्द असलेले जागृतीत येतात व त्यांचा शब्दमय व्यवहार सुरू होतो (३). कांही नव्हे असे म्हणजे ज्याला कांही आहे आहे म्हणता हातातून जे निसटून जाते व कांही नाही असे होते असे जे नव्हे असे जे बापरखुमादेविवर परमात्मरूप ते आपले निजत्वात अस्तिरूपात निजतेला आले अस्तिभावाला आले त्याने काहीना उरले नाही असेच केले (४).

**(१००)**

**पाळण्याची परी सांगेन आता । पाळण्या तान्हुले बोथाते देहेविण ताता ।।१।।**
**तेथे जनकु नव्हे जननी नव्हे । बालक नवे होय माझे विण ।।ध्रु।।**
**तेथे तेल सारूनी अभ्यंग केले । बाल पुसिले अंबर वणे ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* अनुभविण जाले । ते निजरूपा पाविले परब्रह्मी ।।३।।**

पाळण्यात असणारे बालरूप देहाशिवायच आपल्या ठिकाणी उच्चार करीत आहे असा हा पाळण्याचा प्रकार आहे तो आता सांगेन (१). तेथे जनक नाही, जननी नाही. बालक हे नित्य नवीन आहे पण त्याला मांस नाही. ते मांसेविणच आहे. त्याच्यामुळे मांस व मांसाला किंमत. मांसामुळे ते नाही. अगर मांसावेत्याची किंमत होत नाही. ते स्वयंसिद्धच आहे (ध्रु). दृश्याचे आकर्षण बाजूला ठेवून तेथे आत्मजीवनानेच अभ्यंग स्नान केले आणि आकाशाचे वस्त्रानेच ते बालक पुसले (२). बापरखुमादेविवर परमात्म्याचा जो त्याने अनुभव घेतला तो ते निजरूप परब्रह्मीच प्राप्त झाले (३).

**(१०१)**

**अठरा दिगांतिहुनि पाळणा आणिला । तेथे एक निर्गुण बाळ पहुडला ।।१।।**
**बाळापे हे नाही बाळापे हे नाही । अंगुष्ठ घेऊनि घेई निरालंब ।।ध्रु।।**
**निरालंबी स्वाद आळवी ब्रह्मी । तेथे एकू बाळ बोथाये निरंजनी ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* अनादि अंती । त्याहुनी परती मज गती केली ।।३।।**

अठरा पुराणानी दिशांचा अंत जेथे होतो, त्या दिगंतिहून पाळणा आणला. तेथे अद्वितीय एक जो निर्गुण बालरूप परमात्मा तो पहुडला (१). त्या बाळाला हे काही नाही. प्राण गुप्त रूपाने जेथे स्थित आहे असे अंगुष्ठ चोखून, त्यातील जीवनाचा रस घेऊन प्राणापान ऊर्ध्वगामी होतात त्या निरालंबाचाच ज्याने अवलंब केला (ध्रु). निरालंबाचे ठिकाणी जो स्वाद आहे त्याने ब्रह्माला आळवून एक बालक निरंजनात बोभाटा करीत आहे (२). अनाद्यनंत बापरखुमादेविवर परमात्म्याने तेथूनही परते करून मला गतिरूप करून ठेविले (३).



**(१०२)**

**पाच पाट्या नव खिडकिया । पाळणा पहुडया निरंजनी ।।१।।**
**एकवीस सहस्र श्वास हुंकार घाली । माया ते मारिली ज्ञानरूपी ।।२।।**
**तेथे निरंजन नाही काहीच नाही । तेथे निःशब्द उठती पाही ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* बालका घेऊनि मेला । मरोनिया जाला जिवपणे गे माये ।।४।।**

पंच महाभूताच्या पाच पाट्या व नवद्वारे या खिडक्या ज्याला आहेत अशा इमारतीत निरंजनाचे ठिकाणी विराजमान होणेकरता एक पाळणा आहे (१). एकवीस हजार श्वासातून हुंकार घालणारी माया ज्ञानावस्थेत उरलीच नाही (२). जेथे निरंजनही नाही आणि कांहीच नाही तेथे निःशब्दच उठत आहेत हे प्रतीत झाले (३). बापरखुमादेविवर परमात्मा हा जीवभावासह जेथे उरला नाही. रागलोभात्मक जिवंतपणाची ओवरी ग्रासून चैतन्याचा पूर्ण विकास होऊन जिवंतपणाने जेथे जीवनच जगले. जीवात्मा, शिवात्मा आणि परमात्मा हा भेद राहिला नाही (४).

**(१०३)**

**शून्य नाही निरशून्य नाही । तेथे पाळणा पाही लावियेला ।।१।।**
**जातीवीण बाळ उपजले पाही । तेथे परिये देते माय तेही नाही ।।ध्रु।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठली पाळणा नाही । तेथे मी बाळ पाही पहुडलो ।।२।।**

शून्य आणि निरशून्य जेथे नाही तेथे पाळणा लाविला (१). जातीवीण ज्या बाळाचा येथे जन्म झाला ती परिहार देणारी मायाही तेथे राहिली नाही (ध्रु). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी पाळणा नाहीच, तेथेच मी बालक पहुडलो आणि विश्रांती घेतली (२).

## ✻ घोंगडी ✻

**(१०४)**

**आठविता नुपुरे मोविता न मोववे । सांगता न सांगवे गुण त्याचे ।।१।।**
**परतलिया दृष्टी काळा देखिला जगजेठी । वेणी भागी पृष्ठी कैसा दिसुते असे**

**।।ध्रु।। त्या गुणाच्या संगे कैसे अद्‌वैत जाले । मन म्हणौनि काळेपण बहु झाले गे माये ।।२।। पुरे पुरे बुद्‌धी निमाली वेदवाणी । आता केवी वर्णू चक्रपाणी बहू काळे गे माये ।।३।। द्‌वादश मंडळ वोवाळुनि आलिये । तंव तंव काळे देखिले रूपडे त्याचे ।।४।। अनुमाना न ये अनुमाना न ये । परतल्या श्रृति चोजवेना ।।५।। मने बुडी दिधली दाही हारपली । चोविस मावळली अगाध पंथी ।।६।। प्रीतीचे पांघरूण काळे घोंगडे । *रखुमादेविव*रे विठ्ठले मज केले उघडे ।।७।।**

ज्याचे पायातील नुपुरांची नुसती आठवण झाली तर ती मोजावी म्हटली तर मोजता येणार नाहीत. त्याचे मोजमाप होणार नाही व त्याचे गुण सांगावे तर ते सांगता येणार नाहीत (१). दृष्टी परतल्याबरोबर काळा जगजेठी पाहिला. वेणी ग्रामाचे पृष्ठभागी तर तो कसा दिसत असे नाही? (ध्रु). त्याचे गुणाचे संगतीत मन हे कसे अद्‌वैत झाले म्हणून याचे काळेपणच अनंत विश्वरूपाने नटले आहे हेच खरे (२). पुरे पुरे होऊन जे पुरे पुरे असे स्वरूप आहे की जेथे अपुरे असे कांहीच नाही त्याचे पुरे पुरे वर्णन करताना वेदवाणीची बुद्‌धी कुंठित झाली. असा चक्रपाणी ज्याचे रूप फारच काळे आहे त्याचे वर्णन मी आता बहु कालानंतर कसे करू? (३). द्‌वादशादित्य मंडळाने त्याची आरती केली. तो तो त्याचे रूपडे काळेच पाहिले (४). श्रुति वर्णन करता करता परतल्या; त्यांची धाव पुढे जाईना, त्यांना ज्याचा पत्ता लागेना; तो अनुमानाने जाणता येत नाही त्याचे अनुमान होतच नाही (५). त्याचे अगाध पंथाचे आक्रमण करता जेथे मनाने बुडी दिली, दशेंद्रिये विलीन झाली, महत्‌ तत्त्व, पंचप्राण, पंच उपप्राण, तीन गुण व ॐकाराच्या पंच मातृका अशी चोवीस तत्त्वे मावळली (६). प्रीतीचे पांघरूण असे हे काळे घोंगडे असून हे रूप ज्याने धारण केले अशा रखुमादेविवर विठ्ठलाने मला मात्र उघडे केले. मला उघडे केले तेव्हाच मला त्याचे दर्शन झाले. चत्वार देहाचे निरसनानेच निरुपाधि शामवर्ण परमात्म्याची प्रचीती येती (७).

**(१०५)**

**रात्री दिवस वाहतसे चिंता । केशव धडौता होईन मी ।।१।।**



**खिरजट घोंगडे फाटके ते कैसे । वेचिले तैसे भोगी जगा ।।ध्रु।।**
**वित्त नाही गाठी जीवित्वा आटी । उघडी पाठी हीनवाणे ।।३।।**
**घोंगडे देईल तो एक दाता । *रखुमादेविवरा* मागो रे आता ।।३।।**

मी धड केंव्हा होईन? माझे जीवनास धडपणा केंव्हा येईल? केशव जो धड आहे तोच मी होईन ही एकच चिंता रात्रंदिवस माझे मनाला वाटत आहे (१). असंख्य रंध्रांनी युक्त असे खिसलेले व नऊ इंद्रिनांनी फाटलेले फाटके घोंगडे जसे कांही खर्ची पडले तसे जगाला भोगावयास लावते (ध्रु). साधन संपत्ती गाठी नाही. जीवनाची आटाटी मात्र चालू आहे. जिवंत कसे रहावे? हाच खरा प्रश्न आहे. उघडी पाठी सुषुम्नामार्गे हुडहुडी भरून त्रिविध तापाने जीव तप्त झाला आहे. थंडी तर सारखी वाजतीच आहे. त्याच्या यातनाच मोठ्या आहेत (२). घोंगडे देईल आणि आमचे हे हीव घालवून त्रिविध तापातून मुक्त करील असा तो एकच दाता आहे त्या रखुमादेविवर श्रीपांडुरंगालाच आपण आता ते मागू म्हणजे झाले (३).

**(१०६)**

**तुझे घोंगडे एकचि चोख । दुजे वोळख अमंगळ ।।१।।**
**दे धडुत न घोंगडे मोठे । खिरपटे जळो देवा ।।२।।**
***रखुमादेविव*रु उदार झाला । धडौता केला ज्ञानदेवो ।।३।।**

तुझे घोंगडेच एक चोख असून दुजेपणाची ओळख ज्याने होते ते असे मात्र अमंगळ आहे (१). मला फार मोठे घोंगडे पाहिजे असे नाही, त्यातील एक धडका तुकडा दे म्हणजे झाले काय असेल ते धड असू दे, यापेक्षा हे जे खिरपटलेले घोंगडे आहे हे जळणारेच आहे, पण त्याला देहभावाला आताच आग लागो (२). रखुमादेविवर परमात्मा उदार झाला आणि त्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना धडुत देऊन धडौता केला. जीवन हे त्यांचे धड झाले. परिपूर्ण झाले (३).

**(१०७)**

**चौऱ्यांशी लक्ष हिंडता हाट । पुंजे दाट सापडले ।।१।।**
**हित ये खेपेसी बरवे जाले । सुरंग घोंगडे हाताशी आले ।।ध्रु।।**

**येणे पाडे न माये कोठे घोंगडे मोठे सापडले ॥२॥**
**मनोरथ पुरले रे आता । बापरखुमादेविवरा विठ्ठलाशी ध्याता ॥३॥**

चौऱ्यांशी लक्ष योनीतून हा बाजार हिंडता हिंडता दाट असे तेजाचे पुंजच सापडले (१). या नरदेहात चांगले हित झाले. सुर हेच ज्याचे अंग आहे असे सुरंग व रंगाने ही सुरंग असे परमात्म्याचे घोंगडेच हातासी आले (ध्रु). मोठेच घोंगडे व मोठ्याचे घोंगडे सापडले, हा आनंद यामुळे कोठेच मावणार नाही (२). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ध्यानावस्थेत आता मनोरथ पूर्णच झाले. (३)

**(१०८)**

**माझीया घोंगडियावरी ब्रह्माचा गोंडा । बाहिरा सांडा बैसावया ॥१॥**
**घोंगडे संतचरणी रूळे । श्रीरंगी रंगले व्योमाकार ॥ध्रु॥**
***रखुमादेविवरे* विठ्ठले दिधले । अमोलिक जाले मोलेवीण ॥२॥**

माझे जे काही सत्तेचे आहे ज्यावर कोणाचीही सत्ता नाही व जे कोणी हिरावून घेऊ शकणार नाही असे जे घोंगडे त्या माझ्या घोंगड्यावर ब्रह्माचा गोंडा आहे. आता बाहेर बसावे, बसावयाचे तर, आतल्या आत आता बाहेरचे बसणे सांडले (१). हे घोंगडे संतचरणी रुळत असून व्योमाकार श्रीरंग परमात्म्याचे ठिकाणीच रंगले आहे का त्याचाच म्हणजे परमात्म्याचाच रंग याला आहे (ध्रु). मोलाशिवाय रखुमादेविवर विठ्ठलाने जे दिले ते अमोलिकच झाले (२).

**(१०९)**

**घोंगडी घेवोनी हाटासी जाये । पंढरीये आहे वसती आम्हा ॥१॥**
**घोंगडीयाचे मोल पै जाले । चरणी राहिले विठ्ठलाचे ॥ध्रु॥**
**घोंगडे एक बैसले थडी ।उभया गोडी विठ्ठलाची ॥२॥**
***ज्ञानदेव* म्हणे अनुभवी तो जाणे । शहाणे ये खुणे संतोषले ॥३॥**

घोंगडी घेऊन आम्ही बाजारास जातो पण आमची वसती पंढरीत आहे (१). विठ्ठलाचे चरणी राहिल्याने या घोंगड्याचे चीज झाले (ध्रु). एक शरीररूपी घोंगडे तीरावरच बसले आहे पण त्यास उभयपक्षी अंतर्बाह्य विठ्ठलाचीच गोडी आहे (२). जो



अनुभवी आहे तोच हे जाणतो. या खुणेने शहाण्यानाही संतोषच झाला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(११०)**

**काळे ना सावळे धवळे ना पिवळे । घोंगडे निराळे लाधलो मी ॥१॥**
**मागील रंगटे सांडिले आता । पंढरीनाथा चरणा जवळी ॥ध्रु॥**
**नवे नवधड हाता आले । दृष्टी पाहे तव मन हारपले ॥२॥**
**सहस्र फुलीवरी गोंडा थोरू । धडु ते दानी *रखुमादेविवरु* ॥३॥**

काळे सावळे, पांढरे अगर पिवळे यापेक्षा निराळेच घोंगडे मला मिळाले (१). श्रीपंढरीनाथाचे चरणाजवळ देहभावाचे मागील रट्टे आता सांडले आहे (ध्रु). जे नवे आहे आणि नऊ ठिकाणी फाटके नसून तेथे निरोधन असल्याने नवथड आहे तेच माझ्या हाताला आले व डोळ्याने पहावे म्हणतो तो मनच तेथे हारपून गेले (२). सहस्रदळावर या घोंगड्याचा श्रेष्ठ गोंडा असून असे हे धडुते-जीवनाचे धडपड-देणारा एक रखुमादेविवर परमात्माच दाता आहे (३).

**(१११)**

**निरालंब घोंगडे अद्वैत पेठे । तेथे एक भेटे रूपेवीण ॥१॥**
**हिरोनि घेतले हिरोनि घेतले । मज पै दिधले दोषेविण ॥२॥**
***रखुमादेविवरे* कामाण केले । अपकारेविण उघडे नागविले ॥३॥**

अद्‌वैताचे पैठेत प्राणापानापैल निरालंब घोंगडे असून तेथे अद्‌वितीय असे एक रूपाशिवाय प्रतीत होते (१). देहाहंभावाचे माझे घोंगडे हिरावून मला निर्दोष घोंगडे दिले (२). रखुमादेविवर परमात्म्याने मला कामातुर केले. माझ्या ठिकाणी आत्मदर्शनाची इच्छा निर्माण केली आणि निरूपाधिकतेने मलाही निरूपाधिक केले. येथे अपकार घडला नाही पण त्या दर्शनाने त्याचे सन्निध गेल्याने उपकारच झाला (३).

**(११२)**

**अद्‌वैत पेठेहुनी घोंगडे आणिले । अमोलिक घेतले पंढरीये ॥१॥**
**चौहातांची भरणी आली । तिये चराचरी ऐसे नाही ॥२॥**

**रखुमादेविवरु विठ्ठली नीट । पांघुरविले वैकुंठ मन देखा ।।३।।**

अद्वैत पेठेतून आणलेले घोंगडे मोलावाचून अमोलिक असे पंढरपूरात घेतले(१). साडेतीन हात देहाचेवर चार हात पुरेल असे या चराचरात सापडणार नाही(२). चौहाताचे प्रक्रियात्मक साधनकृतीचे भरणीने रखुमादेवीवर विठ्ठलाने वय जेथे कुंठित होते असे नीट वैकुंठाचे पांघरूण मला पांघरविले(३).

**(११३)**

**माझेच वाळे रंगाचे बहुते । श्रीगुरु निवृत्तिनाथे दिधले गे माये ।।१।।**
**चवाळे शुध्द चहू पालवे । व्योमाकारे वेद प्रसिध्द पांघुरवी ।।२।।**
**आता पराहुनि परमेगुणे। *बापरखुमाईवरा* विठ्ठला अंगीचे ।।३।।**

माझे चार रंगाची घोंगडी श्रीगुरुनिवृत्तिनाथांनी मला दिली (१). ही चार घोंगडी शुद्‌ध चैतन्याचे पालवीनी चहु बाजूनी युक्त असून चिदाकाशी असणाऱ्या आकाराने वेदप्रसिद्‌ध चैतन्य पांघरवीत आहे. चत्वार देहाचे निरसनाने ही येणारी प्रतीती आहे (२). बापरखुमाईवर विठ्ठलाचे अंगीचे हे पांघरुण श्रेष्ठाहून श्रेष्ठ असे मोठे आवडीचे आहे (३).

**(११४)**

**निरंजना गाई चारू गेलो । तंव चवाळे तेथे एक पावलो ।।१।।**
**मज निर्गुणे आडवारिले । चवाळे हिरोनी जिणे बुडविले ।।२।।**
***बापरखुमादेविवरे* इतुके केले । माझे चवाळे हिरोनी नेले गे माये ।।३।।**

निरंजनातून गोनाम इंद्रियवृत्ति यांना चारापाणी द्यावे म्हणून आकाशाचे पाणवठ्यावर गेलो. तेथे एक चार देहाची खोळ प्राप्त झाली (१). मला आड येऊन निर्गुणाने तेथे माझे निवारण केले. चार रंगाची चार देहाची खोळ हिरावून घेऊन माझे आयुष्यच लुप्त केले (२). हे माझे चवाळे बापरखुमादेविवर परमात्म्याने हिरावून नेले, इतके केले, आणि काय सांगावे? (३).

**(११५)**

**ब्रह्माचा गोंडा चहु पालवा । मन पांघुरे उमप भावा ।।१।।**
**चौहाताहोनि आगळे । द्विकरांहूनि वेगळे गे माये ।।२।।**



***बापरखुमादेविवरे* सुभटे । भज चवाळे दिधले गोमटे गे माये ।।३।।**

चार पदरी ब्रह्माचा गोंडा उमाप भावाने मन पांघरत आहे (१). चार देहापेक्षा जे आगळे असून जीवनाचे दोन गतीपेक्षा जे वेगळे आहे (२). बापरखुमादेविवर परमात्म्याने उपाधिभूत जीवनात्मक चार देहांचे एकसूत्री शुद्‌ध घोंगडे मला दिले. (३)

**(११६)**

**चवाळ्याची सांगेन मातू । चवाळे पांघुरे पंढरी नाथू ।।१।।**
**गोधने चारिता हरि पांघुरला । मज चवाळ्याचा त्यागू पै दिधला ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* श्रीगुरूराणा । चवाळे पांघरवी निरंजना गे माये ।।३।।**

चार देहाचे जे जीवनसूत्र आहे त्याची गोष्ट सांगतो की हे चवाळे श्रीपंढरीनाथानेच पांघरले आहे (१). गोनाम इंद्रियवृत्ति दृश्य विषयांचा चारा ज्याचेमुळे चरतात तो चारा परमात्मा या गाईंना देत असता, हरीने जीवनसूत्र चवाळ्याचे पांघरूण घेतले. मला मात्र चत्वार देहाची खोळ जे चवाळे त्याचा त्याग करावयास लाविला. माझे वाटणीला त्याग आला (२). बापरखुमादेविवर श्रीगुरुराजांनी हे चवाळे त्या निरंजन स्वरूपालाच पांघरविले, यामुळेच निरंजन म्हणजे काय? हा प्रश्न उपस्थित होऊन राहिला. चवाळे पांघरले याचा अर्थच या पांघरुणापेक्षा जो वेगळा आहे आणि हे ज्यांचे पांघरूण ज्याचे अधिष्ठानावरच निर्माण झाले आणि त्याने तो आच्छादिला यावरूनच त्याची ओळख करून घ्यावयाची आहे. देवापेक्षा देवाची आरासच मोठी झाली की चटकन देव दृष्टीत भरत नाही पण आरास कशा करता हे प्रश्नचिन्ह उभे राहिले की त्याची ओळख होते तसेच हे आहे (३).

**(११७)**

**निर्गुण चवाळे आणिले । बाप निवृत्तिने मज पांघुरविले ।।१।।**
**चौघे चारी पदर म्हणितले । पांघरूण झाले सारासार ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठले । माझे चोरूनि जिणे उघडे केले गे माये ।।३।।**

जीवनाची चतुःसुत्री एकसूत्र होऊन शुद्‌ध बुद्‌धतेने जे निर्गुणाचे अनुभूतीस आली ते निर्गुण चवाळे शून्य, अशून्य, महाशून्य व निरशून्य स्वरूप आणले व बाप

निवृत्तिनाथांनी मला पांघरविले (१). त्यातूनच चार देह, चार पदर असे ज्यास म्हटले हे सर्व मिळून सारासार पांघरूण झाले (२). या दोनी चवाळ्यांचा दुवा जे आपले उपाधिभूत जीवन म्हणजेच जिणे हे माझे जिवंतपण चोरून रखुमादेविवर विठ्ठलाने मला निरुपाधि केले आणि या चवाळ्याचे आत मला आपल्या स्वरूपात मिळवून घेतले (३).

(११८)

**तू माझा स्वामी मी तुझा रंक । पाहता न दिसे वेगळिक ।।१।।**
**मी तू पण जाऊ दे दुरी । एकचि घोंगडे पांघरू हरी ।।२।।**
***रखुमादेविवरा* विठ्ठल राया । लागेन मी पाया वेळोवेळा ।।३।।**

तू माझा स्वामी असून मी एक गरीब पण तुझा आहे. यामुळे विचार करता त्यात वेगळेपणा नाहीच (१). याकरता माझे म्हणणे इतकेच की मीतूपणा हा दूर घालवून आपण दोघे मिळून एकत्वाचेच घोंगडे पांघरू (२). असे झाले तर बापरखुमादेविवर विठ्ठलराज मी आपल्या पाया वेळोवेळा मस्तक ठेवीन (३).

(११९)

**जायाची घोंगडी नव्हती निज । म्हणउनी तुज विनवीतसे ।।१।।**
**एक पाहता दुसरे गेले । तिसरे झाले नेणो काय ।।२।।**
**चौथे घोंगडे तेही नाही । *रखुमादेविवरा* विठ्ठला पायी ।।३।।**

जाणारी घोंगडी आपली नव्हतीच म्हणून तुझी विनंती करतो (१). तुला पाहता पहिले दुसरे स्थूल सूक्ष्माचे घोंगडे गेले. तिसऱ्या कारणाचे काय झाले याचाही पत्ता नाही. सर्वच विसर पडला (२). फार काय रखुमादेविवर विठ्ठलाचे पायी चौथे महाकारणाचे घोंगडेही शिलकीला राहिले नाही. चारी देहांचा निरास झाला (३).

## ❇ पाईक ❇

(१२०)

**जालेनि पाईक गोसावीपण जिंके । परी स्वामिया सेवक साचा होय ।।१।।**
**एक एकेविण स्वामी सेवकपण । मिरविती हे खूण स्वामी जाणे ।।२।।**
**पाईक काय स्वामी स्वामिया काय पाईक । असता एके एक दोनी नव्हती ।।३।।**



**स्वामीचे काज पाईकपणे वोज । करिता होय चोज पै गा ।।४।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलासी वोळगता । पाईका स्वामी असता निवृत्ति ऐसा ।।५।।**

पायाची सेवा करणारा पाईक झाल्याने तो गोसावीपणालाहि जिंकतो. या प्रकाराने तो स्वामीचा खराखुरा सेवक होतो (१). एकाविण एक असे हे स्वामीसेवकपण असून ते दोघेही भूषणास्पद होतात. हे वर्म स्वामी जाणतो (२). पाईक काय स्वामी होतो व स्वामी काय पाईक होतो? नाही ते एकामुळे एक असतात. तेथे स्वतंत्र अस्तित्व दोघांनाही नाही. दोघेही ते एकामुळे एक असल्याने या सापेक्षतेचा विचार करता ते दोनी नव्हती हेच खरे (३). स्वामीचे काम पाईकपणे करताच त्याचे कौतुक होते (४). निवृत्तीसारखा स्वामी पाईकाला लाभल्याने बापरखुमादेविवर विठ्ठलाची प्राप्ती झाली असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (५).

(१२१)

**एकुची एकला जाला पै दुसरा । एकीमेकी सुंदरा खेळविती ।।१।।माझिया कडिये तान्हा तुझिये कडिये कान्हा । देवकी यशोदा विस्मो करिती मना ।।२।। *बापरखुमादेविवरु* आवडे मना । जगत्र जीवनु कान्हा बाईयानो ।।३।।**

एकच एकटा असणारा परमात्माच दुसरा झाला त्याला एकमेकी सुंदर स्त्रिया खेळवीत होत्या (१). माझ्या कडेवर तान्हा आहे तर तुझ्या कडेवर कान्हा आहे असे म्हणत. दोनीकडे एकच रूपाची प्रचिती असल्याने मनातल्या मनात देवकी व यशोदा आश्चर्यचकित होत होत्या (२). त्रैलोक्याचे जीवन बापरखुमादेविवर जो कान्हा (आहे) तोच मनाला आवडतो (३).

(१२२)

**पाईका मोल नाही देसील ते काई । पाईक न मागे काही भोग्य जात ।।१।।**
**देसील ते काई न देसील ते काई । पाईक न मागे काही तुज वाचोनी ।।२।।**
***बापरखुमादेविवर* विठ्ठलाच्या पायी । पाईका मोल नाही तैसे जाले ।।३।।**

पाईक-जो पायाची सेवा करणारा तो - काय मोलाने सेवा करीत नाही; मग तू त्याला काय देशील? भोगावयाच्या वस्तू तर पाईक कांहीच मागत नाही (१). तू

देणार काय? आणि न देणार काय? पाईक तर तुझ्याशिवाय दुसऱ्या कशाचीही अपेक्षा करीत नाही (२). मोलाने सेवा न करणारा हा पाईक, त्याला मोल नाही असे झाल्याने रखुमादेविवर विठ्ठलाचे चरणी तो पाईकही अमोलच ठरला; त्याचे मोलच करता येणार नाही असे झाले (३).

**(१२३)**

**आणिक पाईक मोलाचे तुझे । तैसे नव्हे माझे पाईकपण ।।१।।**
**न मगे बही मोल जीवन भाते । ते धावे माते पाईकपण ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* गोसाविया । पाईकपणे मिया जोडलेती ।।३।।**

तुझे दुसरे जे पाईक आहेत ते मोलाचे आहेत; कांही लोभाने पाईकपण करणारे आहेत, पण तसे माझे नाही (१). बाहेरचा पैसा, पाणी, अन्न काही मागत नाही. आणि हे मागणेची इच्छाच होऊ नये असे ते पाईकपण मला आपण द्यावे (२) अशा या पाईकपणाने मला बापरखुमादेविवर गोसावी याची प्राप्ती झाली (३).

**(१२४)**

**देह दंडुनी पाईक अनुसरला जीवे । तव स्वामीयाचे गूज हातासी आले ।।१।।**
**पाईकपण गेले स्वामि होऊनि ठेले । परी नाही विसरले स्वामीयाते ।।२।।**
**पाईकपणे ऐसा आठवूचि नाही । स्वामिवाचुनि काही जाणेचिना ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* विठोजी उदारू । पाईक तो साचारु स्वामी केला ।।४।।**

पायाची सेवा करणारा पाईक देहदंड सोसून जीवभावाने सेवातत्पर झाला. त्यामुळे इतका तो समरस झाल्याने स्वामीचे गौप्यच त्याचे हाती आले (१). स्वामीवर सत्ता गाजवावी इतके सामर्थ्य ज्याचे अंगी सेवेने आले तो पाईक असूनही सेवा करीत असूनही हा जो अधिकार त्याने संपादन केला यामुळे त्याचे पाईकपण गेले आणि असे असूनही तो खराखुरा पाईक असल्याने तो आपल्या मालकाला विसरला नाही (२). फार काय तो आपल्या पाईकपणालाही विसरला आणि केवळ सेवारूपच तो झाल्याने स्वामीवाचून काही तो जाणेचना असे झाले (३). बापरखुमादेविवर विठोजी उदार असून पाईकाचा त्याने खरोखर स्वामी केला- भावार्थ- सेवेचे स्वामित्व-मालकी दिली (४).



**(१२५)**

**जागता निज आले असे हाता । मग पाईक म्हणविता लाज वाटे ।।ध्रु।।**
**नव्हे कोणा जोगा नाईके हाणितले । उणेपणे आले पाईकपणा ।।१।।**
**पाईक शुद्धमति स्वामिया विवेका । वेव्हारू लौकिकी चाळितु असे ।।२।।**
**निदसुरा होता तो जागसुदा जाला । स्वामिये आणिला आपणापाशी ।।३।।**
**पाईकपणे गेले सन्निधान जाले । स्वामी एका बोले निवांत ठेला ।।४।।**
**मागावे तितुके खुंटले । तेथ न मगता आपणाते जाणितले ।।५।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठला प्रसादे । पाईक परी अभेदे उरला असे ।।६।।**

जागृती निर्माण झाल्याने निजत्व हाताला आले. निजत्वाची ओळख झाल्याने सेव्यसेवकभावच उरला नाही. यामुळे पाईक म्हणविताना लाज वाटू लागली (१).निजत्वात आल्याने तो कोणा जोगा राहिला नाही. त्याला कोणी निंदेचे टोमणे मारले तरी तो स्वामीशिवाय कोणाचे ऐकणार नाही, असे झाले. स्वामींच्या मर्जीत तो इतका उतरला की पाईकपणाला उणेपणा येऊन पाईकपण नाहीसे होऊन तो स्वामित्वासच आला (२).पाईक शुद्ध बुद्धीचा असून मालक नित्यानित्यवस्तु विचार करणारा विवेकी आहे. लौकिक चालण्याचा व्यवहार तेथे निर्माण झाला की ज्यातून कांही अलौकिक प्राप्त व्हावे (३).निजत्वातून जागृतीत तो आल्याने स्वामींनी त्यास आपणापाशीच आणला. जागृतीने निजत्वापेक्षाही भूमिका श्रेष्ठ आहे (४).सेवा बुद्धीने तेथे तत्पर होताच सान्निध्य लाभले. एकत्वाचे बोलण्यात मालक निवांतच झाला (४).जे जे मागावे ते खुंटले असे झाल्याने न मागताच आपण कोण याचे पुरेपूर ज्ञान झाले. बापरखुमादेविवर विठ्ठलाचे प्रसादाने पाईकच खरा पण अभेदत्वाने उरला (५)

**❇ हमामा ❇**

**(१२६)**

**हमामा रे पोरा हमामा । घुमरी वाजे घुमामा ।।ध्रु।।घुमरीचा नाद कानी । घुमरी घालू रानी । रानी सीतळ छाया । मेली तुझी माया । मायेचे घर दुरी । तुज मज कैची उरी रे पोरा ।।१।। उरी नाही तुज । मजसी मांडिले जुंज । जुंझी अहंकार ढळे । कल्पना समूळ गळे । गळता गळता पाहिली ।**

**कान्होबा चरणी राहिली । कान्होबा पाहे दिठी । तुज मज पडली मिठी रे पोरा ।।२।। मिठी मिठी करी पाहसी । आता कोठे राहसी । रहाता ठावो येकू । फटितो तुझा लेकु । लेकू गाई राखे । बाप गोरसु चाखे । चाखता घेतली गोडी । तोचि फासा तोंडी रे पोरा ।।३।। पोरा एक माझी गोठी । राग न धरी पोटी । रागे काम नासे । अहंकारे बोचावासे । वासिले रावणाचे डोळे । भेणे द्वैत कंस पळे । पळता पळता लागला पाठी । तुज मज आता गोठी रे पोरा ।।४।। पोरा गोठी करी ऐसी । संतासी मानेल तैसी । *बापरखुमादेविवरु* ध्यासी । तरि वरल्या गावी जासी रे पोरा ।।५।।**

हा अहं सोऽहं चा खेळ आहे. याचे नाव हमामा. जीव हा अहं म्हणणारा व शिव हा सोहं असा उच्चार करणारा आहे. सोहं हा अजपाजप निसर्गसिद्ध आहे म्हणतात, तो याच करता. तेथे जीवाला नादानुसंधानात आपला अहंकार टिकविता येत नाही, अशी वस्तुस्थिती आहे. 'हमामा रे पोरा हमामा' म्हणत जो शिव आला त्या घुमण्याने घुमरी वाजू लागली. अनुहताची लकेर सुरू झाली. अहंमा, अहंमा, हमामा, अहंकार नको असे म्हणतच तो आला. अर्थात शिवाचा सोहंध्वनी तेथे अहंकार रहातोच कसा? पण ज्याचेशी तो खेळणार तेथे तर अहंशिवाय दुसरे कांही नाहीच. म्हणून तो 'हमामा रे पोरा हमामा' असे म्हणत जो धावला. तेथेच सोहं ध्वनी घुमल्याने ती लकेर म्हणजे घुमरी जी निसर्गसिद्धच आहे ती घुमू लागली. आवाज करू लागली म्हणजे वाजू लागली (ध्रु). घुमरीचा नाद कानी घेऊन ही घुमरी या दृश्यात घालू. या रानात जी परमात्म्याची शीतल अशी छाया आहे, प्रतीत होत आहे, तेथे तुझी माया ही लटकीच आहे. या मायेचे घर म्हणजे दृश्य हे खरे दूरच आहे. जवळ नाही. तेथे तू जन्माला आलास, त्या तुझी माझी बरोबरी कशी होणार रे पोरा सांग तरी (१). तुझी माझी बरोबरी नाही. या सामन्यात तू टिकणार नाहीस आणि तू माझ्याशी डोंबी देत आहेस, धडक देत आहेस. ही जी कांही जीवाशिवाची अहं सोहं रूप होणारी झुंज आहे त्यात अहंकार ढळतोच आहे. कल्पना मुळासकट गळून जावी अशी स्थिती आहे. ती गळता गळता जो पाहिली ती आकर्षण करणाऱ्या



श्रीकृष्णाचे चरणीच राहिली. कल्पनेचा निरास झाला. त्याने जो आपल्या दृष्टि (त) पाहिले तेथेच तुझी माझी मिठी पडली रे पोरा आणि आपणा दोघांचे ऐक्य झाले. कल्पना आहे का याची? (२). मिठी मिठी करू पहातोस आता कोठे राहशील? रहाणेचा ठिकाणा तर आता एकच झाला. तुझा लेक मनजी पाटील हा फसला. लेक गाई राखतो आहे (इंद्रियवृत्ती या गाई). जीवबा नामदुग्ध येत आहे. त्याची गोडी लागताच बंधनाचा फासाच तुटला रे पोरा (३). पोरा माझी एकच गोष्ट आहे याचा राग तू पोटात घेऊ नकोस. रागाने काम होत नाही. अहंकाराने तोंड वासण्याची पाळी येते. रावणाचे डोळे वासले. द्वैताचे भीतीने कंस पळाला. पळता पळता कृष्ण परमात्म्याचे पाठी लागला. तशी तुझी माझी आता गोठी आहे रे पोरा (४). संतांना मानेल अशी तू कांही गोष्ट कर. बापरखुमादेविवर परमात्म्यास ध्याशील तर वरच्या घरी सहज जाशील रे पोरा (५).

**(१२७)**

**हमामा घाली बाळा । सांडी खोटा चाळा । फोडीन तुझा टाळा । वाकुल्या दावीन काळा ।।१।। हमामा रे पोरा हमामा रे ।।२।। हमामा घाली बारे । अंगी भरले वारे । चाखति पिकली चारे । जाऊ वरल्या द्वारे रे पोरा ।।३।। हमामा घाली नेटे । सांडी बोलणे खोटे । आता जासील कोठे । कान्होबाचे बळ मोठे रे पोरा ।।४।। हमामा घाली सोई । भांभाळी सवा दोही । एक नेमे तू राही । तेथे बहु सुख पाही रे पोरा ।।५।। हमामि याचा नादू वाजे । अनुहत कोपर गाजे । *बापरखुमादेविवरु* विठ्ठल राजे । रत्नजडित मुगुट साजे रे पोरा ।।६।।**

अरे जीवा, तू हमामा घाल. खोटा चाळा सांडून 'अहं मा' या स्थितीत ये. तुझा टाळाच फोडून काळाला मी भेडसावीन (१). हमामा रे पोरा हमामा अहंकार नको (२). तू हमामा घाल. अंगी वारे भरले असून येथे पिकलेल्या चार अवस्था याचा रसास्वाद घेत आहेत, त्या ठिकाणी अहंकाररहित तू व मी असे दोघेही आपण दशमद्वाराहून जाऊ (३). खोटे बोलणे सांडून हा हमामा तू नेटाने घाल. हमामा घातला की वारे भरलेच. मग तुला कोठेच जाता येणार नाही. असे या परमात्मस्वरूप

वाऱ्याचे कान्होबाचे बळ मोठे आहे (४). तू हमामा सोईने अभ्यासाने घातलास की तो परमात्मा आपल्या दोघानाही संभाळून घेतो. तू एक येवढ्या नेमाने रहा की तेथे सर्व सुख आहे (५). हमामाचा जो नाद आहे त्याने चारी शून्ये, चारी अवस्था, चारी देह, यांतून अनुहत गाजतो म्हणजे तो प्रतीत होतो असा हा रत्नजडित मुगुट ज्याला शोभतो तो बापरखुमादेविवर विठ्ठल आहे (६).

## ❊ अंबुला ❊

**(१२८)**

**विचारिता देही अविचार अंबुला । न साहे वो साहिला काय करू ।।१।।**
**सखी सांगे गोष्टी चाल कृष्ण भेटी । आम्ही तुम्ही शेवटी वैकुंठी नांदो ।।२।।**
**येरी सांगे भावो जावे वो प्रवृत्ति । तववरि गती येता नये ।।३।।**
***ज्ञानदेवो* प्रवृत्ति निघालिया तत्परा । हरि आला सत्वरा तया भेटी ।।४।।**

विचार करून पाहता मनोवृत्तीचा नवरा अविचार हा या देहातच आहे आणि त्यास सहन करावे म्हटले तर तो सहन करता येत नाही, काय करावे? (१). निवृत्ति सखीने यावर सांगितले तू कृष्ण भेटीला चल. आम्ही तुम्ही यामुळे शेवटी वैकुंठातच वास्तव्य करून राहू (२). प्रकर्षात्मक प्रवृत्तीने भाव धरून जावे का त्याशिवाय ज्या गतीने जीवनाचे आकर्षण करणाऱ्या कृष्णाची भेट होते त्या गतीवर येता येत नाही असे ही निवृत्ति म्हणाली (३). ज्ञानदेवांची प्रवृत्ति तत्परतेने गतिमान झाली. जीवनाचे गतीत प्रविष्ट झाली. तो हरि सत्वरच या वृत्तीस प्रतीत झाला आणि त्याची भेट झाली (४).

**(१२९)**

**न गमे हा संसारु म्हणोनि केला भ्रतारु । लोक अनाचारु म्हणती मज ।।१।।**
**चंचळ झालीये म्हणतील मज । कवणा सांगू हे जीविचे गुज ।।२।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठला वाचुनि नेणे । सतत रहाणे याचे पायी ।।३।।**

या जीवनाचे-संसरणाचे-ज्ञान नाही-कल्पना नाही-म्हणून हे संसरण म्हणजे संसार ठाकठीक रहावा याकरिता म्हणून हा पुरुष प्रकृतीने भ्रतार केला. तथापि लोक



मात्र हिला अनाचारू म्हणजे इजजवळ आचारच नाही असे म्हणतात. वास्तविक ही शून्यात्मक प्रकृति आहे; इचे व पुरुषाचे तादात्म्य झाले की संसरण सुरू होते म्हणून याचे अधिष्ठान जो पुरुष तो तिने पकडला. अर्थात् ही चेष्टा प्रकृतीची पुरुषाचे अधिष्ठानावर पण तिला स्वतंत्र असा काही आचार नाही आणि या शून्यभूत प्रकृतीशिवाय नुसत्या पुरुषाचे ठिकाणीही हे संसरण घडत नाही. चेष्टविणारा तो व चेष्टा करणारी ही, मग संसरण, पण तेथे बाकीचे कर्मकांडात्मक आचार काही नाही व म्हणून जाणते तिला अनाचारु म्हणतात (१). आता कोणी ही चंचळ झाली असे म्हणतील. पण मी तरी काय करावे? या पुरुषाचे संगात चेतनात्मक चंचळपणा हा निसर्गसिध्दच आहे, मग हा तरी काय माझा दोष आहे? (२). याकरिता बापरखुमादेविवर विठ्ठलावाचून मी कांही जाणत नाही. त्याचे पायीच सतत रहाते (३).

**(१३०)**

**अद्वैत अंबुला परिणला देखा । दुसरा विचार सांडिला ऐका ।।१।।**
**सांडिणी सांडिला पै घरा चारु । दुसरा विचारु नाही केला ।।२।।**
***बापरखुमोविवरु* विठ्ठलेसी धरा चार । ठकला व्यवहार बाइयानो ।।३।।**

वृत्तीने अद्वैत नवराच वरला आणि दुजेपणाचा विचारच सांडला (१). सांडणी मांडणीचे विचाराने जीवनाचे घरघरीतील मनोव्यापारात्मक आचार सांडला व दुसरा विचारच केला नाही (२). जेथे प्राण उर्ध्वगामी होणे बरोबर त्याचे बैठकीवर असणारा शरीराचा व्यवहार थांबला, तेथे बापरखुमादेविवर परमात्मा विठ्ठल त्याचाच घराचार सुरू झाला. प्राणाचा व्यवहार प्राणाचे बैठकीवर जीवनाचे ऊर्ध्वगामित्वाने प्राणही ऊर्ध्व होऊन चालू झाला (३).

**(१३१)**

**अंबुला माहेरी भोगी धणीवरी । मग तया श्रीहरी सांगो गुज ।।१।।**
**माझे सुख मीच भोगीन । क्षमेसी निगेन अंगो अंगी ।।२।।**
**सांडुनि कुळाचार जालिये निर्लज्ज । तुम्ही काय मज शिकवाल ।।३।।**
***रखुमादेविवरु* विठ्ठल माता पिता । मी त्याची दुहिता सर्वा गुणी ।।४।।**

माया ज्या ठिकाणी हेरली जाते अशा माहेरी तृप्ती होईपर्यंत शिवात्म्याचा भोग घेईन. मग हे गौप्य श्रीहरि परमात्म्याला सांगेन असे जीवनाची धारणा म्हणत आहे (१). माझे सुख मीच भोगून अंगोअंगी मी क्षेमालिंगन देईन (२). हा देहाचार सांडून मी आता अद्वैत झाले तेथे तुम्ही मला काय शिकवाल? (३). रखुमादेविवर विठ्ठल माता पिता असून तेथेच जीवनाचे तादात्म्यतेने मला हा सर्व अनुभव आला असल्याने मी त्याची सर्वात्मक सर्वगुणाने युक्त अशी स्त्री आहे (४).

**(१३२)**

**जियेचा अंबुला रुसुनि जाये । तयेचे जीवित्व जळो गे माये ।।१।।**
**आम्ही रुसो नेणे आम्ही रुसो नेणे । अंबुलिया रुसो नेदिगे बाई ।।२।।**
**ज्याच्यानी अंगे जोडला हा ठावो । *रखुमादेविवरु* नाहो बुझविला ।।३।।**

जिचा नवरा रुसून जातो तिच्या जिण्याला आग लागो (१). आम्हीही रुसणार नाही व आमच्या नवऱ्यालाही पण रुसू देणार नाही (२). ज्या पुरुषाचे योगाने हा ठिकाणा आम्हाला प्राप्त झाला त्या रखुमादेविवर परमात्म्याचे ठिकाणी आम्ही कोणी आहो हे राहिलेच नाही (३).

**(१३३)**

**अष्टभावे भोगिता न पुरे धरणी । देह उगाणी केली देखा ।।१।।**
**अंबुला निघाला अंबुल्या गावा । मी वो तया सवा जातु असे ।।२।।**
***रखुमादेविवरु* लागलासे चोरु । मार्ग बुडविला घराचारु ।।३।।**

अष्ट सात्त्विक भावाने भोगीत असता जीवनाची धारणा तृप्त होत नाही म्हणून देहात्मता सांडूनच दिली (१). हा पुरुष आपल्या गावाला निघाला असून मीही त्याचे बरोबरच ऊर्ध्वगामित्वाने जात आहे (२). रखुमादेविवर परमात्मा हा चोर आमचे मागे लागल्याने त्याने बाह्य व्यवहाराचा मार्गच बुडविला (३).

**(१३४)**

**दुरळु अंबुला केला गे बाई । ब्रह्मादिका तो न पडे ठाई ।।१।।**
**हालो नये चालो नये । सैरावैरा काही बोलो नये ।।२।।**



**अंबुला केला धावे जरी मन । बुडती बेचाळीस जाती नाक कान ।।३।।**
**मागील केले ते अवघे वावो । बापरखुमादेविवरु विठ्ठलू नाहो ।।४।।**

ब्रह्मादिकांना ज्याचा पत्ता नाही असा दुर्लभ नवरा केला (१). आता हालचालही करू नये, उगीच कांही बोलू नये अशी स्थिती आहे. का तो स्थिर आहे तर आपला अस्थिरपणा कसा चालेल? (२). हा नवरा केला. आता जर मन धावाधाव करेल तर बेचाळीस कुळे नरकात जाऊन नाक कान जातील (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी माझा अहंकारच नाहीसा झाल्याने मागे जे कांही केले असेल त्या सर्वावर पाणी पडले (४).

**(१३५)**

**सूची अंबुला ज्ञान घरा चारु । भक्ति ये साकारु आवडली ।।१।।**
**काय सांगू माये निर्गुण अंबुला । शुन्यी मिळाला नाही ठाई ।।२।।**
***रखुमादेविवरु* साकार अंबुला । मज पूर्ण आला बाइयानो ।।३।।**

जीवनाचे घरघरीत आचार कसा करावयाचा याचे ज्ञान हा नवरा सुचवीत असून तेथे सकाराशी तादात्म्य झालेली जीवनाची धारणा ही साकार भक्तीच खरी आवडली (१). ज्याला ठावठिकाणा नाही अशा शून्यामध्ये हा निर्गुण नवरा गाठ पडला. मग सांगू तरी काय? (२). सकाराने युक्त असा साकार रखुमादेविवर अंबुला असून पूर्णतेने मला प्राप्त झाला व मलाही त्याने पूर्णच केले (३).

**(१३६)**

**अंबुला विकूनि घेतली वस्तू । घराचार समस्तू बुडविला ।।१।।**
**उठोनि गेलिये अज्ञान म्हणाल । म्या तव कैवल्य जोडियेले ।।२।।**
**अंबुला सांडुनि परावा केला । संसार सांडिला काय सांगो ।।३।।**
***रखुमादेविवरे* मज पर्णुनि नेले । सुखची दिधले काय सांगो ।।४।।**

पुरुषाला विकून वस्तू घेतली आणि जीवनाचे घरघरीत निसर्गाने चालणारा सर्व आचार बुडविला (१). जीवनाचे उठाउठीतून उठाव घेऊन ऊर्ध्वगामी झाले म्हणून मला कोणी तुम्ही अज्ञान म्हणाल पण मी तर मूर्तिमंत कैवल्याची म्हणजे मोक्षाची

जोड केली (२) हा पुरुष सांडून पर परमात्म्याचा अंगीकार केला, तो काय सांगावे, जीवनाचे संसरणच संपुष्टात आले (३). रखुमादेविवर परमात्म्याने मला वरून आपले ठिकाणी नेले आणि सुखच देऊन सुखी केले यापेक्षा काय सांगावे? (४).

**(१३७)**

**सगुण अंबुला निर्गुण पै झाला ।घराचार समस्त बुडविला ।।१।।**
**आशा हे सासू असता बुडविली । शांति माउली भेटो आली ।।२।।**
***रखुमादेविवर* विठ्ठलेसी चाड । अद्वैतेसि माळ घेऊनि ठेले ।।३।।**

सगुण अंबुला निर्गुण होऊन सकार गुणाचे अतीत होऊन सर्व घराचार त्याने बुडविला (१). असणारी आशा सासू बुडविली, तिला नामशेष केली, तो शांत वृत्ति अंत:करणात प्रगट झाली (२). रखुमादेविवर विठ्ठलाचीच एक आंतरिक इच्छा असल्याने अद्वैत सांप्रदायी होऊन राहिले. माळ घेतली पण ती अद्वैताची (३).

**(१३८)**

**अंबुला होता तो लेकरु झाला । घराचार बुडाला बाईयानो ।।१।।**
**झणी अकुळी म्हणाल उणे । तुम्ही जाणते जाणा परमार्थ खुणे ।।२।।**
***रखुमादेविवरे* विठ्ठले भोगिलिये । लंपट जहालिये सहजानंदी ।।३।।**

बाप स्वत: मरतो तेव्हा तो पुत्ररूपाने जन्माला येतो असे एक लौकिक व्यवहारातलेही वर्म आहे. 'आत्मा वै पुत्र-नामासि' असे श्रुतिवचन आहे. म्हणून परमात्माच जीवरूपाने नटला आहे. तर तेथे द्वैतमूलक घराचार रहाणार कसा? (१). मग येथे आता कुळ गोताचा प्रश्न नाही असे काही येथे कोणी उणे दुणे काढाल पण परमार्थ खुणेने जाणते पणाने तुम्ही हे जाणून घ्या (२). रखुमादेविवर परमात्म्याने ज्या माझा भोग घेतला तो माझेशी एकरूप झाला. त्या सहजानंदात मी त्याची चित्शक्ती लंपटच होऊन राहिले (३).

**(१३९)**

**स्वरूपाचेनि भावे बिंब हे ग्रासिले । परि खुण न बोले काय करु ।**
**रूपाचा दर्पण रूपेवीण पाहिला । द्रष्टाहि निमाला नवल कायी ।।१।।**



**जिकडे जाय तिकडे दर्शन सांगती । उदो ना अस्तू हे नाही द्वैत स्थिती ।।२।।**
**पूर्व बिंब शून्य हे शब्दची निमाले । अनाम्याचेनि भले होते सुखे ।**
**त्यासी रुप नाव ठाव संकल्पे आणिला । अरूपाच्या बोला नाम ठेला ।।३।।**
***बापरखुादेविवरु* विठ्ठलूचि एक । भोगी सम सुख ऐक्यपणे ।**
**अदृश्य अंबुला जागता निविजे । परी सेज स्वभावी दुजे नाही रया ।।४।।**

स्वस्वरूपाचे भान निर्माण होताच तेथे आपले पूर्णतेचाही ग्रास झाला. पूर्णापूर्ण ही सापेक्षताच तेथे राहिली नाही. आकाशाचे ठिकाणी रूपावीण रूपाचा साक्षात्कार झाला. तेथे दृश्य उरले नाही तर नवल काय? (१). वायुस्वरूप निजत्वाचे संघाताने जिकडे तिकडे आपले बरोबर दर्शनच झाले, उदय आणि अस्त ही द्वैत स्थिती जेथे राहिली नाही (२). पूर्वीचे आपले ते पूर्णरूप म्हणजे आपले जीवनाची पूर्णता हे शब्दच उरले नाहीत. यामुळे जे अनाम आहे त्या योगाने चांगलेच सुख होत आहे. त्याला संकल्पाने रूप, नाव आणि ठावठिकाणा आणला आणि अरूपाचा स्वयंसिध्द बोल तेच नाम असे म्हटले (३). बापरखुमादेविवर विठ्ठलच एक ऐक्यपणाने समसुख भोगीत असून हा अदृश्य अंबुला जागतेपणात निवांत होतो, परंतु सुषुप्ती अवस्थेत त्याचे शेजेवर आले तो ठिकाणा गाठला की स्वभावताच परकेपणा उरत नाही (४).

**(१४०)**

**सुखाचा सुख निधी सुख सागर जोडला ।**
**म्हणोनि काळा दादुला मज पाचारि गे माये ।।१।।**
**प्रेम नव्हाळी मज झाली दिवाळी ।**
**काळे वनमाळी आले घरा गे माये ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* पुरोनि उरला ।**
**सबाह्यजु भरला माझे ह्रदयी गे माये ।।३।।**

सुखाचा सुख ठेवा जो सुखसागर परमात्माच जोडल्या कारणाने तो काळा सावळा माझा नवरा मला बोलावीत आहे (१). काळा वनमाळी श्रीकृष्ण परमात्म्याचे घरा आल्याने प्रेमाचे नवलाईने मला दिवाळीच झाली (२). अंतर्बाह्य भरलेला आणि

सर्वास पुरून उरलेला बापरखुमादेविवर माझे हृदयातच आहे (३).

(१४१)

**वऱ्हाड न होता होतो खेळे मेळे । लग्न लागले कवणे दृष्ट वेळे ।**
**तेथुनि अंबोला चालवितो माते । कैसेनि येथे निस्तरावे ।।१।।**
**मौनेचि घरवात करावयाचि । चाड नाही मज या जीवाची गे माये ।।२।।**
**आया बायानो ऐका वो न्यावो । येकांती सदा वसताहे नाहो ।**
**अंग भोग नाही ऐसा दुरावो । गरुवार होतसे हाचि नवलावो ।।३।।**
**एखादे वेळे मजची मारितोसी । लाजा मी सांगो कोण्हापासी ।**
**राग आलिया अवघे या ग्रासी । ऐसी अती प्रीती आम्हा दोघासी ।।४।।**
**म्हातारा आमुला काय माये । रुप ना वर्ण हात ना पाये ।**
**तरुणि आपुले मी रुप न साहे । क्षणांतरी या वेगळी न राहे ।।५।।**
**पिसुणा देखता बुझाविले माये । बुझवणी माजी शब्द न साहे ।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु पाहे । पाहते पहाणे जाले गे माये ।।६।।**

कोणत्या दुष्ट वेळेवर लग्न लागले हे कळावयास मार्ग नाही, परंतू वऱ्हाड न होताच आम्ही खेळीमेळीत होतो. तेथून हा नवरा मला चालवितो आहे. कालचक्रगतीने येथवर आलो आहे पण हे आता निस्तरावे कसे-उपाधीचा निरास कसा करावा-हाच प्रश्न आहे (१). मूकस्थितीत घरात बात करावयाची मग त्या ठिकाणी मला जीवाचीही पर्वा नाही, का तर यावरच सर्व दृश्याचा खेळ आहे (२). आया बायानो, ऐका, हा सदा एकांती वसत असून नास्तिभावाने जो प्रतीत होतो. अहंकार जेथे ठरत नाही, अंगभोग प्रत्यक्ष नाही असा ज्याचा, इतके असूनही दूरपणा आहे आणि असे असून मी गरोदर होते आणि अनंत विश्व प्रसवते हा एक मोठा नवल चमत्कार आहे (३). एखादे वेळे हा मलाच खलास करतो. हे मी लाजाळूने सांगावे तरी कोणाला? प्रकोपाने हा सर्व दृश्याचाच ग्रास करतो. अशी आमची दोघांची अति प्रीती आहे (४). हा नवरा अति जीर्ण असून त्याला रूप, वर्ण, हात, पाय कांही नाही. मी तो तरुणी असून



मला हे रूप सहन होत नाही. तरी त्याचेशिवाय त्याचे अधिष्ठानावाचून मला स्वतःच्या कांही चेष्टा करता येत नाहीत. कारण सर्व चेतनाही त्यामुळेच होते, म्हणून मी त्यावेगळी स्वतंत्र अशी क्षणभर देखील राहू शकत नाही (५). या वेड्याला पाहिले की माझा मलाच विसर पडतो. तेथे शब्दगुणही रहात नाही अशा बापरखुमादेविवर विठ्ठलाला पहाता, पहाणाराच येथे हे सर्व पहाणे म्हणजे दृश्य जाला हे प्रतीत होते (६).

(१४२)

**द्वैताद्वैत विरहित गौळणी । अमृत दुडिया भरोनिया सांजवनी गे माये ।अभान्वि करुनि श्रृंगारु माथा गोरसाचा भारु । आणि निघाल्या विकरा करु मथुरे हाटा । प्रेम उचंबळले चित्ती हांसे चाले हंस गती । पुढे सखिया खेळती जिवो जिवलगा । दृष्टी फिटला संदेहो लागे कांबळीचा सोवो । तव माझारी कृष्ण देवो स्वरुपी दिसे ।।१।। नवलाव गे नवलाव गे देखियेला ।।२।। दृष्टी देखिला लोचनी लाजिलीये विरोनी । मागती खुंटलीसे मनी पांगुळले । सरले नेत्रांचे देखणे श्रृति श्रवण ऐकणे । चित्त चोरियले कान्होने चैतन्यी वो । निमिषे खुणविले सहजे तव घडले सहज । बिंबी बिंबतसे निज हे जीव हाचि जाला । आता नाही मज जरी हात व बाहिजु भीतरी । अवघी अंतरली दुरी गेले मनुष्यपण ।।३।। याचि ये वो भेटी पडली संसारासी तुटी । शब्द मावळला गोष्टी । तो मी काय सांगो । ऐसा कैसा हा दानी करु नेदिता बोहणी । सुखासाठी सांजवणी केले रुपातीत । आजि करुनि विकरा रीघू नुपुरे जाव्या घरा । नुरे कल्पनेसी थारा । सरले लिंगदेह । मी तव वेधलिये यासी । सवेचि जालिये तत्त्वमसी । गुज लपवावे मानसी । तुम्ही सखियानो ।।४।। याचिया लागल्या अभ्यासे । गेले मीपणाचे पिसे । केले आपलिया ऐसे इंद्रियासहित । पूर्ण चैतन्य भोगिले हे तव दुजे निमाले । देही अखंडीत ठेले होते जैसे तैसे । आलिंगुनिया अंतरी । रिगुनुपुरे बाहेरी । निर्विकाराच्या शेजारी प्रेम दुणावत । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलेसी भेट । आजि संसारा संसारी घेऊनी गेला ।।५।।**

द्वैताद्वैत विरहित इंद्रियवृत्ती अमृताच्या पाट्या भरून झांझड असल्या वेळेला सांजकाली अभिनिवेशाने श्रृंगारून माथ्यावर दूध घेऊन विकरा करणेकरता आज मथुरेच्या बाजारला निघाल्या. चित्तात प्रेम उचंबळले असून हासत हासत हंसगति परमात्मा हंसगतीने चालत असून पुढे अष्टभाव वृत्ति जिवाच्या जिवलग अशा खेळत होत्या. त्याचे कांबळीचा पदर लागताच त्यात स्वस्वरूपी श्रीकृष्ण दृष्टीला दिसताच वृत्तिसंशयच फिटला (१). मोठा चमत्कार मोठा चमत्कार पाहिला (२). दृष्टीत तो परमात्मा प्रतिबिंबित झाल्याबरोबर त्यात ती विरूनच गेली व लज्जित झाली. कांही मागावे तर मनाने पांगुळ झालेली ती कुंठितच झाली. डोळ्याचे पहाणे, कानाचे श्रुतिश्रवण त्या रूपीच सरले. चैतन्याचे ठिकाणी या श्रीकृष्णाने चित्तच चोरून नेले. निमिषार्धात त्याने खुणविले तो हे सहजच घडले तोच हे निजरुप बिंबाकार बिंबले. यामुळे जीव हा श्रीकृष्णच झाला. हा अंतर्बाह्य झाल्याने मला जरी कांही राहिले नाही तरी दृश्यवृत्ती अवघी अंतरली (असल्याने) असे झाल्याने मनाचे मनत्व उरले नाही तो मनोवृत्ती कोठली? मनोवृत्तीच नाही तर मनुष्यपण कोठचे? असे झाले (३). याचीच भेट झाली तो जीवनाचे संसरणाची तुटी झाली, शब्दाचा ग्रास झाला अशी गोष्ट, मग आता सांगू तरी काय? असा हा भवानी न करता दान करणारा असा हा दानी आहे तरी कसा? सुखासाठी ज्याने जीवनाचे संधिकालात मला रूपातीत केले. आज या दुधाचा विकरा करून घरी जावे ही वृत्ति जेथे राहिलीच नाही. कल्पनेला थाराच नाही असे होऊन निर्विकल्प अवस्था प्राप्त झाली आणि लिंगदेहाचा ग्रास झाला (४). याच्या अभ्यासाने मीपणाचे वेडच गेले. इंद्रियासहित त्याने आपल्याप्रमाणेच मला केले. चैतन्याची इंद्रियेही चैतन्यच. तेथे जडाचा व देहाचा संबंधच नाही. यामुळे परिपूर्ण चैतन्य पूर्णतेने भोगले, तो दुजेपणाच नाहीसा झाला. आणि या देहात ते जसे होते तसे अखंडित राहिले. अंतर्बाह्य आलिंगन झाले. अंतरात अपुरेपणा वाटला की बाहेर व बाहेर अपुरेपणा वाटला की अंतरात असा हा चैतन्याचा साक्षात्कार झाला. निर्विकार परमात्म्याचे शेजारीच खरे प्रेम दुणावते. विकारी प्रेम विकारानेच मरते. हे प्रेम शुद्धच; यामुळे याची वाढ होते यालाच भक्ति म्हणतात. जीवनाचे संसरणाबरोबर जो मला घेऊनच गेला तेथेच



बापरखुमादेविवर विठ्ठलाची भेट झाली (५).

**(१४३)**

**कासयाची चाड मज नाही वो साजणी । एकल्या निर्गुणी बोधियेले वो माये ।।१।। पवन वेगाचेनि अंतरले तुम्हासी । आता मागुती वो कैसी परतेन वो माये ।।२।। ध्यान ध्यारणा तनु मनु करणे । ठेवियले ठेवणे गोपाळ चरणी वो माये ।।३।। ऐसे भुलवणी भुलविले नयनी । *रखुमादेविवरे* चिंतनी वो माये ।।४।।**

एक निर्गुणाने मला वेधल्यामुळे मला आता. कशाचीच पर्वा नाही (१). पवनाचे वेगात वेगवान झाल्याने मी तुम्हाला आता कायमची अंतरले; आता पुनः मी परत येणार तरी कशी (२). देहाने व मनाने ध्यान ध्यारणा करणे हे सर्व त्या गोपाळाकडेच सुपूर्त केले आहे. कारण माझी जीवनीची ठेव त्याचे चरणीच ठेवली आहे (३). डोळ्याचे ठिकाणी त्याने आपले भुलवणीने भूल पाडली तोच या बुद्धीचे ठिकाणी रखुमादेविवर परमात्मा चिंतनात आला आहे (४).

**(१४४)**

**अष्टदळ पाहे पद्मनेत्र दाहे । साहे मंत्र कोहं ठाकी दुरी ।।१।।**
**आडवी आडव पारूचा बरव । सखिये तो राव रामराणा ।।२।।**
**उपरती साधी प्रपंच आवधी । गुणे गुण उद्बोधी शेजे सये ।।३।।**
***ज्ञानदेवी* लपे विज्ञान हारपे । कायम मापे न बाधिती ।।४।।**

पद्मासनावर बसून ब्रह्मचक्राचे ठिकाणी दृष्टी दिली गेली तो सोहं मंत्र प्रगट होऊन कोहं धारणा जीवनाची दूर झाली (१). देहाचे आडोशाला आड घालणारा हा चैतन्याचा चांगला आत्माराम राजा तो असा श्रेष्ठ आहे (२). प्रपंचाचे पोकळीत ज्याने सन्निधानी रममाण होणेची क्रिया बुध्दीने साधली त्या शेजेवर म्हणजे स्वरूपाचे अधिष्ठानावर त्रिगुणाचे वर या जीवन सूत्राचा उद्बोध होतो की जो बोध ऊर्ध्वगामित्वाने उत्कर्षात्मक असतो (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे ठिकाणी जे आत्मतत्त्व लपले तेथे विज्ञानही विलीन होऊन जाते हे जाणून प्रमाणबद्धतेने ही अवस्था कायम साधली तर

तेथे कोणाही जीवाला बंधने ही बाधक होत नाहीत (४).

(१४५)

**सम्यक करी शांती बैसे एके पाती ।क्षेमेसी निवृत्ति वाडकरी ॥१॥**
**ऐसा हा उपदेश सखी सांगे जीवास । झणी कासावीस होसी बाई ॥२॥**
**सज्ञानी विज्ञान त्रिज्ञानी नारायण । अन्वयी शोधून पाहे लक्षी ॥३॥**
***ज्ञानदेवी* शिवा उन्मनी रिघावा । हरीचा विसावा सर्वाघटी ॥४॥**

सम्यक ज्ञान जेथे जीवनाचे समतेतून तर-तम भावाने हाती येते तेथे ते ज्ञान आणि शांत वृत्ती एके पंगतीस बसतात आणि क्षेमालिंगनाने निवृत्ति अवस्थेची वाढ होते (१). देहात्मबुद्धीला जी कासावीस होणेची पाळी येते या दृष्टीने हा उपदेश आत्मबुद्धीने जीवाच्या कल्याणाकरता देहबुद्धीस सांगितला आहे (२). सकाराचे ज्ञानात विज्ञान हा अनुभव असून तिनी अवस्थांचे ज्ञानात हा नारायणच आहे. अन्वय व्यतिरेकाने यास लक्ष्य देऊन पाहिले पाहिजे (३). श्रीज्ञानेश्वमहाराजांचे ठिकाणी शिवभावाने उन्मनीत प्रवेश होताच हरीचा विसावा सर्वा घटी कसा आहे हे प्रतीत झाले (४).

(१४६)

**येरी म्हणे भेद सृष्टी दाविती शब्द । तत्त्वी तत्त्वबोध कोठे गेले ॥१॥**
**सखी म्हणे बाई आकाराची सोय । तुज मज काय इये देही ॥२॥**
**चपळता सांगो उष्णता घोटी । घोटुनिया होणे समब्रह्मी ॥३॥**
***ज्ञानदेवी* तट भाग्य जैं उत्कट । तैं वाक् पट पडती दृष्टी ॥४॥**

बहिर्बुद्धी म्हणजे सृष्टीतील भेद शब्दाने दाखविले पण तत्त्वाचे ठिकाणी असणारे बोधतत्त्व कोठे गेले? (१). हा प्रश्न करताच अंतरबुद्धी म्हणाली तुला काय वा मला काय, या देहाने फक्त आकाराची सोय केली (२). उष्णतामय जीवनाने चपळता ही सांगो येती पण या चपळतेच्या पोटी असणाऱ्या उष्णतामय जीवनाची घोटणी केली की ब्रह्मासारखेच होता येते (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे ठिकाणी उत्कट भाग्याने हा तट जीवनाचा निर्माण झाला तोच वाक्तंतूपट दृष्टी पडला.



(१४७)

**सखी सांगे सार शांती क्षमा दया । प्रपंच विलया बरळपोशी ॥१॥**
**सखी म्हणे एका दुजी म्हणे अनेक । अनेक सिंम्यका गुरुगम्य ॥२॥**
**सावध निबंध आध्याचा उकला । रसनेचा पालव रसना तोये ॥३॥**
***ज्ञानदेव* सांगे रखुमादेवी जप । अगम्य संकल्प एक दिसे ॥४॥**

ज्यातून कांही निष्पन्न व्हावयाचे नाही असा बरलपोशी प्रपंच विलयाला जाणारा असून यात सार काय ते शांति, क्षमा, दया हेच आहे. अशी अंतरबुद्धी सांगत आहे. अंतरबुद्धी एक आहे म्हणत आहे तर बाह्यबुद्धी अनेक आहे म्हणत आहे. पण या अनेकात समतेने जे प्रतीत होणारे सम्यक् ज्ञान आहे ती जी एकत्व प्रचिती ही गुरुगम्य आहे (२). आद्य तत्त्वाचा उकल करणारा हा सावधतेचा निबंध आहे. रसनेची या ठिकाणी फुटणारी पालवी रसनेचे पाणी मिळाले तर रसनेत रसरूप आत्माच आहे. जीवनात रस असेल तर तो रसनेत तरी येणार (३). रखुमादेवीचा जप हा एक अगम्य असा संकल्प असून श्रीज्ञानेश्वरमहाराजांना या ठिकाणी एक वस्तूचीच प्रचिती आली (४).

(१४८)

**सखी म्हणे बाई समपण ते कैसे । येरी म्हणे देश हिंडू नको ॥१॥**
**आधी शोधी आप मग पाही दीप । कोहं सोहं दीप दवडी दूर ॥२॥**
**त्रिपुटी झोंबो नको मायावी सकळ । अवघा सरळ हरी आहे ॥३॥**
***ज्ञानदेव* बुझवी बुझे ज्ञान धारणा । तुज मज सौजन्य येणे आहे ॥४॥**

समपण ते कसे असते हा प्रश्न देहबुद्धीने आत्मबुद्धीला केल्यावर तिने ''अन्य प्रदेशात हिंडू नको अनन्य प्रदेशात म्हणजे अनन्यत्वात ये'' असे वर्म पर्यायाने सांगितले (१). आधी आपले खरेखुरे जीवन काय याचा शोध घे नुसत्या तुझ्याच डौलात जाऊ नको. मग हा आत्मदीप पहा की जेथे कोहं सोहं हे सापेक्ष दीप सापेक्षतेनेच दूर दवडले जातात (२). हे सर्व त्रिपुटीने युक्त अर्थात मायावी असे दृश्य जात आहे तेथे उगीच अहंतेने झोंबण्यात अर्थ नाही. सरळ सरळ त्रिपुटीचा निरास

करून पहाता सरळ रेषाकृती अवघा हरीच आहे. एका रेषेत दृष्टी आली की त्रिपुटीचा निरास होतो (३). या प्रकाराने तुझे माझे सौजन्य राहील, असे म्हणताच श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी जी ज्ञानधारणा निर्माण केली, तेथे ही वृत्ति बुझविता बुझलीच. धारणा अवस्था हीच ज्ञानावस्था झाली मग तेथे वृत्तीचे काय?

**(१४९)**

**एकी धावे सुनाट एकीने धरिले बेट । एकीने शेवट साधियेला ।।१।।**
**कोणे तत्वी हरी कैसी याची परी । नांदे कोणे घरी सांगिजेसू ।।२।।**
**सखी सांगे बाई भावो धरी देही । एका रूपा सोयी येईल घरा ।।३।।**
***बापरखुमादेविवर* विठ्ठल अवचिता । निवृत्ति जे समता सांगितले ।।४।।**

एक मोकळी म्हणजे रिकामीच वृत्ती धावू लागली व एकीने दृश्याचे बेट धरले तर एकीने शेवट गोड केला (१). तर हा हरी कोणत्या तत्त्वात असून याचा प्रकार तरी काय आहे व कोणे घरी तो रहातो हे मला सांग असा प्रश्न बाह्यबुद्धीने अंतरबुद्धीला केला (२). अंतरबुद्धी म्हणाली बाई या देहात तू रामकृष्णवाचा हा जो जीवनगतीचा भाव आहे तो धर म्हणजे तो एक हरी तुझे सोयीकरता जीवनाचे तुझ्या घरघरीत आकाराला येईल (३). निवृतिनाथांनी जे समता तत्त्व सांगितले, तो एकाएकी बापरखुमादेविवर विठ्ठल हा जाणण्याचे ठिकाणच होऊन राहिला (४).

**(१५०)**

**सावळीये निळी भुलली एक नारी । परेचा वो घरी शुद्धी पुसे ।।१।।**
**सांगे गे बाईये कोणे घरी नांदे । कैसे या गोविंदे हिंडविले ।।२।।**
**चहू मार्गी गेले न सपडेची वाट । मग चैतन्याचा घाट वेधलीये ।।३।।**
***ज्ञानदेवी* समाधी स्थान पै विठ्ठल । अवघा चित्ती सळ हारपला ।।४।।**

औटपीठावर सावळीया परमात्म्याचे ठिकाणी महाकारण देहात एकता पावलेली जीवनाची धारणा भुलून गेली. परा वाचेच्या घरात प्रविष्ट होऊन तीन देहांचा निरास झालेली ती विदेहता पावली. जाणीव व नेणीव ही दोनीचीही शुद्धी जिची पुसून गेली का भानच कशाचे राहिले नाही (१). या गोविंद परमात्म्याने आतापर्यंत कसे हिंडविले,



तो कोण स्थानात घर करून नांदतो, असे सांग ग बाई म्हणून ती जिवु बाईला सांगू लागली (२). विहंगम मीन, कपी, पिपिलीका या चार मार्गावर लक्ष गेले तो कांही न करणे हेच कांही करणे ही क्रिया तेथे नसलेने वाट सापडेना. पण यावर अद्वय वाटेवर येताच जो चैतन्याचा घाट लागला तेथे मग मन वेधूनच गेले. देह जेथे जळून गेले आणि दशमद्वार उघडले. ब्रह्मकपाट फोडून अव्हाट मार्गाने गेले तो ही अनुभूती आली (३). तेथे आत्मतत्त्व जाणणेचे ठिकाण जो विठ्ठल तेथे चित्तातल्या चिंतनाचा अंकुरही हरपला. चित्त चैतन्याचे ऐक्य झाले तेच श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे समाधी अवस्थेचे स्थान झाले (४).

**(१५१)**

**मी पण माझे हरपले । शेखी ठकची विशेखी पडिले बाईये ।।१।।**
**काय सांगो तुम्हा कैचा हा गोवळु । न म्हणे दिनवेळु आम्हा घरी ।।२।।**
**नवल पै केले बुडविले सगुण । आपणचि निर्गुण होऊनि ठेले ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* जीवन आमुचे । नाही पै साचे कुळकर्मे ।।४।।**

मीपण जो माझे नाहीसे झाले तो शेवटी हे षड विकार सारखे ठकच सफा पडले काय सांगावे? (१). काय सांगू! अरे, हा गोनाम इंद्रियवृत्तींना वळविणारा परमात्मा गोवळु हा तुम्हाला काय प्राप्त होतो? मात्र तो आमचे घरी दिवस वेळ कांही म्हणत नाही. तो आमचे जीवनाचे घरघरीतच घर करून आहे (२). सकाराचा गुण बुडवून आपणच निर्गुण होऊन राहिले, असे त्या परमात्मरूपाने मोठे नवलच केले (३). अर्थात् खरोखरी कुळकर्मे उरलीच नाहीत. बापरखुमादेविवर हेच आमचे जीवन झाले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(१५२)**

**आजिवरी होते मी मोकाट । तव डोळे फुकट मोडा तुम्ही ।।१।।**
**समर्थाचे अंगी पडले अवचिती । तुम्हा ऐसी किती चालविली ।।२।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलाची घरवात जाले । जन्मवरी एकांत करूनि ठेले ।।३।।**

आजवर मी वृत्तीने मोकळीच होते तोपर्यंत तुम्ही डोळ्यांची मोडणी फुकटा फाकट

केली (१). समर्थांचे अंगी जो मी एकाकी पडले तो माझ्यासारख्या प्रकृतीने तुम्हासारख्या कित्येकांची वृत्ती चाळविली, प्रकर्षाला आणली (२). बापरखुमादेविवर विठ्ठल पुरुषाची घराचार संभाळणारीच झाल्याने जन्मवर त्याचेशी एकांत करूनच राहिले (३).

**(१५३)**

**त्वचेचिया राना धाडू नको मना । तेथे नंदाचा कान्हा डोळा घाली गो आई यो ।।१।। गाईचा गोवळा यमुनेचा पाबळा । धरी माझा अचुळा मग मी ताळविरी गोवळी केली मजसी रांडोळा । धावेना रळी मग मी पळाली ये गो ।।२।। गळा गुंजमाळा गाठी । डांगा मोरविसा वेठी । सोकरु लागे पाठी । नंदरायाचा गो आई यो ।।३।। एक्या करे धरी । बिजा करे वेटारी । चुंबना दे हरी । मग मी पळाली ये गो ।।४।। ऐसी पळत पळत गेलिये । कान्होने मोहिलिये । माझी मीचि जालिये । मग मी समखोलिये गो ।।५।। तुनाचार लागते गोर । तुना बोर लागतो गोर । तुनाबाही माझी चार । माझी आई यो गो गो ।।६।। पूर्व पुण्य फळले । देहमुक्त जाले । *बापरखुमादेविर* विठ्ठले । ऐसे केले गो आई यो ।।७।।**

त्वचेच्या रानात मनाला न धाडता नंदाचा कान्हाच डोळ्यात साठव (१). गोनाम इंद्रियवृत्तींना वळविणाऱ्या या गोवळ्याने यमनियमादी वृत्ति जेथे उरत नाहीत, अशा सीमा रेषेवर माझे अंतःकरणाचा पदरच पकडला. यामुळे मला वृत्तीवर रहाताच आले नाही. मी पलायन केले (२). ताक घेऊन फिरणारी मला त्याने गोवळी केली. हा लाडिकपणा माझ्या मनाला येईना म्हणून मी पळाले (२). गळ्यांत गुंजमाळा घातलेल्या, मस्तकी ज्याचे मोरपिसांचा गुच्छ आहे असा तो नंदराजा सोहं करीत माझ्या पाठीला लागला (३). एका हाताने धरून, दुसऱ्या हाताने कवटाळून चुंबन दिले, यामुळे मला वृत्तीवर रहाताच आले नाही, मी पलायन केले (४). कान्हाने असा मला मोह घातला की तेथे माझी वृत्तीच गडगडली. माझी मीच स्वतःसिद्ध राहिले आणि मग त्याचेशी एकरूप झाले (५). तुला चार गोड लागतात, तुला बोर गोड लागते. माझ्या ठिकाणी स्थूलसूक्ष्मांचे दोन दोन गतींचे चार हात साक्षात्काराला येतात ग माझी आई (६).



पूर्व पुण्य फळाला आल्याने बापरखुमादेविवर विठ्ठलाने मला देहमुक्त केले गं आई (७).

**(१५४)**

**ठाकुनि आलिये तुजपाशी । थिते मुकलिये मनुष्यपणासी ।।१।।**
**भले केले विठ्ठला पीक भरला साउला । घरिची कोपती सोडी जाऊ दे वहिला ।।२।।**
**संसार साऊला माझा पालटुनी देसी । तरी मी होईन तुझी कामारी दासी ।।३।।**
**संसार साऊला माझा पालटुनी देसी । *बापरखुमादेविवर* विठ्ठला गुणरासी ।।४।।**

तुझ्यापाशी जो ठाकून आले तो हकनाक मनुष्यपणालाच मुकले (१). तुझ्या कृपेने भरघोस अनुभवाचे पीक आले हे चांगले केले. आता ही संसाराची खोपट सोड. मला तुझ्या ठिकाणीच जाऊ दे (२). साऊली सारखा हा संसार माझा पालटून देशील तर मी तुझी कामारी दासी होऊन राहीन (३). बापरखुमादेविवर विठ्ठला, तू गुणराशी आहेस, हा साऊली संसार माझा पालटून दे. मला मग कांही कशाचाच तोटा नाही (४).

**(१५५)**

**मे दूरथि कर जोडु । तो हे सेवा न जाणु ।।१।।**
**मन्हारे कान्हा मन्हारे कान्हा । देखी कान नेणारे मन्हा कान्हारे ।।२।।**
**तान्हा मराठा देश । मन्ही बागलाणी भाष ।।३।।**
**धटि पटि विजार । खंडे भाले तरवार ।।४।।**
***बापरखुमादेविवरु* जाण । ऐसे मन्हा कान्हा ।।५।।**

तुझी सेवा (आम्हाला) मला कांही कळत नाही. आम्ही आपले दुरून हात जोडू (१). हा माझा कान्हा यास तुम्ही का जाणत नाही (२). तुमचा मराठा देश तर माझी बागलाणी भाषा (३). धटी पटी विजार घालून भाले तलवार घेणारा, सर्वांचे खंडण करणारा, दृश्याचा निरास करणारा हा खंडोबा आहे (४). असा बापरखुमादेविवर कान्हा तू जाण (५).

**(१५६)**

**मज तुरंबा का वो जिथे तिथे । जेणे वेधे हरी सोयरा होय ।**
**मजला का वो चंदन ऐसीये परीचे । जे लाविलियाचि अनादि पुसोन जाये वो ।।१।।**

**मज करा कां वो कांही एक ।जणे करणे ठाके अशेख ।**
**सरा का वो मज आडुनि मज पाहो द्या । आपले मुख गे माये ।।२।।**
**मज श्रृंगारा कां वो तया जोगी । पुढती अंग न समाय अंगी ।**
**या मना पासुनि पढिये तो गोवळु । तोचि तो जिव्हारी भोगीन गे माये ।।३।।**
**देह पालटावो तया साठी । वरचया देईन अवघी सृष्टी ।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलास योगी । तोचि तो त्यागुनि भोगि गे माये ।।४।।**

जिथे तिथे मलाच मोठेपणा कशाला ? मला अशा प्रकारचे चंदन लावा जे लावल्यावर माझे अनादित्वही विसरून जो वेध लागला की हरीच सोयरा होतो (१). मला काही असे एकच करा की ज्याने शेषसुद्धा नाही इतके अशेषच तेवढे उरेल. माझ्या तुम्ही बाजूला व्हा. मला आपलेच मुख पाहो द्या की ज्याने मला आत्मसुख घेता येईल (२). त्या जोगी मी होईन अशी मला श्रृंगारा. वरवरचे हे अंग त्या अंगात समाविष्ट होणारे नाही. आणि हे माझे अंग मी यापुढे या दृश्य रूपात म्हणजे मायिक पदार्थात समाविष्ट करणार नाही. इतक्या मनाने त्या परमात्म्याचाच ध्यास घेतला आहे तोच तो जीवाभावाने मी भोगीन आणि त्या आनंदात राहीन (३). त्या जोगी होण्याकरता माझा कायापालट करा. याकरता अवघी सृष्टी मी तुम्हाला देईन. कारण या सृष्टीशी तरी मला काय कर्तव्य आहे? योगाच्या अभ्यासाने हा योग साधून, त्याचेशी एकरूप होऊन एकरूप जो बापरखुमादेविवर विठ्ठल तोच तो या उपाधीचा निरास करून पुनःपुनः भोगीन (४).

**(१५७)**

**तुज विण येकली रे कृष्णा न गमे राती । तव तुवा नवल केले वेणु घेऊनि हाती । आलिये तेचि सोय तुझी वोळखिले गती ।।१।। नवल हे वाल भरे कैसे जोडले जिवा । दुसरे दुरी (केले) ठेले प्रीती केला रिघावा ।।२।। पारु रे पारु रे कान्हा झणे करिसी अव्हेरू । तू तंव हृदयीचा होसी चैतन्य चोरू । *बापरखुमादेविवरा* विठो करी अंगिकारू ।।३।।**

तुझ्या शिवाय अविद्येची रात्र, कृष्णा, येकटीला सरता सरेना व चैनही पडेना. तोच तू नवल केलेस. हातात वेणु घेऊन जो आलास तो आमची सोय झाली. यावरून तुझी काय गती आहे हे आम्ही ओळखले (१). या जीवाला तुझे प्रेम कसे जोडले हे मोठे नवलच आहे. दुसरे ते दूरच राहिले आणि आम्ही मात्र प्रेमाने तुझ्या रूपात मिळून गेलो आणि तूही अंतःकरणात प्रवेश केलास (२). कान्हा तू अति सूक्ष्म आहेस. तू अव्हेर करशील तर तसे तू करू नकोस. कारण तू आमच्या हृदयीच असून चैतन्याचीही चोरी करणारा आहेस. आमचे चैतन्य हरण करणारा तू चैतन्यचोर चैतन्यच आहेस. म्हणून बापरखुमादेविवरु विठ्ठल राया, तू आमचा अंगीकार कर. आम्हीही चैतन्यरूप होऊन राहू (३).



**(१५८)**

**जळधाराच्या धारी सिंधूजळ जयापरी । पुरोनिया उरे महीवरी रे गोवळा ।तेजे शोकले काई आणावया गेले । तैसी नवल तुझी कुसरी रे गोवळा ।।१।। चाळा लावुनी गोवितोसी । दाऊनिया लपसी । लपोनी केउता जासी तैसी धाव न करी आम्हासि रे गोवळा ।।२।। वायु काय वोखट चांग विचारूनी वाजे । तयावीण कवण ठावी असे तो आपुलीया चाडा करी कोडीवरी येरझारा । सेखी गगनी सामावला दिस रे गोवळा ।।३।। आकाश तेचि अवकाश तुजमाजी हे विश्व कीं तू विश्वी अससी । *बापरखुमादेविवरा* विठ्ठला न बोले । तुझे वर्म बोलता निकरा झणी जासी रे गोवळा ।।४।।**

जळधारांच्या धारेतून जसे सिंधुजळ प्रतीत होते त्याप्रमाणे या पृथ्वीवर जो गोवळा परमात्मा आहे. या कायेमध्ये जे त्यास अनुभूतीस आणावयास गेले ते त्या तेजाने शोषले गेले आकृष्ट झाले. तसे तुझे कौशल्य आहेच रे कृष्णा (१). तू चैतन्याचा चाळा लावून जीवांना आपल्या ठिकाणी गोवून घेतोस. पुनः त्यांचे समोर कांहीतरी दृश्य दाखवून त्या आड लपतोस. दृश्याचे आकर्षणाने तुझी स्मृती रहात नाही. बरे लपून तरी तू कोठे जातोस? जात नाहीस. पण तशी भावना तू आम्हाला करू नकोस रे कृष्णा (२). वायू काय न दिसणारा काय आम्हाला विचारून ध्वनी करीत आहे? किंबहुना तरी काय स्वतः विचार करून मग आवाज करीत आहे.

त्याशिवाय ठाव ठिकाणा तरी आहे कोठे? तो आपल्याचसाठी कोटीवर येरझारा करीत असून शेवटी तो कृष्णा आकाशात समाविष्ट झालेला प्रत्ययास येतो (३). पोकळी म्हणजेच आकाश व त्यात हा साठलेला वायू. तसे तुझ्यात विश्व की तू विश्वात येथे प्रश्न चिन्हच आहे. तुझ्या ठिकाणी हे विश्व आहे म्हणजे तू विश्वात आहेसच. पण या निकराच्या गोष्टी बोलू गेले तर तू चटकन् अंतर्धान पावतोस. म्हणून बापरखुमादेविवर विठ्ठल जो तू त्या तुझ्याबद्दल कांही बोलताच येत नाही. मूकत्वातच तू खरा प्रतीत होतोस (४).

(१५९)

**लेकुरे नसतील काय घरोघरी काय न विये ते माया । परी हे दशा वेगळी न बाई हो । हा नये त्या आधी जीव निघो पाहे । आला तरी उरो नेदी काही जाय तरी जाय । डोळे तळमळीता ठाये लाचावला जीऊ राहे गे बाई ये ।।१।। तमाळ नीळे चांदिणे वो वारी वोवराल आपुलियेस बये । हे मूळ दृष्टी पुढे रिघोनिया झाडा घेत आहे । येणे कान्हये कासावीस केले गे माये ।।२।। नेणो कैसे बाळसे । डौरले डोळा लासे । माजि महुर जता हे हासे भोळिवेचे । देखिलियाचि पुरे । घालुनि दृष्टीचे भुर रे । मग ते ह्रदयी वावरे । इच्छा वसे गे माये ।।३।। थुर थुर करितु । शक्ती भोळी वाचालतु । मुद्रुले गुणे बोलतु गे माये । असावतु सावळीया । प्रभा डोळसु नभाचा गाभा । कटी कर ठेवुनिया उभा । हेची जाण गे माये ।।४।। पाहे याची नवल परी । बरवेपणाची हाऊली वरी । दृष्टी करवी झोंबवी यासी कवण वारी । आम्हीच साहतो अळी परी हे चुबडी भली । रिघोनिया आड घाली । अंग कांती गे माये ।।४।। पहा वो याचा खेळु आमुचे नासे । कोणीतरी खदखदा हासे । जी जी बाळा म्हणो तरी रूसे वो । राहो नेदी सुखे । न ऱ्हाये निमिष एके । वारा का गो डीसे विसे । कान्हो दिठीचे माये ।।५।। आता येईल म्हणोनी सापडऊ द्वारे । आडऊ तव झळाळीत दिसताहे उजियेडे । भतिरीच्या भीतरी लांबा धुमाळु चाचरु । मांडी कामा पाडी आवारु गे माये ।।६।। गाऱ्हाण्याचे निमिषे**



**। गौळणी उचंबळताहे ब्रह्मरसे । वान वसे चोपसे । कृष्णाचेनि । मालाथुन एक मोहरे । देवपण धाडले अनु रे । भावों कीं देवो बैसवाल धुरे । म्हणे *निवृत्तिदासू* ।।७।।**

घरोघरी काय लेकरे नसतील का त्यांच्या आया प्रसूत झाल्या नसतील? परंतू ही अवस्थाच वेगळी हे मोठे नवल आहे. हा श्रीकृष्ण जर आला नाही तर त्या आधीच जीव जाऊ पहात आहे. हा आला तर आमचे असे कांही शिल्लक राहू देत नाही. आणि हा गेला की गेला. याचा पुन्हा पत्ता म्हणून लागावयाचा नाही. डोळ्यांची तळमळ होताच, तो ठिकाणावर जीव राहिलेला याचे भेटीसाठी आतुर झाला. याचे भेटी करताच तो राहिला (१). ओवरी मध्ये शून्यावस्थेत नील वायुप्रकाशयुक्त चांदणे आपुल्या ठिकाणीच आहे. हे मूळ दृष्टीपुढे येऊन तत्त्वांचा झाडा घेत आहे असा हा आकर्षक कान्हा असून याने नुसते कासावीस केले आहे (२). डोळ्यात ध्वनिचक्रयुक्त बाळसेदार हासरा आणि मोहक असे हे भोळ्या बुद्धीचे स्वरूप. हे पाहिले की पुरे. दृष्टीची भुरळ घालून इच्छावश होऊन ह्रदयातच ते वावरत आहे (३). ज्याचे तेजाची ओळ हीच शक्ती धुरधुर करीत वाचाळ झाली आहे. त्या गुणानेच जो बोलत आहे. आकाशाचा गाभा असा हा डोळ्यामधे सावळ्या प्रभेने युक्त असा डोळसू होऊन जो आहे तोच कंबरेवर हात देऊन पंढरपुरात उभा आहे. हे जाणणेच महत्वाचे. याचे जो नवल पहावे तो चांगुलपणाची हाव दृष्टीकरवी वरवर पहाणारासही झोंबवीत आहे याचे निवारण कोण करील? आम्हीच ही आगळीक सहन करावी. परंतू ही माया आड होऊन आपली अंगकांती त्यावर घालीत आहे. त्यालाच जीव भुलतो (४). पहा तर याचा हा खेळ म्हणजे आमचा नाशच आहे. म्हणून यावर राग करावा तो हा खदखदून हसत आहे. यालाही एक मजाच वाटत आहे. जी जी बाळा म्हणून कवतुक करावे तर हा रुसून बसतो आहे. हा आम्हाला सुखात राहू देत नाही. का हा सुखदुःखातीत आहे. हा एका ठिकाणी निमिषही रहात नाही. का हा कान्हा मुळची गोडीच सेवन करणारा हा दृश्यात स्थिर व्हावा कसा? (५). आता हा येईल म्हणून त्याला दारातच धरु, तर त्याच्या आडच झळझळीत त्याचा उजेड दिसत आहे. तो ते द्वार प्रकाशित

करीत आहे. तो धरणे महत्त्वाचे, एरव्ही द्वारात काय आहे? त्याचे प्रकाशाने त्याला त्या द्वाराला किंमत आहे. तो द्वाराचे आतल्या आत अंतराळी पावलाने धूम ठोकत आहे. आपल्या इच्छेने खेळण्याकरता त्याने हे शरीराचे आवार निर्माण केले आहे (६). गाऱ्हाण्याचे- तक्रारीचे- निमित्ताने हा ब्रह्मरस गौळणींचे ठिकाणी इंद्रियवृत्तीतून उचंबळून येत आहे. त्या कृष्णास पकडावे, चोप द्यावा तो दृष्टि कटाक्षाने कृष्णाने अंगीकार करून जगात कांही न उरवून देवपण धाडले. येथे भाव श्रेष्ठ का देव श्रेष्ठ असा प्रश्न श्रीनिवृत्तीदास श्रीज्ञानेश्वरमहाराज करतात (७).

**(१६०)**

**आधारचक्री निवणे मांडिले कैसा डेरिया उपचार केला । तिन्ही संयोग गोमटे घुसळण रवी बजो मेरू वो । तेणे आणिले समयाते तेथे वरू वचन लाधले निरुते वो ।।१।। विद्या पात्रे गौळणी मंथन करू ब्रह्म ज्ञानी वो । चाल निजनिज पंथे कैसे नवनीत आणिले हाता वो ।।ध्रु।। गुरू उपदेशे रवी धरी अध ऊर्ध्व मांजरी पाचै प्राण मंथन केले निरुते वो । इडा पिंगला कुंडलणी या ब्रह्मसूत्र दोरू तो आणिया वो । उभी राहोनी गगनी अनुहाते अंबर गर्जे वो ।।२।। मन एक तत्त्वी करी वो । चित्त दृढ धरी वो । तया माजी न विसंबे काहो । ऐसा गोरसु चोखटु । मोलेविण येतसे फुकटु । यासी न वचे काही । चित्त बैसे समरसे ठायी वो ।।३।। गौळणी गोमटी हाती कसवटी । क्षीरा निरा निवाडा करी वो । मेघ डंबर न विसंबे तेथे । घुसळिता थेंबु जो नुसळे वो । जन पाडलेस धंदा गोरसा गोडी नेणती अंधे वो ।।४।। काया हे नगरी गौळणी गोरसु पुकारि नवशे दारवंटे सांडुनी वो । दसवे द्वारी पातली कैसी विनटली गोविंदी वो । दंभ विकरा जाला अधर्म धर्म लोपला वो । अवघी काया झाकुळली *बापरखुमादेविवरा* विठ्ठली वो ।।५।।**

आधारचक्राचे ठिकाणी शीतळपणाने उपाधिभूत जीवनात आत्मसन्निध आचार केला. इडा, पिंगला, सुषुम्ना या तीनी नाड्यांचे संयोगात जे घुसळण झाले त्या मंथनाने रविप्रकाशाचा मेरु प्रगट झाला. त्याच योगे आत्मांनुभूतीची वेळ प्राप्त झाली.



तेथे खरोखरीच आशिर्वचन लाभले (१). ब्रह्म ज्ञानाने विद्या ज्यात साठविली जाते, अशा पात्रात म्हणजे उपाधिभूत जीवनात पावलोपावली मंथन करून निजपंथाचे आक्रमणाने हे प्रत्ययाचे लोणी हाती आणले (ध्रु). गुरूपदेशाची रवी धरून अधोर्ध्व जीवनाचे गतीचे ठिकाणी खरोखरीच पंच प्राणांचे मंथन केले. इडा, पिंगला, सुषुम्ना मार्गाने ब्रह्मसूत्राचा दोर आणला. तेथे जी वृत्तीची धारणा झाली ती आकाशात स्थिर होऊन आकाशच गर्जू लागले, तो अनुहत झाला (२). या वृत्तीने मन एक तत्त्वी एकत्वात समरस झाले. ज्या वृत्तीने चित्ताची दृढता झाली, एकत्वाला ते विसंबेनासे झाले असा गोनाम इंद्रियवृत्तींना मिळणारा रसरूप आत्म्याचा रस हा शुद्ध असून पैसा न देता फुकट आला. याला तुलनाच नसून साम्यरसाने चित्ताठायीच चत्वार देहाचा निरास होऊन त्याने चैतन्यात बैठक घेतली (३). गोमट्या अशा इंद्रियवृत्ती गौळणी यांनी नीर क्षीर मोठ्या चातुर्याने परीक्षण करून निवडले. ज्या रसाचे धारणे (त) आकाशाची धारणा असून जेथे शब्द फुटला त्याचे साधन प्रक्रियेने घुसळण चालू असता त्यातील एक थेंबही खाली सांडला नाही. जे अंधळे आहेत त्यांना मात्र या गोरसाची गोडी कळली नाही (४). काया नगरीत नऊ दरवाजे सांडून वृत्ती दुधाचा पुकारा करू लागली. दहाव्या द्वारात येऊन परमात्म्याशी ती समरस झाली. दंभ हा विकून टाकला. अधर्म व धर्म दोनी लोपले. अशा स्थितीत बापरखुमादेविवर परमात्म्याने सर्व काया (कामा) झाकून टाकली. देहभान नष्ट होऊन परमात्मप्रचीतीच तेवढी उरली.

**(१६१)**

**ज्ञान हेचि गाय दुहिले भरणा दोही । तव जना हातू नाही । ठेविले अग्नीवरी अग्नी नाही । भीतरी तापले पडिभरी साय आली ।।१।। गौळणी चतुरे झडकरी जाय मथुरे विकरा करी ।।२।। दहिया महियाविण घातले विरजण । मांडिले घुसळण रवीये विण । करिती मंथन वरील आले जीवन । एकले आणून काढू पाहे ।।३।। आले गिऱ्हाईक न विकी तूप ताक । नेणती विवेक । गोरसाचा । दहिया महियाच्या करूनी घागरी । लटकी उंबरा उंबरी काय**

**करू ।।४।। ज्ञान हे घागरी वाईयेली शिरी । गोरस भीतरी दाखवितो । एके हाते सावरी । झाकीत यावरी ।चोखटीव करी । गोरसाची ।।५।।तव मार्गी जाता एक पुसे गौळणी । परी वैसले दानी की नाही वो । त्यासी नेदी मी दान । जाईन मी आपण । प्रत्यक्ष प्रमाण । काय करू ।।६।। ऐसी पाराजवळी गेली । तव शब्दे वोळखिली । जावो देगा वहिली । उसिरु जाला । या निर्वाणाच्या बोला । सुखिया संतोषला । निरोप दिधला । गौळणीसी ।।७।।ऐसी पावली मथुरा । क्षण न लगे विकरा करा । सवेची एकसरा । उडफरवा झाला । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलू । ग्राहिक मानसी । गोरसु ज्ञानेसि मिळोनि गेला ।।८।।**

ज्ञान हीच गाय असून जीवनाच्या दोनी गर्तीत दूध भरून राहिले. ते भरावे म्हटले तर लोकांच्या हातांनी ते भरता येत नाही. ते अग्नीवर उकळत ठेविले परंतू पाहिले तर तो चुलीतला अग्नी नव्हे. सुषुम्नेवर ते उकळू लागले. ते खरपूस तापले पण त्यावर साय आली नाही (१). त्याची विक्री करण्याकरता एक मर्मग्राही गौळण मथुरेला गेली (ध्रु). पृथ्वी आणि आप यावाचून विरजण घालून तेजाचे रवीवाचून ते दूध म्हणजे वायुरूप जीवन तिने घुसळले आणि त्यातून एक तत्त्वाचा अनुभव त्या जीवनातून तिने घेतला. चत्वार देहाचे निरसनाने हा अनुभव आला (२). नित्यानित्यवस्तूविवेक ज्या ठिकाणी नाही असे या गोरसाचे महत्व न जाणणारे जर गिऱ्हाईक आले तर ती गौळण अनुभव घृताची व जड देहस्वरूप ताकाची विक्री करीत नाही. ताक किंवा दही म्हणजे हे जे जड दृश्य हे मूलतःच खोटे आहे. मग त्याचे उभारणीचे तरी काय महत्त्व आहे? याचा तादृश काय उपयोग? (३). गौळणीने ज्ञान मस्तकी धारण केले तरी त्यातील जीवनकळा योग्य अशा अधिकारी जीवास दाखवून अज्ञानी जीवास त्याचा पत्ता लागू देत नाही अशी चोख व्यवस्था करते (४). इतक्यात या पंथाचे आक्रमण करीत असताना एका गौळणीने तिला विचारले की बाजारातील पारावर म्हणजे मुख्य ठिकाणावर तू ही विक्री करण्याकरता बसतेस का? तेव्हा ही अंतर्वृत्ती बोलली की मी हे अनधिकारी जीवास देणार नाही. पाहिजे तर मी मूळ ठिकाणी परत जाईन. हे प्रत्यक्ष प्रमाण आहे. मग अज्ञानी जीवाकरता मी तरी काय करावे? (५). असे सांगून ती पाराजवळ जाते, तोच तिचे शब्दावरून तिला परमात्म्याने हेरले. तेव्हा ती देवाला म्हणाली ''मला फार उशीर झाला आहे. घरी जाऊ दे.'' या तिच्या निर्वाणीच्या बोलण्याने देव संतुष्ट झाला व देवाने तिला निरोप दिला (६). तिला विक्रीची जरुरीच नव्हती. म्हणून ती देवाचे निरोपाने क्षणार्धात आपले घरी-ठिकाणी- आली (७). परंतू तिला परमात्मवियोगाने फारच त्रास झाला. या जीवनकळारूप गोरसाचे खरे गिऱ्हाईक एक परमात्माच. तो ज्याचे मनात ठसला तोच धन्य (८).



(१६२)

**चालता लवड सवडी । बाहुली मुरडली । माथा गोरसाची दुरडी । जाय मथुरे हाटा । सवेची विचारी जीवी । महीयाते सादावी । तव तो अवचिता पालवी । नंदानंदनु ।। पाहे पा सुखाचेनि मिसे । झणी करी अनारिसे । तेव्हा उरले ते कैसे । माझे मनुष्यपण । विनवी सखीया ते आदरे । तुम्ही गुह्याची भांडारे । अघटित घडिली या शरीरे । प्रगटित न करा साजणी वो ।।१।। काय करणे वो काय करणे वो ।।ध्रु।। देखोनि सावळा तनू । लुब्धला माझा मनु । लागलेसे ध्यानु । द्वैत निवडेना । डोळा भरुनिया बाळा । देखे श्रीरंगु सावळा । वेधे वेधल्या सकळा । गोपी गोविंदा सवे । ठेला प्रपंचु माघारा । भावो भिनला दुसरा । पडिला मागील विसरा । कैचे कैचे आपुलेपण । सहज करिता गोष्टी । पहाता पडिली मिठी । जाली जन्मे साठी । सखिये साजणी वो ।।२।। ऐसी सोसिता सोसणी । सखी झाली विरहिणी । आजी मथुरा भुवनी । मज गमेल कैसे । सरले साजणे विकणे । निवांत राहिले बोलणे । पूर्ण गोरसा भरणे । माथा त्यजूनिया । जाली अकुळांचे कुळ । तनु जात बरळ । फिटले भ्रांती पडळ । दोनी एक जाली । *बापरखुमादेविवरी* । अवस्था लाऊनी पुरी । भावे भोगुनी श्रीहरी । मन मुक्त साजणी वो ।।३।।**

एक गौळण मथुरेच्या बाजारास गोरसाची भांडी दुरडीत घेऊन गडबडीने जात

असता तिची दृष्टी अंतर्मुख झाली. तिने परमात्म्याला हाक दिली. तो परमात्मा प्रगट होऊन तिला खुणावू लागला. साक्षात्काराची खूण झाली. परमात्मसुखाच्या निमित्ताने जर मी आणि कांही गोष्टी करीन तर माझे मनुष्यपणच राहील. मग मला त्याची प्राप्ती होणार नाही. बरे त्याची प्राप्ती झाली तर हे मनुष्यपण टिकणार नाही. या विचाराने ती आपल्या मैत्रीणींना सांगू लागली तुम्ही सर्वजणी या गुह्याची ठेवच आहात. तुम्ही यातील मर्म जाणता. या शरीरात मी अंतर्मुख झाल्याने जी अघटित घटना घडली व मला परमात्मअवस्था प्राप्त झाली, ही तुम्ही प्रगट करू नका (१). आता खरोखरीच कसे करावे हेच मला सुचेना (ध्रु). सहाला वळविणारा तो सावळा परमात्मा दृष्टीस पडल्याबरोबर माझे मन त्या ठिकाणी लुब्धच झाले. त्याचे जो ध्यान लागले तो द्वैतच उरले नाही. सर्व वृत्तींची एकच अवस्था झाली. सावळा परमात्मा पहाताच सर्व गोपीना तो वेध लागला. गोविंदाचे संगतीत प्रपंचाचा विसर पडला. प्रपंच मागे राहिला. दुजेपणा शिवाय अद्वैत तरी कसे सेवावे? तो द्वैतभाव अद्वैतानुभवाकरिता अंतरी भिनून राहिला. मागचा सर्व विसर झाला. अनादि आपुलेपण जागृत झाले. सहज ही गोष्ट घडली तो पहाता पहाता वृत्तीने कृष्णरूपाची मिठीच घेतली. जन्माचे खरेखुरे सार्थक झाले (२). असा आनंद लुटता लुटता विरहावस्था प्राप्त झाली. एकदम जेथल्या तेथेच भगवान गुप्त झाले. आता मथुरेत गमावे कैसे? अशी अवस्था झाली. व्यवहार राहिला. बोलणे संपुष्टात आले. वृत्ति निवांत झाली. ज्ञानाचे ओझे टाकून ती वृत्ती अकुळांचे कुळ म्हणजे ज्याला कुळच नाही अशा अकुळाचे कुळातीत झाली. परमात्म्याची झाली. शरीराचे व्यवहार कसे होतील तसे होतील असे झाले. दृष्टीतील भ्रांती गेली. कृष्णमय वृत्ती झाली. द्वैत संपले. बापरखुमादेविवर परमात्म्याने मला पुरी अवस्था लाविली. माझ्या भावाचा श्रीहरीने भोग घेतला, तो मनाचे उन्मनच झाले.

**(१६३)**

**दुडीवरी दुडी साने निघाली । गौळणी गोरसु म्हणे विसरली ।।१।।**
**गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो । तव तव बोलती मथुरेच्या वो ।।२।।**
**गोंविदु गोरसु एकचि नावा । गोरसु विकू आले तुमच्या गावा ।।३।।**



***बापरखुमादेविवरु* विठ्ठलेसी भेटी । आपुले संवसाटी करूनि ठेला ।।४।।**

दुधाच्या घागरीवर घागरी घेऊन बाजाराकरता गौळण निघाली तो ती दूध घ्या म्हणावयाचे विसरली (१). गोविंद घ्या दामोदर घ्या असे म्हणताच मथुरेतल्या बायका हसू लागल्या (२). गोविंद म्हणजेच गोरस व गोरस हाच गोविंद, मी तुमच्या गावात विकावयास आले आहे असे त्या गौळणीने तत्त्वार्थाने स्पष्टीकरण केले (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाची भेट होताच त्याने आपले सेवेसाठी मला सेवकच करून ठेवले (४).

**(१६४)**

**रांगतु रंगणी चोरितु लोणी धावोनि धरिती गौळणी । बांधती चरणी देती गाऱ्हाणी यशोदे साजणी । दधी घृत भक्षून तमाल नीळे नवल केले साजणी ।।१।। कृष्ण आळिवा कृष्ण आळिवा । परतोनी माते दावा ।।ध्रु।। कृष्णा कान्हा मधुसूदना कामिनी मन मोहना । योगिध्याना हरस्मरणा गोपी ध्याना मानिती कान्हा । बोलती यमुना ।।२।। नेणवसी नेणवसी । अकळतु नाकळसी ।।ध्रु।। इंद्रनीळा श्रुतीजन विरळा । सुरीजन घन सावळा । कंठी माळा कौस्तुभ गळा । प्रीति तुळसी दळा । कासे सेला सोनसळा । उभा बळीभद्रा जवळा ।।३।। कृष्ण सावळा उोळसु । सहज परमहंसु ।।ध्रु।। सदानंदा श्रीमुकुंदा श्रीहरी परमानंदा आनंद कंदा । अभय प्रल्हाद पावक नादा धेनु लुब्ध । गोपाळा गोविंदा ।।४।। कृष्ण आमुचा आमुचा । खेळिया गौळियाचा ।।ध्रु।। कर्पुर गोरा मन स्थिरा । पुराणा गुण गंभीरा । विरादिविरा महाविरा । पांडवदल साहाकारा । मथुरानगरा कौंसासुरा । शिक्षा लाविली चाणुरा । अती सुंदरा तू पेंढारा । *बापरखुमादेविवरा* ।।५।। जाणितले जाणितले । माझे मज दिधले ।।ध्रु।।**

अंगणात रांगणाऱ्या व लोणी चोरणाऱ्या कृष्णाला गौळणींनी धावत जाऊन धरला आणि त्याचे पाय बांधून त्या यशवदेस कागाळी सांगू लागल्या. दही तूप खाऊन या नीलवर्ण कृष्णाने नवल केले (१). कृष्णाची कांही यशवदाबाई समजूत

करा. ती म्हणती मग त्याला आणून मला दाखवा तर खरे (ध्रु). गोपी श्रीपरमात्म्याला आळवू लागल्या, हे कान्हा, श्रीकृष्णा, मधुसुदना, कामिनीचे मन मोहून टाकणाऱ्या, योग्याचे ध्यानाचा विषय असणाऱ्या, शंकराचे स्मरणात असणाऱ्या, गोपींच्या ध्यानात असणाऱ्या, यमुनाकाठी तुला इतक्याप्रकारे मानतात हे खरे (२). पण तू आकलन करावा म्हणून पाहू गेले तर तुला जाणताच येत नाही (ध्रु). इंद्रनील वर्णाचा, श्रुती जनाबरोबर खेळणारा, सावळ्या वर्णाचा, कंठी कौस्तुभमाला धारण करणारा, तुळसी पत्रावर प्रेम करणारा, पीत प्रभायुक्त पीतांबर परिधान करणारा आणि बलिभद्राजवळ उभा राहून शोभणारा असा सावळा श्रीकृष्ण परमहंसस्थितीने डोळसु आहे, डोळ्यात भरणारा आहे (ध्रु). सदानंद, मुकुंद, हरि, परमानंद, आनंदकंद, अग्नीपासून प्रल्हादाला अभय देणारा, गाईचा छंद असणारा, असा हा गोविंद गोपाळ आहे (४). असा हा गवळीयांचे बरोबर खेळणारा कृष्ण हा आमचा आहे (ध्रु). शंकराप्रमाणे शोभणारा, ज्याचे मन स्थिर आहे असा, पुराणानी ज्याचे गंभीर गुणवर्णन करावे असा, वीरांचा महावीर, पांडवाचा सहाय्यक, मथुरावासी कंसचाणूरांचा शत्रू, अति सुंदर मोत्यांचा पैर गळ्यात धारण करणारा, असा जो बापरखुमादेविवर विठ्ठल यास जाणलेने त्याने माझे होते तेच मला दिले (५).

(१६५)

**कान्हया गोवळु बाहिले न करी । दसवंती सांगे नंदा अवधारी । चौघी माया श्रृंगार करिती । तेथे विघ्नेश्वरु जाले मुरारी ।।१।। आनंदे दोंदिलु नाचे गदारोळे पायी घागुरली नेवाळे । चर्म चक्षू पडले वेगळे काढुनिया ज्ञानचक्षु दिधले डोळे गे बाई ।।२।। गौळणी दहाबारा मिळोनी सोळांची टोळी । एकी म्हणती यावे उभाची कवळु गा काय करील ते गौळणी गे बाई ।।३।। आणिकी एकी साचा बोले त्या उपरी असे त्या नागिणी । काय सांगो तिचे विण बहुसाल राहिलीसे भानु ते धरूनी ।।४।। तव मुक्ता दोन्ही आलीसे धावोनी म्हणती कृष्णा तू नीघ येथुनी । तीन नानावी तुम्हा पाठीच लागतील औठावे राहे धरूनी ।।५।। बाळा कान्ह्या वेल्हाळा सांडी या मनाचा चाळा रे । ऐसे ऐकोन *बापरखुमादिवरे* विठ्ठले पवनू गिळितया वेळा रे ।।६।।**



चौघी बायका (चार देहांच्या मायिक वृत्ती) आपला श्रृंगार करीत होत्या. तेथे परमात्म्याने जाऊन विघ्न केले. असे न करण्याबद्दल श्रीकृष्णाला दूर केले असे दसवंतीने नंदाला सांगितले (१). तो दोंदिलतनू श्रीकृष्ण पायात घागऱ्या वाळे घालून, मोठमोठ्याने डरकाळ्या फोडून, त्यांच्यापुढे नाचू लागला. श्रीकृष्णाने त्या बायांचे चर्मचक्षू बंद करून त्यांचे डोळ्यात ज्ञानचक्षू दिले (२). दशेंद्रिये वृत्ती, बारा सोळा कलांनी युक्त अशा गती, यांनी आपली टोळी करून यांच्या मिळणीतून असे निष्पन्न झाले की हा नाचत असताना आपणच त्याला कवटाळू म्हणजे झाले. मग हा श्रीकृष्ण आपले काय करू शकेल? (३). त्यानंतर आणखी वृत्ति बोलू लागली. आपले पलीकडे कुंडलिनी नागीण सूर्याप्रमाणे तेजस्वी आहे (४). तोपर्यंत जीवनमुक्त अशा जीवनाच्या दोनी गती धाऊन आल्या. त्या म्हणू लागल्या तू येथून ऊर्ध्वगामी हो आणि दुसऱ्या इडा पिंगला सुषुम्नारूप तीन गौळणी आहेत. त्या तुला धरतील म्हणून तीनीच्या पलीकडे स्वस्थ रहा. बाळा कृष्णा सुंदरा, आमच्या या मनाचा चाळा तू बंद कर, असे हे गोपींचे बोलणे ऐकून बापरखुमादेविवर विठ्ठलाने त्याचवेळी पवनाचा ग्रास करून त्यांना ती स्थिती प्राप्त करून दिली.

## ❊ विरहिणी ❊

(१६६)

**माझी शंका फिटले । लाजा सांडिले ।**
**अवघे घातले । मज निरसुनिया ।।१।।**
**आठरा भार वनस्पती । सुरवर वोळंगती ।**
**देवो देवि आदिपती । कृष्ण काळा गे माये ।।२।।**
**ऐसा कृपानिधी सावळा । कीं *बापरखुमादेविवरु* गोवळा ।**
**त्याचा मज चाळा । बहू काळ गे माये ।।३।।**

माझी निःसंशय वृत्ती झाल्याने माझ्या ठिकाणी द्वैत राहिले नाही. देह भावाचा निरास करून माझे असे काही न ठेवता आहे नाही ते सर्व त्या आत्मस्वरूपातच

मिसळले (१). सर्व प्रकारच्या वनस्पती आणि तेहत्तीस कोटी देव ज्याचे चरणी लागतात तो देवाधिपती श्रीकृष्ण हा श्यामवर्ण आहे (२). असा तो कृपासागर सावळा बापरखुमादेविवर गाई वळविणारा असून त्याचाच मला अनंतकाळचा छंद लागला आहे (३).

**(१६७)**

**पांचा दमांचा घोंगडा नेसेन । उरली मोट ते मी जेवीन गे बाई ये ।।१।।**
**कामारी कामारी कामारी होऊन । या गोपाळाचे घर रिघेन गे बाई ये ।।२।।**
**त्यांचा उंबरा उसीसा करीन । वरी येरझार मी सारीन गे बाई ये ।।३।।**
**निवृत्ती ज्ञानदेवा पुसतील वर्म । त्यासी कामीन पुरेन गे बाई ये ।।४।।**

पाच तत्त्वांचे जाडे भरडे वस्त्र नेसेन आणि त्या परमात्म्याचा उच्छिष्ट प्रसाद मी सेवन करीन (१). त्याचे एका दासीच्या दासीची दासी होईन पण गोनाम इंद्रिय वृत्तींचे पालन करणाऱ्या या गोपाळाचे घरात प्रवेश करीनच (२). त्याचे दाराचा उंबरठा मी उशास घेईन पण जीवनाची चाललेली येरझार मी संपवीन (३). श्रीनिवृत्तीनाथांनी जर ज्ञानेश्वरांना हे वर्म विचारले (तर) त्याचे उत्तर देण्यास ही दासीच पुरे. (४)

**(१६८)**

**जागृती पुसे साजणी । कवण बोलिले अंगणी । निरखिता वो नयनी । वृंदावनी देखियला ।।१।। मनी वेधु वो तयाचा । पंढरी रायाचा ।।२।। स्वप्न सांगे सुषुप्ती । असे ममता हे चित्ती । विठ्ठल होईल प्रतीती । मार्ग गर्जती तुर्ये ।।३।। मज बोलो नये ऐसे केले । मन उन्मनी बोधले । *बापरखुमादेविवरु* विठ्ठले । थिते नेले मी माझे ।।४।।**

जागृत वृत्तीचे कानावर जो अनुहत ध्वनी आला तो ॐकाराचे प्रांगणात कोण बोलत आहे म्हणून जो डोळे उघडून पाहिले तो परमात्माच पाहिला (१). श्रीपंढरीचा राजा जो परमात्मा त्याचा मनात वेधच लागला (२). तीच अवस्था स्वप्नात होऊन स्वप्नावस्था सुषुप्तीस सांगू लागली. की माझे आत जो वेध आहे तोच तुझ्या ठिकाणी असणार अर्थात् हीच प्रचीती ज्ञानात्मक तुर्यावस्थेत होणार. तोच अनुहताची गर्जना होऊ लागली (३). परमात्म्याने या अनुसंधानात मी कांही बोलू नये असेच केले. मनाचे उनमन होऊन बोधावस्था अखंडत्वाने प्रात्प झाली. या योगाने बापरखुमादेविवर विठ्ठलाने मी आणि माझे हे खोटेच केले. (४)



**(१६९)**

**सावळिये बुंथी सावळिया रुपे । सावळिया स्वरुपे बेधिले ले ।।१।। काय करू गे माये सावळे न सोडी । इंद्रिया इंद्रिय जोडी एक तत्वे ।।२।। कैसे याचे तेज सावळे अरुवार । कृष्णी कृष्णनीर सतेजपणे ।।३।। ज्ञानदेव हणे निवृत्तीचे खुणे । सावळेचि होणे यासी ध्याता ।।४।।**

शामवर्ण शुन्याचे खोलीत शामवर्ण असलेल्या स्वरुपाने त्या सावळ्या स्वरुपाचा मला वेधच लाविला (१). काय करावे माझे डोळ्यात सावळ्या रुपाची जी धारणा झाली ते मला सोडावयासच तयार नाही. या एकतत्वानेच कर्मेंद्रियांची व ज्ञानेंद्रियाची जोड केली (२). या कोमल स्वरुपाचे सावळे तेज तरी काय सांगावे ? या कृष्णाचे ठिकाणी हे जीवन सतेज आएि सावळेच झाले (३). श्री ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात श्री निवृत्तीनाथांनी या साक्षात्काराची जी खूण दिली या योगाने याच ध्यान करता आपणही सावळेच होऊ (४).

**(१७०)**

**शामचिया घरा वासना पै नेती । मने मन गुंती तये रुपी ।।१।। बिंबाचे स्वरुप छाया पै घनदार । दिननिशी अविट शामतेज ।।२।। ते रुप देखिले कोण्या भाग्य योगे । निवृत्ती प्रसंगे आम्हा घरी ।।३।। दिठिवेचेनि बोपे सानुले स्वरुप । मुराली वालिप कल्पनेची ।।४।। साठविले आकार इंद्रियांच्या वृत्ती । शामतेजे दीप्ती धनकिले ।।५।। निराशा संचती आशा पै हे सार । अमरी अमर तनु झाली ।।६।। बापरखुमादेविवर विठ्ठलो गळाले । ब्रम्हसुख सोहळे आम्हा घरी ।।७।।**

मनाने मन आत्मरुपाच्या ठिकाणी गुंतून गेल्यावर सर्व वासना शामरुप होणाऱ्या साक्षात्काराकडेच खेचल्या जातात (१). स्वरूप हे पूर्ण बिंब असून त्याची

सर्वत्र ही छायाच पसरलेली आहे. त्यामुळे जीवनाचे दिननिशीवाचक गतीत ज्याचा कधीही वीट येणारच नाही. असे शामतेजच भरुन राहिले आहे (२). कोण स्थानातील भाग्याने आम्ही सभाग्य झाल्याने ते रुप आम्ही पाहिले आणि श्री निवृत्तीनाथांचे कृपेने ते आम्हा घरीच जीवनाचे घरघरीत कोंदाटून राहिले (३). दृष्टीमधेच अती सूक्ष्म रुप धारण करून सामावला असून कल्पनेची वृत्तीच जेथे मरुन गेली (४). शाम तेज प्रकाशाने सर्व विश्व प्रकाशित झाले असून त्यातच सर्व आकार आणि इंद्रियांच्या वृत्ती साठविल्या आहेत (५). जीवनाचीच आज्ञा तेथे साठली. ही आशाच जीवनातले सार झाले. बाकी सर्व निराशा झाली. का आशा उरलीच नाही. देवलोकातील देवरूपच तनू झाली (६). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी सर्व दृश्याचा लय झाल्याने आमुचे घरी ब्रह्मसुखाचाच सोहळा झाला (७).

**(१७१)**

**मने करूनि कुटिल उकलुनि श्रृंगारे । ते लावण्याच्या अपारे पाडिले वो माये ।।१।। माझे कुटिलपण गेले कुटिलपण गेले । गोविंदे बोजाविले निजरूप वो माये ।।२।। *बापरखुमादेविवरु* माझे कुटिल फेडू आला । विटेवरी मालाथिला निजरूपे वो माये ।।३।।**

मनाच्या विपर्यस्त ज्ञानवृत्तीने शरीरास सजवून लावण्याचे मोठ्या अभिमानात होते (१). अशा स्थितीत श्रीगोविंदाने जी मला निजरूपाची प्रचीती दिली त्यामुळे हे माझे क्षणैक संभ्रमात्मक विपर्यास्त ज्ञान गेले व मी देह ही वृत्तीच नाहीशी झाली. अर्थात् शृंगारही गेला (२). बापरखुमादेविवर विठ्ठलाने माझी विपरीत बुद्धी नाहीशी केली. आणि त्याने आपले ठिकाणी माझ्या रूपाचा लयच केला (३).

**(१७२)**

**येणे रूपे पाहावासी तरि असुमाय होसी । माझ्या मना नाकळसी सावळ्या ।।१।। सगुणपणाची तुझी पडिलिसे मिठी । केली जीवासाठी सावळ्या । वेधला जिऊ माझा सिकवाल काई । सगुण ठाई वेधियेले ।।२।। ये अंगणी अवचिता देखिला बोलता । कोण ऐसा निरुता न कळे गे माये । सगुण म्हणोनी धरू गेले पालवी । तंव नवलपणाची ठेवी प्रगट केली ।।३।। आतु बाहेरी कांही न कळे वो मज । आप आपणिया चोज वाटोनि ठेले । *बापरखुमादेविवरे* माझे मीपण चोरूनि नेले । आपणा ऐसे केले बाईये वो ।।४।।**



साक्षात्कारास येणाऱ्या रूपाला तुला पहावे तो तू माझ्या पोटात मावत नाहीस. आणि माझ्या मनाला तुझे आकलनही करता येत नाही असा तू सावळा आहेस (१). माझ्या जीवासाठी, हे सावळ्या, तुझ्या सगुणपणाची मिठी पडावी अशी गोष्ट केली. सगुणाचे ठिकाणी मी वेधून गेले. माझा जीवच त्या ठिकाणी वेधला अशी माझी स्थिती झाली. आता तुम्ही मला शिकवाल तरी किती? (२). या माझे अंगणात एकाएकी बोलताना जो मी पाहिला तो कोण हे मला खरोखरी कळेच ना! तो सगुण आहे म्हणून जो त्याचा मी पदर धरू गेले, तो त्याने आपल्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाचीच ठेव प्रगट केली (३). आत बाहेर हे मला कांही कळत नाही. मात्र माझेच मला कौतुक वाटून राहिले आहे. बापरखुमादेविवराने माझा मीपणाच चोरून नेला व आपल्यासारखेच मला करून ठेविले (४).

**(१७३)**

**कृष्णे वेधिली विरहिणी बोले । चंद्रमा करिती उबारा गे माय । न लावा चंदनु आंगी न घाला विंजण वारा । हरिविणे शून्य शेजारू गे माये ।।१।। माझे जिवीचे तुम्ही का वो नेणा । माझा बळिया तो पंढरीराणा वो मारू ।।२।। नंदनंदनु घडी घडी आणा । तयावीण न वाचती प्राण वो माये । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु गोविंदु । अमृत पान गे माये ।।३।।**

कृष्णाचा वेध जिला लागला अशी विरहिणी बोलते. चंद्रमा हा अतिशय थंड खरा पण मला बाई तो उबारा करतो. मला चंदनाची उटी नको, किंवा या उबाऱ्याच्या निवृत्तीकरता तो वाराही नको. कारण माझे शेजारी तो श्रीहरी नसलेने मला हे सर्व शून्यच आहे. मग हा उबारा हरी शेजारी येईतो होणारच (१). ही माझे जीवातील गोष्ट तुम्हाला कशी कळत नाही. माझे अंगाचा दाह निवारण करणारा तो एक पंढरीचा राजाच समर्थ

आहे (२). याकरता वारंवार तुम्हाला एकच सांगते की तो नंदाचा नंदन श्रीकृष्ण परमात्मा त्याला घेऊन या, पुनः पुनः घेऊन या. त्याचे वाचून माझे प्राण वाचत नाहीत. बापरखुमादेविवर विठ्ठल जो गोविंदत्वाची प्राप्ती हेच माझे अमृतपान आहे (३).

**(१७४)**

**सावळे परब्रह्म आवडे या जीवा । मने मन राणिवा घर केले ।।१।।**
**काय करू सये सावळे गोवित । आपेआप लपत मन तेथे ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* सावळी प्रतिमा । मने मनी क्षमा एक झाले ।।३।।**

सावळे परब्रह्मच या जीवाला आवडते म्हणून मनाने आपले ठिकाणीच त्या आत्मसुखाचा आस्वाद घेण्यास राजमंदिर केले (१). काय करावे ते सावळे परब्रह्म मनाला आपल्याच ठिकाणी गुंतवून ठेवते. या योगाने आपोआप मन तेथे लपते (२). बापरखुमादेविवर विठ्ठलाची जी सावळी प्रभा तेथेच मन प्रवाही होऊन ते एकरूपच झाले. भेद हा राहिलाच नाही (३).

**(१७५)**

**पैल विळाचिये वेळी । अंगणी उभी ठेलिये । येतिया जातिया पुसे । विठ्ठल केउता गे माये ।।१।। पाय रऊ जाला संचारु नवल । वेदे विंदान लाविले म्हणे विठ्ठल विठ्ठल ।।२।। नेणे तहान भूक नाही लाज अभिमान । वेधिले जनार्दनी । देवकी नंदनु गे माये ।।३।। *बापरखुमादेविवरु* जीविचा जीवनु ।माझे मनीचे मनोरथ पुरवी कमळनयनु गे माये ।।४।।**

वेळच्या वेळी पलीकडे अंगणात उभी राहून माझा विठ्ठल कोठे आहे असे येणारा-जाणारास वृत्तिरूप गौळण विचारत आहे (१). कृष्णप्रेमाने ती जो निघाली तो प्रत्येक पावलाला तिचे अंतःकरणात कृष्णप्रेमाचा प्रकर्ष झाला. वेदाने ज्याकडे लक्ष लाविले ते ती सतत विठ्ठल विठ्ठल म्हणू लागली. काय नवल सांगावे? (२). तिला तहान, भूक, लाज, अभिमान कांही राहिले नसून देवकीनंदन जो जगाला व्यापून राहिला आहे अशा त्या जनार्दन श्रीकृष्णाचे वेडच लागले (३). जीवाचा जीवन बापरखुमादेविवर आपले मनोरथ पूर्ण करतोच आहे, हीच तिची वृत्ती होऊन राहिली (४).



**(१७६)**

**निळिये निकटे कामधेनू मोहरे । निळेपण सरे निळे नभी ।।१।।**
**घुमत घुमत निळेमाजी यातु । निळेपणी देतु क्षेम कृष्णी ।।२।।**
**निळिये सागरी निळे निळेपणे सुंदरी । रातलीसे हरी विरहिणी ।।३।।**
***ज्ञानदेव* सांगे निळियेचे बागे । निळा संगे वोळले गे निळी माजी ।।४।।**

ज्याचा निळेपणा-नीलवर्ण-आकाशापर्यंत जाऊन पोचला आहे अशा प्रकारचे पृथ्वीवरील निळे तृणांकुर पाहून ज्याप्रमाणे कामधेनूला आनंद होतो (१), त्याप्रमाणे अनुहताचे ठिकाणी जो नीलवर्ण साक्षात्कार आहे त्याच नील प्रकाशाने युक्त अशा या वृत्तिमय गोपी त्या ठिकाणी आलिंगन देत आहेत (२). नीलवर्ण स्वरूपाचे सागरात त्या गोपी आपल्या स्वतःचे निळेपणाने क्रीडा करताना शोभू लागल्या (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात त्या नीलवर्ण परमात्म्याचे दृश्यात मी नीलवर्णाने, त्या नीलवर्णाशी समरस झाल्याने ही प्रचीती आली (४).

**(१७७)**

**मन मुरडोनि घातले मनाते । थोर मारू तेथे होत असे ।।१।।**
**पुरे पुरे वो आता जिणे ते केऊते । येणे वो पंढरीनाथे वेधियेले ।।२।।**
**न चले न चले कांही करणे काना न । याचे पाहणेचि विंदान कामानिया ।।३।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलासी भेटी । संसारासी तुटी जाली गे माये ।।४।।**

मनाला अंतर्मुख करून जो आत्मरूपाचे ठिकाणी घातले तेथे त्या मनाला थोर मार बसत आहे की ज्या योगे मनाचे मनत्वच रहात नाही (१). आता खरी पूर्णता झाली. या ठिकाणी जिवंत रहाणेही उरले नाही मग मरण्याची गोष्टच नको. अशाप्रकारे या पंढरीनाथाने मला आपल्या रूपाचा वेध लाविला (२). ज्या परमात्म्याला पहाण्याची इच्छा राहिली त्यापुढे दृश्य पदार्थाची इच्छा करणे असा मनाचा व्यापार चालतच नाही (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाची भेट झाल्याने माझी व संसाराची ताटातूट झाली (४).

**(१७८)**

**निळियेच्या निशी विरहिणी पिशी । शेज बाजे कैशी अटळ शेजे ।।१।।**

**कृष्णसंगे वाली विव्हळ जाली निळी । चंदन अंगी पोळी विरह ज्वरे ।।२।। ज्ञानदेव प्रेम निळा रूप रूपसे सोहळा । *कृष्णवेधे* वेधली वो बाळा लाभली वसे ।।३।।**

नीलवर्ण परमात्म्याचे साक्षात्काराचे बाबतीत जो अंधार पडला त्याचे अनुभूतीने परमात्मवियोगावस्थेत विरहाने तिला समाधी अवस्था प्राप्त होणे शक्यच नाही (१). मग ती परमात्मविरहाने विव्हळ झालेली जीवनवृत्ती परमात्म्याचे ध्यासाने नीलप्रकाशयुक्त नीलवर्ण झाली. तिला मग चंदनाची उटी केली तरी विरहज्वराने तिचे अंगाची आगच होऊ लागली (२). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात या नीलवर्ण परमात्म्याचे प्रेमाचा सोहळा काय सांगावा? कृष्णाचा वेध लागून ती गोपी कृष्णप्रेमाने वेडी होऊनच राहिली (३).

**(१७९)**

**गुणाचेनि आरोपे आकारिले ब्रह्म । भक्त भाग्य सम आले मूर्ती ।।१।।**
**चैतन्य परिपाठी ठसा घडलासे साकार । कृष्णाची आकार गोकुळी रया ।।२।।**
**त्या रूपे वेधिले काय करू गे माये । नाम रूप सोय नाही आम्हा ।।३।।**
**सबाह्य सभोवते चतुर्भुज सावळे । सर्वभूती विवळे कृष्णरूपे ।।४।।**
**हरपले आकार कृष्णची क्षरला ।वेदासी अबोला श्रुती सहित ।।५।।**
**ऐसे परब्रह्म सावळे दैवत आमुचे । आता आम्हा कैचे क्रिया कर्म ।।६।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु दैवत । मन घर तेथे चरणी केले ।।७।।**

भक्त जे जीवनाचे समत्वाचे भाग्याने भाग्यवान झाले तोच सकाराचे गुणाने युक्त असे ब्रह्म सगुण साकार झाले (१). चैतन्याचा ठसा यथाक्रम घडला तो साकार झाला; तोच श्रीकृष्ण (पाण्याचे बर्फ व्हावे त्याप्रमाणे) गोकुळात आकाराला आला (२). त्या रूपाने मला वेधून घेतले याला काय करावे? त्यामुळे नामरूपात्मक दृश्य पसारा नाहीसा झाला. हे दृश्य माझे चित्तातून निघून गेले. ही सोय ती व्यवस्था आम्हाला राहिलीच नाही (३). अंतर्बाह्य सभोवती चतुर्भुज सावळ्या स्वरूपाचा साक्षात्कार झाल्याने सर्व भूतमात्राचे ठिकाणी कृष्णरूपच प्रकर्षाने उदित होत असलेले



दिसून आले (४). आकार हे उरलेच नाहीत, का कृष्णच क्षरत्वाने लक्ष्य होत आहे. ज्या ठिकाणी वेदही कुंठित झाले (५). असे हे सावळे परब्रह्म आमुचे दैवत असल्याने आता आम्हाला क्रिया, कर्म हे कांही राहिलेच नाही (६). बापरखुमादेविवर विठ्ठल हेंच दैवत असून त्याचे चरणाचे ठिकाणीच माझ्या मनाने घर केले (७).

**(१८०)**

**सावळी प्रतिमा घेऊनि सकुमार । खेळत सुंदर गोकळी रया ।।१।।**
**त्या रूपे वेधिले काय करू माय । अवघे निर्गुण होय पाचारिता ।।२।।**
**मीपणा ठाव नुरेचि पै सर्वथा । प्रपंचाची कथा ब्रह्म जाली ।।३।।**
***बाप निवृत्तिराजे* दावितीती खुणा । नाम नारायणा पाठ कीजे ।।४।।**

सावळे सुकुमार रूप घेऊन गोकुळात भगवान श्रीकृष्ण खेळत आहे (१). त्या रूपाने मला वेधून टाकले. काय करावे? त्याला जर बोलवावे म्हटले तर तोच माझ्या सकट सर्वासकट निर्गुण होतो (२). मीपणाचा जेथे ठाव ठिकाणाच रहात नाही मग प्रपंचाची ती कथा काय? प्रपंच ब्रह्मरूपच होतो (३). ज्यांनी नारायण नामाचाच पाठ केला असे वडील श्रीसद्गुरु निवृत्तिनाथच या खुणा दाखवितात (४).

**(१८१)**

**आजी शुभ लवे लोचनु हरिखे सांगताहे शकुनु स्वप्न देखिले सुंदरी । अलंकार लेववा चंदनच विजातिजुति पार्या तिकेशेवती करा आईती सेजारी । शेला काढा मेचुचा हा दिन दैवाचा । सोहळा तो आमुचा मंदिरी गे माये ।।१।। गुढिया उभारा मखरे श्रृंगारा । भेटी होईल आळंगी । स्फुरण आले बाही । क्षेमालागी पाही । काचोळी न समाये अंगी गे माये ।।२।। जिवी जीव सुंदर त्याचेनी साचार तो मज भेटवा सुखाचा विसावा । सुमने उकलली नित्य दे माळी । उचित करी तया भावा । आजी वेळु का बोलाविला नेणो पंथी सीणला बुझावु जाऊ त्याच्या गावा गे माये ।।३।। ह्रदयी निर्भर प्रेम वोरंवार माझे चित्ती राहो ऐक्य मज । दुजिये वस्तुलागी रूत जाय माधवी मन्मथ करिता हे वोज । ऐसी तेथ वरी जाईन सुखाची होईन नाचेन आनंदाचे**

**भोजे गे माये ।।४।। ऐसा विपरीत लाघवी लपे सवेचि दावी वासिपे चौके । अभ्यासे अंतर पडले येणे तरी मी त्यजीन जिणे म्हणोनि विनवितसे चतुर सुरेखे । रात्रीचे ठायी देख मेघश्याम बोलला अंबरी गे माये ।।५।। ऐसिये निवांत मूर्ती ऐकोनी ठेली श्रुती । आकर्षोनी चित्त चैतन्य भरोनी ठेले लोचन । ध्यानी विसर्जिले मन परमात्मया रामा तू एक लाघवी सावेव पावले ज्ञान । *बापरखुमादेविवरा* विठ्ठला सुमन संयोगी आजी सत्य झाले माझे स्वप्न गे माये ।।६।।**

आज माझा शुभ शकुन दाखविणारा डोळा लवत आहे. तो मला आनंदाने जणू शकुनच सांगत आहे. तोच हे सुंदरी मी एक स्वप्न पाहिले. माझ्या अंगावर अलंकार, घाला, चंदनाची उटी लावा. जाई, जुई, पारिजातक, शेवंती पुष्पांची सेज तयार करा. माझ्या अंगावर घेण्याचा शेला काढा. हा दिवस आमच्या भाग्याचा आहे. श्रीकृष्ण परमात्मभेटीचा सोहळा आमचे मंदिरात होणार आहे असे मी मैत्रिणीला म्हणत आहे (१). याकरता तुम्ही गुढ्या उभारा, मखर श्रृंगारा, आज परमात्म्याची भेट होईल. मी त्यास आलिंगन देईन. पहा, त्याला आलिंगन देण्यासाठी माझे बाहू स्फुरण पावत आहेत. ही पहा अंगातील काचोळी अंगात मावेनाशी झाली (२). जीवाच्या ठिकाणी सुंदर जीवपणा त्याच्याचमुळे असून तो सुखाचा विसावा मला भेटवा. ही वृत्तिभावांची फुललेली फुले श्रीकृष्ण माळीच नित्य देत आहे. आज त्याने यावयास वेळ का बरे लावला? का येता येता वाटेत त्याला शीण झाला. काहीच कळेना. त्याचे गावालाच आपण जाऊ आणि त्यालाच विचारू म्हणजे झाले. चला आता (३). माझे ह्रदयात त्याचे आत्यंतीक प्रेम असून चित्तात त्याचे प्राप्तीचे साधन जे चिंतन ते चालू आहे. नेहमी त्याचेशी ऐक्य असावे असे वाटते. दुसरीकडे कोठे चित्त जातच नाही. का ते माधवाचे ठिकाणीच रूतून घट्ट बसले आहे. हीच एक माझे अंतःकरणात इच्छा आहे. या दृष्टीने मी अशीच तेथपर्यंत जाईन. सुखाची म्हणजे त्याचीच होईन आणि त्या आनंदाचे भरात मी त्याचे पुढे नाचेन (४). या श्रीकृष्ण परमात्म्याचे लाघव विचित्र आहे. क्षणात दिसतो क्षणात लपतो. क्षणात भीती उत्पन्न होऊन अंतःकरणच भीत



होऊन जाते. असे त्याचे प्राप्तीकरता प्रयत्न करूनही त्याचेशी अंतर पडले तर मी या जीविताचाच त्याग करीन. याकरता त्याची प्राप्ती व्हावी म्हणून तुम्हा चतुर वृत्तींना मी विनवीत आहे. रात्रीच्या वेळी तो मेघश्याम आकाशात काहीतरी बोललाही आणि काय सांगू? (५). अशी ही नादरूप मूर्ती तो नाद ग्रहण करू(न) वेदही निवांत राहिले. त्याने चित्ताचे माझे आकर्षण करून चैतन्य रूपाने तो माझे डोळ्यात भरून राहिला आहे. ध्यानावस्थेत मनाचे विसर्जन झाले. परमात्मा रामा, तूच एक या जगात लाघवी आहेस, हे मूर्तिमंत मला ज्ञान झाले. बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी माझे सुमनाचा संयोग होऊन माझे स्वप्न खरे झाले गं बाई ! (६)

### (१८२)

**त्रिभुवनीचे सुख पहावया नयनी । दीन रात्री धणी न पुरे माझी ।।१।।**
**विटेवरी सावळा पहाता पैं डोळा । मन वेळोवेळा आठवितु ।।२।।**
**सागरी भरीते दाटे तैसे मन उल्हाटे । वाट पाहो कोठे तुझी रया ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* पूर्ण प्रकाशला । कुमुदिनी विकासला तैसे जाले ।।४।।**

त्रिभुवनीचे सुख डोळ्याने पहात असताना रात्रंदिवस पाहूनही मनाची तृप्ती होत नाही (१). विटेवर असणारा हा सावळा डोळ्यातच बसला असून मन वेळोवेळी त्यास आठवतच रहाते (२). सागरास भरती यावी तसे मन उल्हासाने दाटून जाते. आता तुझी कोठे म्हणून वाट पाहू? (३). बापरखुमादेविवर विठ्ठल कमलिनी विकसित व्हावी असा पूर्णत्वाने प्रकाशला आहे (४).

### (१८३)

**मायबापे आमुची विठोबा रखुमाई निजाची । त्याचिये गावीची कोण्ही येतु न्यावया ।।१।। माझा विसावा माहेर वो पंढरपूर ।।ध्रु।। ऐशी वाट पहातसे जरू । ये सासुरा आमुची बहु वाहरु । काम-क्रोध मद मत्सरू । मज आटती दीरू ।।२।। अहंकार खेदिताहे भावा । दंभ प्रपंच या जावा । येरु न येरा घालिती हेवा । आपुल्यासवा ओढितसे ।।३।। आवो चिंतवोही निके वोढाळे । तुज मज ठायीचे वेगळे । वोढुनी नेसी आपुल्या बळे । तुझ्या सळे नांदतसे**

**।।४।। आशा लागलीसे सर्पिणी । ग्रासू पाहातसे पापिणी । रामनामाचिया ध्वनी । आईको नेदी श्रवणी ।।५।। माझे सत्व बळा रथी । धीरु धर्मू हा सांगाती । संती सांगितले निवृत्ती । तरी मी जीवे वाचलिये ।।६।। ऐसी दगदगल्ये सासुरवासा । विठोरखुमाई माझा कुवासा । *निवृत्तिदासु* तयाचा । जन्मोजन्मी वोळंगणा ।।७।।**

आमुचे निजत्वाचे मायबाप विठोबा रखुमाई असून त्याचे गावचे आम्हास कोणी न्यावयास येतील काय? (१). माझा विसावा आणि माहेर हे पंढरपूरच आहे (ध्रु). अशी जर वाट पहावी तर सासरी आमचा फारच जाच होत आहे. काम, क्रोध, मद, मत्सर हे दीर चांगली माझी आटणीच करताहेत (२). अहंकार हा माझे ठिकाणी जो भाव त्याला मला खेद करणेचा प्रसंग आणतो. अहंकारासी पोषक असणाऱ्या वृत्ती माझा हेवा करून आपल्या बरोबर मलाही खेचतात (३). ही चिंता तर खरोखरी ओढाळ आहे म्हणून तुझे व माझे हे वेगळेच आहे. तेव्हा तू जर आपल्या बळाने ओढून नेसील तरच बरे, नाहीतर या चिंतेच्या जाचात मी नांदतेच आहे (४). आशा सर्पीण माझे मागे लागली असून ती पापीण मला गिळू पहात आहे. रामनामाचा ध्वनी तर ती कानाने ऐकूही देत नाही (५). माझे बळ काय ते सत्त्व व धर्म मोठ्या धीराने सांगाती आहे. त्यामुळे संतानी जे निवृत्तीचे वर्म सांगितले त्या योगानेच मी वाचले आहे (६). अशा सासुरवासाला मी फार दगदगले. विठ्ठलरखुमाई हेच काय ते माझे विश्रांती स्थान. त्याची जन्मोजन्मी सेवा करणारे श्रीनिवृत्तिनाथ, त्यांचा मी दास आहे (७).

**(१८४)**

**पंढरीचा नीळा लावण्याचा पुतळा । विठा देखियेला डोळा बाईये वो ।।१।।**
**वेधले वो मन तयाचिया गुणी । क्षणभर न विसंबे विठ्ठल रुक्मिणी ।।२।।**
**पौर्णिमेचे चांदणे क्षणक्षणा होय उणे । तैसे माझे जिणे एका विठ्ठले विण ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलुचि पुरे । चित्त चैतन्य मुरे बाईये वो ।।४।।**

पंढरपुरातील निळा लावण्याचा पुतळा जो विठोबा तो मी डोळ्यात पाहिला



(१). माझे मन त्याचे गुणाचे ठिकाणी वेडावल्यामुळे मी या विठ्ठल रुक्मीणीला क्षणभर विसंबत नाही (२). पौर्णिमेचे चांदणे क्षणाक्षणाला कमी होते, तसे माझे विठ्ठलावाचून आयुष्य झुरणीला लागत आहे (३). बापरखुमादेविवर विठ्ठलच एक मला पुरे आहे, का त्या चैतन्यातच माझे चित्त सारखे मुरून लय पावत आहे (४).

**(१८५)**

**पैल तो गे काऊ कोकताहे । शकुन गे माये सांगताहे ।।१।। उड रे उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ । पाहुणे पंढरी रावो घरा कै येति ।।२।। दही भाताची उंडी लावीन तुझ्या तोंडी । जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी ।।३।। दुधे भरूनी वाटी लावीन तुझे वोठी । सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ।।४।। आंबया डाहाळी फळे चुंबी रसाळी । आजिचे रे काळी शकुन सांगे ।।५।। *ज्ञानदेव* म्हणे जाणिजे ये खुणे । भेटती पंढरी राणे शकुन सांगे ।।६।।**

पलीकडे तो कावळा कोकू करत आहे. तो काही शकुन सांगत आहे असे वाटते (१). उड रे उड, तू काऊ, तुझे पाय मी सोन्याचे मढवीन पण येवढे मात्र सांग की पंढरीनाथ पाहुणे माझे घरी कधी येतील (२). दही भाताची उंडी करून तुला खाऊ घालीन पण जीवाला ज्याची अत्यंत गोडी आहे त्याची प्राप्ती केव्हा होईल ते लवकर सांग (३). दुधाने भरलेली वाटी तुझ्या ओठाला लावीन पण तो विठोबा घरी येईल काय हे खरे सांग (४). आंब्याच्या ढाळीला आलेली ही रसाळ फळे तू चाख पण आजच्या वेळी मला शुभ शकुन सांग (५). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात या खुणेने तू काय जाणावयाचे ते जाणून पंढरीराजे भेटतील असा शकुन सांग (६).

**(१८६)**

**सुखाचिये गोठी सुख आले भेटी । तया लाभासाठी जीव वेचिला गे माय ।**
**तव अवचित सगुणरुप भरलेसे नयनी । बोलता अंगणी म्यावो देखियेले ।।१।।**
**जीवाचा जीऊ माझा भेटवा यादवराणा । उचलल्या चारी भुजा देईल क्षेम ।।२।।**
**न करा उपचार न रंगे हे मन । दृष्टी पुढे ध्यान ठसावले ।**

**आवडी गिळूनी येणे सुख विहरोनी ठेले । चित्त माझे गोविले गोवळेनी ।।३।।**
**आता भरोवरी उरविता नुरे उरी । आनंदे अंतरी कान्हो संचारला ।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठल निर्गुण । तो सुखाची साठवण गिळुनी ठेला ।।४।।**

सत्‌चिदानंदाच्या गोष्टी बोलत असता ते सुखच प्राप्त झाले. तसा प्रत्यक्ष लाभ व्हावा म्हणून जीवभावही खर्ची घातला. तोच एकाएकी सगुणरूप माझे डोळ्यातच भरले. अंगणात म्हणजे ॐकाराचे प्राकारात माझ्याशीच ते बोलत आहे हे मी पाहिले. माझ्या जीवाचा जीव तो यादवांचा राजा मला भेटवा. आपले चारी हात उचलून तो मला आलिंगन देईल असे करा (२). दुसरे उपचार मला नकोत. त्यात माझे मन रमत नाही. माझ्या दृष्टीपुढे त्याचे सारखे ध्यान ठसावले आहे. आवडीचा ग्रास करून त्याने या विरहावस्थेत मला ठेवले आहे. माझे चित्त मात्र आपले ठिकाणी आकर्षून घेतले आहे (३). आता दुसरे प्रयत्न नकोतच. कां ? आनंदाने माझे अंतरात श्रीकृष्णाचाच संचार झाला आहे. बापरखुमादेविवर विठ्ठल जो निर्गुण आहे तो माझी सुखाची साठवण ग्रासून उरला आहे (४).

**(१८७)**

**घनु वाजे घुण घुणा । वारा वाजे रुणुझुणा । भवतारकु हा कान्हा । वेगी भेटवा का ।।१।। चांदवो चांदणे । चापे वो चंदनू । देवकीनंदनुवीण नावडे वो ।।२।। चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी । वेगी भेटवा का ।।३।। सुमनाची सेज । सीतळवो निकी । वोले आगी सारिखी । वेगी विझवा का ।।४।। तुम्ही गातसा सुस्वरे । ऐकोनि द्या उत्तरे । कोकिळे गर्जावे । तुम्ही बाईयानो ।।५।। दर्पणी पाहता रूप न दिसे आपुले । *रखुमादेविव*रे विठ्ठले । मज ऐसे केले ।।६।।**

मेघनाद होत आहे. वारा झुळझुळ वहात असून त्याचा रूणझुण ध्वनी होत आहे. अशा स्थितीत जीवनाचे आवेगात भवतारक श्रीकृष्ण भेटवा की (१). चंद्राचे चांदणे, चंदनाची चोळी माझे सर्व अंगाची आगच करीत आहे. तो कान्हा वनमाळी मला लवकर भेटवा ना (३). ही पुष्पशय्या शीतळ खरी पण ती आगच आहे. मला जीवनाचे वेगात आणून ती विझवा तरी. तुम्ही मला कोकिळेचा पंचम आलाप ऐकवत आहात तरी तो परमात्म्याचे अनहत नादाशिवाय मला वर्ज्यच वाटतो (५). आरशात पाहूनही मला आपले रूप दिसतच नाही. बापरखुमादेविवर विठ्ठलाने मला असे वेडेच करून ठेविले आहे (६).



**(१८८)**

**जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा । तुज वाचुनी केशवा अनु नावडे ।।१।।**
**जीवे अनुसरलिये अझुनी का न ये । वेगी आणावा तो सये प्राणु माझा ।।२।।**
**सौभाग्य सुंदरु लावण्य सागरु । *बापरखुमादेविवरु* श्रीविठ्ठलु ।।३।।**

सर्व जीवांच्या जीवा, प्रेमभावाच्या भावा, केशवा, तुझ्यावाचून मला दुसरे कांही आवडत नाही (१). जीवभावाने अनुसरूनही अजुनी तो केशव का येत नाही. जीवनाचे आवेगात त्या प्राणाला, हे वृत्तीनो, तुम्हीच आणा (२). सर्व सौभाग्य ज्याचे ठायी आहे असा तो सुंदर लावण्याचा सागर बापरखुमादेविवर श्रीविठ्ठलच आहे (३).

**(१८९)**

**मी माझे म्हणता ठकचि ठेलिये । आपुले जातीकुळ विसरूनी गेलिये ।।१।।**
**गुणाचा दुकाळ पडिला देशी । निर्गुणासी कैसी रातलिये ।।२।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु सये । सेजारासी न ये काय करू ।।३।।**

मी माझे म्हणावे असे आता कांही शिलकीलाच राहिले नाही. आपुले जातिकुळ तर मी परमात्म-अनुभूतीने विसरूनच गेले (१). ज्या देशात गुणाचा दुष्काळच झाला आहे, गुण उरलाच नाही, अशा निर्गुणाचे ठिकाणीच माझे कसे तादात्म्य झाले आहे (२). बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल सगुणत्वाने-सकाराचे गुणाने-माझे शेजारी येत नाही याला काय करावे ? (३).

**(१९०)**

**अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु । मी म्हणे गोपाळु आला गे माये । चांचरती चांचरती बाहेरी निघाले । ठकचि मी ठेले काय करू ।।१।। मज करा कां उपचारु अधिक ताप भारु । सखिये सारंगधरु भेटवा कां ।।ध्रु।। तो**

**सावळा सुंदरु । कासे पीतांबरु । लावण्य मनोहरु देखियेला । भरलिया दृष्टी जव डोळा न्याहाळी । तव कोठे वनमाळी गेला गे माये ।।२।। बोधुनि ठेले मन तव जाले आन । सोकोनि घेतले प्राण माझे गे माये । *बापरखुमादेविवरु* विठ्ठल सुखाचा । तेणे काया मने वाचा वेधियेले ।।३।।**

सुंगधित शीतळ वाऱ्याची सहज स्थितीत झुळुक आली. तो असे वाटले की हा गोपाळच आला आहे. म्हणून त्याला पाहणेसाठी चाचरी मुद्रेने बाहेर आले तो मी ठकलेच, काय करावे? (१). मला शांत वाटावे म्हणून, तुम्ही इंद्रिय वृत्तीनो, जे उपचार करता त्यामुळे अधिक संतापच होतो. मला तो युक्तीने शारंगधर आणून भेटवा (ध्रु). तो सावळा सुंदर कंबरेला पीतांबर नेसलेला लावण्याचा आगरच, मनाचे हरण करणारा पाहिला. तोच दृष्टीत भरलेल्या डोळ्याने निरखून पाहताच तो वनमाळी कोठे दृष्टीआड लपला कोणास ठाऊक. (२) माझ्या मनाला त्याने जो बोधस्थितीत आणले तो कांही दुसरेच झाले. माझे प्राणच त्याने शोषण करून घेतले. सुख ठेवा बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल, त्याने माझे शरीर, मन आणि वाणी वेधूनच घेतले (३).

**(१९१)**

**पेंढारा दाऊनिया थोकसी ।देखिलेपण केवी जाये अंग लपविसी ।तरी वेधा काय करिसी ।मा शहाणपण तुझे नव्हे रे गोवळा ।।१।।ए आम्ही येकवीध जीवे तुवा केले आधातु रे । वर्षावो वोसरलिया वोल्हासु जाय । तैसी न होत प्रेमळ उखरे गोवळा ।।२।। देठी गुंफलिया फुले डाळलिया आहाच तव काही न दिसे रे । परी घ्राण इंद्रियांच्या अंगसुखा समर्थ कोण असे रे गोवळा ।।३।। या बोला मानवोनी *बापरखुमादेविवरे* विठ्ठले दिधले आप आपणियाते । तैं पासुनी ते लपणेची पारुषले उभा पंढरिये येणे वेषे रे गोवळा ।।४।।**

तुला दृश्य दाखवून संतोष होतो. पण तुझ्या अंग लपविण्याने हे दृश्य कसे जाते. या वेधाने जे तुझे ज्ञान होते याला तू काय करशील. तू लपलास की दृश्य जाते व प्रगट झालास की ते उरतच नाही. हे कळल्यावर तुला पळावयास मार्ग कोठे आहे? अशाही स्थितीत आता तुझे हे लपणे खरे नव्हे बरे, कृष्णा (१). आम्ही तुझ्याशी एकविध



जीव आहोत आणि तू मात्र या तुझ्या लपण्याने आम्हाला अंतराळी करू पहात आहेस. तुझ्या कृपेचा वर्षाव जर ओसरला तर उल्हास कुठला? तसे आम्ही नाही. आम्ही तुझ्या कृपेतले व प्रेमातलेच आहोत (२). झाडावर असलेली फुले काढून त्याचा हार केला तर सुंगधाच्या दृष्टीने डोळ्याला त्याचे कांही महत्त्व नाही पण घ्राणेंद्रिये अंगाने सुगंध घेण्यास समर्थ आहेत (३). हे बोलणे मान्य करून बापरखुमादेविवर विठ्ठलाने आपले आत्मरूपच आम्हाला दिले आणि तेव्हापासून त्याचे लपणेच राहिले आणि पंढरीत सगुणरूपाने हा गोवळा उभाच राहिला (४).

**(१९२)**

**याती कुळ माझे गेले हारपोनी । श्रीरंगा वाचुनी आनु नेणे ।।१।।**
**किती वो शिकवाल मज वेळोवेळा । मी तंव गोवळा रातलिये ।।२।।**
**अष्ट भोग भोगिता माते नाही चाड । भक्ति प्रेम गोड लेइले गे माये ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* जीवीचा जिव्हाळा । कांही केलिया वेगळा नव्हे गे माये ।।४।।**

याती कुळ माझे सर्व हरपून गेले. यामुळे आता श्रीरंगावाचून मी कांही जाणत नाही (१). मी तर परमात्म्याच्या ठिकाणी तादात्म्य झाले आहे मग आता मला तुम्ही वेळोवेळा शिकवाल तरी किती? (२). अष्ट भोग भोगण्याची मला, आता गोड असे भक्तिप्रेम धारणा केल्यामुळे, इच्छाच राहिली नाही (३). बापरखुमादेविवर हाच माझ्या जीवीचा जिव्हाळा असून तो आता जीवापासून काही केल्या वेगळा होत नाही (४).

**(१९३)**

**ज्याचिये आवडी संसार त्यजिला । तेणे का अबोला धरिला गे माये । पाया दिधली मिठी घातली जीवे गाठी । साऊमा नये जगजेठी । उभा ठेला गे माये ।।१।। भेटवा वो त्यासी चरण झाडीन केशी । सगुण रूपासी मी वो भाळलिये ।।२।। क्षेमा लागी जीऊ उतावेळ माझा । उचलोनी चारी भुजा देईन क्षेम । कोण्या गुणे का वो रुसला गोवळु । सुखाचा चावळु मजसी न करी गे माये ।।३।। ऐसे अवस्थेचे पिसे लाविलेसे कैसे । चित्त नेले आपणिया सरिसे गे माये । *बापरखुमादेविवरे* लावियेले पिसे । करुनिया ठेविले आपणिया ऐसे गे**

**माये ।।४।।**

ज्याची अशी आवड की ज्या योगे जीवनाचे संसरणही मागे टाकले. त्याने माझ्याशी अबोला का धरिला कोण जाणे? समचरण ओळखून मिठी मारली व जीवे पक्की गाठ केली, तरी तो जगजेठी साक्षात्काराला येत नाही. का तेथे माझेच अस्तित्व राहिले नाही (१). त्याचे सकारात्मक गुण रूपाला मी खरी भाळली आहे. त्याची कोण भेट करवील तर त्याचे पाय मी आपल्या केसाने झाडीन. त्याची मला भेट करवा (२). त्याला आलिंगन देण्याकरता माझा जीव अगदी उतावीळ झाला आहे. त्याच्या चारी भुजा उचलून त्याला केव्हा आलिंगन देईन असे झाले आहे. असा कोणता गुण मज जवळ आहे की त्यामुळे तो गोनाम इंद्रियवृत्तींना वळविणारा गोवळु मजवर का रुसला आहे कोण जाणे? सुखासाठी तो मला चावळीत नाही (३). अशा अवस्थेचे वेड मला त्याने कसे लाविले आहे. आपल्या बरोबरच त्याने माझे चित्त नेले आहे. बापरखुमादेविवर विठ्ठलाने मला वेड लावून आपल्या सारखेच मला करून ठेविले आहे (४).

**(१९४)**

**देऊनिया भेटी मजसी न करी गोठी ।लाचावला जीऊ पाठी न राहे वो । निष्ठुर म्हणो तरी अपंगी तो माते । व्यापुनी जीवाते उरी उरवितो ।।१।। तो दाखवा वो माये धरीन त्याचे पाये । तयालागी जीऊ आहे उतावेळु ।।२।। भेटीचेनी सुखे मनची होय मुके । ते रूप देखे परी बोलवेना । सगुण गुणाचा म्हणोनि घातली मिठी । तव तो आपणिया समसाठी करूनी ठेले ।।३।। चित्त चोरून नेले गोवळीने *बापरखुमादेविवर* विठ्ठले अंग लपवुनी ।काय नेणो कामाण कैसे वो जाले । चित्त चोरुनि नेले गे माये ।।४।।**

परमात्मा मला भेट देऊनही माझ्याशी गोष्टी करीत नाही. माझा जीव त्याचे ठिकाणी इतका लाचावला आहे की तेथे जीव म्हणून कोणी वेगळा रहातच नाही. आता त्याला निष्ठुर म्हणावे तर तो माझा स्वीकार करतो. मला अंतर्बाह्य व्यापून टाकतो. जीवपणा असा उरूच देत नाही (१). असा तो परमात्मा मला दाखवा हो. मी त्याचे पाय धरीन. त्याकरता माझा जीव उतावीळ आहे (२). परमात्मभेटीचे सुखाने मनाला मूकत्वच प्राप्त होते. ते रूप पाहिले तरी त्याबद्दल काही बोलता येत नाही. सकाराचे गुणाने युक्त असा तो गुणाचा गुणनिधी आहे हे जाणून त्याचे पायी मिठी घालावी तो जीवाला आपल्या समच करून ठेवितो. तीच स्थिती त्याने माझी केली आहे (३). कशी मला त्याचे दर्शनाची इच्छा झाली कोण जाणे? त्या गोधने वळणाऱ्या गोवळ्याने माझे चित्त चोरून नेले. बापरखुमादेविवर विठ्ठल याने आपले स्वरूप लपवून माझे जीव चैतन्य चोरून नेले (४).



**(१९५)**

**सुख शेजारी असता कळी जाली वो पहाता । देठु फेडुनी सेवता अरळ केले ।।१।। अंगणी कमळणी जळधरु बोले वरी । वाफा सिंपल्यावरी वाळून जाये ।।२।। मोतियाचे पाणी वाहे निलिये सारणी । सगुणाची लावणी लावुनी गेला ।।३।। अंगणी वोळला मोत्ये वरूषला । धन्य दिवसु जाला सोनियाचा ।।४।। चोरट्या मधुकरा कमळी घेतलासे थारा । मोतियांचा चारा राजहंसा ।।५।। अंगणी बापया तूं परसरे चापया । असुवी माचया भिनलिया ।।६।। वाट पाहे मी येकली मज मदन जाकळी । अवस्था धाकुली म्हणो नये ।।७।। आता येईल म्हणू गेला वेळु का लाविला । सेला जो मिनला मुक्ताफळी ।।८।। बावन चंदनु मर्दिला अंगी वो चर्चिला । कोणे सदैवे वरपडा जाला वो माये ।।९।। *बापरखुमादेविवरु* माझे मानसीचा होये । तयालागी सये मी जागी सुती ।।१०।।**

परमात्म्याचे निरुपाधि स्थितीत सेवन करीत असता शेजारी सुख असूनही आम्हा दोघात द्वैत निर्माण झाले. शेवंतीचे तोडलेल्या फुलाप्रमाणे माझी दीन अवस्था झाली (१). अंगणातील कमळांच्या झाडावर पर्जन्य पडून ती प्रफुल्लित व्हावी व त्यावर कढत पाणी शिंपताच ती वाळून जावी अशी माझी स्थिती (२). मोतियाचे पाणी= आकाशात मुक्तावस्था हीच मोती. शब्दाचा ग्रास जेथे तेथे ते पाणी वहावे. तशी सकार गुणाची लावणी जो करून गेला (३). त्याने ॐकाराचे प्राकारात आपल्या

कृपेचा वर्षाव केला. मुक्तावस्थेचा वर्षाव झाला तो खराच सोन्याचा दिवस झाला (४). चित्तचोर सूक्ष्मतम मधुकराने आधार कमलात थारा घेतला. त्यामुळे तेथे विचरणारा राजहंस यास मुक्तावस्थेचा चारा मिळाला (५). असा तूं एकदम अंतर्धान पावल्याने माझी काय स्थिति झाली म्हणून सांगू? डोळ्यातून सारखे पाणीच वाहू लागते (६). तुझ्यासारख्या मद नाहीसा करणाऱ्या मदनाची मी एकटी वाट पहात असते. ही सामान्य अवस्था म्हणू नये (७). आत्ता येतो म्हणून गेला आणि मग वेळ का लाविला हे कळत नाही. माझ्या डोळ्यातील पाण्याने, मोत्याने गुंफलेला शेला भिजून गेला (८). अति उत्तम बावणी चंदन माझ्या अंगाला थंडोसा येण्याकरीता लावला पण मला त्याचा कांही उपयोग झाला नाही. कोणा भाग्यवानाचे हाती तू सापडलास कोणास ठाऊक? (९). बापरखुमादेविवर विठ्ठल हाच एक माझे मनाचा विषय असल्यामुळे त्या ठिकाणी मी सारखी जागीच आहे (१०).

**(१९६)**

**प्रभा कळिकादीप शून्याकार हे स्वरूप । मुनिजन मानसीचे सुख येकलेपणे । बिंब अर्धबिंब अर्धमातृका तुर्या नातळे । ज्यासी भानू तो दिठी केवी धरावा । गुणातीत निर्गुणी जे सहजी सहजची सगुणी विखुरे रया ।।१।। आप आपणिया पडे माय विसरु । मज आवडे तो नंदाचा कुमरु गे माये ।।२।। म्हणोनी डोळियाचे अंजन आणि मेघश्याम बुंथीचे ध्यान । निडारले वृत्ति नयन पाहा जावो । तेथे ते अनुमते न लगे मतांतरे । भावे देखणा होय देवो रया ।।३।। डोळ्याचा डोळसु विचरे हा परेशु । तोचि परमात्मा सर्वी असे । बापरखुमादेविवरु विठ्ठलु उघडा । पुरविला सौरसु गे माये । आम्हा जिताची मरणे । की मेलिया कल्पकोटी जिणे । *निवृत्तीने* दाविले परेशु रया ।।४।।**

शून्याचे कलिकेत आत्मदीपाची पसरणारी प्रभा हाच स्वरूपाचा साक्षात्कार असून एकत्वाने मुनिजनांच्या मनाचे ते एकमेव एकच सुख आहे (१). बिंब अर्ध बिंब, अर्धमातृका जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या हे अवस्थात्मक भाव जेथे उरत नाहीत असा तो आत्मभानू दृष्टीने कसा पहावा? गुणातीत जे निर्गुण ते सहज स्थितीत सहजच



सगुणात विस्तारले आहे (१). आपला आपल्यालाच विसर पडावा असा तो नंदाचा मुलगा श्रीकृष्ण मला फार आवडतो (२). म्हणून डोळ्याचे अंजन आणि शामवर्ण स्वरूपाचे ध्यान वृत्तीच्या डोळ्यांनी वृत्तिभाव उन्मीलित होऊन पाहू जाता त्या दर्शना करता दुसऱ्या शास्त्रांच्या मतांच्या अनुमतीची आवश्यकताच रहात नाही. आपले अस्तित्वभावानेच तो देव पाहिला जातो (३). डोळ्यांचा जो डोळा, ज्यामुळे डोळ्याला ज्ञान होते, म्हणजे डोळ्याला प्रकाशित करणारा तोच परेश परमात्मा सर्व पदार्थामध्ये व्याप्त आहे. निरुपाधिक बापरखुमादेविवर विठ्ठलाने आमचे मनोगत पूर्ण केले. जीवपणा मारून कोटिकल्प ज्याने आपल्या रूपात मिळवून आमचे खरेखुरे जिवंतपण आमचे जीवनाच्या प्रकर्षाने राखले हे वर्म परमात्मरूप निवृत्तिनाथांनी दाखविले (४).

**(१९७)**

**भेटिसी गेलिये तंव तेचि जालिये । भुलली ठेलिये मज नकळे कांही । परतलिये दृष्टी जव मागुता न्यहाळी । तंव काळी ना सावळी मूर्ति चोजवेना ।।१।। काय सांगो माय न कळे तयाची सोये । येणे मनाचे मोडुनी पाये वेधियेले ।।२।। आतु बाहेरी कैसी भरले निरंगे । क्षेम देऊ गेले अंगे तंव तो जडुनि ठेला । वारिता नावरे काय सांगो माय गोठी । करूनि ठेला साठी जीवित्वेसी ।।३।। आशेचिया हावे तव तो परताचि धावे । निराशेची पावे वेळु न लागता । *बापरखुमादेविवरु* विठ्ठली उपावो । ज्ञानदेवा धावो निवृत्ति पायी ।।४।।**

परमात्म्याची अनुभूती घेण्याकरता गेले तो परमात्मरूपच झाले. अशी मला भूल पडली. काय झाले हेच कळेना. परतलेल्या अंतर्मुख दृष्टीने आपल्या जीवनाचे मागे काय आहे म्हणून जो आत्मनिरीक्षण करू लागले तो ती मूर्ती काळी कीं सावळी आहे याचा निर्णय होईना. खरे म्हणजे काही समजेचना (१). परमात्मस्वरूपाची काय स्थिति आहे कळेचना. येवढे मात्र संकल्प-विकल्प मनाचे नाहीसे करून त्याने मला वेधच लावला (२). अंतर्बाह्य त्या रंगात मी रंगून गेले. त्या स्वरूपास आलिंगन देऊ गेले तो माझ्याशी त्याचे ऐक्यच झाले. तोच काय नवल सांगावे? त्याला पलीकडे दूर

करू गेले तो जीवाहून वेगळा होईचना (३). मनात कांही व्यवहारिक इच्छा ठेविली तर तो दूर जातो आणि जेथे नैराश्य अवस्था प्राप्त झाली तेथे क्षणाचा अवकाश न लागता तो प्राप्त होतो. बापरखुमादेविवर विठ्ठल प्राप्तीचा उपाय म्हणजे श्रीज्ञानेश्वरांचा श्रीनिवृत्तिनाथांचे पायी असणारा निःसीम भावच होय (४).

## ❊ गाईच्या रूपकाने हरीचे वर्णन ❊

(१९८)

**आधी चरे पाठी प्रसवे । कैसे प्रतिदिनी गाभास जाये रे । विऊनिया वांझ जाली रे । ती उन्हाळा मासा वोळली रे कान्हो ।।१।। दुहता पान्हा न सवरे रे । पैल पर्वता सुटले झरे रे कान्हो ।।२।। मोहे चारावयाचा डेरे दोही तयावरी पडे रे । वत्स देखोनि उफराटी उडे रे । तव केलिया तिन्ही वाडे रे कान्हो ।।३।। तिही त्रिपुटी हे चरती दिस रे । तिही वाडिया वेगळी बैसे रे । *ज्ञानदेव* म्हणे गुरूते पुसा रे । ते वोळता लक्ष कैसे रे कान्हो ।।४।।**

आधीच जी पाठीत प्रसवली आणि रोजच्या रोज गाभ जाती आणि पुनः ती वांझच रहाती, ती तापत्रयात मनावर जी पान्हावून त्यास तृप्त करती अशी एक गाय आहे, रे कृष्णा (१). तिचा पान्हा दोहन करू लागले तर जी आवरत नाही, जिचे दूध पर्वताचे पलीकडे पाझरत आहे (२). मोहाने चारावयास गेले असता धार काढणारावरच जी पडते आणि वत्स पाहून जी उफराटी ऊर्ध्वगामी झेप घेते तिला रहाण्यास तीन लोक आहेत, रे कृष्णा (३) त्रिपुटीचा ती ग्रास करते आणि त्रिपुटी वेगळी होऊन ती वसते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हे गुरुंना विचारा. ती प्रसन्न झाली असता लक्ष हेच लयच पावते (४).

(१९९)

**गायी तिचे निरंजनी वाडे रे । ती सवे तिन्ही पाडे रे ।**
**तिने दैत्य मारिले कुवाडे रे । गाईचे सांगता बहुत पवाडे रे कान्हो ।।१।।**
**ते सांग पा धेनु कवण रे । तिसी नाही तिन्ही गुण रे कान्हो ।।२।।**



***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु रे । ते उभी पुंडलिकाचे द्वारी रे कान्हो ।।३।।**

एक अशी गाय आहे. ती निरंजनात वास्तव्य करते. तिला जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा अशी तीन पोरे आहेत. या त्रैलोक्य वाड्यातील तिने असुरी संपत्तिमान दैत्य सहज रीतीने मारून टाकले. अशा त्या गाईचे पोवाडे सांगावेत तेवढे थोडेच आहेत (१). ती गाय कोणती सांग; तरी तिला तिन्ही गुण नाहीत (२). बापरखुमादेविवर विठ्ठल हीच गाय पुंडलिकाचे द्वारात उभी आहे (३).

(२००)

**तिही त्रिपुटी तिचे वाडे रे । सव्वा लक्ष चरावया जाय रे ।**
**ते दैत्यापाठी हुंबरत लागे रे । भक्ता घरी दुभे सानुरागे रे कान्हो ।।१।।**
**तिचे नाम शांभवी आहे रे । तिची रूपरेखा ते काय रे कान्हो ।।२।।**
**येकी चौमुखी गाय पाहे रे । तिचा विस्तार बहू आहे रे ।**
**तिच्या नाभी कमळी जन्म वासु सांगे रे । तिसी आदिपुरुषु बाप माय रे कान्हो ।।३।।**
**ते भक्ता ओळली आहे रे । ते दोहता भरणा पोहे रे ।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु पाही रे । चारी धारा वर्षत आहे रे कान्हो ।।४।।**

त्रैलोक्यातील त्रिपुटी हे जिचे वसतिस्थान आहे व जिचेकडून रोज सव्वालक्षाची घडामोड होते, जी दैत्यांच्या मागे त्यांचा नाश करण्याकरता ओरडत धावते आणि आपल्या भक्ताघरी मोठ्या प्रेमाने दूध देते (१). जिचे नाम शांभवी आहे तिची रूपरेखा तरी काय आहे सांग पाहू (२). एक चार तोंडाची ब्रह्मदेव गाय आहे ती पहा. तिचा विस्तार फारच आहे. तिचा जन्म नाभिकमलस्थानी असून आदिपुरुष परमात्माच जिचा मायबाप आहे (३). बापरखुमादेविवर विठ्ठल पहा. ती भक्ताला मोठ्या प्रेमाने पहाते. तिचे दुधाने तृप्त जीव आनंदाने भवाब्धीत पोहतात, ते मुक्त होतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशा चारी धारांनी ती अमृताचा वर्षाव करते. (४)

(२०१)

**काळी कोसी कपिला धेनू रे । तिचे दुभते काय वानू रे । तिसी बापमाय दोन्ही नाही रे । ते असक्रिया वेगळी पाहे रे कान्हो ।।१।। ती अखरीच चरे रे । सर्व**

**साक्षी वरती जाय रे कान्हो ।।ध्रु।। पैल येकी सहस्रमुखी रे । तिहीहूनी येकी आहे रे । तिची नांवे अनंत पाहे रे । तिसी बाप माय कोण रे कान्हो ।।२।। *बापरखुमादेविवरु* विठ्ठली पाहे रे । ते पुंडलिकाचे द्वारी जाय रे । तिचे दुभते अपरंपार रे । ते दुभते सहस्रधारी रे कान्हो ।।३।।**

एक काळी कपिला गाय आहे. तिचे दुभते काय सांगावे? तिला आई, बाप दोन्ही नाहीत. ती असक्रिया म्हणजे सर्वापेक्षा निराळीच आहे (१). ती अखरी म्हणजे आपल्या चरणाच्या ठिकाणी चरत आहे. तसेच ती सर्वसाक्षी असून ऊर्ध्वगामी आहे (ध्रु). पलीकडे सहस्रमुखी अशी एक गाय आहे आणि एक तिन्ही गुणांहून वेगळी निर्गुण आहे. तिचे नांव अनंत आहे. तिचे आईबाप कोण सांग पाहू? (२). ती गाय बापरखुमादेविवर विठ्ठल असून पुंडलीकाचे द्वारी जाते. तिचे दूध अपरंपार असून हजारो धारांनी दूध देत आहे (३).

**(२०२)**

**आगरीचे क्षीरसागरी पैल डोंगरी दुभते गाय रे ।**
**दोहो जाणे त्याचे दुभते जे वित्याची मेली माय रे ।।१।।**
**कान्हो पाहाले रे कान्हो पाहाले रे नवल विपरीत कैसे ।**
**जाणत्या नेणत्या झांसा पै चतुरा लागले पिसे ।।२।।**
**पाणियाने विस्तव पेटविला । वारियाने लाविली वाती ।**
**आपे आप दीप प्रकाशला । तेथे न दिसे दिवसराती ।।३।।**
**खोकरी आधन ठेविले । तेथे न दिसे माझी भाक ।**
**इंधनावीण पेटविले तेथे चुली नाही राख ।।४।।**
**जाणत्या नेणत्या झांसा पैल चतुरा बोलिजे ह्याळी ।**
**निवृत्तिप्रसादे *ज्ञानदेव* बोले ढिवर पडिले जाळी ।।५।।**

क्षीरसागराचे आगरा पलीकडे एक दुभती गाय आहे. याचे दोहन कसे करावे हे जो जाणतो त्याची माया जी अविद्यात्मक आई, ती खलासच होते (१). हे एक मोठे विपरीत नवल आहे. ज्यांनी या कृष्णाला पाहिले तेथे जाणते नेणते किंवा त्या पलीकडे



गेलेले कोणीही चतुर असोत, त्यांना याचे वेडच लागले (२). जेथे जीवनाने उबारा निर्माण केला, वाऱ्याने आयुष्याची वात लावली, आपोआप आत्मदीप प्रकाशला तेथे दिवसरात्र उरलेच नाहीत (३). फुटक्या चुलीवर आधण ठेवले. लाकडा वाचून विस्तव पेटविला. तेथे चूलहि नाही. व राखही नाही. तेथे माझे असे कांही उरलेच नाही (४). जाणते नेणते व त्या पलीकडचे चतुरही ह्या गाईच्या ह्याळी म्हणजे घोटाळ्यात गोंधळात पडले आहेत. श्रीनिवृत्तिनाथांचे कृपेने श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हे सर्व जीव कोळ्याचे जाळ्यात (मायेत) सर्व सापडले आहेत (५).

**(२०३)**

**साई खडियाते देखोनिया माते । तैसा संसाराते येत रमा ।।१।।**
**सोय ध्यान उन्मनी पाचांची मिळणी । सतरावीची कानी गोष्टी सांगे ।।२।।**
**दुभोनिया खडाणी नैश्वर्य ध्यान गगनी । चेतलिया मन क्षीर देत ।।३।।**
**ज्ञानदेवी समभाव त्रिगुणी नाही ठाव । आपेआप राणीव साई खडीया ।।४।।**

साई खड्याचा खेळ पाहून संसारात जीव माग येतो तो तसाच येतो व साई खड्याप्रमाणेच संसारही खोटाच आहे असे मला दिसते (१). ध्यानाचे सोईने पाचवी अवस्था उन्मनी पंचमातृकांचे मिळणीने साधली असता सतरावी जीवनकलेची गोष्ट अनहत ध्वनीने कानात प्रतीत होते(२). आकाशात दुभणारी गाय आकाशापलिकडे, ऐश्वर्य ज्याचे मूळे असे, ते ऐश्वर्यविरहित निरुपाधिक ध्यान प्रगट झाल्याने मनाला ब्रह्मानंद देते (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात या ठिकाणी समभाव असलेने त्रिगुणाला ठावठिकाणाच रहात नाही. आत्मस्वरुपाचे ऐश्वर्य साई खड्यातील बाहुल्या प्रमाणेच एकविध जीवाला प्राप्त होते (४).

**(२०४)**

**काय करिसी सकळ देवांचे वैभव विलास ।**
**माझिया स्वामिवीण ते अवघे उद्वस रया ।।१।।**
**तपन त्या कमळाकमळी विकासु ।**
**सुकवी मयंकु काय करिसी अरे बा सुधांशु ।।२।।**

**साताही बारांचे दिवसु एकियाचि सुरिजे ।**
**तैसे सर्वी सर्वपण माजीये न श्रीराजे ।।३।।**
**सर्वज्ञ सुंदर देव होतु का कल तैसे ।**
**परी जडाते चेष्टविते आणिका पै नसे ।।४।।**
**जया नाव नाही रूप चिन्ह कांही ।**
**नामरूप चिन्ह स्वयेचि पाही ।।५।।**
***बापरखुमादेविवरु* आहे तैसाचि पुरे ।**
**काय करिसी आणिका देवांची गोवारे रया ।।६।।**

सर्व देवांचे वैभव, विलास घेऊन काय करावयाचे? माझ्या स्वामीवाचून हे सकळ देव व्यर्थ आहेत (१). सूर्यविकासिनी सूर्य प्रकाशानेच विकास पावते, चंद्रोदय झाला की ही फुले मिटतात. मग तो चंद्र अमृतांश जरी असला तरी त्याचा काय उपयोग? (२). वारांचे दिवस सात असले तरी सर्वात सूर्यच तेजस्वी असतो. बाकीचे ग्रहांचे जरी वार असले तरी प्रकाशाचे दृष्टीने त्याचा काय उपयोग? आदितवाराचे पुढे ते निस्तेज आहेत (३). बाकीचे देव कितीही सुंदर सर्वत्र असोत. जडाला चेष्टविण्याचे सामर्थ्य त्यात नाही, ज्याला नामरुपादि कोणतेही चिन्ह नाही (४). ज्याचे नामरूप हे स्वरूपच स्वतःसिद्धच आहे. नाम हेच रूप व रूप तेच नाम हे ज्या स्वरूपात प्रतीत होते (५). बापरखुमादेविवर विठ्ठल तो जसा आहे तसाच तो आम्हास पुरे आहे. बाकीच्या देवांची म्हणजे गुरांची भरती आम्हास काय करावयाची?

**(२०५)**

**पूर्व दिशे भानू उगवला नयनी । कमळणी कमळी विकासु केला । उष्णकरु अस्तु जाला सीतकरू । प्रवर्तला कमळणी । संकोचु केला गे बाई ये ।।१।। पढियंते मानसी बहु वसे । असे दुरी वे जवळीच वसे रया ।।२।। दो लक्षी सोम अंबरी । त्याचे गुण उमटती सागरी । आवसे कळाहीनू येरू दिसे अंधारी । तै समंधु ये शरिरी रया ।।३।। गगनी वोळली वनुचरे । तेणे क्षितीवरी नाचती मयुरे । सोम शीतपणे कळा मिरवी । अमृत घेवो जाणती चकोर रया ।।४।। वोळली स्वातीची अंबुटे । ते तत्त्व झेलती शुक्ति का संपुष्टे । येरे नक्षत्रे वरुषती निकटे । काय जळ तयाचे वोखटे रया ।।५।। चातकु चंद्राते चिंतितु । तो तयाचे मनोरथ पुरवितो । *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु । तो मी सदा असे हृदयी ध्यातु रया ।।६।।**



पूर्व दिशेस जो सूर्योदय झाला तो नीलवर्ण कमळे विकसित झाली. सूर्यास्त होऊन जो चंद्रोदय झाला ती कमळे मिटली (१). पुष्कळ प्रकाराने मनात विचार करणेसारखी गोष्ट आहे. जे दूर आहे असे वाटते ते जवळच असते. (२) शुद्ध वद्य पक्षांत चंद्र आकाशातच असतो पण त्याचे गुण भरतीओहटीमुळे समुद्रात उमटतात. अवसेच्या दिवशी तो कलाहीन असतो आणि इतर दिवशी तो अंधारातही प्रकाशतो. तसेच या शरीरातही आत्मानुभूतीबद्दल पाहता तो तसाच संबंध आहे (३). आकाशात संचार करणारे मेघ वर्षाव करण्याच्या तयारीत असले की पृथ्वीवरचे मोर नाचू लागतात. चंद्र आपल्या शीतल कलांनी परिपूर्ण असता ते चंद्रामृत सेवन करण्याची हातोटी चकोरालाच आहे (४). स्वाती नक्षत्राचे पाणी पडू लागले की मोती उत्पन्न करणारे शिंपले ते थेंब आपल्यामधे धारण करतात. बाकीची नक्षत्रे पर्जन्य वर्षाव करू लागली तरी मोती उत्पन्न होत नाहीत. म्हणून का ते पाणी वाईट म्हणावे? (५). चातक चंद्राचे चिंतन करतो. म्हणून तो त्याचे मनोरथ पूर्ण करतो. बापरखुमादेविवर विठ्ठलाचे मी सदा ध्यान करतो. अर्थात तो माझे सर्व मनोरथ पूर्ण करतो, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (६).

**(२०६)**

**पतीचा जिव्हाळा म्हणोनी सासऱ्याचे साहिजे । येऱ्हवी वाहिजे चामाची मोट ।।१।। न पाहे वास न धरी मनी आस । वाया निकण भूस काय उमणसी ।।२।। *बापरखुमादेविवरु* विठ्ठलुचि पुरे । चाड नाही आम्हा दुजेवीण ।।३।।**

पतिप्रेमाकरता सासऱ्याचे कष्ट सहन करावयाचे, नाहीतर नुसत्या कातड्याला विचारतो कोण? (१). ज्यात धान्यकण नाही असे नुसते भूस उपणून काय उपयोग? ती दृष्टीही नाही व इच्छाही नाही. बापरखुमादेविवर विठ्ठलच पुरे आणि कोणतीही दुसरी इच्छा नाही (३).

## ❊ बुद्धीरूपी सखीशी संवाद ❊

(२०७)

**ममता पुसे सये शिवी जीवा ठाये । पूर्णता पान्हाये कोणे घरी ।।१।।**
**ऐक सखये पुससी बाईये । परब्रह्म समाये पुंडलिका ।।२।।**
**नाही यासी ठावो संसार पै वावो । एकतत्त्व रावो घरी वसे ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* उदारु वोळला । विश्वजन पाळा ब्रीद साजे ।।४।।**

ममतेने एका सखीने एका सखीला, देहबुद्धीने आत्मबुद्धीला विचारले गडे जीव शिवाला पूर्णता प्राप्त होणारे घर कोणते? (१). तेंव्हा देहबुद्धीला आत्मबुद्धी म्हणाली पुंडलिकाचे घरी परब्रह्म समाविष्ट झाले आहे (२). वस्तुतः परमात्म्याला ठाव ठिकाणाच नाही. आणि संसार तर मिथ्याच आहे का तो परिणामी खोटा ठरतो. तो एकतत्त्व चक्रवर्ती परमात्मा जीवनाचे घरघरीत करतो. एकतत्त्व परमात्म्याचे घरही एकच आहे (३). बापरखुमादेविवर परमात्मा उदार असून त्याने मजवर कृपा केली. विश्वजन पालक हे ब्रीद त्याला साजते, शोभून दिसते (४).

(२०८)

**चित्तिचे चैतन्य रूपीचे अणुकार । रुप असे साचार नयनामाजी ।।**
**तेजाचे तेज दीपी कळिका सामावे । दीपक माल्हावे तेज तेजी ।।१।।**
**काय सांगो सखये तेज पै अढळ । इंद्रिये बरळ देखताचि ।।२।।**
**घनदाट रूपी एकरूप तत्त्व । दीपी दीप समत्व आप दिसे ।।३।।**
**निराकार वस्तू आकार पै अपार । विश्वी चराचर बिंबलीसे ।।४।।**
**प्राण प्रिया गेली पुसे आत्मनाथा । कैसेनी उलथा गुरु खुणे ।।५।।**
***बारखुमादेविवरु* विठ्ठली उपरती । रुपी रुप दीप्ती एक जाली ।।६।।**

चित्तात असणारे चैतन्य सर्वरूपाकार झाले आहे. त्याचे खरे रूप डोळ्यात साठविले आहे. हे तेजाचे तेज असून शून्य कलिकेत सामावले आहे. हा दीप मालवला की दीपाचे तेज मूळच्या तेजातच लय पावते (१). काय सांगावे ते मूळचे तेज अढळ आहे. पाहणाराला इंद्रिये खोटीच दिसतात (२). घनदाट रूपाचे ठिकाणी हे तत्त्व



एकरूप असून दीपाचे ठिकाणी जो समत्वाचा दीप आहे ते जीवन दिसते (३). निराकार वस्तूच अनंत आकारात व्याप्त असून चराचर विश्वात बिंबली आहे (४). प्राणप्रिया बुद्धि आत्मनाथ गुरुखुणेने विचारवयास गेली तो ती उलथलीच, आत्मप्रवण झाली (५). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी उपरती होऊन रूपाचे ठिकाणी जीवन कलारूप दीप्ती एकरूपच होऊन राहिली (६).

(२०९)

**प्राणासवे सखी आत्मा हा बिंबला । सवे गुणी निमाला याच्या वृत्ती ।**
**ध्यान गेले ठाया मन गेले सुखा । नयनी नयन सुखा अवलोकी ।।१।।**
**तेची सखी रुप वोळखे स्वरुप । विश्वी विश्वरुप एका तेजे ।।२।।**
**द्वैत पैं न दिसे अद्वैत सुखाडु । एक दीपे उजेडू सर्वा घटी ।।३।।**
**विराल्या अमूर्त परिपाठी । चैतन्याची दृष्टी उघडली रया ।।४।।**
**सखी म्हणे सुख प्राणासी भुलले । आत्मपणे मुकले काय करु ।।५।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठले रूप । दाऊनी स्वरूप एक केले ।।६।।**

प्राणासह बुद्धीचे ठिकाणी आत्मा बिंबला असून गुणवृत्ती या ठिकाणी आत्मत्वात निमाल्या. ठिकाणावर ध्यान गेले. मन त्या ठिकाणी सुखाकरता गेले. नयनाचे नयनाला सुखाने अवलोकन केले व ते सुख अनुभविले (१). विश्वामध्ये जे एक तेज विश्वरूप आहे. तेच या बुद्धीने आपले आत्मस्वरूप आहे असे ओळखले (२). त्या ठिकाणी द्वैत न दिसता अद्वैत सुखाचा दीप एकत्वाने सर्व देहामध्ये उजेड करीत आहे. (३). अमूर्त अशा चैतन्याचे ठिकाणी सांप्रदायिक पद्धतीने दृष्टी उघडली तो कामनाच नाहीशा झाल्या (४). आत्मबुद्धीला जीवनबुद्धी म्हणाली तू सांगितल्याप्रमाणे या सुखाचा आस्वाद घेताना प्राणालाही भूल पडली व आत्मत्वाला मी मुकले. माझा जीवपणा राहिला नाही. काय करु ? (५). बापरखुमादेविवर विठ्ठलाने आपले स्वरूप दाखवून माझ्या स्वरूपाचे ऐक्य केले. ते हे असे वेगळे राहिलेच नाही (६).

(२१०)

**तत्वता पै तत्व धरिता न ये हाता । मग ममतेची चिंता तयासी पुसे ।।१।।**

**बाई कोणे घरी सांगे वो जीवित्व । परेचे परतत्त्व कोणे घरी ।।२।।**
**सखी सांगे गोष्टी बाई ये रूप वो धरी । आपणची घरी सापडले ।।३।।**
**निवृत्तीने खुण सांगितले ज्ञान । *रखुमादेविवरु* ध्यान विठ्ठल वरदा ।।४।।**

तत्त्वता पाहिले तर जगताचे मूलभूत तत्त्व तत्त्वाने धरावे व हाताने घ्यावे असे नाही. यामुळे जिला या तत्त्वाची ममता आहे अशी बुद्धी चिंतामग्न होऊन विचारू लागली (१). हे आत्मबुद्धी, जीवाचे जीवित्व म्हणजे ज्यामुळे या जीवाला जीवपणा आला असा तो जीवाचाही जीव कोणत्या घरी आहे तसेच परावाचेचे पलीकडे असणारे ते श्रेष्ठ तत्त्व कोठे आहे ? (२). आत्मबुद्धीने उत्तर दिले व ती गोष्ट सांगू लागली. ''बाई रूप धारण करणारे आपण आत्मस्वरूपच असून आपल्याच घरी ते सापडणे सारखे आहे'' (३). श्रीनिवृत्तिनाथांनी हे ज्ञान खुणेने सांगितले असून वर देणाऱ्या रखुमादेविवर विठ्ठलाचे ध्यानच लागले आहे (४).

**(२११)**

**प्राणाची पै सुखी पुसे आत्मयासी । ईश्वरी ध्यानाची वृत्ती गेली ।।१।।**
**पांगुळल्या वृत्ती हरपली भावना । निर्माली कल्पना ब्रह्मी रया ।।२।।**
**हे सुख साचार सांगे का विचार । आत्मयाचे घर गुरु खुणे ।।३।।**
**चेतवते कोठे गुंफले सगुण । निर्गुणी पै गुण समरस ।।४।।**
**ते सुख अपार निळिये वेधले । कृष्णरुप देखिले सर्वा रुपी ।।५।।**
**या ध्यानी गुंफिले मना माजी वेख । द्वैत भान सुख नाठवे मज ।।६।।**
**अद्वैत घरकुले गुणाचे पै रूप । मनामाजी स्वरूप बिंबले रया ।।७।।**
**विस्मृती गुणांची स्मृती पै भजना । दृष्टादृष्ट जना ब्रह्मरुप ।।८।।**
**याचेनी सुलभे नाठवे संसारु । ब्रह्मची आकारु दिसत असे ।।९।।**
**वेगी सांग ठसा कोण हे रुपडे । कृष्णचि चहुकडे बिंबलासे ।।१०।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठल सखी । कृष्णरूपी सुखी तनु जाली ।।११।।**

प्राणाची सखी जी बुद्धी आत्म्याला विचारू लागली आत्मानात्माविचार करु लागली तो ईश्वरी ध्यानाची वृत्ती धाऊ लागली (१). ब्रह्माच्या ठिकाणी कल्पना लय पावली. सर्व वृत्ती या पांगुळल्या व द्वैतभावना उरलीच नाही (२). हे जे गुरुखुणेने प्राप्त होणारे आत्म्याचे घर तेथे लाभणारे निर्भेळ सुख हाच एक खरा विचार उत्पन्न करतो तोच सत्य संकल्प होय (३). चेतविणारे चैतन्य कोठे सगुणत्वाने गुंफले असून निर्गुणात त्या गुणाची समरसता आहे. तेथेच तो मिळून जातो (४). ते सुख अपार असून नीलवर्ण जीवनाला त्याचा वेध लागल्यामुळे सर्व ठिकाणी कृष्णरूपाची प्रचिती आली (५). या श्रीकृष्णाचा वेध मनात ध्यानावस्थेत गुंफल्याने द्वैतसुखाची त्या स्थितीत आठवणही राहिली नाही (६). अद्वैत घरकुलात त्रिगुणातीत गुणाचे सूत्ररूप असून ते स्वरूप मनात बिंबून राहिले (७). गुणांची विस्मृती होऊन भजनाची स्मृती राहिल्याने दृष्टादृष्ट जगाचे ठिकाणी ब्रह्मरूपच दिसले (८). या योगाने अगदी सोप्या रीतीने संसाराची विस्मृती होऊन सर्व आकार हे ब्रह्माचेच आहेत अशी अनुभूती आली (९). सकाराचे अंगाने युक्त असा ठसा ज्याचा जीवनाचे वेगात उमटला आहे तो श्रीकृष्णच चहूकडे बिंबला आहे (१०). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे ठिकाणी असणारी तादात्म्य अशी बुद्धी कृष्णरूपाची तनूच सुखाने होऊन राहिली (११).



**(२१२)**

**येऊनी वऱ्हाडिणी बैसल्या टेकी । कोण तो नोवरा नाही वोळखी ।।१।।**
**मी कवणाची मज सांगा कोण्ही । वऱ्हाड आलिया वऱ्हाडिणी ।।२।।**
**कवण ते वरमाय कवण तो वरबाप । कवण तो नवरा कवण तो मंडप ।।३।।**
**वऱ्हाड नव्हे स्वप्न गे माये । *बापरखुमादेविवराचे* वेगी धरावे पाये ।।४।।**

नवरा कोण याची ओळखच नसल्याने वऱ्हाडिणी टेकीला येऊन बसल्या (१). वऱ्हाडातून आलेल्या वऱ्हाडणीनो, मी कोणाची ते मला कोणी सांगा तरी? (२). वराची आई कोण, बाप कोण, नवरा कोण आणि मंडप तरी कोण? (३). अरे हे वऱ्हाड आहे कोठे? ते खरे नाहीच. कां बोलून चालून स्वप्नच ते. हे जाणून बारखुमादेविवर परमात्म्याचे पाय धरावे हेच खरे (४).

**(२१३)**

**अखंड हरि वाचेसी । जरी सुकृताची राशी ।**
**तरीच हरी ये मुखासी । धन्य जन्मासी तो आला ।।१।।**

**देखता ज्याचे चरण । यम जातसे शरण ।**
**ऐसे सुकृताचे वर्णन । कवणे करावे त्याचे ।।२।।**
**तोचि एक साधु देखा । नित्य पुसावे त्या विवेका ।**
**तो कांही न धरी शंका । हरिनाम म्हणतसे ।।३।।**
***ज्ञानदेवी* निज सूत्र । तोचि धन्य शुद्ध पवित्र ।**
**हरिवाचुनी त्याचे वक्त्र । नेणे आणिक दुसरे ।।४।।**

जर सुकृतांच्या राशी असतील तर अखंड हरिवाचेचे साधनाने हरी वैखरीपर्यंत येईल आणि जन्मा येऊन तोच खरा धन्य होय (१). ज्याचे चरण पाहिल्याबरोबर यमही शरणागत होतो, त्याच्या सुकृताचे वर्णन कोणी करावे? (२) तोच एक साधु असून त्यालाच खरा विचार कोणता तो विचारावा. तो कांहीही शंका न बाळगता हरिनामाचाच उच्चार करतो (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे निजत्वाचे सूत्र असून हे जाणणारा धन्य आणि शुद्ध असा पवित्र आहे. का तर त्याची वाणी हरिनामाशिवाय काही जाणतच नाही (४).

**(२१४)**

**आनंदले वैष्णव गर्जती नामे । चौदाही भुवने भरली परब्रह्मे ।।१।। नरहरि हरि हरि नारायण । सन सनंदन मुनिजन वंदना ।।२।। गाता वाता नाचता प्रेमे उल्हासे । चराचरीचे दोष नासिले अनायासे ।।३।। हरि मनी हरि चित्ती हरिअंकु शरीरी । तयाचे देखोनि हरि चारी बाह्या पसरी ।।४।। अंघ्रि रेणू ज्याचा उद्धरितो पतिता । प्राकृत वाणी केवी वर्णू हरिभक्ता ।।५।। तीर्थी पावन धर्म जिही केला धडौती । कैवल्य कल्पद्रुम ते त्रिजगती ।।६।। मत्स्य कूर्मादिक ज्याचे महिमेसी आले । धन्य वैष्णव तेज रवि शशीसी पाहाले ।।७।। *बापरखुमादेविवरा* पढियंती जया तनु । तया संताचरणी स्थिर हो का मनु ।।८।।**

चौदाही भुवने परब्रह्माने भरली असून त्या आनंदाने आनंदित झालेले वैष्णव, ज्याला सनक सनंदादि मुनिजन वंदन करतात अशा नरहरि हरिनारायण नामाची गर्जना करतात (१/२). उल्हासपूर्ण प्रेमाने गाताना, वाद्ये वाजविताना आणि हर्षनिर्भर होऊन त्या नामछंदात नाचताना चराचरीचे दोष नाहीसे होतात (३). वैष्णवांच्या मनात, चित्तात हरी असून शरीरावरही हरीचेच चिन्ह आहे. ज्यांना पाहून त्यांना आलिंगन देण्याकरता हरी आपले चारी हात पसरतो (४). ज्या हरिभक्तांच्या पदरेणूने पतिताचाही उद्धार होतो अशा हरिभक्ताचे वर्णन मला प्रकृतिजन्य वाणीने कसे करता येईल? (५). ज्यांनी तीर्थालाही पावन करून धर्माला धडपणा आणला असे जे या त्रैलोक्यातील मोक्ष प्राप्त करून देणारे कल्पतरूच आहेत (६). ज्या भक्तांचा असा महिमा आहे की ज्यामुळे मत्स्य, कूर्मादि अवतार झाले आणि ज्याचे तेजाने रवि शशीही ओशाळले, त्या वैष्णवांचा थोरपणा कोणी वानावा? (७). ज्यांची तनु बापरखुमादेविवरालाही प्रिय आहे त्या संतांचे चरणी आपले मन स्थिर व्हावे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (८).



**(२१५)**

**श्रवणे कीर्तने जाले ते पावन । सनकादिक जाण परमभक्त ।।१।।**
**जाली ते विश्रांती याचका सकळा । जीवी जीवनकळा श्रीमूर्ती रया ।।२।।**
**पाद सेवने अक्रूर जाला ब्रह्मरूप । प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचे ।।३।।**
**सख्यपणे अर्जुन नर नारायण । सृष्टी जनार्दन एकरूप ।।४।।**
**दास्यत्व निकट हनुमंते केले । म्हणोनी देखिले रामचरण ।।५।।**
**बळी आणि भीष्म प्रल्हाद नारद । बिभीषणावरद चंद्रार्क ।।६।।**
**व्यास आणि वसिष्ठ वाल्मिकादिक । आणि पुंडलीक शिरोमणी ।।७।।**
**शुकादिक योगी रंगले श्रीरंगी । परीक्षितीच्या अंगी ठसावले ।।८।।**
**उद्धव यादव आणि ते गोपाळ । गोपिकांचा मेळ ब्रह्मरूप ।।९।।**
**अनंत भक्तराशी तरले वानर । *ज्ञानदेवा* घर चिदानंदी ।।१०।।**

सनकादिकासारखे श्रेष्ठ भक्त श्रवण, कीर्तनाने पावन झाले (१). जीवाची जीवनकळा परमात्मा आहे याची अनुभूती ज्यांना आली अशा सर्व याचकांना ते परमात्मरूप हीच विश्रांती झाली (२). श्रीगोविंदाचे प्रत्यक्ष स्वरूप जे ब्रह्मरूप ते अक्रूरास

पादसेवनाने प्राप्त झाले (३). सख्यपणाने नर जो अर्जुन तो तद्रूपतेने सृष्टीत व्यापलेला जनार्दन श्रीनारायणच झाला (४). श्रीहनुमंताने निकट दास्य केले म्हणून त्यास श्रीरामचरणाची प्राप्ती झाली (५). बळी, भीष्म, प्रल्हाद, नारद, बिभीषण, वरदचंद्र, अर्क, व्यास, वसिष्ठ स्वरूप हेच श्रीज्ञानदेवांचे घर आहे (१०).

(२१६)

**संत भेटती आजी मज । तेणे मी जालो चतुर्भुज ।**
**दोन्ही भुजा स्थूळी सहज । दोन्ही सूक्ष्मी वाढल्या ।।१।।**
**आलिंगनी सुख वाटे । प्रेम चिदानंदी घोटे ।**
**हर्षे ब्रह्मांड उतटे । समूळ उठे मीपण ।।२।।**
**या संतासी भेटता । हरे संसाराची व्यथा ।**
**पुढता पुढती माथा । अखंडित ठेवीन ।।३।।**
**या संतांचे देणे । कल्पतरुहूनि दुणे ।**
**परिसा परीस अगाध देणे । चिंतामणी ठेंगणा ।।४।।**
**या संतापरिस उदार । त्रिभुवनी नाही थोर ।**
**मायबाप सहोदर । इष्टमित्र सोईरे ।।५।।**
**कृपा कटाक्षे न्यहाळिले । आपुल्या पदी बैसविले ।**
***बापरखुमादेविवरे* विठ्ठले । भक्ता दिधले वरदान ।।६।।**

आज मला संत भेटले त्यामुळे मी चतुर्भुज विष्णुस्वरूप झालो. दोन भुजा स्थूळ आहेतच. त्यातच जीवनाचे गतीच्या दोन सूक्ष्म भुजा वाढल्या (१). त्यांना आलिंगन देण्यात सुख वाटते. चिदानंद स्वरूपाचे ठिकाणी प्रेम एकरूप होते. ब्रह्मांडाचे पलीकडे आनंद होतो. आणि मीपणा तर मुळासकट नाहीसा होतो (२). या संतांना भेटले तर संसाराची व्यथाच नाहीशी होते म्हणून पुनः पुनः मी त्यांचे पायावर मस्तक ठेवीन (३). या संतांचे देणे कल्पवृक्षापेक्षाही जास्त आहे, परिसापेक्षाही श्रेष्ठ आहे, नव्हे नव्हे चिंतामणी तर त्यांच्या दानापुढे अगदी ठेंगणा आहे (४). आई, बाप, सहोदर, इष्ट, मित्र, सोयरे हे कोणीही त्रैलोक्यात या संतांपेक्षा उदार नाहीत. म्हणून मला ते अधिक



वाटत नाहीत (५). कृपाकटाक्षाने पाहून आपल्या पदाच्या ठिकाणीच बसविले. बापरखुमादेविवर श्रीविठ्ठलाने आपल्या भक्ताला तर हे वरदानच दिले आहे (६).

(२१७)

**भाग्याचा उदयो की दैवाची गती । मज जोडली संगती सज्जनांची ।।१।।**
**माझे मीच भांडवल घेऊनिया निगुती । लाभाची गती श्रीविठ्ठलु ।।२।।**
**देश देशा उरा न लगेची जाणे । ठायीच जो उणे एक्या भावे ।।३।।**
**खेप खेपांतर अनेक सोशिले । मुद्दल उरले लेखाचारी ।।४।।**
**मुद्दल देऊनी वाणेरा फेडिला । उत्तीर्ण झाला दोही पक्षी ।।५।।**
**चौघे साक्ष ठेवुनी अक्षरी । बेव्हार ज्ञानेश्वरी खंडियेला ।।६।।**

भाग्याचा उदय की दैवाची गती कांहीच कळेना. मला सज्जनांचे संगतीचा लाभ झाला (१). खरोखरी माझे मीच भांडवल घेऊन गतिरूप विठ्ठलाची प्राप्ती झाली (२). एकत्वभावाने देशदेशांतरांला न जाता अधिष्ठानाचे ठायीच श्रीविठ्ठलाची जोड झाली (३). अनेक जन्माच्या खेपा सोसल्या तेव्हा चार देह, चार वाचा, चार अवस्था, चार शून्ये, चार खाणी या चारी पलीकडील जे मुद्दल आत्मस्वरूप तेवढेच उरले (४) ते मुद्दल परमात्म्याने मला देऊन अनेक प्रकारे देह धारणा होणेचा प्रकार फेडला. यामुळे दोनी कुळांत उत्तीर्ण झालो (५). चारी वेदांची साक्ष घेऊन व्यवहार नाहीसा केला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (६).

(२१८)

**अकार उकार मकार करती हा विचार । परी विठ्ठल अपरंपार न कळे रया ।।१।।**
**संतांचे संगती प्रेमाच्या कल्लोळा । आनंद गोपाळा माजी खेळे ।।२।।**
**भाळे भोळे भक्त गाताती साबडे । त्यांचे प्रेम आवडे विठोबासी ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* परब्रह्म पुतळा । तेथील हे कळा निवृत्ति जाणे ।।४।।**

अकार उकार मकारात्मक प्रणव याचा विचार करूनही हा अपरंपार असा विठ्ठल कळत नाही (१). मात्र तो परमात्मा संतसंगाचे प्रेमाच्या कल्लोळात आनंदाने गोपाळांच्यात मिसळून खेळत असतो. भाळेभोळे भक्त साधेच गातात पण त्यांचे प्रेम

विठोबाला आवडते. बापरखुमादेविवर परमात्मा हा परब्रह्माचा पुतळाच असून त्याची कळा श्रीनिवृत्तिनाथ जाणतात (४).

**(२१९)**

**शर्कराची गोडी निवडावया भले । साधु निवडिले सत्संगती ।।१।।**
**सत्संगे प्रमाण जाणावया हरी । येर ते निर्धारी प्रपंच जात ।।२।।**
**भानुबिंब पाहा निर्मळ निराळे । अलिप्त सकळ तैसे साधु ।।३।।**
**ज्ञानदेव हरी जपोनी निर्मळ । सदा असे सोज्वळ निवृत्ती संगे ।।४।।**

सत् स्वरूपाचे संगतीत असणारे साधूच चैतन्याची गोडी अनुभवण्याकरता निवडले, त्यांचीच निवड केली (१). सत्संग हे एकच हरीला जाणण्याचे प्रमाण असून प्रापंचिकांनी प्रपंचाचा निर्धार करावा (२). सूर्यबिंब जसे सर्वांतून निराळे असून निर्मळ आहे तसे साकाराची कळ जाणणारे साधू हे प्रपंचात अलिप्त असतात (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज हरिजपाने निर्मळ असून श्रीनिवृत्तिनाथांचे संगतीत सदा शुद्‌ध बुद्‌ध आहेत. (४)

**(२२०)**

**सोळा कळी चंद्र पूर्णिमे पूर्ण बोधु । संतजना उद्‌बोधु सागर न्याये ।।१।।**
**नित्यता पूर्णिमा हृदयी चंद्रमा । आलिंगन मेघश्यामा देतु आहे. ।।२।।**
***ज्ञानदेवा* मोहो निःशेष निर्वाहो । रूपी रूप सोहं हो एका तेणे ।।३।।**

सोळा कळी चंद्र हा पूर्ण असून त्याने जशी सागराला भरती येते, त्याप्रमाणे पूर्णात्मतेने संतजनांना बोधाची पूर्णता प्राप्त होते (१). हृदयस्थ परमात्मा हा पूर्ण चंद्र असून तेथे नित्याची पोर्णिमाच असल्याने त्या मेघश्याम परमात्म्यास हे संत आत्मबुद्‌धी प्रणवतेने आलिंगन देतात. सर्व वृत्ती त्यात विलीन होतात, उचंबळून लय पावतात (२). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हे आकर्षण हाच माझा खरा निर्वाह असून त्यावरच माझे जीवित्व असल्याने एकत्वाने त्या तेजात, रूपात हे उपाधिभूत जीवन मिळाल्याने ते सोहम्‌च झाले (३).

**(२२१)**

**खळे दान देसी भोक्तया सापडे । ऐसे तुवा चोखडे रूप केले ।।१।।**



**ज्ञान तेचि धन ज्ञान तेचि धान्य । जाले हे कारण ज्ञानदेवा ।।२।।**
**तळवटी पाहे तव रचिले दान अपार । वेदवक्ते साचार बुझावले ।।३।।**
**साचार आठरे भासासी । उपरती भुसी निवडली ।।४।।**
**मोक्ष मुक्ती फुका लाविली तुवा दिठी । तुझा तू शेवटी निवडलासी ।।५।।**
**निवृत्तीप्रमाण केले तुवा ज्ञाना । ब्रह्मी ब्रह्म अगम्या रातलासी ।।६।।**

खळे दान दिल्यानंतर शेतकऱ्याचे दृष्टीने त्यात कांही नसले तरी मांगल्यातून धान्य निवडून काढून तो आपला चरितार्थ सुखाने चालवितो, त्याप्रमाणे मी केलेल्या सहजोपदेशातील वाच्यांश टाकून लक्ष्यांश जे निखळ आत्मरूप ते तू ग्रहण केले आहेस (१). तुला धन-धान्य हे आत्मज्ञानच झाले आहे. कारण श्रीज्ञानदेवांचेच सर्वांचे कारण आहे (२). सर्व दृश्याचे अधिष्ठान ते परमात्मा, त्याचे ज्ञान प्रसृत करणे हे अपार दान आहे. वेदवेत्तेही ज्याला बुझले तेथेच काही महत्त्व आहे (३). दृश्य, देहादी भुस्कटा, सहा शास्त्रे, चार वेद, अठरा पुराणे या मागे झालेल्या उपरतीमुळे आत्मानुभूतीच तू निवडलीस (४). मूळ स्वरूपाचे ठिकाणी तादात्म्य झाल्याने मोक्षाला, मुक्तीलाही अर्थ राहिला नाही. तुझा तूच शेवटी उरलास व त्याचीच तू निवड केलीस (५). निवृत्तिरावच, हे ज्ञानेश्वरा, तुला प्रमाण झाल्याने अगम्य ब्रह्माचे ठिकाणी ब्रह्मरूप तू रममाण झालास याचे मला खरे कवतूक वाटते (६).

**(२२२)**

**आवेगे ज्ञान जननी । ज्ञान आई गे । ज्ञाननाथे गे ज्ञाने कामधेनू तू माझिये गे ।।१।। ज्ञानाई तू माय माझी गे । ज्ञानाई तू बाप माझा गे ।।२।। ज्ञानाई गुरु देव ज्ञान ध्यान । साधन परत्र पावन ।।३।। इह तुज वाचू आन मज कोण गे । बाई नुपेक्षी गे । ज्ञान बहीणी ।।४।। राऊळीचे कऱ्हे हारपले हाटी । माणुस प्रति झाडा घेताती वेठी ।।५।। नवल विपरीत देखिले सृष्टी । माणुस प्रति झाडा घेताती वोटी ।।६।।**

जीवनाचे आवेगात असणारी ज्ञानजननी ही ज्ञानाची म्हणजे बाह्य ज्ञानाची आईच आहे. ज्ञाननाथ परमात्म्याचे योगाने प्राप्त होणाऱ्या ज्ञानाने तू माझी कामधेनूच

आहेस (१). ज्याचे योगे ज्ञान होते अशी जी वृत्ती ती तू माझी आईच असून, तो जो ज्ञान प्राप्त करून देणारा वृत्तिभाव माझा बाप आहे (२). ही ज्ञानवृत्ती ज्याने निर्माण केली तो गुरुदेव असून ज्ञान हीच माझी ध्यानावस्था आहे. याहीपेक्षा परलोकीचेही ते पवित्र साधन आहे (३). या ठिकाणी मला तुझ्यावाचून कोण आहे? ज्ञानवृत्तिरुप बहिणीनो, तुम्ही माझी उपेक्षा करू नका (४). राऊळातील सुख बाजारात नाही. कर्माचा झाडाच द्यावा लागतो (५). असे हे नवल विपरीतपणाने सृष्टीत दिसते (६).

**(२२३)**

**उंच पताका झळकती । टाळ मृदंग वाजती । आनंदे प्रेमे गर्जती । भद्रजाती विठ्ठलाचे ।।१।। आले हरीचे विनट । वीर विठ्ठलाचे सुभट । भेणे जाहले दिप्पट । पळती थाट दोषांचे ।।२।। तुळसी माळा कंठी । गोपीचंदनाच्या उटी । सहस्र विघ्ने लक्ष कोटी । बारा वाटा पळताती ।।३।। सतत कृष्णमूर्ती सावळी । खेळे हृदयकमळी । शांती क्षमा तयाजवळी । जीवे भावे अनुसरल्या ।।४।। सहस्रनामाचे हतियेर । शंख चक्राचे श्रृंगार । अतिबाड वैराग्याचे थोर । षडवर्गा ।।५।। ऐसे एकांग वीर । विठ्ठलरायाचे डिंगर । *बापरखुमादेविवर* । तीही निर्धार जोडिला ।।५।।**

श्री विठ्ठलाचे शुभजातीचे भक्त उंच पताक झळकत व टाळ मृदंग वाजवीत, आनंदाने व प्रेमाने गर्जना करितात (१). श्रीहरीशी विनट असलेले विठ्ठलाचे योद्धे वीर जो आले तो भयाने भीतीच नाहीशी झाली आणि दोषांचे कळप पसार झाले (२). कंठात तुळसीमाळा धारण केलेले, गोपीचंदनाची उटी लावलेले, लक्षाचा प्रकार साधल्याने हजारो विघ्ने बारा वाटे जीव घेऊन पळत सुटली (३). हृदयकमळात सहांना वळविणारी सावळी कृष्णमूर्ती दया, क्षमा, शांतीसह सतत खेळत असल्याने जीवाभावाने परमात्मरूपाला अनुसरल्या (४). शंखचक्रांकित परमात्म्याचे सहस्रनामाचे हत्यार बाळगणारे हे भक्तवीर, यांनी वैराग्याचे थोर बळाने षड्रिपूंचा चुराडाच केला (५). श्रीविठ्ठलरायाचे लाडके असे एकत्वाचे अंगाने युक्त असणारे जे वीर त्यांनी मोठ्या निर्धाराने बापरखुमादेविवर परमात्मा आपलासा केला (६).



**(२२४)**

**कुंचे पताकांचे भार । आले वैष्णव डिंगर ।**
**भेणे पळती यम किंकर । नामे अंबर गर्जतसे ।।१।।**
**आले हरिदासांचे थाट । कळिकाळा नाही वाट ।**
**विठ्ठल नामे करिती बोभाट । भक्ता वाट सापडली ।।२।।**
**टाळ घोळ चिपळिया नाद । दिंडी पताका मकरंद ।**
**नाना बागडियांचे छंद । कवच अभेद नामाचे ।।३।।**
**वैष्णव चालिले गर्जत । महावीर ते अद्भुत ।**
**पुढे यमदूत पळत । पुरला अंत महादोषा ।।४।।**
**निवृत्ती संत हा सोपान । महावैष्णव कठीण ।**
**मुक्ताबाई तेथे आपण । नारायण जपतसे ।।५।।**
**ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठलनामे मुक्त पेठा ।**
**स्नान दान घडे श्रेष्ठा । वैकुंठ वाटा संत गेले ।।६।।**

कुंचे, पताका घेऊन जो लाडके वैष्णव आले, तो नामाने आकाश दणदणून गेल्याने यमदूत भयाने पळाले (१). हरिदासांचे समुदाय आले, तो कळिकाळाला वाटच मिळेना. विठ्ठलनामाचा बोभाटा करता करता भक्तांना वाट सापडली (२). टाळ, घोळ चिपळ्यांचे नादाने पताका घेऊन जो नाचत बागडत मोठ्या शोभेने त्या नामछंदात दिंडी निघाली तो नामाचे अभेद्य कवच निर्माण झाले (३). महायोद्धे असे ते अद्भुत वैष्णव गर्जना करीत चालले. तो महादोषांचा शेवट होऊन सर्व दोष खलास होऊन यमदूत पळू लागले (४). श्रीसंत निवृत्तिनाथ व सोपान हे मोठे कडक वैष्णव असून तेथे श्रीमुक्ताबाई आपण श्रीनारायण जप करीत आहे (५). ज्ञानदेव वैष्णव मोठा विठ्ठलनामाने मुक्तपेठेत आले असून तेथे श्रेष्ठ स्नान, दान घडत असून त्या वैकुंठाचे वाटेनेच संत गेले (६).

**(२२५)**

**पूर्व जन्मी सुकृते थोर केली । ती मज आजी फळासी आली ।।१।।**

**परमानंदू आजी मानसी । भेटी जाली या संतासी ।।२।।**
**मायबाप बंधु सखे सोयरे । याते भेटावया मन न धरे ।।३।।**
**एक एका तीर्थाहुनि आगळे । तयामाजी परब्रह्म सावळे ।।४।।**
**निर्धनासी धन लाभु जाला । जैसा अचेतनी प्राणु प्रगटला ।।५।।**
**वत्स विघडलिया धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडसा मीनली ।।६।।**
**हे पियुषापरते गोड वाटत । पंढरीरायाचे भक्त भेटत ।।७।।**
***बापरखुमादेविवर* विठ्ठले । संत भेटता भवदुःख फिटले ।।८।।**

मागे अनेक जन्मात जी थोर पुण्य कर्मे केली ती मला आज फलद्रूप झाली (१). या संतांची भेट झाल्याने आज मनाला परमानंद झाला (२). आई, वडील, भाऊ, मित्र, गणगोत याना भेटावे असे व्यवहारदृष्टीने मनातही येत नाही (३). हे संत एक एक तीर्थाहूनही कांही वेगळेच आहेत. त्यांचे समुदायात सहाला वळविणारे परब्रह्म आहे असा त्यांचा अधिकार आहे. सर्व तीर्थात ते श्रेष्ठ आहेत (४). निष्कांचनाला द्रव्यप्राप्ती व्हावी किंवा मेलेल्यात जीव यावा (५). ताटातूट झालेल्या वत्सास आई भेटावी किंवा हरिणीस आपले चुकलेले पोर भेटावे (६). ही अवस्था अमृतापेक्षाही गोड आहे. पंढरीनाथांचे भक्त मला भेटले (७). बापरखुमादेविवर विठ्ठलाचे कृपेने या संतांची भेट होताच भवदुःख नाहीसे झाले (८).

**(२२६)**

**आजी सोनियाचा दिनु । वर्षे अमृताचा घनु ।।१।।**
**हरि पाहिला रे हरि पाहिला रे । सबाह्य अभ्यंतरी अवघा व्यापकु मुरारी ।।२।।**
**दृढ विटे मन मुळी । विराजीत वनमाळी ।।३।।**
**बरवा संत समागमु । प्रगटला आत्मारामु ।।४।।**
**कृपासिंधु करुणाकरु । *बापरखुमादेविवरु* ।।५।।**

अमृताचा मेघ वर्षाव करीत आहे अर्थात आजचा दिवस सोन्याचा आहे (१). अंतर्बाह्य अवघा व्यापून राहिलेला श्रीहरी तोच पाहिला (२). मनाला जेथे वीट येतो अशा मूळस्थानी विटेवर दृढ असणारा वनमाळी विराजमान आहे (३). हा संतसमागम चांगला असून त्यायोगे आत्माराम प्रगट झाला (४). बापरखुमादेविवर परमात्मा हा करुणाकर असा कृपेचा समुद्रच आहे (५).



**(२२७)**

**कापुराचे कळीवर अनळाचा मरगळा । भेदोन द्वैताचा सोहळा केवी निवडो पाहे ।।१।। बोलू अखरीच वळला भीतरी नाही आला । तो कवी विठ्ठला पावे जी तुम्हा ।।२।। मन बुद्धीसी जे आद्य तयासी जे वेद्य । कळीकाळा कवळेना संधी जडोनि जाय ।।३।। वाचाळपणे परा येवो न ल्हाये दातारा । अनुभवो भीतरा बाहेजु वेडावला ।।४।। निरय दृष्टी ती खोली येऊनी राहे बुबुळी । लवणठाव घेऊनी जळी केवि निवडो पाहे ।।५।। *निवृत्तिदासु* तेथे निवृत्ती करूनी पाते । श्रीगुरू निवृत्तिनाथे पुढे केले ।।६।।**

कापुराचे देहाला अग्नि लागला तर तो अग्निरुप कापूर होतो. मग अग्नी आणि कापूर असा भेद दाखवता येत नाही. चार देह जर सुषुम्नाकार अग्निरुप झाले तर ते जीवन ब्रह्मरूप होऊन देहभाव नाहीसा होतो. वेगळेपणाने हे दोन पदार्थ दाखवता येतच नाहीत (१). बोल म्हणजे शब्द अक्षराला आला तेथे जो प्रगट होणारच नाही अशा विठ्ठलाला या शब्दाक्षराने कसे पोचावे? (२). मन बुद्धीला जे आद्य असून मनबुद्धीला ज्याचा प्रकाश आहे, म्हणून मनबुद्धीवर कांही प्रकाश पडून मनबुद्धीला आपण जाणू शकतो. कळिकाळालाही ज्यांचे आकलन होत नाही ते जीवनातील संधिकाल सोडून जात आहे. संधिकालाचे आतच ते आहे (३). वाचाळपणाने परेला येऊनही ज्याची प्राप्ती होत नाही. परेचे पलीकडे अनिर्वाच्य वाणीत ज्याने अनुभव घेतला तो वेडाच होतो (४). निरय दृष्टी म्हणजे आत्मदृष्टी सखोल अशी बुबुळात येऊन रहाते. मिठाचे खड्याने जर पाण्याचा ठाव घेतला तर त्याला वेगळे कसे करावे? तसे होते (५). श्रीनिवृत्तिदासाला म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांना श्रीनिवृत्तिनाथांनी कृपादृष्टीने निःसंशय परमात्मरूपच केले (६).

**(२२८)**

**व्यक्ताव्यक्त दिठी घालुनि कल्पांता । कल्पना नुरेची तेथे आता ।।१।।**

**पाहणियाचा प्रपंचु पाहता । निमाला कवणा बोलु ठेऊं आता ।।२।। दुजे म्हणो जाय तव मी माजी हरपे । न वर्णवे तुझी सत्ता रया ।।३।। निशी जागरणी निमाला । की तंतूचि तंती आटला । रसी रसु दुणावला तुझ्या ठायी ।।४।। तेथे कल्पनेसी मूळ विरोनिया पाल्हाळ । तैसे उभय संधी तू विदेही रया ।।५।। या लागी बापरखुमादेविवरु विठ्ठलु उदारु । दिठीचे दिठीमाजी अंजन । सुखी सुख दुणावले चौघा पडिले मौन्य । येणे *निवृत्तिराये* खुणा दावुनि सकळ । डोळ्याविण दिठी प्रबळ रया ।।६।।**

व्यक्ताव्यक्त दृष्टी जो कल्पांतावर घातली तो कल्पनेचा अंत झाल्याने कल्पना उरलीच नाही (१). दृश्याचा प्रपंच पाहता पाहता नाहीसा झाला. आता कोणावर बोल ठेवावा? (२). परमात्म्याला दुसरा म्हणावे तर आपला मीपणाच जेथे नाहीसा होतो त्या तुझी परमात्म्याची सत्ता ही वर्णनातीतच आहे. गोडीचा गोडपणा का गोडी मिरवती? तसे परमात्म्यातच हा मी अंतर्भूत असल्याने दुसरेपणा आता आणावा तरी कोठून? (३). पटात तंतू आटतात. जागृतीमध्ये झोप उरतच नाही. असे झाल्याने हा जीवनरस देवा तुझ्या रसरूपांत दुणावला आहे (४). कल्पनेचे जे मूळ तेथे कल्पना विस्तार राहिलाच नाही. यामुळे जीवपरमात्मऐक्यबोधात उभयपक्षी विदेही अवस्था प्राप्त झाली की जेथे सापेक्षता आता राहिलीच नाही (५). याकरिता बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल हे उदार अंजन दृष्टीचेही दृष्टीत भरले असून ज्याबद्दल चारी वेद मौनावले अशा ठिकाणी सुखानेच सुख दुणावले. ही खूण श्रीनिवृत्तिनाथांनी दाखवून चर्मचक्षूवाचून माझी आत्मज्ञानदृष्टी प्रबळ केली असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (६).

**(२२९)**

**अनुभव खुण मी बोले साजणी । निरंजनी अंजन लेईले अंजनी ।।१।।**
**गुरूमुखे साधन जाणे पै निवृत्ती । तत्त्व सार आपणची जाला निवृत्ती।।२।।**
***बापरखुमादेविवरा* विठ्ठलकृपा चित्ती । पुंडलिका साधिले प्रेम तत्त्वार्थी ।।३।।**

हे सखे मी अनुभवाची खूणच सांगते. निरंजन हेच अंजन मी आपल्या अंजनी म्हणजे डोळ्यात घातले आहे (१). मी निवृत्तिनाथांनी श्रीगहिनीनाथांचे कृपेने हे साधन जाणले. तो सर्व तत्त्वांचे सार जी निवृत्ती अवस्था तीच ते आपण होऊन राहिले (२). बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल तो तत्त्वार्थी प्रेमाने पुंडलीकास त्याचे कृपेने चित्तात साक्षात्कारास आला, प्राप्त झाला (३).



**(२३०)**

**पदोपदी निजपदा गेले वो । कर्म संचित सकर्म जाले वो ।।१।।**
**तेथे आपुले नाठवे काही वो । आप आपणा न पडे ठायी वो ।।२।।**
**श्रीगुरूप्रसादे ज्ञान बोधु जाला वो । नव्हे ते ठाऊके पडले माय वो ।।३।।**

प्रत्येक पाऊलांस माझी वृत्ती निजपदावरच आरूढ झाली. यामुळे संचित कर्म हे सत्कर्मच झाले (१). तेथे देहभावच विसरला. यामुळे आपला आपल्यालाच पत्ता राहिला नाही. आपण एक कोणी आहोत हे उरलेच नाही (२). श्रीगुरुनिवृत्तीनाथांचे कृपेने आत्मज्ञानाचा बोध झाला. जे पूर्वी उकलले नव्हते तेच नेमके ठाऊक झाले (३).

**(२३१)**

**कैवल्याचे रोप लावियेले द्वारी । त्याचा वेलु गेला गगनावरी ।।१।।**
**मोगरा फुलला मोगरा फुलला । फुले वेचिताविं भारु कळीयासी आला ।।२।।**
**मनाचिया सुमने गुंफियेला झेला । *बापरखुमादेविवरु* विठ्ठली अर्पीला ।।३।।**

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी मोक्षाचे रोप आपल्या द्वारात लावले. तो वेल आकाशाचेही पलीकडे गेला (१). मनाचा मोगरा जो फुलला तो फुले वेचता वेचता त्या मोगऱ्याला पुनः बहर येऊन मनोवृत्तीच्या कळ्या आत्मसाक्षात्काराने फुलू लागल्या (२). म्हणून मनाच्या सुमनाचा गुच्छ करून बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल याचे चरणी अर्पण केला (३).

**(२३२)**

**प्रकृतीचे पूजन प्राप्तीवीण जाण । प्राप्ती सिंचन दोन्ही वाया गेली ।।१।।**
**पूजन कवणा करू सिंचन कवणा करू । नाही नव्हे ते धरू गुरूमुखे ।।२।।**
***रखुमादेविवरु* गुरू मुखा भ्याला । होता तो लपाला नाही ते ठायी ।।३।।**

अष्टधा प्रकृतीचे पूजन म्हणजे दृश्य प्रपंच याचे आकर्षण फळावाचून फुकट गेले. त्या प्रपंचाची प्राप्ती व त्याचे आकर्षण परमार्थदृष्टीने फोलच आहेत (१). प्रपंचाचा स्वीकार किंवा त्याचे आकर्षण याला परमार्थात किंमतच नाही. परमात्म्याचे ठिकाणी तर दृश्य प्रपंचाचा अभावच आहे. मग त्याचे आकर्षण तरी कोठले? आहे आहे म्हणता जे नाहीसे होते असे जे नाही तेच मग आता गुरुमुखाने समजून आणि उमजून घट्ट धरू (२). गुरुमुखाने सगुण झालेला रखुमादेविवरु परमात्मा पुनः निर्गुणच झाला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(२३३)**

**जन्मा आवर्ती येरझारी फिटली । ब्रह्मसमदृष्टी जाली गुरूमुखे ।।१।।**
**भागल्याचा सिणु भागल्याने नेला । भाग्योदय झाला भाग्येवीण ।।२।।**
***रखुमादेविवरु* भाग्ये जोडला । जोडोनि मोडला कांही नव्हतेपणे ।।३।।**

जन्म मरणाचे भोवऱ्यात होणारी माझी येरझार संपली कारण गुरुमुखाने ब्रह्माचे ठिकाणी तादात्म्य झाल्याने माझी दृष्टीही समच झाली (१). जन्ममरण्याचे फेऱ्यात श्रमाचा शीण ज्याला झाला होता त्याच्याकडूनच तो नाहीसा झाला. व्यवहारात ज्याला भाग्य म्हणतात त्याहून निराळ्या अशा पारमार्थिक भाग्याचा उदय झाला (२). रखुमादेविवर श्रीविठ्ठल भाग्याने जोडला. त्या जोडण्याने संसारधर्म नसलेला नाहीसा झाला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

**(२३४)**

**दृश्यादृश्य नातळे स्थूळ प्रपंच भान । तेथे मायेचे कारण हेत नाही ।। म्हणोनि ज्ञान विज्ञान कल्पना लक्षण । तेथे सुखासी सुख जाण भोगिताहे ।।१।। नामावाचुनि संवादे निवृत्ति अभेद पदे । निजभजनी स्वानंदे नवल पाहे ।।२।। तेथे दिवस ना रात्री सर्व हेतु विवर्जितु । स्वयंभासक तू नवल त्याचे ।।३।। चिन्मय ना चिन्मात्र वेद्य सर्वगत । स्वसंवेद्य साक्षभूत आपणयासी ।।४।। स्वसंवेद्य सन्मुखता भेदु नाही आता । भक्ति आणि परमार्थ हेचि रूप ।।५।। निवृत्ति प्रसादे संपर्केसी बोध । नीत नवा आनंद *ज्ञानदेवा* ।।६।।**



स्थूलमानाने दृश्यादृश्य प्रपंचभान न राहिल्याने जेथे कांही दृष्टीत येतच नाही, तेथे मायेचे कारण जो काही हेतू तोही राहिला नाही. मग ज्ञान, विज्ञान तेही कल्पनेचेच लक्षण आहे. यामुळे तेथे सत्‌चिदानंदाचा अंश जो सुखरूप जीव तो चित् सुखाचाच अनुभव घेतो (१). श्रीनिवृत्तिनाथ हे निवृत्तीने ज्या अभेद पदावर आरूढ आहेत तेथे द्वैत नामावाचून संवाद होत असून या संवादाचे आश्चर्य स्वतःचे आनंदाने निजत्वाचे भजनातच पहात आहे (२). जेथे सापेक्ष दिवस रात्र नाही किंवा कोणताच हेतू नाही ते तूच स्वयंप्रकाश स्वरूप असून त्याचेच हे सर्व नवल आहे (३). जे चिन्मय आणि चिन्मात्र असे जे चैतन्य त्याचे पलीकडे असून सर्वव्यापी, सर्वास जाणणारे, स्वसंवेद्य आणि आपणालाच साक्षिभूत आहे (४). आपणच स्वसंवेद्य व आपणच आपल्याला सन्मुख असल्याने आता भेदच नाही म्हणून हीच भक्ती व हेच परमार्थाचे स्वरूप आहे (५). श्रीनिवृत्तिनाथांचे कृपाप्रसादाने हा आत्मरूपाचा संपर्क होऊन, झालेल्या आत्मबोधाने श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना नित्य नवा आनंद झाला (६).

**(२३५)**

**अंतरीच्या सुखा नाही पै मर्यादा । यापरी अगाधा होऊनी खोल ।।१।।**
**तेथे गोविंदु अवघाची जाला । विश्वा व्यापुनिया उरला असे ।।२।।**
**बाह्य अभ्यंतरी नाही आपपर । सर्व निरंतर नारायण ।।३।।**
**मीपण माझे न देखे दुजे । *ज्ञानदेवो* म्हणे ऐसे केले निवृत्तिराजे ।।४।।**

अंतरात जे याप्रमाणे खोल आणि अगाध होऊन राहिले आहे त्या सुखाला मर्यादाच नाही (१). त्या ठिकाणी सर्व श्रीगोविंदच झाला असून विश्वाला व्यापून तो उरला आहे (२). सर्वत्र निरंतर श्रीनारायणच असल्याने अंतर्बाह्य कोणत्याही स्थितीत आता आपले आणि परके असा भाव राहिला नाही (३). मीपणा, माझे व दुसरे असे पहावयास आता कांही राहिलेच नाही. अशी अवस्था श्रीनिवृत्तिनाथांनी केली असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२३६)**

**लेवुनि अंजन दाविले निधान । देखताची मन मावळले ।।१।।**
**ऐसिया सुखाचे करूनिया आळे । बीज ते निर्मळ पेरू आता ।।२।।**

**ज्ञानाचा हा वाफा भरूनिया कमळी । सतरावी निराळी तिंबतसे ।।३।।**
***निवृत्तिप्रसादे* पावलो या सुखा । उजळलिया रेखा ज्ञानाचिया ।।४।।**

डोळ्यात जी चकाकी धारण केली आहे तिची ओळख करून देऊन असे आत्मज्ञानाचे अंजन डोळ्यात घालून श्रीनिवत्तिनाथांनी अलक्ष ठेवा दाखविला की जो पहाताच मनाचे मनत्वच नाहीसे झाले (१). अशा आत्मसुखाचे आळे करून त्यात आता निर्मळ अशा विश्वबीजाची पेरणी करू (२).हा ज्ञानाचा वाफा हृदयकमळात भरून निरालंब सतरावी कळा त्यात तुडुंब भरू (३). श्रीनिवृत्तिनाथांचे कृपाप्रसादाने ज्ञानाची रेषा उजळल्याने या सुखाला प्राप्त झालो,असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२३७)**

**मी माझे द्‌वैत अद्‌वैत होऊनी ठेले । सद्‌गुरु एका बोले ठेविले ठायी ।।१।।**
**द्‌वैत गिळी अद्‌वैत मेळी । चित्ताची काजळी तोडी वेगी ।।२।।**
***ज्ञानेदव* म्हणे निवृत्ती उदार । दीपी दीप स्थीर केला सोयी ।।३।।**

श्रीसद्‌गुरुंनी एकत्वाचे बोलण्याने जे ठिकाणावर आणून ठेविले त्यामुळे मी, माझे हे द्‌वैत अद्‌वैतच होऊन राहिले (१). अद्‌वैताशी समरस झाल्याने द्‌वैताचा ग्रास होऊन चित्ताची काजळी तोडून टाकली. भ्रममूलक अज्ञान नाहीसे झाले (२). श्रीनिवृत्तिनाथ उदार असून मोठ्या युक्तीने त्यांनी आत्मदीप परमात्मदीपात स्थिर केला असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(२३८)**

**अनंत अनंतापटी देखता तो अंतरी । हृदया भीतरी मज निववितो माये ।।१।। चालवी चक्रचाळ अलगट गोपाळ । याने केला सुकाळ सहजसुखाचा वो माये ।।२।। सांगवी ते सांगणी उमगुनी चक्रपाणी । त्या निर्गुणाचे रहाणी मी रिघाले वो माये ।।३।। भ्रांती भुली फेडुनिया निवृत्ती । *रखुमादेविवरु* विठ्ठली गती जाली वो माये ।।४।।**

अनंत प्रकाराने तो अनंत अंतरात पहाताना हृदयामध्ये तो शांत करतो (१). हे विश्वचक्र चालविणारा, अल्लड स्वभावाचा श्रीगोपाळकृष्ण याने सहज सुखाचा सुकाळच केला (२). जे सांगावयास पाहिजे ते उमगून त्या चक्रपाणीचे सांगण्याने त्या निर्गुणाचे रहाणीत माझा प्रवेश झाला (३). श्रीनिवृत्तिनाथांचे कृपेने भ्रांती भूल नाहीशी होऊन रखुमादेविवर श्रीविठ्ठलाचे ठिकाणी माझी गती जहाली, वो माय (४).



**(२३९)**

**पंचविसा वेगळे महत् तत्त्व बोलिजे । ते मज अंगविजे ऐसे निवृत्ती केले वो माये ।।१।। सहज बोधे बोधले न विचारी आपुले । म्हणोनिया मुकले अवघ्यासि वो माये ।।२।। पाचाहुनी परती मी जाहालिये निवृत्ती ।चिदानंदी सरती स्वरूपी वो माये ।।३।। ऐसे जाहले चांग अचिर देवांग । *रखुमादेविव*रे पांग फेडिले वो माये ।।४।।**

पंचवीस तत्त्वावेगळे जे परमात्म तत्त्व ते माझे ठिकाणी श्रीनिवृत्तिनाथांनी बाणविले (१). आपले कांही न विचारता सहज बोधस्थितीनेच बोध केला. यामुळे या सहजावस्थेत मी सर्वालाच मुकले (२). पंचमहाभूतापलीकडे मी निवृत्त होऊन वृत्तींच्या अतीत जी निवृत्ती, त्यायोगे चिदानंदस्वरूपाचे ठिकाणी एकरूप झाले (३). उशीर न लागता चांगले असे देवाचे अंगच मी झाले. यामुळे रखुमादेविवराने माझा पांग फेडला (४).

**(२४०)**

**सत्व रज तम प्रकृती अपारा । याही भिन्न प्रकारा हरी रया ।।१।।**
**दिसोनी न दिसे लोकी व्यापारी । घट मठ चारी हरी व्याप्त ।।२।।**
**स्वानुभवे घरी अनुभवे वाट । तव अवचित बोभाट पुढे मागे ।।३।।**
***ज्ञानदेव* म्हणे नकळे याची लीला । ते निवृत्तीने डोळा दाविली मज ।।४।।**

सत्त्व, रज, तमात्मक जी प्रकृती आहे तिच्याहून निराळा, ज्याचा पार नाही असा श्रीहरी आहे (१). घटा, मठात, चारी शून्यात तो व्याप्त असून तो दिसत असूनही या लोकांना व्यवहारात तो दिसत आहे याचे ज्ञान होत नाही (२). स्वानुभवाने जर अनुभवाची वाट धरली तर एकाएकी तोच पुढे मागे आहे असा बोभाटा होईल (३). याची लीला कोणासही कळणारी नाही. ती श्रीनिवृत्तीनाथांनी माझे डोळ्यात मला दाखविली असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२४१)**

**देखिले तुमचे चरण निवांत राहिले मन । कासया त्यजीन प्राण आपुला गे माये ।।१।। असेन धणीवरी आपुले माहेरी । मग तो श्रीहरी गीती गाईन गे माये ।।२।। सकळही गोत माझे पंढरीसी जाण । *बापरुमादेविवरा* विठ्ठलाची आण ।।३।।**

आता तुमचे चरण पाहिले तो मन निवांतच झाले; मग आता काय म्हणून प्राण द्यावा? (१). आता मी, माया जेथे हेरली जाते, अशा माहेरी राहून श्रीहरीला अनंत गीते गाऊन आळवीन (२). बापरखुमादेविवर विठ्ठलाची शपथ घेऊन सांगते माझे सर्व गोत एक पंढरीतच आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(२४२)**

**तृप्ती भुकेली काय करू माये । जीवनी जीवन कैसे तान्हेजत आहे ।।१।।**
**मन धाले परी न धाये । पुढत पुढती राजा विठ्ठल पाहे ।।२।।**
**निरंजनी अंजन लेईजत आहे । आपुले निधान कैसे आपणची पाहे ।।३।।**
**निवृत्ती गार्हस्थ मांडले आहे । निष्काम अपत्य प्रसवत जाये ।।४।।**
**त्रिभुवनी आनंदु न माये गे माये । आपेआपू परमानंदू वोसंडतु आहे ।।५।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु गे माये । देहभाव सांडुनी भोगीजत आहे ।।६।।**

जीवनाचीच जीवनाला तहान लागल्याने तृप्तीलाच भूक लागली आहे, काय करू? (१). कितीही या विठ्ठलराजास पाहिले तरी आता पुरे असे वाटतच नाही. म्हणून पुनः पुनः पहात आहे (२). निरंजन हेच अंजन डोळ्यात घालून आपला आत्मठेवाच मी त्यात पहात आहे (३). आमच्या निवृत्तिनाथांनी गृहस्थाश्रम मांडला असून त्यांचे ठिकाणी निष्कामता निर्माण झाली आहे (४). हे माये, हा आनंद त्रिभुवनात मावत नसून तो परमानंद परमात्मा आपोआप वोसंडत आहे (५). देहभाव टाकून बापरखुमादेविवर विठ्ठलाचा मी भोग घेत आहे (६).

**(२४३)**

**सावळा सुकुमार लावण्य त्रिभुवनी । अवचिता अंगणी देखिला रया ।।१।।**



**आळविता नयेची सचेतनी अचेत । भावेचि तृप्त माझा हरी ।।२।।**
**अज्ञानी न दिसे ज्ञानी येऊनी उभा । विज्ञानेसी शोभा दावी रया ।।३।।**
**ज्ञानदेवा सार सावळिये मूर्ती । *निवृत्तिने* गुंती उगविली ।।४।।**

सर्व त्रिभुवनात लावण्याची खाणच असा, चांगले आणि वाईट दोनी नाहीसे करणारा, सहाला वळविणारा, असा श्रीकृष्ण परमात्मा एकाएकी अंगणात पाहिला (१). अचेतनात तो सचेतन असून अस्तित्वभावानेच तृप्त असणारा माझा हरी आळवूनही येत नाही (२). अज्ञानाने तो दिसत नाही. ज्ञानावस्थेत तो धारणेत येतो आणि विज्ञानाने तो आपली शोभा दाखवितो (३). श्रीनिवृत्तिनाथांनी हा गुंता उकलून सारभूत सावळ्या मूर्तीचे दर्शन घडविले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२४४)**

**सद्‌गुरू सारिखा असता पाठीराखा । इतरांची लेखा कोण करी ।।१।।**
**राजयाची कांता काय भीक मागे । मनाचिये जोगे सिद्‌धी पावे ।।२।।**
**कल्पतरू तळवटी जो कोणी बैसला । काय वान त्याला सांगी जो जी ।।३।।**
***ज्ञानेदव* म्हणे तरलो तरलो । सत्य उद्‌धरिलो गुरूकृपे ।।४।।**

सद्‌गुरूसारखा पाठीराखा असल्यावर इतरांची पर्वा कोण करील? (१). मनासारख्या जर सर्व गोष्टी होत आहेत तर राजाची बायको काय भीक मागेल? (२). कल्पवृक्षाच्या मुळाशी बसलेल्याला काय उणीव भासणार आहे सांगा तरी?(३). श्रीगुरुकृपेने आपला खरा उद्‌धार झाला. यामुळे मी तरलोच असे श्रीज्ञानेश्वरमहाराज ठासून सांगतात (४).

**(२४५)**

**ब्रह्मी ब्रह्म होणे हे तो कठीण सांगता । आब्रह्मीता जयाचिया सत्ता विस्तारले ।।१।। सांगता नये सांगावे ते काय । तेथील हे सोय गुरूखुणा ।।२।। मन हे अमोलिक जरी गुंफे अमुपा । तरीच हा सोपा मार्ग रया ।।३।। बापरखुमादेविवरु ब्रह्मविद्येचा पुतळा । तेथील हे कळा निवृत्ति प्रसादे ।।४।।**

ज्या ब्रह्मापासून ज्या सत्तेने हे सर्व विस्तार पावले त्या ब्रह्माच्या ठिकाणी ब्रह्म

कसे स्वतःच व्हावे हे सांगावे तर कठिण आहे (१). जे सांगता येणे सारखे नाही ते काय सांगावे? ती युक्ती गुरुखुणेनेच जाणून घेतली पाहिजे (२). अमोलिक आणि अमूप अशा स्वरूपाचे ठिकाणी जर मन गुंतले तरच हा मार्ग सोपा आहे (३). बापरखुमादेविवर हा ब्रह्मविद्येचा पुतळा असून त्याचे प्राप्तीची कळा श्रीनिवृत्तिनाथांचे कृपाप्रसादातच आहे (४).

**(२४६)**

**परे पडे मिठी तेथे बोलणेचि नुठी । आवडी गिळूनिया आता जीवे नाही तुटी ।।१।। सांगिजे बोलिजे तैसे नव्हे गे माये । सुमरी मारिले येणे श्रीगुरुराये ।।२।। *निवृत्तीदासा* सन्निधान दुरी । आवडी गिळुनी आता जीवे नाही उरी ।।३।।**

परा म्हणजे जेथून स्फुरण होते अशा वाचेला जेथे मिठी पडली तीच जेथे मौनावली तेथे आता बोलणे वैखरीतून उमटणार कसे? अनिर्वाच्य स्थितीशी तादात्म्य झाल्याने आवड जेथे ग्रासली गेली व एकरूप अवस्था झाली तेथे आत्मस्वरूपाची तुटी जीवाला व्हावी कशी? उलट अखंड योगच झाला (१). सांगावे बोलावे असे ते मुळी नाहीच. श्रीगुरुरायांनी ते स्मरणही गुप्तच केले (२). श्रीनिवृत्तिनाथांनी सन्निधानही दूर केले. सन्निध हा शब्दही थोडा दूरच राहील. तोसुद्धा दूरपणाच वाटेल इतके ऐक्य केले. आवडीचाही येथे ग्रास झाल्याने माझा जीवपणाही त्यांनी शिल्लक ठेवला नाही, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (३).

**(२४७)**

**समसुखे शेजे निजोनिया काज । साधीलेसे बीज निवृत्तीराये ।।१।।**
**पृथ्वीतळ शय्या आकाश प्रावरण । भूतदया जीवन जीवभूत ।।२।।**
**निजी निज आली हरपल्या कळा । ब्रह्मानंद सोहळा गुरूशिष्यी ।।३।।**
***ज्ञानदेवी* काज निरालंब रूप । तळीवरी दीप सतेजला ।।४।।**

चित्ताच्या समत्वाचे सुखाचे शेजेवर निजल्याने निजत्व संपादिल्याने श्रीनिवृत्तिरायांनी हे बीजतत्त्व मला साधून दिले (१). पृथ्वी ही शय्या असून आकाश



हेच पांघरूण आहे. भू म्हणजे भूत म्हणजे झालेले, यावर दया हेच जीवभूत जीवन आहे (२). निजत्वात जी निजवृत्ती जागृत झाली तो जीवनाच्या कळा हरपून गुरुशिष्यांचे एकपणात हा ब्रह्मानंद सोहळा झाला (३). निरालंब रूपाचे ज्ञान हेच श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे मुख्य काम असून या ज्ञानावस्थेत तो आत्मज्ञानदीप तळापासून तो वरपर्यंत प्रकाशमान झाला (४).

**(२४८)**

**साकारु निराकारू वस्तु सद्गुरू आमुचा । तेणे या देहाचा केला उगरु ।।१।।**
**उगविले उगविले मायेने निरसले । एकत्त्व दाविले त्रिभुवन रया ।।२।।**
**सत्रावी दोहोनी इंद्रिया सौरसु । गुरूमुखे उल्हासु भक्ति महिमे ।।३।।**
***ज्ञानदेव* म्हणे मी नेणता प्रपंची । तोडली मोहाची पदवी आम्ही ।।४।।**

साकार निराकार असा वस्तुरूप आमुचा सद्गुरू असून त्याने हा देह प्रकाशात आणला (१). असे प्रकाशात आणून आणून मायेचाच निरास करून त्रिभुवनात एकत्वच दाखविले. द्वैताचा निरास झाला (२). सत्रावीचे दोहन करून भक्तिमहिमा सर्व इंद्रियांना समरसतेने मोठ्या उल्हासाने प्राप्त करून दिला (३). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मी प्रपंचात नेणता असून त्या योगे मोहाची श्रेष्ठता ज्याने जीव मोहवश होतात, ते मोहाचे आकर्षणच नाहीसे केले (४).

**(२४९)**

**अमित्व भुवनी भरले शेखी जे उरले । ते रूप आपुले मज दावियले वो माय ।।१।। आता मी न ये आपुलिया आस । तुटले सायास भ्रांतीचे वो माय ।।२।। मंजुळ मंजुळ वायोगती झळकती । तापत्रये निवृत्ती निर्वाळिले वो माय ।।३।। वेडावले एकाएकी निजधामरूपी । *रखुमादेविवरु* दीपी दिव्य तेज वो माये ।।४।।**

अनंत भुवनात व्यापूनही जे शेवटी उरले आहे ते आपले रूप मला दाखविले (१). आता आपल्या आशेवर भ्रममूलक सर्व सायासांचे निराकरण झाल्याने मी येणारच नाही (२). मंजुळ मंजुळ अशी वायूची गती झुळझुळ अशी प्रकाशमान

असल्याने तापत्रयांचे निर्मूलनच झाले (३). एकाएकी निजधामात रखुमादेविवर दीप दिव्य तेजाने प्रकाशमान झाल्याने मी वेडावूनच गेलो असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२५०)**

**शुद्धमती गती मज वोळला निवृत्ती । त्याने पदोपदी प्रीती स्वरूपी वो माय ।।१।। आता मी जाईन आपुलिया गावा । होईल विसावा सुखसागरी वो माय ।।२।। पाहता न देखे आपुले कोणी नाही । निजरूप पाही अनंता नयनी वो माय ।।३।। हा *रखुमादेविवरु* गुरुगम्य सागरू । न करीच अव्हेरू माझा वो माय ।।४।।**

माझी बुद्धी शुद्ध असून त्याप्रमाणेच माझे जीवनाची गती असल्याने श्रीनिवृत्तिनाथ मजवर प्रसन्न झाले. त्यामुळे पावलोपावली स्वरूपाचे ठिकाणी प्रेम निर्माण झाले (१). आता मी आपल्या गावाला जाईन. त्या योगे स्वरूपसुखसागरातच मला विसावा होईल (२). पहावयास आता वेगळे काही न राहिल्याने पहावे तर आत्मरूपावाचून काही दिसतच नाही. आपणच सर्व झाल्याने आपले म्हणजे आपणात जे काही वेगळेपण आपणाशी संबंधित असे काही राहिले नाही. अनंत नयनांत निजरूपाचाच साक्षात्कार होऊ लागला (३). हा रखुमादेविवर गुरुगम्य सागरच असून माझा कधी अव्हेर करीत नाही (४).

**(२५१)**

**साध्य साधन काज निवृत्तीचे गूज । केशव सहज सर्वभूती ।।१।।**
**रामकृष्ण मंत्रे प्रोक्षियेली गात्रे । हरिरूप सर्वत्र भरला दिसे ।।२।।**
**गुरुगम्य चित्त जाले माझे हीत । दिननिशी प्राप्त हरी आम्हा ।।३।।**
**पुर्णिमा प्रकाश चंद्र निराभास । हरि हा दिवस उगवला ।।४।।**
**चकोरे सेविती आळी उळे पहाती । घटघटा घेती अमृत पान ।।५।।**
**ऐसे हे पठण ज्ञानदेवा जाले । *निवृत्तीने* केले आपणा ऐसे ।।६।।**

श्रीनिवृत्तिनाथांचे गौप्य हेच साध्य साधनाचे कारण असून त्याने सर्व भूतमात्राचे ठिकाणी- सकार हकार जेथे जन्मास येतात अशा- सहजतेत केशवाची अनुभूती



आली (१). रामकृष्ण मंत्राने माझी गात्रे अभिमंत्रित होऊन मला सर्वत्र भरलेले हरिरूपच दिसू लागले (२). गुरुगम्य चित्तात ठसल्याने माझे हितच झाले. दिननिशीवाचक गतीमध्ये हरीचीच प्राप्ती झाली (३). निराभास चंद्राचा पूर्ण प्रकाश झाल्याने सोळाव्या कलेने हरी हा चित् सूर्य उगवला (४). चकोर चंद्रामृत घटघटा पितात (५). असा हा अभ्यास श्रीज्ञानेश्वरांचा झाल्याने निवृत्तिनाथांनी त्यांना आपल्या सारखेच केले (६).

**(२५२)**

**अवेवी सावेव सम साम्य बुद्धी । शांति दया सिद्धी प्रगटल्या ।।१।।**
**वोळली हे कृपा निवृत्ती दयाळा । सर्व रोम पाल्हाळा निवृत्तीराजे ।।२।।**
**दिवसाचे चांदिणे रात्रीचे उष्ण । सांगितला प्रश्न निवृत्तीराजे ।।३।।**
**सोहं सिद्धी मंत्रे प्रोक्षिला संसार । मरणाची येरझार खुंटियेली ।।४।।**
**चित्त वित्त गोत आपण पै जाला । देही देह गेला भाव माझा ।।५।।**
***ज्ञानेदवा* रसी स्नान दान गंगे । प्रपंचेसी भंगे विषय जात ।।६।।**

ज्याच्यामुळे अवयव असा जो अवयवी, बुद्धीत साम्यतेने प्रतीत झाल्याने शांति, दया अष्ट सिद्धी प्रगट झाल्या (१). दयाळू श्रीनिवृत्तिनाथ यांचे कृपेमुळे सर्वांग रोमांचित झाले. आणि अंगी प्रेमाचे अंकुर फुटल्याने स्वेद, कंपादी भाव निर्माण झाले (२). दिवसाचे चांदणे व रात्रीचे ऊन या प्रश्नावरून श्रीनिवृत्तिनाथांनी मला बोध केला (३). सोहं सिद्धी मंत्राने संसार शुद्ध केला. यामुळे माझी जन्ममरणाची येरझारच खुंटली (४). चित्त, वित्त, गोत जे कांही माझे होते ते सर्व निवृत्तिनाथ आपणच झाल्याने देहाचे ठिकाणी असणारा माझा देहभावच नाहीसा झाला (५). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना रसरूप परमात्मगंगेत स्नान, दान घडलेमुळे पंच विषयासकट प्रपंचही नाहीसा झाला (६).

**(२५३)**

**अरे अरे ज्ञाना झालासि पावन । तुझे तुज ध्यान कळो आले ।।१।।**
**तुझा तूचि देव तुझा तूचि भाव । फिटला संदेह अन्य तत्त्वी ।।२।।**
**मुरडुनिया मन उपजलासी चित्ते । कोठे तुज रिते न दिसे रया ।।३।।**

**दीपकी दीपक मावळल्या ज्योती । घरभर वाती शून्य झाल्या ।।४।।**
**वृत्तीची निवृत्ती आपणासकट । अवघेची वैकुंठ चतुर्भुज ।।५।।**
**निवृत्ती परमानुभव नेमा । शांती पूर्ण क्षमा ज्ञानदेवो ।।६।।**

अरे ज्ञानेश्वरा, तू पवित्र झाला आहेस, कारण तुझे तुलाच ध्यान म्हणजे काय हे कळून आले (१). तुझा तूच देव असून तुझा तूच भाव आहेस. यामुळे द्वैतमूलक जो काही संशय आहे तो नाहीसा झाला आहे (२). मनाची मुरड साधल्यामुळे चित्ताचे ठिकाणी तुझी तुला प्रतीती आली, यामुळे आता स्वरूपाव्यतिरिक्त कोठेही मोकळे असे काही दिसतच नाही (३). दीपाचे ठिकाणी दीप साक्षात्काराला आलेने जीवन ज्योती मावळल्याने घरामधील जीवनसूत्राच्या वाती शून्यच झाल्या (४). आपणासह वृत्तीची निवृत्ती झाल्यामुळे अवघे चतुर्भुज ब्रह्मरूपच झाले (५). श्रीनिवृत्तिनाथांचे श्रेष्ठ अनुभवाचे नेमात शांतिक्षमादि गुण पूर्णतः विकसित झाले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (६).

**(२५४)**

**परेसी जव पाहे तव दिसे हे अरूते । तळी तळा खालते विश्वरूप ।।१।।**
**दिव्य चक्षुदृष्टी निवृत्तीने दिधली । अवघीच बुझाली विष्णू माया ।।२।।**
**शम दम कळा दांत उदांत । शांति तत्त्व मावळत उपरमेसी ।।३।।**
**गगनी दिनमणी गगनासगट । अवघेची वैकुंठ तया घरी ।।४।।**
**उद्‌भट कारण केले हो ऐसे । तुष्टोनी सौरसे केले तुम्ही ।।५।।**
***ज्ञानदेव* शरण निवृत्तीच्या चरणा । कासवीचा पान्हा पाजीयेला ।।६।।**

स्फुरणाचे दृष्टीने पहाता खरोखरी हे विश्वरूप तळाचेही तळी दिसते (१). श्रीनिवृत्तिनाथांनी दिव्य चक्षूंची पहाण्याची दृष्टी दिल्याकारणाने ही विष्णूची माया नाहीशी झाली (२). शमदमादि कला आणि उदात्त, अनुदात्त स्वराने युक्त जो वेद शांतितत्त्वात उपरमासह मावळले (३). गगनात आत्मसूर्य प्रगट झाल्याने आकाशासह सर्व वैकुंठच त्या घरात झाले (४). हे निवृत्तिराया, आपण संतुष्ट होऊन मोठ्या प्रेमाने हे महत् कार्य केलेत (५). अशा श्रीनिवृत्तिनाथांना श्रीज्ञानेश्वरमहाराज शरण गेले तो



कासवीप्रमाणे कृपादृष्टीने त्यांनी रक्षण केले (६).

**(२५५)**

**ऐसे हे अंडज सांगितले देवे । सांगोनिया भावे गिळियेले ।।१।।**
**गिळिला प्रपंच समाप्ती इंद्रिया । वैष्णवी हे माया बिंबाकार ।।२।।**
**निरशून्य शून्य साधुनी उपरम । वैकुंठीचे धाम हृदय केले ।।३।।**
**जीव शीव शेजे पंक्तीस बैसली । पंच तत्त्वांची बोली नाही तेथे ।।४।।**
**तत्त्वी तत्त्व गेले बोलणे वैखरी । वेद वक्ते चारी मान्य झाले ।।५।।**
***ज्ञानदेव* म्हणे निवृत्ती तुष्टला । सर्वांगे दिधला सम बोध ।।६।।**

ब्रह्मांडाचे उत्पत्तीचा प्रकार देवांनी सांगितल्यावर आत्मभावाने त्या ब्रह्मांडाचा ग्रासही केला (१). अर्थात् प्रपंचासकट इंद्रियांचे व्यवहाराची समाप्ती झाली. यामुळे मायाही परिपूर्ण बिंबाकार परमात्मरूपच झाली. ती वेगळी उरलीच नाही (२). शून्य साधून शून्यातीत मायेपैल होऊन निरशून्यावस्थेत उपरम झाल्याने हृदय हे परमात्म्याचे मंदिरच केले (३). ज्या ठिकाणी पंच तत्त्वांची भाषाच संपली त्या निरुपाधि स्थितीत जीवशिवांचे ऐक्यच झाले (४). जीवतत्त्व शिवाशी एकरूप झाल्याने निरुपाधि परमात्मतत्त्वात मिळून गेले हे वैखरीचे बोलणे चारी वेदांनाही मान्य झाले (५). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हा समत्त्वाचा बोध श्रीनिवृत्तिनाथांनी संतुष्ट होऊन सर्वांगी दिला. त्यात अपुरे असे काही राखले नाही. म्हणून माझे सर्वांगीण समाधान झाले (६).

**(२५६)**

**रवितेज किरण फाकलिया तेज । उडे रे सहज तिमीर रया ।।१।।**
**तैसा तू गभस्ती निवृत्ती उदारा । उगवोनि चराचरा तेज केले ।।२।।**
**तेजी तेज दिसे अव्यक्ताचा ठसा । उमजोनी प्रकाशा न मोडे तुझा ।।३।।**
**चंद्रोदयी कमले प्रकाशिले सीते । तैसे तुझे भरते करी आम्हा ।।४।।**
**वृत्तीची निवृत्ती देखिली म्या तुझी । हरपली माझी चित्तवृत्ती ।।५।।**
**ज्ञान ऐसे नाव *ज्ञानदेवा* देसी । शेखी तुवा रूपासी मेळविले ।।६।।**

सूर्य तेजाचे किरण फाकल्यामुळे त्या तेजाने सहजच अंधार नाहीसा होतो

(१). त्याप्रमाणे, हे श्रीनिवृत्तिराया, उदारपणे प्रगट होऊन आपल्या आत्मप्रकाशाने या चराचराला तुम्ही सतेज केले आहे (२). तेजात तेज प्रतीत होऊन (होत असून) अव्यक्ताचा ठसा अनुभवून हा आपला प्रकाश लुप्त होत नाही (३). चंद्रोदयाचे वेळी जशी कमळे प्रफुल्लित होतात, त्याप्रमाणे तुझे कृपेने आम्हाला भरते येते (४). आपली वृत्तीची नावाप्रमाणेच निवृत्ती झाली आहे असे मी प्रत्यक्ष पाहिल्याने माझी चित्तवृत्तीच निवृत्त झाली आहे (५). माझे नाव आपण ज्ञान असे ठेवून त्याला विज्ञान स्थितीत आणून तुम्ही मला आपल्या स्वरूपात शेवटी मिळवून घेतले (६).

**(२५७)**

**अरे स्वरूपा कारणे विश्वरूप घेतले । सगुण झाकिले निर्गुण रया ।।१।।**
**तत्त्वी तत्त्व कवळी उगवे रवि मंडळी । अवघीच झाकोळी आपुल्या तेजे ।।२।।**
**द्रष्ट्याचिये दीप्ती दृश्यची न दिसे । समरसी भासे तेज त्याचे ।।३।।**
**चित् स्वरूपी नांदे चित् स्वरूपी भासे । ॐकारा सरिसे तदाकार ।।४।।**
**प्रेमकळी ओतिले सोज्वळीत तेज । तेथे तू विराज *ज्ञानदेवा* ।।५।।**

आपले सुख आपण चाखणेकरिता स्वरूपानुभूतीसाठी परमात्म्याने विश्वरूप धारण केले. पण सगुणत्वाने निर्गुण झाकले गेले (१). परंतु तत्त्वाने तत्त्वाचे आकलन झाले तर सूर्यप्रकाशात चंद्रादि लुप्त होतात त्याप्रमाणे आत्मतेजात दृश्य रहातच नाही (२). द्रष्ट्याचे प्रकाशात दृश्य दिसतच नाही. त्याचेशी समरस असेच त्याचे तेजात सर्व भासमान होते (३). ॐकाराशी तादात्म्य झाल्याने चित्स्वरूपाचे ठिकाणी नांदणारा चित्स्वरूपानेच प्रतीत होतो (४). प्रेमकलेत हे सोज्वळ तेज ओतले असून, हे ज्ञानदेवा, तू तेथे विराजमान हो (५).

**(२५८)**

**स्वामीचे कृपेने चिद्घन ओळले । रसातळ पाल्हेळे ब्रह्म तेजे ।।१।।**
**कृपाळु श्रीगुरू ओळला सर्वत्र । आपे आप चरित्र दृष्टी दावी ।।२।।**
**ॐकाराचे बीज समूळ मातृकी । दिसे लोकालोकी एकतत्त्वी ।।३।।**
**अविकारी साकार अरूपी रूपस । दावी आपला भास आपणासहित ।।४।।**



**सर्वांग समतेजे ऐसा हा चोखडा । पाहता चहुकडा दिव्य तेज ।।५।।**
***ज्ञानदेव* म्हणे निवृत्तीशी पुसिले । सत्रावी दोहिले पूर्ण अंशी ।।६।।**

श्रीनिवृत्तिनाथांचे कृपेने चैतन्य कृपामय होऊन त्याने ब्रह्मतेजाने रसातळ म्हणजे पाताळादि चतुर्दश भुवने व्यापून टाकली (१). कृपाळू श्रीगुरू सर्वत्र कृपारूप असून आपोआप अध्यात्मजीवन दृष्टीला दाखवीत आहेत (२). अकार-उकार-मकारात्मक हे ॐकार बीजतत्त्व मूळापासून सर्व लोकांत एक तत्त्वानेच दिसत आहे (३). अविकाराचे ठिकाणी साकार व अरूपाचे ठिकाणी रूप आपल्यासहित हा ॐकार दाखवितो (४). सर्वांगाने जो समच आहे असा शुद्ध तेजोरूप हा ॐकार दिव्य तेजाने चहूकडे दिसत आहे (५). श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात श्रीनिवृत्तिनाथांना विचारल्याबरोबर सत्राव्या जीवन कलेचे दोहन करून पूर्णांशाने त्यांनी मजकडून अमृतपान करविले (६).

**(२५९)**

**अरे अरे ज्ञाना ज्ञान उघडे बोलसी । तुझा तूंचि होशी हरि ऐसा ।।१।।**
**आपुले ते झाकी पर ते दावी । पश्यंतीये भावी मध्यमे राहे ।।२।।**
**तत्त्व तेचि धरी रजोगुण चारी । पंचमा आचारी सापडती ।।३।।**
**षड्रसी भोक्ता हरीरूप करी । सप्तमा जिव्हारी कळा धरी ।।४।।**
**अष्टमा अष्टसिद्धी अष्टांग नेमेशी । ते जीवभावेसी तुचि होसी ।।५।।**
**नवमा नवमी दशमा वृत्ती । एकादशी तृप्ती करी ज्ञाना ।।६।।**
**ऐसा तू एकादश होई रे तू ज्ञाना । द्वादशीच्या चिन्हा सांगो तुज ।।७।।**
***निवृत्ती* द्वादश गुरूसेवनी भाष्य । एकविध कास घाली ज्ञाना ।।८।।**

अरे ज्ञानदेवा, तू निरूपाधिक आत्मज्ञान बोलत आहेस. तो तुझा तूच श्रीहरी आहेस (१). आपुले ते स्वरूप झाकून तूच परेपाशी स्फुरण दाखवीत आहेस. पश्यंतीत स्थायी भाव दृढ करून माध्यमानेच (मध्यमानेच) तू रहात आहेस (२). त्या तत्त्वानेच रजोगुण व त्यापासून चार खाणी, चार वाणी, चार देह, चार अवस्था, चार शून्ये धरली आहेत. त्यात सर्वपैल जो पाचवा त्याची प्रचीती येती. तोच मुख्य प्राण आहे (३). षड्रसी भोक्ता जो जीव तो हरिरूपानेच निर्माण केला आहे. पंचप्राण, मन, बुद्धी या

सातांना जीवनकळा धारण करीत आहे (४). अष्टांग नेमाने प्राप्त होणाऱ्या अष्ट सिद्धी जीवभावाने तूच होत आहेस (५). नवविध भक्तीचे लक्ष्य जे दशम किंवा नवद्वारा पैल जे दशमद्वार आहे तेथे ऐक्य पावून त्या पैल एका दशस्थानात ज्या ठिकाणी एकच अवस्था आहे तेथेच स्वयंतृप्त होत असत (६). असा तू एकादश होत आहेस म्हणून तुला मी जीवन्मुक्तावस्थेचे गुह्य सांगतो (७). गुरूसेवाही बारावी स्थिती एकत्वापेक्षाही आनंद देणारी. त्याची तू कास धरली आहेस, असे श्रीनिवृत्तिनाथांनी मला सांगितले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (८).

**(२६०)**

**अरे अरे ज्ञाना ज्ञान हे निवृत्ती । देही देहा उपरती तुज प्राप्त ।।१।।**
**अर्थावबोध अर्थुनी दाविला । ज्ञानिया तू भला ज्ञानदेवा ।।२।।**
**सोहं तत्त्व साधले प्रमाण सर्वत्री । उभयता गात्री प्रेम तनू ।।३।।**
**बिंबी बिंबरसी उपरम देखिला । प्रपंच शोखिला तुवा एके ।।४।।**
**विष्णू नाममंत्र सोहं तेज दिवटा । उजळून चोहटा शुद्ध केला ।।५।।**
**निवृत्तीचा शिष्य *ज्ञानदेवी* भाष्य । शांति समरस बोध उत्तरे ।।६।।**

अरे ज्ञानदेवा, निवृत्ती हेच ज्ञान आहे. यामुळे या देहातच तू देहापासून निवृत्त झाला आहेस (१). अर्थ बोध कृती अर्थाने तू दाखविलास म्हणून, हे ज्ञानदेवा, तू ज्ञानीयांत भला आहेस (२). सर्वांना प्रमाण असलेले सोहं तत्त्व किंवा सर्वत्र प्रमाण असलेले सोहं तत्त्व तू साधल्याने तुझ्या माझ्या देहात ते प्रेमच निर्माण झाले आहे (३). परमात्मबिंबामध्ये जीवात्मबिंब समरस झाल्याने वृत्ती निवृत्त होऊन तू एकट्यानेच सर्व प्रपंच शोषून टाकलास. देहभाव उरलाच नाही (४). विष्णुनाम मंत्र जो सोहं त्या तेजाने मार्ग उजळून तू हा चव्हाटा शुद्ध केलास (५). निवृत्तीचा शिष्य हेच श्रीज्ञानेश्वरांचे भाष्य असून जीवनाचे समरसतेत शांती बोध प्राप्त झाला (६).

**(२६१)**

**सूक्ष्म साध्य काज सांगितले स्वामी । धृती धारणा क्षमी हरपल्या ।।१।।**
**सूक्ष्म सख्य नेले विश्वरूप देही आले । प्रपंचेसी मावळले तिमिर रया ।।२।।**



**विशेषेसी मिठी दिधली शरीरे । इंद्रिये बाहिरे नाईकसी ।।३।।**
**ऐसे हे साधन साधका कळले । चेताविता बुझविले मन माझे ।।४।।**
**उताविळ पिंड ब्रह्मांडासहित । नेत्री विकासतर ब्रह्म तेज ।।५।।**
***ज्ञानदेव* विनवी निवृत्तीस काज । हपरली लाज संदेहेसी ।।६।।**

अत्यंत सूक्ष्मतम असे आपले ध्येय आहे हे सद्गुरूंनी दाखवून दिल्याने त्यामुळे धैर्य धारणा, क्षमा यांची जरुरीच उरली नाही. त्या मावळल्या (१). त्या सूक्ष्माकडे भक्तीने नेल्यामुळे अनंत असे विश्वरूप देहातच अनुभवास आले. यामुळे अज्ञानमूलक प्रपंच, व्यवहार सर्व नाहीसेच झाले (२). चैतन्य शरीराने चैतन्याला मिठी दिली. तो बाह्य इंद्रिये आपले विषय उपभोगण्यास नाराज झाली (३). असे हे साधन या साधकाला कळल्यामुळे चेतना देणारा जो आत्मा त्याने माझे मन विरघळूनच टाकले (४). यामुळे पिंड, ब्रह्मांड नेत्रात विकसित होणाऱ्या ब्रह्मतेजाशी समरस होण्याकरिता उतावीळ झाले (५). हे ध्येय गाठणेसाठी श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जो श्रीनिवृत्तिनाथांना विनंती केली तो द्वैत आणि संदेह नाहीसे झाले (६).

**(२६२)**

**पहाते पहाणे पहाता निरूते । पाहिलीया तेथे तेचि होय ।।१।।**
**तोचि तो आपण श्रीमुखे जाण । आणिक साधन न लगे काही ।।२।।**
**भानुबिंबेविण निरसले तम । *ज्ञानदेवी* वर्म सांगितले ।।३।।**

खरोखरी पहाणाराने पहाणे पाहता पाहता पाहणारा ज्याला पहावयाचे तोच होतो, ब्रह्मच होतो. कारण तोच द्रष्टा आणि दृश्य अशी स्थिती आहे (१). तोच तो आपण आहोत हेच ज्ञान गुरुमुखाने होते. याला वेगळ्या साधनाची आवश्यकताच नाही (२). सूर्यप्रकाशाशिवाय हे अज्ञान नाहीसे झाले, का त्याला अस्तित्त्वच नाही हे वर्म श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले (३).

**(२६३)**

**अनुपम्य तेजे धवळले ब्रह्मांड । विश्वरूपी अखंड तदाकार ।।१।।**

**रसी रस पुरे प्रेमाचे स्फुंदन । एकरूपी घन हरी माझा ।।२।।**
**नाद आणि ज्योति परिपूर्ण आम्हा । परेसी महात्मा उजेडला ।।३।।**
**जाला अरूणोदयो उजळले सूर्यतेज । त्याहुनी सतेज तेज आले ।।४।।**
**हरपल्या रश्मी देहभाव हरी । रिद्धी सिद्धी कामारी जाल्या कैशा ।।५।।**
**निवृत्ती उपदेश ज्ञानिया लाधला । तत्त्वी तत्त्व बोधिला *ज्ञानदेव* ।।६।।**

विश्वाचे ठिकाणी अखंड तदाकार असलेल्या अनुपम परमात्मतेजाने ब्रह्मांड शुद्ध झाले (१). एकच, सर्व रसांचाही रस असा माझा घनदाट भरलेला श्रीहरी या ठिकाणी हा जीवनरस मुरल्याने प्रेमाचे स्फुंदन झाले (२). परेच्या ठिकाणी हा महान् आत्मा उदित झाल्याने नाद, ज्योती आम्हाला परिपूर्णत्त्वाने प्रतीत झाल्या (३). अरुणोदयाचे वेळी सूर्यतेजाने विश्व उजळले जाते त्यापेक्षाही श्रेष्ठ सतेज परमात्मतेज साक्षात्काराला आले (४). या हरिप्रकाशाने देहभाववृत्ती कशा हरपून गेल्या मग काय? या रिद्धी सिद्धी कामारी होऊन राहिल्या (५). श्रीनिवृत्तिनाथांचा ज्ञानोपदेश लाभल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना तत्त्वानेच तत्त्वबोध झाला (६).

**(२६४)**

**अमर रसद्वंद्व विसरला भूक । त्याहुनी एथे सुख अधिक दिसे ।।१।।**
**जववरी भुली तववरी खोली । समुद्रीची खोली विरळा जाणे ।।२।।**
**आशा पाश परी निवृत्तीत टाक । पडियेले ठक चिद्रूपरुपी ।।३।।**
**प्रकाश हरीचा प्रकाशला देही । नेणतीच काही मूढ जन ।।४।।**
**ऐल तीरी ठाके पैल तीरी ठाके । तेथे कैसेनी सामर्थ्ये पाहो आता ।।५।।**
**जाणीव राहाणीव तूंचि निवृत्तीदेवा । हरि उभय यावा ज्ञानदेशी ।।६।।**
**ज्ञानदेवा शांती उन्मनी रहस्य । हरिरूप भाष्य करविले ।।७।।**
***बापरखुमादेविवर* विठ्ठल हृदयी । आलिंगता बाही भ्रमर जाला ।।८।।**

भोंगा हा रसादि द्वंद्व इच्छाविहीन होऊन विसरतो; त्याहूनही या ठिकाणी अधिक सुख आहे असे दिसून येते (१). जोपर्यंत याचे आकर्षण आहे तोपर्यंत कांही बोलता येते.पण या ब्रह्मसमुद्राचा तळ गाठणारा विरळाच दिसेल (२). आशापाशाचा



शेवट ही निवृत्ती असून चित्स्वरूपाचे ठिकाणी मौनच प्राप्त झाले (३). श्रीहरीचा प्रकाश या देहातच प्रकाशित झाला असून तो मूर्ख जीवांना कळत नाही (४). प्रपंचाचे अलीकडे व पलीकडे म्हणजे प्रवृत्ती, निवृत्ती तटाकाला सर्वत्र परमात्माच भरला आहे, तर आता त्यास कोणत्या सामर्थ्याने पहावे? (५). जाणीव व शहाणपणा हे श्रीनिवृत्तिनाथा, सर्व तुम्हीच असून दोनी ठिकाणी श्रीहरीचीच व्याप्ती आहे हेच ज्ञान तुम्ही देता (६). श्रीज्ञानेश्वरमहाराज यांची शांती हेच उन्मनीचे रहस्य असून हरिरूपाचे व्याख्यान या वृत्तिकरवीच करविले (७). हृदयस्थ बापरखुमादेविवर श्रीविठ्ठल याने आपल्या हातांनी कवटाळल्या बरोबर श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात मी अमरच झालो (८).

**(२६५)**

**आपुले कांही न विचारीता धन । निर्गुणासी ऋण देऊ गेले ।।१।।तिथे होते ते निध साठविले । विश्वासे घेतले लक्षवित ।।२।।ऐसा हा निवृत्तिप्रसादु फळासी आला । निर्फळ केला मज निर्गुणाकारे ।।३।। *बापरखुमादेविवरु* विठ्ठलु साच म्हणोनि रिघालौ । तेणे नेऊनि घातलौ निरंजनी ।।४।।**

आपली अवस्था काय होईल याचा कांही एक विचार न करता निर्गुणाशी तादात्म्य झाले (१). त्या ठिकाणी होते ते निधान साठविले व त्या ठिकाणी लक्ष्य देऊन विश्वासाने घेतले (२). श्रीनिवृत्तिनाथांचा कृपाप्रसाद फलद्रूप झाला. त्यामुळे निर्गुणाकार झाल्याने मला कर्मफलातीत केले (३). बापरखुमादेविवर विठ्ठल हाच खरा आहे म्हणून त्याचे ठायी त्याचे प्राप्तीकरिता निघालो तो त्यांनी मला निरंजनाचे ठिकाणी नेऊन घातले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (४).

**(२६६)**

**चौदा भुवनी चौघा भुलविले । वेव्हार नासिले स्मृति व्यालौ गे माये ।।१।।**
**अवघे धन देऊनि मज निर्धन केले । ऋण मागावया धाडिले नये ते ठायी ।।२।।**
**ऐसे श्रीनिवृत्ती शब्दे अगाध जाले । माझे मीपण गेले धन देखा ।।३।।**
***बापरखुमादेविवरु* विठ्ठलु साक्षी । तो मज पारखी घेऊनी गेला ।।४।।**

चतुर्दश भुवनांमध्ये शोध घेणाऱ्या वेदांना परमात्म्याने भुलविले. तो व्यवहारच खुंटला व स्मृतीच प्रगट झाली (१). आपले आत्मत्व देऊन मला देहातीत केले. परमात्म्यापाशी ऋण मागो गेले असता आता पुनः देहावर येणे नाही असे झाले (२) श्रीनिवृत्तिनाथांचे उपदेशाने असे अगाध ज्ञान झाले, तो माझे मीपणाचे द्रव्य नाहीसे झाले, मीपणा उरलाच नाही (३). साक्षीभूत बापरखुमादेविवर विठ्ठल तो माझी पारख करून मला आपल्या स्वरूपाप्रत घेऊन गेला (४).

**(२६७)**

**अवघड ते एक घडले माझ्या अंगी । तीही ऋण चौघी मज देवविले ।।१।।**
**ज्यासी दिधले त्यासी नाव पै नाही । जया रूप नाही त्यासी ऋण देवविले।।२।।**
**निवृत्ती गुरूने अधिक केले । निमिष्यमात्री दाविले धन माझे ।।३।।**
**येणे *रखुमादेविवरु* विठ्ठले होते ते आटिले । सेखी निहाटिले निळारंभी ।।४।।**

जे खरोखरी घडणे अवघड तेच एक परमात्मस्वरूप माझे अंगी घडून आले, अनुभूतीला आले. जागृती, स्वप्न, सुषुप्ती अवस्थेत ज्याचे उपकार आहेत, त्या परमात्म्याची अवस्था जी तुरीया त्या अवस्थेप्रत मला देवविले (१). पण हे ऋण ज्याला दिले त्याला नाव नाही, अशाला हे उपकृतीचे ऋण देवविले (२). एका निमिषात हे माझे आत्मधन मला दाखविले असे काही श्रीगुरू निवृत्तिनाथ यांनी काही अधिक केले (३).दृश्याची आटणी रखुमादेविवर विठ्ठलाने केली आणि ही दृष्टी दृश्याचा शेवट जेथे होतो त्या आरंभी असणाऱ्या नील प्रकाशाचे ठिकाणी खिळून गेली (४).

**(२६८)**

**माया विवर्जित जाले वो । माझे गोत पंढरीराये राहिले वो ।।१।।**
**पतिव्रता मी परद्वारिणी । पर पुरूषेसी व्यभिचारिणी ।।२।।**
**साचारी चौदा जाली वो । सेखी आठरा घोकुनी राहिले वो ।।३।।**
**निवृत्तीप्रसादे मी गोवळी वो । माझा भावो तो विठ्ठलु न्यहाळी वो ।।४।।**

माझे ठिकाणी आता माया राहिलीच नाही. या कारणामुळे माझे गणगोत सर्व



पंढरपूरलाच राहिले आहे (१). परमात्म्याचे द्वार शोधणारी मी पतिव्रता असून माझे प्रेम परमात्मपुरुषाचे ठिकाणी जडून गेले आहे. येथे आत देह संबंधित लौकिक उरला नाही (२). सहा शास्त्रे, चार वेद, चौदा विद्या व अठरा पुराणे ही सर्व घोकून राहिले (३). श्रीनिवृत्तिनाथांचे प्रसादाने मी आता परमात्म्याची झाले. तो गोवळा तर मी गोवळी झाले (३). हा माझा भाव एक विठ्ठलच न्यहाळून पहात आहे (४).

**(२६९)**

**प्राण जाये प्रेत न बोले, चित्रीचे लेप न हाले । तैसे दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटी वो करी हे शब्दची वाऊगे ठेले रया ।।१।। आता आपणिया आपण विचारी । शेखी प्रकृती ना पुरुष निर्धारी ।।२।। आता प्रेताचे अळंकार सोहळे । का शब्द ज्ञाने जे डौरले । दीप ते देखती काही केले । ऐसे जाणोनिया शीण न मनी ती प्रतिष्ठा भोगिती भले रया ।।३।। बापरखुमादेविवरु विठ्ठल देखताचि जे बोधिले । ते तेणे सुखे होऊनी सर्वात्मक जे असताचि देही विस्तारले । येणे *निवृत्तीराये* खुणा दाऊनी सकळ । बोलता शिणु झणे होईल रया ।।४।।**

प्राण गेलेले प्रेत बोलत नाही, चित्राची अंशतःही हालचाल होत नाही, त्याप्रमाणे परमात्म्याचे ठिकाणी दृश्य, द्रष्टा दर्शन ही त्रिपुटीच खोटी आहे (१). आता आपल्या ठिकाणी आपण विचार करता शेवटी निधार्राने प्रकृती व पुरुष हे दोनी नाहीत, हेच दिसेल. (२) शब्दज्ञानाने मिरविणारे काही केले तरी आत्मप्रकाश पहात नाहीत व प्रेतावरील अलंकाराचे सोहळ्याप्रमाणे त्याना शीण न होता, ते फोल आहे असे न जाणता व्यवहारात कष्ट करून प्रतिष्ठा भोगतात हे आश्चर्य आहे (३). बापरखुमादेविवर विठ्ठलाला पहाताच ज्यांना खरा बोध झाला ते सुखी झाले. असतेपणाने जे सर्वात्मक आहे तेच या देहात विस्तारले आहे. या खुणा कळेसहित मला निवृत्तिनाथांनी दाखविल्या हे बोलतानाही कष्ट होतील (४).

**(२७०)**

**पृथ्वी आडणी आकाश हे ताट । अमृत घनवट आप तेज ।।१।।**
**नित्य हे जेविता तेज प्रकाशत । सर्वही गोमटी ब्रह्मद्वारे ।।**

**जेवणार भला जेवोनिया धाला । योगी जो निवाला परमहंस ।।२।।**
**चांदणा वोगरू दिसे परिकरु । नवनीत घातले व्योमी बरवे ।**
**निळिये परवडी शाक जाले निके । अंबट घाला तिखे प्रेम तेथे ।।३।।**
**गंगा यमुना तिसरीये सागरी । म्हणौनी प्रकारी क्षीर जाली ।**
**सोज्वळ ब्रह्मतेजे साखर सांजोरी । जेविता हे गोडी तोचि जाणे ।।४।।**
**इडा क्षीर घारी पिंगला गूळ वरी । त्यामाजी तिसरी तेल वरी ।**
**सुषुम्नेचे रूची तुर्या आतुडली । अहर्निशी जाली जेवावया ।।५।।**
**सितळ मिनला चंद्र अंबवडा । सुर्य जो कुरवडा खुसखुशीत ।**
**तया दोही संगे भाव हेचि मांडे । मग जेवा उदंडे एक चित्ते ।।६।।**
**पवित्र पापडु मस्तकी गुरू हस्त । म्हणऊनी अंकित तया तळी ।**
**सौरसाची गोडी जयासी लाधलीसे । उपदेशिता जाली अमृत फळे ।।७।।**
**कपट वासनेची करूनिया सांडई । शेवा कुरवडई गोमटी कीजे ।**
**गुरूचरणी लाडू करूनिया गोडू । मग जेवी परवडू योगीराजू ।।८।।**
**गुरू परमार्थे ग्रासुनिया भूते । क्षेम अवकाशाते आच्छादुनी ।**
**जेवणे जेविता ध्वनी उठे अंबरी । ते सुख अंतरी प्रेम वाढे ।।९।।**
**षड्रसाची उपमा देऊ म्हणो जरी । ब्रह्मरसा परते गोड नाही ।**
**येणे दहिभाते जेवणे हे झाले । तिखटही आले प्रेम तेथे ।।१०।।**
**अमृते जेविला अमृते आचवला । सेजे विसावला निरालंबी ।**
**मन हे तांबुल रंगले सुरंग । नव जाये अभंग कव्हणीकडे ।।११।।**
**कापूर कस्तुरी शुद्‌ध परिमळु । गोडियेसी गुळू मिळोनि गेला ।**
**सुमनाची मूर्ती सुमनी पूजिली । सुमनी अर्चिली कनक पुष्पी ।।१२।।**
**ऐसे नाना परीचे जेवण जाले । बाप निवृत्ती योगियाने वाढिले ।**
**ज्ञानदेव म्हणे धणिवरी जेविलो । *बापरखुमादेविवरे* विठ्ठले सुखिया नेलो ।।१३।।**

पृथ्वीचे आडणीवर आकाशाचे ताट ठेवून तेजोयुक्त जीवनामृत त्यात वाढले (१). हे जेवण नित्य जेवताना ब्रह्मतेज सर्वद्वारातून, इंद्रियातून प्रकाशमान झाले (२). यAप्रकारे जो परमहंस योगी शांत झाला तो भला जेवणारा जेवण करून तृप्त झाला (३). ज्या आकाशात चांदण्याचे भांड्यात नामाचे नवनीत घातले असून रुचकर असे नीलवर्ण भाजी आणि लोणचे आहे आणि तेथे आंबट तिखटाचे जागी प्रेम ठेवले आहे (४). गंगा, यमुना एकत्र होऊन सरस्वती सागरात क्षीर झाल्या. सकाराने उज्वल ब्रह्म हे ज्याची साखर आहे, इडा नाडी ही क्षीर आणि घारगा असून पिंगला नाडी ही त्यावरील गूळ होय. सुषुम्ना ही तेलची असून त्या रुचीने तुरीय अवस्था सापडली. त्या योगे रात्रंदिवस अखंडत्वाने आनंदाचे जेवण झाले (५). शीतल चंद्र हाच वडा, सूर्य हा खुसखुशीत कुरवडा, त्याबरोबर भावाचे मांडे असलेने एकचित्ताने आता मनमुराद जेवावे (६). मस्तकावर आलेला श्रीगुरूंचा वरद हस्त हा पवित्र पापड असून त्याचे चरणी मी अंकित होऊन राहिलो. ही प्रेमाची गोडी ज्याला लाभली तेथे उपदेशांबरोबरच अमृताची फळे आली (७). कपटवासना सांडून जीवभावाने श्रीगुरूची सेवा करून श्रीगुरुचरणाचे गोडीचे लाडू करून तो योगीराज आवडीने जेवण करतो (८). श्रीगुरू हाच ज्याचा परमार्थ ज्या योगाने पंचमहाभूतांचा ग्रास करून क्षमा अवकाशाने त्याला आच्छादन करून जेवण जेवीत असताना चिदाकाशात सोहं ध्वनी होताच त्या सुखाने अंतरात प्रेम वाढू लागते (९). षड्रसाची या जेवणाला उपमा द्यावी तर या ब्रह्मरसाची गोडी त्याला नाही. अशा प्रकारे दहीभाताचे जेवण झाले तोच रुचकर असे प्रेमाचे तिखट तेथे प्राप्त झाले (१०). अमृताने जेवला, अमृताने आंचवला, आणि निरालंब आत्मरूपाचे ठिकाणी ज्याने विश्रांती घेतली. मनाचा विडा रंगलेला असल्यामुळे हा रंग आता नाहीसा होणारा नाही (११). अंगाला लावलेला कापूर, गूळ, कस्तुरीचा परिमळ, गोडी आणि गूळ जसे एकरूप तसा मिळून गेला. सुमनाचे मूर्तीचे पूजन सुमनाने केले. सुमन कनक पुष्पाने अर्पण केले (१२). बाप योगी श्रीनिवृत्तिनाथ यानी वाढलेले नाना प्रकारचे हे जेवण जेऊन मी तृप्त झालो. बापरखुमादेविवर विठ्ठलाने मला सुखी केले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात (१३).

(२७१)

**अनुभवे अनुभव बोधा बोध आथिला । निःशब्दी निःशब्द नादावला ।।१।।**
**माझा श्रीगुरू ब्रह्म बोलणी बोलवितु । तेथील संकेतू कोण्ही नेणे ।।२।।**
**निवृत्ति प्रसादे म्या ब्रह्मची जेविले । ब्रह्म ढेकरी पाल्हाईले नेणोनिया ।।३।।**

अनुभवाचा जो अनुभव, बोधाचा बोध, निःशब्दाचे ठायी निःशब्दानेच निनादित झाला (१). असे माझे श्रीगुरू निवृत्तिनाथ ब्रह्माचे बोलणे बोलवीत आहेत परंतू तो संकेत कोणी जाणत नाहीत (२). श्रीनिवृत्तिनाथांचे कृपेने मी ब्रह्मच जेविलो आणि ब्रह्माचीच ढेकर देऊन तृप्त झालो (३).

***

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०
२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ..१९५२
३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८
४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९
५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१
६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२
७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३
८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)
९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४
१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र.....................................................१९७५
११) सिद्धस्तुती........................................................१९७७
१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.........................१९७९
१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................१९८३
१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र...............................(सन नाही)
१५) गुरुपाठ............................................................१९८४
१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४
१७) श्रीरामपाठामृत....................................................१९८४
१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४
१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र.............................१९८७
२०) नित्यपाठामृत......................................................१९८७
२१) संजीवनपाठ.......................................................१९८७
२२) श्रीदासरामवचनामृत................................................ १९८७
२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति...................................... १९८८

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२४) श्रीगोविंददर्शन....................................................१९८८
२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८
२६) श्रीदासरामगाथा....................................................१९८८
२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण.......................१९८९
२८) श्रीगुरुमहिमा......................................................१९९१
२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ.................................१९९७
३०) श्रीरामदासबोध....................................................१९९७
३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९
३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)..२००२
३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२
३४) आरती संग्रह.......................................................२००२
३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२
३६) हरिपाठ संकीर्तन...................................................२००७
३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना...................................२०१०
३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह.....................................२०१०
३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी...................................२०१०
४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०
४१) ग्रंथत्रमी.........................................................२०११
४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०११
४३) सद्बोध दशक......................................................२०११
४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध ...................................२०११
४५) श्रीदासराममहाराजलिखित लघुचरित्रे................................२०११
४६) श्रीदासराममहाराज यांची आत्म लहरी..............................२०११
४७) श्रीदासराममहाराज यांची प्रवचने...................................२०१२

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत(ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम(श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |
| तो हा दासबोध | ३६ | २०११ |
| श्रीदासराममहाराज चरितामृत (२ री आवृत्ति) | ३७ | २०११ |
| श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र ( ४ थी आवृत्ति) | ३८ | २०११ |
| श्रीदाजीसाहेबमहाराज चरित्र | ३९ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र | ४० | २०११ |
| श्रीदासराममहाराज यांची आत्म लहरी | ४१ | २०११ |
| हरिनामसंकीर्तन | ४२ | २०१२ |
| श्रीदासराममहाराज यांची प्रवचने | ४३ | २०१२ |
| प.प.सद्गुरु श्रीमामामहाराज केळकर चरित्र | ४४ | २०१२ |
| दासरामगीतम् | ४५ | २०१२ |
| श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (आवृत्ती तिसरी) | ४६ | २०१२ |
| चैतन्यब्रह्म | ४७ | २०१३ |
| श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी विवरण | ४८ | २०१३ |
| श्रीदासराममहाराजकृत विवरणासह सात करुणाष्टके | ४९ | २०१३ |
| श्रीगुरुलींगगीता | ५० | २०१३ |
| चिमड सांप्रदायातील पंचपदी (विवरणासह) | ५१ | २०१३ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-१) | ५२ | २०१४ |
| राम दास बोध | ५३ | २०१४ |
| श्रीदासरामायण | ५४ | २०१४ |
| वास्तुशांत | ५५ | २०१४ |
| श्रीदासराममहाराजकृत रेवणसिध्दपाठ (विवरणासह) | ५६ | २०१५ |
| गुरुलींगगीतेचे अंतरंग (भाग-२) | ५७ | २०१५ |
| अभंगदरबार (आवृत्ती दुसरी) | ५८ | २०१५ |
| श्रीदासरामचरित्र | ५९ | २०१५ |
| आत्मारामपाठ | ६० | २०१५ |
| श्रीज्ञानेश्वरी (अध्याय ६ वा)(श्रीदासरामकृत अर्थासह) | ६१ | २०१५ |
| श्रीमत् दासबोधातील प्रपंचयोग | ६२ | २०१५ |
| अभंग दरबार भाग-२ | ६३ | २०१५ |

## – सूची –


अकार उकार मकार १५५
अखंड हरि वाचेसी १५१
अमर रसव्दंव्द १८०
अठरा दिगांती हुनि ८०
अद्वैत अंबुला ९५
अद्वैत पेठे हुनी ८५
अनुपम्य तेजे १७९
अनुभव खुण १६२
अनुभवे अनुभव १८६
अनंत अनंतापटी १६६
अमित्व भुवनी १७१
अरे अरे ज्ञाना ज्ञान १७७
अरे अरे ज्ञाना ज्ञान १७८
अरे अरे ज्ञाना झालासी १७३
अरे स्वरूपा कारणे १७६
अवघड ते एक १८२
अवचिता परिमळु १३५
अवेवी सावेव १७३
अष्ट दल पाहे १०३
अष्टभावे भोगिता ९६
अंतरीच्या सुखा १६५
अंबुला माहेरी ९५
अंबुला विकुनि ९७
अंबुला होता तो ९८
आकानि केले ५५
आकारे विण पाळणा ७९
आगरीचे क्षीरसागरी १४४
आजिवरी होते मी १०७
आजी शुभ लवे १२९
आजी सोनियाचा १६०
आठविता नुपुरे ८१
आणिक पाईक ९०
आतसि कुसुम कोश ३१
आधारचक्री निवणे ११४
आधी चरे पाठी १४२
आनंदले वैष्णव १५२
आनु नेणे काही ५७
आनंदाच्या ताटी ४४
आपुले काही न १८१
आवघाची संसार ४५
आवेगे ज्ञान जननी १५७
उंच पताका १५८
एकांति बाळा १४
एकी धावे सुनाट १०६
एकी म्हणे भाव ४६
एकुची एकला ८९
ऐसा अवतार नरहरि ३४
ऐसे हे अंडज १७५
कल्पद्रुमातळी ७०
कल्पना वृक्षासी ४८
कापुराचे कळीवर १६१
कान्हया गोवळु १२०
काय करिसी सकळ १४५
कासयाची चाड मज १०३
काही नव्हे तो ९
काळिये रात्रीचा ७६
काळी कोसी कपिला १४३
काळे ना सावळे ८५
काळेपणाचा आवो ३६
कुंचे पताकांचे १५९
कृष्णे वेधिली १२५
कैवल्याचे रोप १६३
कोवळे ठुसठुशीत ७८
खळे दान देसी १५६
गाई चालिल्या ६९
गायी तिचे निरंजनी १४२
गुणाचे नि आरोपे १२८
गुणे सुकुमार ७४
गोकुळी कमळ ६४
गोवलेपणाची बुंथी ७२
घनु वाजे घुणघुणा १३४
घोंगडी घेवोनी ८४
चतुरपणे चतुराननु ३२
चवाळ्याची सांगेन ८७
चंचळ चांदणे ३३
चालता लवडसवडी ११७
चित्तिचे चैतन्य १४८
चिदानंदरूप १
चौदा भुवनी १८१
चौऱ्यांशी लक्ष ८३
जटिल धुळ धुसिर ६२
जन्मा आवर्ती १६४
जन्मोजन्मीच्या सायासी ५९
जया ते पाहता ५३
जरासंद मल्ल ७
जळधाराच्या धारी १११
जागता निज आले ९१
जागृती पुसे साजणी १२२
जायाची घोंगडी ८८
जाले नि पाईक ८८
जियेचा अंबुला ९६
जीवाचिया जीवा १३५
जे येथे होते ५२
जोडुनिया जोडी ५५
ज्ञान विज्ञान हरी १२
ज्ञान हेचि गाय ११५
ज्याचिये आवडी १३७
ज्याचे गुण नाम ३७
ठाकुनि आलिये तुजपाशी १०९
तत्त्वता पै तत्त्व १४९
तत्त्वे तत्त्व धरी ४६
तळवे तळवटी ५८
तिही त्रिपुटी १४३
तुजविण येकली ११०
तुज सगुण म्हणो ३२
तुझिये निढळी ७७
तुझे घोंगडे ८३
तुरे कांबळा डांगेवरी ३०
त्रिभंगी देहुडा २९
तू माझा स्वामी ८८
तृप्ती भुकेली १६८
त्रिपुटी भेदूनी ५५
त्रिभुवनीचे सुख १३१
त्वचेचिया राना १०८
दुजे द्वैत सांडी ४६
दुडीवरी दुडी ११८
दुरळु अंबुला ९६
दृश्यादृश्य नातळे १६४
देऊनिया भेटी १३८
देखिले तुमचे १६८
देव आहे जैसा ३४
देह दंडुनी पाईक ९०

द्वैताद्वैत विरहित १०१
न गमे हा संसारु ९४
न चलीत शब्द ४५
नभ नभाचेनि झळे २१
नवल देखिले ३
नागोठणी गोपाळ ७१
निजगूजा गूज ८
निज ब्रह्मा ९
निरंजना गाई ८६
निरालंब घोंगडे ८५
निर्गुण चवाळे ८७
निळियेच्या निशी १२७
निळिये निकटे १२७
निळिये पेरणी ६
निळिये मंडळी ५
निळीये रजनी ३७
निळे हे व्योम २५
नीलवर्ण रज ६
नेणो विठो मार्ग ५४
पतीचा जिव्हाळा १४७
पदोपदी निजपदा १६३
परे पडे मिठी १७०
परेसी जव पाहे १७४
पहाते पहाणे १७९
पंचविसा वेगळे १६७
पंढरीचा निळा १३२
पंढरीचे वाटे ४७
पाईका मोल नाही ८९
पाच पाट्या नव ८१
पाते जोनि देवकासि ५२
पावया छंदे ७८
पाव या लुब्ध जाला ६८
पाळण्याची परी ८०
पांचा दमांचा घोंगडा १२२
पूर्व जन्मी सुकृते १५९
पूर्व दिशे भानू १४६
पृथ्वी आडणी १८३
पेंढारा दाऊनिया १३६
पैल गोल्हाट मंडळ १०
पैल तो गे काऊ १३३
पैल विळाचिये १२६
पैल सुखाचेनि २६
प्रकृतीचे पूजन १६३
प्रभा कळीकादीप १४०
प्राणा जाये प्रेत १८३
प्राणाची पै सुखी १५०
प्राणासवे सखी १४९
बरवा हो हरी बरवा ३१
ब्रह्माचा गोंडा ८६
ब्रह्मादिका आठवू ७
ब्रह्मी ब्रह्म होणे १६९
भक्तिचिया चाडा ६७
भवाब्धि सागरी ६१
भाग्याचा उदयो १५५
भेटिसी गेलिये १४१
भोवरी सांडुनी ७७
मज तुरंबा का १०९
मदनमूर्ति तू ७५
मदन मूर्ति विश्वी ४१
मन मारुनि डोळा ३६
मन मुरडोनि २
मन मुरडोनि १२७
मनाचा भाव माझा २०
मने करूनि कुटिल १२४
ममता पुसे सये १४८
माझीया घोंगडियावरी ८४
माझी शंका फिटले १२१
माझेच वाळे ८६
माझे जीवीची आवडी ४८
माथे टेकित बाह्या ६९
मायबापे आमुची १३१
माया विवर्जित १८२
मी पण माझे हरपले १०७
मी माझे द्वैत १६६
मी माझे म्हणता १३५
मूळ ना डाळ शाखा ४
मे दूर्थि कर १०९
याती कुळ माझे १३७
येऊनी वऱ्हाडिणी १५१
येणे रुपे पाहावासी १२४
येरी म्हणे भेद सृष्टी १०४
योगिया मुनिजना ६८
रवितेज किरण १७५
रात्री दिवस ८२
राम बरवा कृष्ण ३८
रांगतु रंगणी ११९
रूप पाहता लोचनी १
लक्ष लावुनी अंतरी ७३
लाउनि मनगमीची २८
लेकुरे नसतील काय ११२
लेवुनि अंजन १६५
वऱ्हाड न होता १००
वाजतसे बोंब ४९
वाराणसीयात्रे जाईन ६०
विचारिता देही ९४
विज्ञानाचे ज्ञान ११
विवेक नदीये बैसोनी ५९
विश्व भुलवी १०
वृंदावनी आनंदु रे ७६
वेद प्रमाण करावया २३
व्यक्ता व्यक्त दिठी १६१
शरीर हे स्थळ ५६
शर्कराची गोडी १५६
शामचिया घरा १२३
शुद्धमती गती १७२
शून्य नाही निरशून्य ८१
श्रवणे कीर्तने १५३
श्रुति स्मृति वचन ८
सखी म्हणे बाई १०५
सखी सांगे सार १०५
सगुण अंबूला ९८
सत्त्व रज तम १६७
सद्गुरू सारिखा १६९
समसुखे शेजे १७०
सम्यक् करी शांती १०४
सर्वा आदि सर्व ८
संत भेटती आजी १५४
साई खडियाते १४५
साकारू निराकारू १७१
साती बारी दोनी ३९
साध्य साधन १७२
सारंग धरू तो १०
सारासार दोन्ही १३
सावळा सुकुमार १६८

| | |
|---|---|
| सावळियाचे तेज | २६ |
| सावळिये बुंथी | १२३ |
| सावळी प्रतिमा | १२९ |
| सावळीये निळी | १०६ |
| सावळेचे तेज | १३ |
| सावळे परब्रह्म | १२६ |
| सांगाति आमुचिया | ७५ |
| सुख शेजारी असता | १३९ |
| सुखाचा सुखनिधी | ९९ |
| सुखाचिये गोठी | १३३ |
| सुनीळ गगना मालटु | २७ |
| सुंदर सुरेख वोतिले | ३ |
| सूक्ष्म साध्य काज | १७८ |
| सूची अंबुला ज्ञान | ९७ |
| सोळा कळी चंद्र | १५६ |
| स्वरूपाचे नि भावे | ९८ |
| स्वर्ग जयाची सालोखा | ३४ |
| स्वामीचे कृपेने | १७६ |
| हमामा घाली बाळा | ९३ |
| हमामा रे पोरा | ९१ |
| हरपली सत्ता | २ |
| हरिप्रेम सरोवरी | ७२ |
| हे नव्हे आजि कालिचे | ५० |
| क्षीरसागरीचे निज | ५२ |


******